

चीनचें आक्रमण व गांधीवाद



श्रीपाद जोशी

चीनचें आक्रमण

व

गांधीवाद

श्रीपाद जोशी

विदर्भ मराठवाडा बुक कंपनी : पुणे

प्रकाशक
अ. ज. प्रभु
विदर्भ मराठवाडा बुक कं.
१३२० शुक्रवार : पुणें २

●

●

प्रथमावृत्ति
२६ जानेवारी १९६३

●

मूल्य रु. ३-५०

●

आवरण :
सुधाकर खासगीवाले

●

मुद्रक :
वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय
३९५ सदाशिव : पुणें २

वि ष या नु क्र म

म्हणजे बेसावधपणा नव्हे !– सैन्यांतील राजकारणाचा परिणाम – श्री. रा. कृ. पाटील यांचे अभिप्राय – पक्षपाती तटस्थता – आमची तयारी झालेली नव्हती – थंड प्रदेशास न सरसावलेले सैनिक – आमचीं शस्त्रें मागासलेलीं होतीं – सारेजण सारखेच गुन्हेगार–अपुरी साधनसमुग्री.

४. गांधीवाद्यांचा गांधीवाद [पृष्ठें ९१ ते १३५]

दोन गांधीवादांतील फरक – गांधींचा जनसंपर्क – सर्व सेवा संघाची भूमिका – सर्व सेवा संघाच्या अधिवेशनांतील चर्चा – मध्यस्थीचा मार्ग – दिल्ली ते पेकिंग 'मैत्रीयात्रा' – अन्यायाचा प्रतिकार कसा करणार ? – युद्ध थांबणें महत्त्वाचें कीं अन्याय दूर होणें ? – शांतिसेनेचें मर्यादित क्षेत्र — शांतिसैनिकाचें प्रतिज्ञापत्रक – गांधीजींची शुद्ध अहिंसा – गांधी स्मारकनिधीची भूमिका – एक आदर्श व अनुकरणीय कार्यक्रम.

५. पुढें काय ? [पृष्ठें: १३६ ते १६८]

युद्धाची संभाव्य व्याप्ति–खरी लढत लडाखसाठीं–भारतीय शहरांवर बॉंबवर्षाव–तेजपूरचा अनुभव–मनांत गोंधळ नको !–रस्त्यांचें जाळें विणलें पाहिजे–साम्यवाद्यांचा नवा साम्राज्यवाद- स्वप्नाळूपणा गेला आहे काय? – गांधीवाद्यांचा भोळेपणा–मुसलमानांच्या बाबतींतहि तेंच–श्री रा. कृ. पाटील यांचा अनुभव–नेहरु विरोधक – देशद्रोही ? – तटस्थता खरी असावी – इतरांकडून अवश्य मदत घ्यावी–अंतर्गत सामर्थ्य वाढविलें पाहिजे --समाजकंटकांना जरब बसली पाहिजे – कॉंग्रेसदेश ? –आम्हांला शेजारी मित्र हवेत–सत्यालाहि प्रचाराच्या कुबड्या हव्यात–सत्याच्या विजयासाठीं कंबर कसू या !

भूमिका

२० ऑक्टोबर ते २० नोव्हेंबर (१९६२) या एका महिन्यांत सबंध भारतवर्षाचें मन जसें व जितकें ढवळून निघालें तसें व तितकें यापूर्वींच्या ज्ञात इतिहासांत कधींच ढवळून निघालें नव्हतें. त्या एका महिन्यांत ज्या घटना घडल्या त्यांनीं जणूं सारा जुना इतिहास पुसून टाकून एक नवाच इतिहास निर्माण केला—आमच्या गाफीलपणाचा, भ्याडपणाचा, क्षुद्र स्वार्थीपणाचा, आणि त्याचबरोबर आमच्या अभंग आत्मविश्वासाचा, अप्रतिम शौर्याचा व तेजस्वी त्यागाचाहि इतिहास !

भारतावर यापूर्वीहि अनेकदां परकीयांचे हल्ले झाले आहेत आणि त्यांत भारताला मारहि खावा लागला आहे; परंतु विसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत सारें जग शांततेचा मंत्र जपत असतां, शांतीसाठीं आतुर झालें असतां, 'मुँहमें राम व बगलमें छुरी' अशा थाटांत 'हिंदी चिनी भाई भाई'च्या घोषणा देत देत, साम्यवादाचा उद्घोष करणाऱ्या चीननें दगलबाजपणें भारतावर जो हल्ला केला आणि भारतीय प्रदेशांत घुसून भारतीय सैन्याला नामुष्कीनें माघार घ्यावयास जें भाग पाडलें, त्याला मात्र भारताच्या इतिहासांत तोड नाहीं. आजवर दुर्लंघ्य समजला गेलेला हिमालय शत्रूला सहज पादाक्रांत करितां येतो, भारताचें रक्षण करण्यास यापुढें तो समर्थ रहाणार नाहीं, म्हणून त्याच्यावर विसंबून राहून चालणार नाहीं, हा फार मोठा बोध या चिनी हल्ल्यामुळें भारताला घ्यावा लागला आहे.

शांततेच्या काळांतील नेतृत्व युद्धकाळांत प्रभावी ठरत नाहीं, असा साऱ्या जगाचाच अनुभव असल्यामुळें भारताचें नेतृत्व शत्रूच्या हल्ल्याचा रेटा सहन करूं शकलें नसल्यास आश्चर्य नाहीं; परंतु मुक्या मेंढरांसारखी दुबळी भासणारी भारतीय जनता शत्रूचा हल्ला होतांच वाघ बनली आणि तिनें आपल्या ऐक्याच्या जोरावर लटपटणाऱ्या नेत्यांना सांवरून धरलें, पराभव होत असतांहि शरणागति पत्करूं दिली नाहीं, हा एक अद्भुत चमत्कार जगाला पाहायला मिळाला. नेते गडबडले तरी जनता गडबडली नाहीं. ज्यांच्यावर लोकांच्या संरक्षणाची जबाबदारी होती ते अधिकारी तेजपूरमधून जीव घेऊन पळाले, परंतु तेथील स्थानिक लोक मात्र खंबीरपणें शत्रूशीं सामना द्यायला पाय रोवून उभे राहिले, हें दृश्य अभिमानास्पद नाहीं, असें कोण म्हणेल ?

या सर्व घटनांचा आढावा तटस्थपणें घेण्याचा प्रयत्न या छोट्याशा पुस्तकांत

करण्यांत आला आहे. राष्ट्रपिता गांधीजींनीं या देशाला अन्याय-प्रतिकाराची दिलेली शिकवण ही एक फार मोठी देणगी आहे, असें मी समजतों. मी स्वतः स्थूल अर्थानें गांधीवादी नसलों तरी गांधीप्रेमी व गांधी-परिवारांतील आहें. थोर गांधीवादी पुढारी व कार्यकर्ते यांच्याशीं माझे आत्मीयतेचे व स्नेहाचे संबंध आहेत. या आत्मीयतेच्या आधारावरच मी त्यांच्यावर परखडपणें टीकाहि करीत असतों. त्या टीकेमागील स्नेहाची कल्पना असल्यामुळेंच गांधीवादी मंडळी त्याबद्दल राग मानीत नाहींत.

अर्थात् हीच उदारता राज्यकर्त्या पक्षाकडून दाखविली जावी, अशी अपेक्षा बाळगणें बरोबर होणार नाहीं. कॉंग्रेस म्हणजेच देश (आणि नेहरू म्हणजे कॉंग्रेस हें तर निर्विवादच आहे!) असें समीकरण मानणारे व इतरांनीं तें मानलें पाहिजे असा आग्रह बाळगणारे मित्र कॉंग्रेसवरील किंवा पंडितजींवरील टीका सहन करूं शकले नाहींत आणि नेहरूंचे नुसते हात बळकट करण्याऐवजीं त्यांचे लटपटणारे पाय व धडधडणारें हृदय बळकट करा असें म्हणणाऱ्यांना त्यांनीं देशद्रोही ठरविलें तर त्याबद्दल आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. अशा मित्रांच्या माहितीसाठीं एवढेंच सांगावयाचें कीं असें म्हणणारी सारीच मंडळी राजकीय किंवा वैयक्तिक स्वार्थानें बरबटलेली नसतात, तर देशाच्या स्वातंत्र्य लढ्यांत सर्वस्व पणाला लावून लढलेल्या सैनिकांपैकींच तीं असतात. व्यक्तिशः माझ्या बाबतींत बोलावयाचें तर सत्य, न्याय, मातृभूमीचा मान, तिची इज्जत या गोष्टी कोणाहि व्यक्तीपेक्षां किंवा पक्षापेक्षां श्रेष्ठ आहेत, असें मी मानतों. ज्यांनीं आपल्या देशभक्तीचें मोल मंत्रिपदांच्या रूपानें पदरांत पाडून घेतलें किंवा अन्य अर्थप्राप्तीच्या व मानमरातबाच्या जागा मिळविण्यासाठीं वाटेल त्या भल्याबुऱ्या मार्गांचा अवलंब केला त्यांच्याकडून देशभक्तीचे धडे मीं घेतले पाहिजेत, असें मला वाटत नाहीं. म्हणून त्यांच्या रागा-लोभाची पर्वा न करितां मीं माझे विचार स्पष्टपणें मांडले आहेत. अर्थात् माझे विचार हे एका व्यक्तीचे नसून सर्वसामान्य देशभक्त भारतीयांचेंच ते प्रतिनिधित्व करतात, याविषयीं मला मुळींच शंका नाहीं.

चीनचें आक्रमण व गांधीवाद या विषयाची चर्चा करितांना सत्ताधारी पक्षावर टीका करण्याची काय जरूर आहे, असा प्रश्न कदाचित् कोणी उपस्थित करतील. त्याला माझें उत्तर असें कीं देशाच्या रक्षणाची जबाबदारी ज्या सरकारवर होती त्यानें ती कितपत पार पाडली हें पाहिल्याखेरीज या विषयाचें

सर्वांगीण विवेचन होणेंच शक्य नव्हतें. त्या अनुषंगानें सरकार व सत्ताधारी पक्ष यांच्या कर्तृत्वाचा विचार करणें अपरिहार्य होतें. परंतु त्यापेक्षांहि महत्त्वाचें कारण असें कीं सत्ताधारी पक्ष आपल्या सोयीप्रमाणें – विशेषतः जनतेकडून मतें मिळविण्याच्या वेळीं – उठल्यासुटल्या गांधीजींचें नांव घेत असतो; आणि गांधीजींच्या परंपरेचा वारसा सांगत असतो. अशावेळीं गांधीवादासंबंधीं विचार करितांना सत्ताधारी पक्षाच्या कर्तबगारीचाहि विचार करणें आवश्यक आहे, असें वाटल्यानें जरूर तेथें त्या पक्षाविषयींहि उल्लेख आलेला आहे.

चिनी आक्रमणाविषयीं बोलतांना तें साम्यवादी चीनचें आक्रमण आहे, असें म्हटलें कीं भारतांतील साम्यवादी मित्रांना राग येतो. परंतु इतिहासाच्या अभ्यासकाला हें सहज दिसून येईल कीं चीन साम्यवादी बनल्यानंतरच, किंबहुना तो साम्यवादी बनल्यामुळेंच त्यानें भारताच्या पाठींत हा सुरा खुपसला आहे. अशा प्रकारें दगाबाजीनें हल्ले करणें हा लांडग्याप्रमाणें साम्यवादाचाहि मूळस्वभाव आहे, आक्रमण हें त्याच्या रक्तांतच भिनलेलें असतें आणि रशियाप्रमाणें आसपासचा मुलूख आकंठ गिळंकृत केल्याखेरीज साम्यावादी चीन स्वस्थ बसणार नाहीं, हें भारतीय नेत्यांनीं ओळखलें पाहिजे, हें सांगण्यासाठींच त्या विषयाची सांगोपांग चर्चा या पुस्तकांत करण्यांत आलेली आहे.

अर्थात् या पुस्तकांत कांहीं व्यक्ती, पक्ष व विचारप्रणाली यांवर कठोरपणें टीका करण्यांत आलेली असली तरी ती केवळ देशहिताच्या बुद्धीनें करण्यांत आलेली आहे, तिच्या मागें लेखकाचा कसलाहि स्वार्थी हेतु नाहीं. कारण लेखक कोणत्याहि पक्षाचा सभासद किंवा प्रचारक नाहीं; अथवा कोणाची स्तुति-निंदा करून त्याला कांहीं मिळवावयाचें नाहीं. अशा स्थितींत सर्व संबंधितांनीं या विवेचनाकडे पूर्वग्रहरहित दृष्टीनें पाहावें, एवढीच विनंती.

हें पुस्तक लिहून तयार झाल्यानंतर कोलंबो येथील सहा तटस्थ आफ्रो-एशियाई देशांनीं चीन-भारत संघर्षाच्या बाबतींत सुचविलेली योजना प्रसिद्ध झालेली असून ती भारतीय संसदेला सादर करण्यांत आली आहे. या योजनेचें स्वरूप थोडक्यांत असें सांगतां येईलः—

(१) लडाखमध्यें चीननें सध्यांच्या प्रत्यक्ष ताबारेषेपासून २० किलोमीटर (साडेबारा मैल) मागें जावें, भारतानें आपलें सैन्य जेथें आहे तेथेंच ठेवावें, आणि चिनी सैन्य मागें घेतलें गेल्यानंतर निर्माण होणाऱ्या प्रदेशाचें निर्लष्करीकरण करून तेथें उभयतांच्या मान्यतेनें मुलकी चौक्या उभाराव्यात.

(२) नेफा विभागांत मॅकमहोन रेषा हीच प्रत्यक्ष ताबारेषा मानण्यांत आलेली आहे. त्या रेषेवर दोन्ही सैन्यांनीं युद्धबंदी करावी आणि थाग ब्लिड (थाग ला रिज) व लोंगजू यांसारख्या वादग्रस्त प्रदेशांचा प्रश्न वाटाघाटीनें सोडवावा.

(३) मध्यविभागांतील बाराहोतीसारख्या वादग्रस्त प्रदेशाचा प्रश्न परस्पर विचारविनिमयानें सोडवावा.

या योजनेमध्यें चीननें ८ सप्टेंबर १९६२ च्या प्रत्यक्ष ताबारेषेपर्यंत मागें हटलें पाहिजे, ही भारताची अट पूर्णांशानें नसली तरी बव्हंशीं पुरी होत आहे, त्यामुळें ही योजना मान्य करावी, असाच संसदेचा कल दिसून आल्यास आश्चर्य नाहीं. आपला पक्ष पराभूतांचा असल्यामुळें आपण सध्यांतरी या बाबतींत फार ताणून धरूं शकणार नाहीं हें उघड आहे. अर्थात् चीननेंच ती फेटाळली तर प्रश्नच मिटला !

परंतु याच वेळीं तिबेटमध्यें व सिक्कीमच्या सरहद्दीवर चिनी फौजा प्रचंड संख्येनें गोळा होत असल्याच्या बातम्या येत आहेत. या फौजा तेथें वनभोजनासाठीं आल्या असण्याची फारशी शक्यता नाहीं ! त्यामुळें एका बाजूनें शांततेचीं बोलणीं चालू ठेवून दुसऱ्या बाजूनें आक्रमणाची तयारी करण्याचा जुनाच डाव कम्युनिस्ट चीन खेळत आहे असें दिसतें. यापुढें त्याच्या या दगलबाजीला आपण बळी पडणार नाहीं अशीं आश्वासनें राष्ट्राचे सरकारी नेते देत आहेत; परंतु मागील अनुभवाचा विचार करितां जनतेनें सतत जागरूक राहून आपल्या नेत्यांना सावध ठेवलें नाहीं तर ते कोणत्याहि क्षणीं शत्रूच्या जाळ्यांत अडकण्याची शक्यता आहे, म्हणून यापुढें देशरक्षणाच्या बाबतींत साऱ्या जनतेनेंच विशेष जागरूक राहिलें पाहिजे. आपण कां व कसें जागरूक राहिलें पाहिजे, याची सविस्तर चर्चा या पुस्तकांत करण्यांत आली आहे. त्यायोगें सर्वसामान्य वाचकालाहि चीन-भारत संघर्षाची वैचारिक भूमिका समजेल आणि स्वतःच्या कर्तव्याचीहि कल्पना येईल अशी आशा आहे.

विदर्भ मराठवाडा बुक कंपनीचे चालक श्री अ. ज. प्रभु यांनीं हें पुस्तक लिहिण्याची प्रेरणा मला दिली, इतकेंच नव्हे तर अल्पावधींत तें मजकडून लिहवूनहि घेतलें, याबद्दल माझ्याप्रमाणेंच मराठी वाचकहि त्यांचे आभार मानतील, यांत शंका नाहीं.

नेताजी सुभाष जयंती
२३. १. १९६३.

श्रीपाद जोशी

१

बर्फ पेटलें !

जनतेची झोंप उडाली :

२१ ऑक्टोबर १९६२ !

झोंपीं गेलेली भारतीय जनता खडबडून जागी झाली ती वृत्तपत्रविक्रेत्यांच्या आरोळ्यांनीं ! 'दगलबाज चीनचा भारतावर हल्ला !' झाल्याच्या वार्ता ऐकून व वाचून भारतांतीलच नव्हे तर जगांतील तमाम लोकांना आश्चर्याचा धक्का बसला. भारताशीं शत्रुत्व करण्यासाठींच जन्माला आलेलीं पाकिस्तानसारखीं कांहीं नतद्रष्ट राष्ट्रें वगळलीं तर इतर देशांना भारतावरील चीनच्या या तिरस्करणीय हल्ल्यानें दुःखहि झालें व चीडहि आली.

जो तो विचार करूं लागला, हें कसें घडलें ? कां घडलें ?

अनाकलनीय हल्ला :

२० ऑक्टोबर १९६२ रोजीं पहांटे चीननें भारतावर हल्ला केला आणि तुफान वेगानें आगेकूच चालविली. वाऱ्यानें पत्त्याचे बंगले ढासळावेत, तशीं भारतीय ठाणीं धडाधड कोसळूं लागलीं. आजवर अभेद्य समजला गेलेला हिमालयाचा तट हां हां म्हणतां ढांसळला आणि थंड बर्फ पेटून उठलें. शौर्या-बद्दल जगांत ख्याति मिळविलेल्या भारतीय सैनिकांचा—शीख, गुरखा, डोग्रा, कुमाऊँ, मराठा, रजपूत, कुणाचाच—चिनी सैन्याच्या माऱ्यापुढें टिकाव लागेना. आपल्या पराभवाच्या बातम्या वाचून भारतीय लोक अधिकाधिक चिंतित

होऊं लागले. परंतु त्यांच्या मनांत चिंतेपेक्षांहि अधिक महत्त्वाचा असा एक प्रश्न होता. ज्याच्या गळ्यांत गळा घालून आपण कालपर्यंत 'भाई भाई' म्हणून नाचलों, त्या चीननें आपल्यावर हा नीच हल्ला कां केला असावा? चीन-भारत संघर्षाच्या बाबतींत सर्वांत अधिक अनाकलनीय गोष्ट हीच आहे. अजूनहि हें कोडें समाधानकारकपणें कोणालाच सुटलेलें नाहीं.

जगाच्या इतिहासांतील एक अभूतपूर्व युद्ध :

चीननें दगलबाजपणें भारतावर लादलेलें हें अघोषित युद्ध जगाच्या इतिहासांत एक अभूतपूर्व युद्ध समजलें जाईल. त्याचीं अनेक कारणें सांगतां येतील. त्यांपैकीं कांहीं अशीं :—

(१) हें युद्ध मुळांत केव्हां सुरू झालें तें भारतीय जनतेला कळलेंच नाहीं; किंबहुना भारताच्या राज्यकर्त्यांनाहि तें कळलें नसावें, किंवा कळलें असल्यास त्यांनीं त्याच्याकडे दुर्लक्ष तरी केलें असावें, अथवा जाणीवपूर्वक भारतीय जनतेपासून तें वृत्त त्यांनीं लपवून ठेवलें असावें, असें वाटतें. कारण चिनी सैन्यानें ७ ऑक्टोबर १९५० रोजीं तिबेट व्यापलें आणि भारतावरील स्वारीचें प्रस्थान ठेवलें. त्यानंतर चार वर्षे चांगली तयारी करून १७ जुलै १९५४ पासून चीननें भारतीय प्रदेशावर आपला हक्क सांगण्यास सुरुवात केली. १९ एप्रिल १९६० रोजीं चीनचे पंतप्रधान श्री चौ-एन्-लाय यांनीं भारताला भेट देऊन भारताच्या पंतप्रधानांशीं सहा दिवस बोलणीं केलीं (व हीं बोलणीं फिसकटलीं !) तोंपर्यंत चीननें भारताचा पुष्कळच प्रदेश बळकावला होता. तरीहि 'हिन्दी–चिनी भाई भाई' अशी घोषणा करीत आपण खुळ्यासारखे चिनी आक्रमकांना प्रेमानें मिठ्या मारीत राहिलों. २० ऑक्टोबर १९६२ रोजीं ईशान्य सरहद्द विभाग (North-East Frontier Agency – नेफा) आणि लद्दाख (लडाख) या भारतीय प्रदेशांवर चीननें प्रचंड सैन्यानिशीं चढाई केली व पहिल्याच सपाट्यांत शेंकडों चौरस मैल प्रदेश व्यापला. तोंपर्यंत सर्वसामान्य भारतीय जनता या चिनी आक्रमणाच्या बाबतींत जवळजवळ अंधारांतच होती. आपल्या देशावर झालेलें परक्यांचें आक्रमण आठ-दहा वर्षेपर्यंत आपल्या जनतेपासून लपवून ठेवणारें भारतीय सरकार हें बहुधा जगांतील पहिलेंच अजब सरकार असेल ! चीनच्या आक्रमक

हालचालींचा ज्यांना सुगावा लागला होता किंवा संशय आला होता त्यांनीं कायदेमंडळांतून व जाहीर सभांतून सरकारला या भावी संकटाचा इषारा दिला होता; परंतु त्यांना ‘युद्धखोर’ ठरवून त्यांच्या इषाऱ्याकडे भारतीय राज्यकर्त्यांनीं दुर्लक्ष केलें, ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. भारताऐवजीं दुसरा एखादा देश असता तर त्यानें चीनच्या आक्रमक हेतूंचा नुसता संशय येतांच त्याविरुद्ध प्रचाराचें रान पेटविलें असतें आणि त्या दिशेनें हालचाली करण्यास सुरुवात केली असती; परंतु प्रत्यक्षांत घडलें मात्र अगदींच उलटें !

(२) जगांतील कोणतेंहि युद्ध सुरू होण्यापूर्वी तें कोणत्या मुद्यांवर सुरू होत आहे, याची स्पष्ट कल्पना आक्रमक पक्ष आपल्या जनतेला देतो आणि त्यांच्या पुष्टयर्थ खरीं-खोटीं कारणें जगासमोर मांडून युद्ध सुरू झाल्यानंतर आपली बाजू कशी बरोबर आहे, हें तटस्थ जगाला पटविण्याचा प्रयत्न करतो. त्यावरून इतरांना त्या युद्धाविषयीं कांहींतरी कल्पना येऊं शकते. परंतु चीननें भारतावर लादलेलें हें अघोषित युद्ध एक प्रकारें झोंपलेल्या शेजाऱ्याच्या डोक्यांत धोंडा घालण्यासारखें आहे. बरें, त्या शेजाऱ्याशीं वैर बाळगण्यास कांहीं कारण झालें असेल असें म्हणावें, तर तेंहि जगापुढें आलेलें नाहीं. उलट, स्वतंत्र जगाचा, लोकशाही राष्ट्रांचा रोष ओढवून घेऊनहि कम्युनिस्ट चीनला संयुक्त राष्ट्रसंघांत प्रवेश मिळवून देण्याचा जोराचा प्रयत्न भारतानें चालविला होता. त्यामुळें हें युद्ध कां चाललें आहे हेंच जगाला, किंबहुना भारत-चीनच्या जनतेलाहि नीट कळलेलें नाहीं. त्यामुळें आपली भूमिका आशियांतील तटस्थ देशांना समजावून देण्यासाठीं भारताच्या उच्चपदस्थ मंत्र्यांना व राजदूतांना खूप धांवपळ करावी लागली. चीनच्या सैन्यानें भारतीय भूमीवर प्रथम आक्रमणाचें पाऊल ठेवलें तेव्हांच भारतानें आरडाओरडा करून जगाचें लक्ष त्याकडे वेधून घेतलें असतें तर ऐनवेळीं अशी धांवपळ करण्याची जरुरी भासली नसती.

(३) मोठ्या प्रमाणावर प्रत्यक्ष युद्ध सुरू होऊन कित्येक दिवस लोटले तरी दोन्ही देशांनीं युद्ध जाहीर केलेलें नाहीं, अथवा एकमेकांशीं असलेले राजनैतिक संबंधहि तोडलेले नाहींत. दोन युद्धयमान राष्ट्रांतील हे परस्पर-संबंध ‘कौतुकाचा विषय’ बनले आहेत. त्यामुळें पाकिस्तानसारख्या भारताला शत्रु मानणाऱ्या राष्ट्रांना भारताविरुद्ध प्रचार करण्यास चांगलीच संधि

मिळाली. ज्याअर्थी भारत-चीनचे राजनैतिक संबंध कायम आहेत व भारतानें पाकहद्दीवरील आपल्या सेना – लडाख-नेफा हद्दीवर चीनकडून पराभव होत असतांहि – हलवून रणांगणावर नेल्या नाहींत, त्याअर्थी चीन-भारतांतील हें तथाकथित युद्ध म्हणजे लुटुपुटीची लढाई किंवा किरकोळ सीमातंटा आहे, असा धोशा पाकिस्ताननें लावला होता. एखाद्या युद्धाबद्दल त्रयस्थांना असा विपरीत प्रचार करतां यावा ही एक अद्भुतच गोष्ट म्हटली पाहिजे.

(४) गाफील भारतावर एक महिनाभर जोराची डुक्करमुसंडी मारून चीननें २० नोव्हेंबर १९६२ पर्यंत सुमारें अडीच हजार चौरस मैलांचा भारतीय मुलूख व्यापला आणि त्या दिवशीं अकस्मात्पणें एकतर्फी युद्धतहकुबीची घोषणा केली; इतकेंच नव्हे तर युद्धानें जिंकलेला मुलूख स्वखुषीनें खाली करण्यांत येईल असेंहि जाहीर केलें व त्याप्रमाणें कांहीं भागांत माघारहि घेतली. पराभूत पक्षाकडून शरणागति मिळविल्याखेरीज विजेत्या पक्षानें आपण होऊन एकतर्फी युद्ध थांबविल्याचें हें जगांतील बहुधा पहिलेंच उदाहरण असावें. प्रत्यक्ष युद्धापेक्षांहि अधिक जोराचा असा हा युद्धतहकुबीचा धक्का चीननें भारताला व जागतिक लोकमताला दिला यांत शंका नाहीं.

चीनचे युद्ध-हेतू :

चीननें भारतावर लादलेल्या या अघोषित युद्धांतील सर्वांत अवघड किंवा न सुटलेलें कोडें म्हणजे चीनचे युद्ध-हेतू हें होय. चीननें भारतावर हें आक्रमण कशासाठीं केले असावें ? त्यांतून त्याला काय साधावयाचें असेल ? त्याचा अंतिम हेतु कोणता ? त्याचें तात्कालिक लक्ष्य कोणतें ? वगैरे वगैरे ! या बाबतींत चीनकडून कांहीं खुलासा मिळूं शकेल अशी शक्यता नाहीं. कारण त्यानें तर 'भारतानेंच चिनी प्रदेशावर आक्रमण केलें आहे.' असा उलटा बकवा करण्यास सुरुवात केली आहे. भारत हा युद्धपिपासु देश असून पंडित नेहरू हे अमेरिकन साम्राज्यवाद्यांच्या हातांतील बाहुलें आहे, असा प्रचार चीननें धूमधडाक्यानें चालविला आहे. त्याच्या त्या नगाऱ्यापुढें आमच्या मिळमिळीत शांततावादी प्रचाराची टिमकी कोणाला ऐकूंहि गेली नाहीं, ही गोष्ट पाकिस्तान, ब्रह्मदेश, सिलोन, इंडोनेशिया, कंबोडिया वगैरे भारताच्या शेजारी राष्ट्रांनीं या युद्धाच्या बाबतींत घेतलेल्या चीनच्या पक्षपाती भूमिके-

वरून स्पष्ट होतें. चीननें भारताच्या प्रदेशावर इतकें नागडें-उघडें आक्रमण केलें असतांनाहि स्वतःला तटस्थ व भारताचे मित्र म्हणविणाऱ्या देशांनीं निर्भयपणें पुढें येऊन त्या आक्रमणाचा परखड शब्दांत निषेध करूं नये, याचा अर्थ आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत आपण कोणी मित्र मिळवूं शकलों नाहीं असाच नव्हे काय ? संकटकाळीं साह्याला धांवून येतो तोच खरा मित्र, या म्हणी-प्रमाणें इंग्लंड, अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, पश्चिम जर्मनी वगैरे ज्या देशांना आपण (म्हणजे आपल्या संरक्षणमंत्र्यांनीं) साम्राज्यवादी समजून अनेक वेळां निष्कारण हेटाळलें व दुखावलें तींच राष्ट्रें ऐन संकटप्रसंगीं मागचा सारा अपमान विसरून आपल्या मदतीला धांवून आलीं, यावरून आपण योग्य तो बोध घेतला पाहिजे. असो.

चीननें आपले युद्धहेतू जाहीर केले नसल्यामुळें राजकारणाच्या अभ्यासकांनीं एकूण परिस्थितीवरून चीनचे हेतू ठरविले आहेत. हे सारे हेतू खरे असण्याची शक्यता आहे. परंतु त्या बाबतींत निश्चित निदान करणें अवघड आहे. हुकूमशाही राजवटींत असें घडणें अपरिहार्यच असतें. कारण तेथें हुकूमशहा जे बेत योजीत असतो त्यांची संपूर्ण कल्पना देशाच्या जनतेला किंवा जगाला देण्याची जबाबदारी त्याच्यावर नसते.

आजवर चर्चिलेले चीनचे कांहीं युद्धहेतू असे आहेत :—

(१) दरसाल दीड कोटींनीं वाढणारी सुमारें ७० कोटींची आपली लोकसंख्या चीनच्या भूमीला पेलत नसल्यामुळें तिला राहाण्यासाठीं चीनला भूप्रदेश हवा आहे. त्याकरितां त्यानें प्रथम तिबेट व्यापला, आणि आतां तो भारताची मऊ भूमि कोपरानें खणण्यासाठीं हिमालय ओलांडून भारतांत शिरला आहे.

(२) आसाममधील पेट्रोलच्या खाणींवर चीनचा डोळा असून त्यासाठीं तो सारा आसाम प्रांत घशांत घालण्याचा प्रयत्न केल्याशिवाय राहाणार नाहीं. आसाममधून तो पूर्व-पश्चिम बंगालमध्यें सहजासहजीं उतरूं शकेल आणि मग बंगालच्या उपसागरावर प्रभुत्व ठेवून उर्वरित भारत व ब्रह्मदेश यांना तो आपल्या कह्यांत राखूं शकेल.

(३) आशियाई देशांत साम्यवादाचें जाळें पसरवून लोकशाहीला कायमची मूठमाती देण्याची जी जागतिक योजना आहे, तिचा एक भाग म्हणून चीननें

भारतावर प्रत्यक्ष स्वारी करून त्याला लाल बनविण्याची आकांक्षा बाळगली आहे.

(४) भारताला साम्यवादी बनविणें इतक्यांत शक्य झालें नाहीं तरी त्याच्यावर कोणत्याहि क्षणीं झडप घालतां घेईल अशा मा-याच्या व मोक्याच्या जागा हिमालयाच्या दक्षिणेस आहेत. त्या ताब्यांत घेण्यासाठीं ही धडपड आहे.

(५) जगाच्या रंगभूमीवर पंडित नेहरूंचा व पर्यायानें भारताचा शांतिदूत म्हणून होत असलेला उदोउदो चिनी नेत्यांना असह्य झाल्यामुळें नेहरूंचें नाक खालीं करण्यासाठीं चीननें ही स्वारी केली आहे. अशा प्रकारें स्वारी केल्यानंतर गाफील भारताला जगांतील कोणत्यातरी एका सत्तागटाचें साह्य घेणें भाग पडेल. रशियाकडून तें साह्य मिळणें शक्य नसल्यामुळें – कारण रशियाचे चीनशीं कितीहि मतभेद असले तरी साम्यवादाच्या नात्यानें ते रक्ताचे भाऊ आहेत म्हणन – भारताला पाश्चात्य राष्ट्रांच्या गटांत वा गोटांत सामील व्हावें लागेल, आणि मग त्यानें आणलेला शांतिदूताचा आव किंवा बुडबुडा क्षणांत फुटून त्याची फटफजिती होईल, अशा अपेक्षेनें त्याच्यावर चीननें हें युद्ध लादलेलें आहे. इंग्लंड-अमेरिकेकडून भारताला त्वरेनें शस्त्रास्त्रांची मदत मिळूं लागतांच रशियासकट सा-या साम्यवादी देशांनीं भारताविरुद्ध टीकेची जी झोड उठविली, तिच्यावरून चीनचा हा हेतु पुष्कळ अंशीं सफल झाला, असें म्हणतां येईल.

(६) चीननें आपल्या देशांत आंखलेल्या पंचवार्षिक योजनांचा बोजवारा उडाल्यामुळें तेथील लोकमत अस्वस्थ झालें आहे. मुलुखगिरीचे झगझगीत विजय त्या लोकमतासमोर ठेवून त्याचें मन इतरत्र गुंतविण्यासाठीं चीननें ही चढाई केली आहे.

(७) चीनला आशियाई देशांचें नेतृत्व हवें आहे. बौद्धिक किंवा सांस्कृतिक श्रेष्ठत्वाच्या बळावर हें नेतृत्व संपादन करण्याची धमक चीनमध्यें नसल्यामुळें त्यानें आडदांडपणाच्या या मार्गाचा अवलंब केला आहे. दरसाल भरमसाटपणें वाढत चाललेल्या आपल्या देशाच्या लोकसंख्येपैकीं दहा-पांच कोटि लोक हिमालयाच्या लढाईंत गारद झाले व त्याच्या मोबदल्यांत आशियाई देशांचें नेतृत्व मिळालें तर तें चीनला हवेंच आहे. त्यायोगें नको असलेली लोकसंख्या

आपोआप कमी होईल आणि आपल्या विनाशकारी सामर्थ्याचें प्रदर्शन होऊन इतर आशियाई देश दबून जातील, अशी चीनची कल्पना आहे. चीनच्या जबरदस्त आक्रमणामुळें आशियाई देशांची जी बोबडी वळली, तिच्यावरून चीनचा अंदाज खरा होता, असेंच म्हणावें लागतें.

(८) चीननें तिबेट व्यापल्यानंतर चिनी राज्यकर्त्यांकडून होणाऱ्या छळाला भिऊन तिबेटचे दलाई लामा आपल्या संपत्तीसह व हजारों अनुयायांसह भारतांत आश्रयास आले. भूतदयेनें प्रेरित होऊन भारतानें त्यांना आश्रय दिला. चीनला हें आवडलें नाहीं. भारताचें हें कृत्य आपल्याला खिजविणारें आहे, आपल्याशीं शत्रुत्व करणारें आहे, असें चीननें मानलें; आणि आपल्यासारख्या प्रबळाशीं शत्रुत्व करणें किती धोक्याचें असतें हें भारताला व इतर आशियाई देशांना दाखवून देण्यासाठीं, भारताला अद्दल घडविण्यासाठीं चीननें हा हल्ला केला आहे.

(९) कम्युनिस्ट चीनचे शत्रु जनरल चँग कै शेक यांचे हस्तक भारतांत असून ते भारतांतून कम्युनिस्ट चीनच्या राजवटीविरुद्ध जोरदार प्रचार करतात, तो थांबविण्यासाठीं चीननें भारतावर हल्ला केला आहे.

(१०) पाकव्याप्त काश्मीरच्या गिलगिट भागांत असलेले अमेरिकेचे विमानतळ चीनला धोक्याचे वाटतात. त्यांना यशस्वीपणें तोंड देण्यासाठीं त्याला लडाखचा प्रदेश आपल्या ताब्यांत हवा आहे. त्याप्रमाणें त्यानें एकतृतीयांश लडाख गिळंकृतहि केला आहे. त्या भागावरील हक्क सोडून देण्यास भारतानें तयार व्हावें, म्हणून त्याच्यावर दडपण आणण्यासाठीं चीननें नेफा विभागांत जोरदार चढाई केली. युद्धाच्या मार्गानें जिंकलेला मुलूख वाटाघाटींच्या मार्गानें राजरोसपणें पचवितां यावा यासाठीं चीननें हें व्यापक व प्रचंड आक्रमण केलें आहे.

चीनच्या तहकुबीचीं कारणें :

चीननें भारतावर युद्ध कां लादलें हें जसें एक अगम्य कोडें आहे, तसेंच त्यानें एकतर्फी युद्धबंदी कां केली हेंहि अद्यापि न सुटलेलें कोडें आहे. या बाबतींतहि अनेकांकडून अनेक कारणें दिलीं जातात. उदाहरणार्थ,

(१) आशिया खंडांत चीन हाच सर्वांत अधिक सामर्थ्यसंपन्न देश आहे, याची चुणूक जगाला दाखविण्याची चीनला इच्छा होती. भारतावरील पहिल्या धपाटचांत त्यानें ती दाखविली आणि छोटचा राष्ट्रांना घाबरवून सोडलें. त्यानंतर आपणच खरे शांतताप्रेमी असून भारत हा युद्धखोर आहे, असें जगाला दाखवून देण्यासाठीं चीननें युद्धबंदी पुकारून माघारहि घेण्यास सुरुवात केली.

(२) भारतीय जनता आपसांतील हेव्यादाव्यांनीं पोखरलेली आहे आणि भारतांतील साम्यवादी (कम्युनिस्ट) पक्षानें आपल्या स्वागताची सारी सिद्धता करून ठेवलेली आहे, अशी माहिती चीनला मिळालेली होती. भारतीय सेनेंतहि आपल्याला अनुकूल असा गट कृष्ण मेनन यांच्या कृपेनें निर्माण झालेला आहे, असें चीनला कळलें होतें. त्यामुळें आपल्याला भारतीय भूमी-वर मुळींच विरोध न होतां पिकलेलें फळ तोंडांत पडावें, तसा भारत आपल्या ताब्यांत येईल अशी चीनची अपेक्षा होती. परंतु चिनी आक्रमणाचें वृत्त जाहीर होतांच भारतामध्यें एक अभूतपूर्व अशी ऐक्याची लाट उसळली आणि भारतीय कम्युनिस्टांना भारतीय जनतेच्या अंतःकरणांत फार थोडें स्थान असल्याचें सिद्ध झालें. तेव्हां पुढील पराभव टाळण्यासाठीं चीननें माघार घेतली.

(३) हिमालयामध्यें अपेक्षेपेक्षां लवकर बर्फ पडूं लागल्यामुळें पुढें जाणाऱ्या सन्याचें मागील रसद केंद्राशीं असलेलें दळणवळण (line of communication) तुटण्याची भीति निर्माण झाली. हें दळणवळण तुटल्यास सारें सैन्य उपासमारीला बळी पडेल असें वाटल्यावरून चीननें माघार घेतली.

(४) भारतानें आपल्या तटस्थतेच्या व शांततावादाच्या अहंकारामध्यें ब्रिटन, अमेरिका वगैरे पाश्चात्य राष्ट्रांना निष्कारण दुखवून ठेवलें होतें; त्यामुळें तीं राष्ट्रें ऐनवेळीं भारताच्या मदतीला धांवून येतील अशी अपेक्षा चीननें बाळगली नव्हती. परंतु या लोकशाही राष्ट्रांकडून भारताला इतक्या झपाटचानें अद्ययावत् शस्त्रास्त्रांची मदत मिळूं लागली कीं, चीनलाच नव्हे तर साऱ्या जगाला आश्चर्याचा धक्का बसला. आतां यापुढें आपण भारतीय प्रदेशांत अधिक घुसलों तर पाश्चात्यांच्या आधुनिक शस्त्रास्त्रांना तोंड द्यावें लागेल हें चीननें ओळखलें. या शस्त्रांचें सामर्थ्य कोरियाच्या युद्धांत चीनला

कळून चुकलें होतें. तो अनुभव पुनः घ्यावा लागूं नये, म्हणून चीननें माघार घेतली.

(५) चीनच्या आक्रमणामुळें भारताला त्याची तटस्थता सोडून नाइलाजानें पाश्चात्यांच्या लष्करी गटांत सामील व्हावें लागेल असें दिसतांच तो धोका टाळण्यासाठीं रशियानें चीनवर दडपण आणून त्याला माघार घेण्यास भाग पाडलें. रशिया व चीन हे दोन्ही देश साम्यवादी असले तरी रशिया हा जागतिक शांततावादाचा पुरस्कर्ता आहे; कारण जागतिक युद्ध पुनः उद्भवल्यास आपल्या विकास-योजना बंद पडतील व वैभवसंपन्न अमेरिकेच्या तुलनेनें आपण अधिक मागें पडूं अशी भीति रशियाला वाटते. जगांत शांतता नांदल्यास रशियाला जीवनोपयोगी वस्तूंचें उत्पादन भरपूर प्रमाणांत वाढवितां येईल आणि साम्यवादी देशहि लोकशाही देशांप्रमाणें आपल्या जनतेला सर्व प्रकारच्या भौतिक सुखसोयी उपलब्ध करून देऊं शकतात, हें जगाला दाखवून देतां येईल; तसें झाल्यास भांडवलशाही देशांतील जनतेला वाटणारें कम्युनिझमचें भय आपोआप कमी होऊन ती साम्यवादाकड आकर्षित होईल, अशी आजच्या रशियन राज्यकर्त्यांची विचारसरणी आहे. चीनला ही विचारसरणी मान्य नाहीं. साम्यवादी राष्ट्रांनीं शस्त्रबळाच्या जोरावर साम्यवादाचा प्रसार केला पाहिजे, असें तो मानतो. म्हणूनच त्यानें भारतावर आक्रमण केलें. परंतु चीनजवळ युद्धासाठीं लागणारें पेट्रोल नाहीं. त्या बाबतींत तो

● पाश्चात्यांनीं पुरविलेल्या शस्त्रांमुळें आपण चिन्यांना थोपवून धरूं शकलों, ही कल्पना ततकीशी बरोबर नाहीं. पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं १४ नोव्हेंबर १९६२ रोजीं लोकसभेंत केलेल्या भाषणांत असें म्हटलें होतें कीं, "आपल्याला परदेशांकडून शस्त्रास्त्रें मिळालीं, त्यामुळें आपल्याला थोडीफार तरी संरक्षण फळी उभारतां आली, असें श्री. फ्रँक अँथनी म्हणाले, असें मला वाटतें. युद्धसाहित्य, शस्त्रें आणि इतर सामग्री दिल्याबद्दल आपण त्या देशांचे अत्यंत कृतज्ञ आहोंत. परंतु आज जी स्थिति आहे, ती प्राप्त होईपर्यंत हीं शस्त्रें आपल्या सैनिकांना मिळालेलीं नव्हतीं. त्यांनीं चिनी सैनिकांना जें थोपवून धरलें तें त्या वेळच्याच साधनसामग्रीच्या बळावर !"

रशियावर अवलंबून आहे. रशियानें पेट्रोलचा पुरवठा बंद करण्याची धमकी देतांच चीनला आपलें आक्रमण मागें घेणें भाग पडलें.

(६) चीननें भारतावर हल्ला करतांच तिकडे फोर्मोसा ऊर्फ तैवान बेटामध्यें चँग कै शेकच्या राजवटीनें कम्युनिस्ट चीनवर हल्ला करण्याची तयारी सुरू केली; म्हणून चीनला आपलें लष्कर मागें घ्यावें लागलें.

(७) अधिक जोराच्या आक्रमणाची तयारी करण्यासाठीं चीनला थोडा अवधि हवा होता, म्हणून तो मागें गेला.

(८) चिनी सैन्य गनिमी काव्याची लढाई लढण्यांत तरबेज आहे. आसामच्या खुल्या मैदानांत भारतीय सैन्यापुढें आपला टिकाव लागणार नाहीं, हें ओळखून चीननें वेळींच माघार घेऊन आपली अब्रू बचावली.

भारत-चीन संबंधांतील महत्त्वाच्या घटना :

अशा प्रकारें चीनचे युद्धहेतू व त्याच्या एकतर्फी युद्धबंदीचीं संभाव्य करणें यांचा विचार केल्यानंतर या युद्धांत आपला पराभव कां झाला व अंतिम विजयासाठीं आपण काय केलें पाहिजे, याचा विचार क्रमप्राप्त ठरतो. तत्पूर्वी भारत-चीन संबंधांतील कांहीं महत्त्वाच्या घटनांची तारीखवार माहिती आपल्याला असणें आवश्यक आहे. या हेतूनें कांहीं महत्त्वाच्या घटनांचा निर्देश खालीं करण्यांत येत आहे.

१९४७

१५ ऑगस्ट : भारत स्वतंत्र झाला व भारताच्या पहिल्या स्वतंत्र सरकारनें ब्रिटिश राज्यकर्त्यांकडून अधिकारसूत्रें हातीं घेतलीं.

नवीन सरकारला वारसाहक्कानें तिबेटमध्यें कांहीं विशेष प्रादेशिक हक्क प्राप्त झाले होते. ब्रिटिश नागरिक व स्थानिक लोक यांच्यांतील तंटे, तिबेटी अधिकाऱ्यांशीं बोलणीं करून, भारतीय व्यापारी प्रतिनिधी (ट्रेडएजंट) शांततेनें सोडवीत. मतभेद निर्माण झाल्यास प्रतिवादीच्या मायभूमींत अमलांत असलेल्या कायद्याप्रमाणें निर्णय घेतला जाई. अशा वेळीं चौकशी मंडळाच्या अध्यक्षपदीं प्रतिवादीच्या राष्ट्रीयत्वाच्या अधिकाऱ्याची नियुक्ति केली जाई. ब्रिटिश लोकांच्या हक्कांसंबंधींचे सर्व प्रश्न ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या हुकमतीखालीं येत.

ब्रिटिश नागरिकांनीं गुन्हा केल्यास त्यांच्यावर ट्रेड एजंट खटले भरीत व भारतीय कायद्यानुसार त्यांना शिक्षा केली जाई.

स्वतःच्या व ब्रिटिश नागरिकांच्या संरक्षणासाठीं लष्करी (सशस्त्र) पहारेकरी ठेवण्याचा अधिकार ट्रेड एजंटांना होता. त्याचप्रमाणें गँमटॉकपासून याटुंग व ग्यान्टसेपर्यंत टेलिफोन व टेलिग्राफची व्यवस्थाहि त्या एजंटांनीं केली होती. याटुंग, फारी व ग्यान्टसे येथें टपाल व तार कचेऱ्या होत्या. तिबेटमध्यें भारत सरकारच्या मालकीचे ११ डाकबंगले होते.

१९४९

१ ऑक्टोबर : चीनच्या लोकसत्ताक राज्याची घोषणा झाली.

३० डिसेंबर : चीनच्या लोकसत्ताक राज्याला भारत सरकारनें अधिकृत मान्यता दिली. या वेळीं अशी आशा व्यक्त करण्यांत आली कीं, यापुढें भारत व चीन यांच्यांतील पूर्वापार चालत आलेले मैत्रीचे संबंध अधिक बळकट होतील व त्यामुळें आशिया खंडांत स्थैर्य निर्माण होऊन जागतिक शांतता टिकविण्यासाठींहि ही मैत्री उपयोगी पडेल.

१९५०

१३ ऑगस्ट : भारताच्या सीमेवरील अस्थिर परिस्थितीमुळें एक प्रकारची चिंता निर्माण झाली आहे, असें भारत सरकारनें चीनला कळविलें व चीन-तिबेट संबंध शांततेच्या मार्गानें निश्चित केले जावेत, असें आग्रहपूर्ण निवेदन केलें.

२१ ऑगस्ट : चीन सरकारनें असें जाहीर केलें कीं, तिबेटचा प्रश्न शांततेच्या मार्गानें व मित्रत्वानें सोडवून चीन-भारत सीमा निश्चित करण्याची चीनची इच्छा आहे.

२४ ऑगस्ट : तिबेटबाबतच्या चीनच्या ह्या धोरणाबद्दल भारतानें समाधान व्यक्त केलें आणि असें सुचविलें कीं, भारत व तिबेट या दोन देशांतील पारंपारिक सीमेचें उल्लंघन केलें जाऊं नये.

१९ सप्टेंबर : संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेंत भारतीय प्रतिनिधींनीं अशी मागणी केली कीं, संयुक्त राष्ट्रमंडळांत चीनचें प्रतिनिधित्व लोकसत्ताक चीननें करावें.

७ ऑक्टोबर : चिनी लष्कराचा तिबेटमध्यें प्रवेश.

२१ ऑक्टोबर : चीननें तिबेटमध्यें केलेल्या लष्करी कारवाईच्या दुष्परिणामाकडे चीन सरकारचें लक्ष वेधून भारत सरकारनें असें निवेदन केलें कीं, यामुळें एक तर लोकसत्ताक चीनला संयुक्त राष्ट्रांत प्रवेश मिळणें लांबणीवर पडेल, आणि दुसरें म्हणजे भारतीय सीमेवर अस्थिर व तंग वातावरण चालू राहील.

३० ऑक्टोबर : तिबेटमधील चीनशीं शत्रुत्व असलेल्या परकीय सत्तेचा भारताच्या विचारसरणीवर पगडा पडला आहे, अशा प्रकारची टीका करण्यास चीननें सुरुवात केली.

१ नोव्हेंबर : चीननें केलेल्या वरील आरोपाबद्दल भारत सरकारनें आश्चर्य व्यक्त करून, हा प्रश्न शांततेच्या मार्गानें सोडविला जावा, एवढीच आपली इच्छा असल्याचें प्रतिपादिलें.

१९५१

१ फेब्रुवारी : कोरियांत कम्युनिस्ट चीननें आक्रमण केलें, अशा अर्थाचा ठराव संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेंत आला असतां भारतानें त्या ठरावाविरुद्ध आपलें मत दिलें.

८ सप्टेंबर : सान्फ्रान्सिस्को (अमेरिका) येथें ४९ राष्ट्रांनीं जपान-बरोबरच्या मैत्रीच्या तहावर सह्या केल्या. चीनला या बैठकीस निमंत्रण नव्हतें म्हणून व इतर कांहीं कारणांसाठीं भारतानें या बैठकीस उपस्थित राहाण्याचें नाकारलें.

१४ नोव्हेंबर : संयुक्त राष्ट्रांत साम्यवादी चीनला प्रतिनिधित्व मिळावें, अशी भारतानें पुनः एकदां मागणी केली.

१९५२

२५ ऑक्टोबर : भारतानें पुनः एकदां जाहीर केलें कीं, संयुक्त राष्ट्रसंघा-मध्यें प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार केवळ साम्यवादी चीनलाच आहे.

१९५३

२८ सप्टेंबर : चीनला संयुक्त राष्ट्रांत प्रवेश मिळण्याबद्दलचा प्रश्न भारतानें पुनः धसास लावला.

३१ डिसेंबर : महत्त्वाचे प्रश्न सुटून चीन व भारत यांच्यांतील मैत्रीचे व सहकार्याचे संबंध अधिक दृढ व्हावेत यासाठीं भारत सरकारनें पुढाकार घेऊन भारत-तिबेट संबंधांबाबत पेकिंग येथें बोलणीं सुरू केलीं.

१९५४

२९ एप्रिल : तिबेट व भारत या दोन देशांतील व्यापार व दळणवळण यासंबंधीं भारत व चीन यांमध्यें करार झाला. भारतानें तिबेटमधील आपले विशेष प्रादेशिक हक्क व सवलती सोडून दिल्या व तिबेट हा चीनचा भाग आहे, या गोष्टीला मान्यता दिली. हा करार आठ वर्षांपुरता होता. करारनाम्याच्या प्रस्तावनेंत पंचशील* तत्त्वांचें पालन करण्याचें दोन्ही देशांनीं कबूल केलें होतें.

याटुंग व ग्यान्टसे येथील भारतीय संरक्षक दल काढून घेण्याबद्दल व भारत सरकारच्या मालकीची तिबेटमधील पोस्ट, टेलिग्राफ व टेलिफोन व्यवस्था आणि डाकबंगले चीन सरकारच्या स्वाधीन करण्याच्या प्रश्नाबाबत उभय देशांत पत्रव्यवहार झाला.

२५ जून : चीनचे पंतप्रधान श्री चौ-एन्-लाय यांनीं दिल्लीला सरकारीरीत्या भेट दिली.

२८ जून : या भेटीनंतर दोन्ही देशांच्या पंतप्रधानांनीं एक संयुक्त पत्रक काढलें. त्यांत असें नमूद केलें होतें कीं, "आंतरदेशीय संबंधांप्रमाणेंच आंतरराष्ट्रीय संबंधांच्या बाबतींतसुद्धां पंचशील तत्त्वांचा वापर केला तर जगांत शांतता व सुव्यवस्था निर्माण होण्यास मदत होऊन, आज जगांत

* भारत व चीन यांनीं मान्य केलेलीं पांच तत्त्वें पंचशील या नांवानें प्रसिद्ध आहेत. हीं तत्त्वें अशीं :—

(१) उभय देशांनीं एकमेकांची प्रादेशिक एकता व आधिपत्य यांना मान्यता देणें.

(२) एकमेकांवर आक्रमण न करणें.

(३) एकमेकांच्या अंतर्गत व्यवहारांत ढवळाढवळ न करणें.

(४) एकमेकांस बरोबरीच्या नात्यानें वागवून एकमेकांचें हित साधणें.

(५) शांततापूर्ण सहजीवन जगणें.

सर्वत्र भीतीचें व संशयाचें जें वातावरण पसरलें आहे तें नष्ट होईल व लोकांमध्यें एक प्रकारचा विश्वास निर्माण होईल." दोन्ही पंतप्रधानांनीं भारत-चीन मैत्रीबद्दल विश्वास व्यक्त करून आपल्या देशांचा व आशिया खंडांतील इतर देशांचा शांततेच्या मार्गानें विकास घडून यण्यास व जागतिक शांतता प्रस्थापित होण्यास या मैत्रीचा चांगला उपयोग होईल असें प्रतिपादिलें.

१७ जुलै : उत्तर प्रदेशांतील बडाहोटी (बाराहोती – याला चीननें 'युजे' असें नांव दिलें होतें) या ठिकाणीं भारतीय लष्कर असल्याबद्दल चीननें तक्रार केली· भारतीय प्रदेशांतील टापूवर चीननें आपला हक्क सांगितल्याची ही पहिली वेळ. आतांपर्यंत चीननें भारतीय प्रदेशाच्या कोणत्याहि टापूवर हक्क तर सांगितला नव्हताच, पण उलट भारतीय प्रदेशाची एकता व आधिपत्य यांचा मान राखण्याचें मनःपूर्वक आश्वासन दिलें होतें. म्हणून चीननें बाराहोतीवर सांगितलेला हक्क केवळ अज्ञानामुळें, विशेषतः बाराहोती निश्चितपणें कोठें आहे हें माहीत नसल्यामुळें, सांगितला असावा, अशी भारत सरकारनें समजूत करून घेतली.

२७ ऑगस्ट : भारतीय लष्कर तिबेटमध्यें घुसल्याचा चीननें भारतावर केलेला आरोप खोटा असल्याचें भारत सरकारनें चीनला कळविलें व चिनी अधिकाऱ्यांनीं बाराहोतींत घुसण्याचा प्रयत्न केल्याबद्दल चीनकडे निषेध नोंदविला. बाराहोती हें ठिकाण निती खिंडीच्या दक्षिणेला असून तो प्रदेश परंपरेनें भारताचा प्रदेश असल्याचें सदर खलित्यांत नमूद केलें होतें.

२१ सप्टेंबर : चीनचें प्रतिनिधित्व साम्यवादी चीनला मिळावें असा प्रस्ताव पुनः एकदां भारतीय प्रतिनिधींनीं संयुक्त राष्ट्रसंघांत मांडला.

१४ ऑक्टोबर : चीन व भारत यांच्यांत एक व्यापारी करार झाला.

१८ ऑक्टोबर : चीन व भारत यांच्यांतील मैत्रीचे संबंध कायम राहून ते अधिक बळकट व्हावेत या हेतूनें श्री नेहरूंनीं चीनला भेट दिली. या वेळीं चीनमध्यें नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या कांहीं नकाशांकडे श्री नेहरूंनीं चिनी नेत्यांचें लक्ष वेधलें. या नकाशांत उभय देशांतील सीमा चुकीची दाखविण्यांत आली होती व भारतीय प्रदेशांतील सुमारें ५० हजार चौरस मैलांचा टापू चीनच्या हद्दींत दाखविण्यांत आला होता. श्री नेहरू असें म्हणाले कीं, "कदाचित् हें चुकीनें झालें असेल, परंतु कांहीं असलें तरी भारताला

त्याबद्दल विचार करण्याची मुळींच जरूर नाहीं; कारण भारताच्या सीमा अत्यंत स्पष्ट असून, त्या सर्वांच्या परिचयाच्या आहेत. त्यांबद्दल शंका येण्याचें कांहींच कारण नाहीं." यावर श्री चौ-एन्-लाय यांनीं त्या चिनी नकाशांना विशेष महत्त्व नसल्याचें सांगून असा खुलासा केला कीं, "हे नकाशे म्हणजे पूर्वीच्या कोमिंगटांग सरकारच्या नकाशांच्या हुबेहूब नकला आहेत; कारण लोकसत्ताक चीनला त्यांतील चुका काढून टाकून पुन: नकाशे छापण्यास वेळच मिळाला नाहीं."

१९५५

११ मे : फोर्मोसाचा पेंचप्रसंग सोडविण्याचा प्रयत्न करण्याकरितां चीन सरकारच्या विनंतीवरून श्री कृष्ण मेनन यांनीं पेकिंगला भेट दिली.

२८ जून : बाराहोती येथें चीनच्या तुकडीनें बेकायदेशीरपणें तळ ठोकल्याबद्दल भारत सरकारनें चीन सरकारकडे निषेध नोंदविला.

१५ सप्टेंबर : उत्तर प्रदेशांतील डामझान या ठिकाणीं, भारतीय हद्दींत १० मैल आंत, चिनी सैनिकांची एक तुकडी घुसली.

२० सप्टेंबर : साम्यवादी चीनला संयुक्त राष्ट्रांत प्रवेश मिळावा असा पुन: एकदां भारतानें प्रस्ताव मांडला.

५ नोव्हेंबर : डामझानमध्यें चिनी सैन्य घुसल्याबद्दल भारतानें चीनकडे निषेध नोंदविला.

१९५६

२८ एप्रिल : उत्तर प्रदेशांतील निलांग या ठिकाणाच्या अर्धा मैल पूर्वेस सशस्त्र चिनी तुकडीनें तळ ठोकला.

२ मे : निलांग विभागांत चीननें आक्रमण केल्याबद्दल भारतानें चीनला निषेध-खलिता पाठविला.

२६ जुलै : बाराहोती हा चीनचा प्रदेश असल्याचें चीननें घोषित केलें व तुनजुन ला ही सीमेवरील खिंड असल्याचें अमान्य केलें. (ला = खिंड)

१ सप्टेंबर : शिपकी खिंड ओलांडून चिनी सैनिकांनीं भारतीय हद्दींत प्रवेश केला.

८ सप्टेंबर : चिन्यांनीं शिपकी खिड ओलांडल्याबद्दल भारतानें चीनकडे निषेध नोंदविला.

१० सप्टेंबर : आणखी एकदां चिनी तुकडी शिपकी खिड ओलांडून भारतीय हद्दींत घुसली.

२० सप्टेंबर : शिपकी खिड ओलांडून एक चिनी टेहेळणी तुकडी हपसांग खुडपर्यंत आली. भारतीय टेहळणी तुकडीची या तुकडीशीं गांठ पडतांच चिनी तुकडीनें गोळीबार करण्याचा धाक दाखविला.

२४ सप्टेंबर : शिपकी खिड ओलांडल्याबद्दल व हुपसांग खुड यथें चिनी सैन्यानें तळ ठोकल्याबद्दल भारत सरकारनें चीनला निषेध-खलिता पाठविला.

१० नोव्हेंबर : संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेंत चीनच्या प्रतिनिधित्वाचा प्रश्न घ्यावा असें भारतानें सुचविलें.

२८ नोव्हेंबर : चीनचे पंतप्रधान श्री चौ-एन्-लाय यांनीं भारतास भेट दिली. या भेटींत असें ठरलें कीं, भारत व चीन यांच्यांत सीमेबद्दल कांहीं तंटा नसून कांहीं किरकोळ प्रश्न आहेत व दोन्ही देशांच्या प्रतिनिधींनीं परस्पर बोलणीं करून ते सोडवावेत. श्री चौ-एन्-लाय यांनीं असेंहि सांगितलें कीं, चीन सरकारनें ब्रह्मदेशाच्या बाबतींत १९१४ सालीं ठरलेली मॅकमोहन सीमारेषा मान्य केली आहे व भारताच्या बाबतींतहि तीच मान्य करावी असें आपण सुचविलें आहे. (ही सीमारेषा भारताच्या पूर्वेकडील सरहद्दीशीं संबंधित आहे.) तिबेटच्या अधिकाऱ्यांशीं या बाबतींत बोलणीं करण्याचें श्री चौ-एन्-लाय यांनीं आश्वासन दिलें.

१९५७

५ जून : भारतीय ट्रेड एजन्सीच्या ताब्यांतील भाग सोडून भारत सरकारच्या ताब्यांत असलेली, याटुंग येथील सर्व जमीन, भारतानें चीन सरकारच्या स्वाधीन केली.

१३ सप्टेंबर : संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेनें चीनच्या प्रतिनिधित्वाचा प्रश्न हातीं घ्यावा असें भारतानें सुचविलें.

ऑक्टोबर : भारताच्या ईशान्य सरहद्दीवरील लोहित विभागांतील वालाँग या ठिकाणीं चिनी सैन्यानें प्रवेश केला.

१९५८

एप्रिल-मे : भारतानें पुढाकार घेऊन बाराहोतीच्या प्रश्नावर भारत-चीन-प्रतिनिधींमध्यें बोलणीं सुरू केलीं. भारतानें असें सुचविलें कीं, ह्या प्रश्नाचा निकाल लागेपर्यंत उभय पक्षांनीं या विभागांत लष्करी लोकांना पाठवूं नये, ही गोष्ट चीनला मान्य होती; परंतु बिनलष्करी लोकांवर बंदी घालण्याचें त्यानें नाकारलें. अधिकाऱ्यांच्या या चर्चेंतून आणखी एक गोष्ट स्पष्ट झाली कीं, चीन सरकार ज्या विभागांवर आपला हक्क सांगत होतें, त्या भागांविषयीं निश्चित अशी कांहींच माहिती त्याच्याजवळ नव्हती.

२ जुलै : लद्दाख (लडाख) विभागांतील खुरनाक फोर्ट हें ठिकाण चिनी सैनिकांनीं ताब्यांत घेतल्याबद्दल भारत सरकारनें चीनकडे निषेध नोंदविला.

१७ जुलै : संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेनें चीनच्या प्रतिनिधित्वाचा प्रश्न हातीं घ्यावा, असें भारतानें पुन: एकदां सुचविलें.

सप्टेंबर : अक्साई चीनच्या उत्तरेकडील भागांत गस्त घालणारी भारतीय तुकडी आपलें नित्याचें कार्य करीत असतां चिनी सैन्यानें त्या तुकडींतील लोकांना कैद करून सुमारें ५ आठवडेपर्यंत डांबन ठेवलें व अत्यंत वाईट तऱ्हेनें वागविलें.

सप्टेंबर : इमारती बांधण्यास उपयोगी पडेल असें सामान बरोबर घेऊन एक मोठी चिनी तुकडी बाराहोतींत शिरली.

२७ सप्टेंबर : चिनी सैन्याची एक तुकडी प्रथम नेफाचा लोहित विभाग ओलांडून आंत आली व नंतर ती ब्रह्मदेशांत गेली.

१८ ऑक्टोबर : लडाखमधील अकसाई चीन विभागांत मोटार-रस्ता बांधल्याबद्दल भारतानें चीनकडे निषेध नोंदविला.

ऑक्टोबर : उत्तर प्रदेशांतील लापथाल व संगचामा ला येथें चिनी सैन्यांनीं ठाणीं स्थापिलीं.

८ नोव्हेंबर : लडाखमधील अकसाई चीन प्रदेशावर हक्क सांगितल्याबद्दल व भारतीय टेहेळणी तुकडींतील लोकांना वाईट रीतीनें वागविल्याबद्दल भारतानें चीनकडे निषेध व्यक्त केला.

१० डिसेंबर : बाराहोती, लापथाल व संगचामा ला येथून चीननें आपलें लष्कर ताबडतोब काढून घ्यावें, असें भारतानें चीनला सांगितलें.

१४ डिसेंबर : एका अधिकृत चिनी पत्रकांत चीन-भारत सीमा चुकीची दाखविण्यांत आल्याचें श्री नेहरूंनीं श्री चौ-एन्-लाय यांना पत्र लिहून त्यांच्या निदर्शनास आणलें; आणि देशांत गंभीर गैरसमज निर्माण करणारी कोणतीहि परिस्थिति शक्य तितक्या लवकर दूर केली पाहिजे असें प्रतिपादिलें.

१७ डिसेंबर : चिनी विमानांनीं २७ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबरच्या दरम्यान स्पिती व्हॅली (पंजाब) व हिमाचल प्रदेश या भागांवर केलेल्या उड्डाणांकडे भारत सरकारनें चीनचें लक्ष वेधून यापुढें अशीं उल्लंघनें होणार नाहींत, अशी तजवीज करण्याची विनंती केली.

१९५९

१७ जानेवारी : चीननें १९५९ सालीं वालाँगवर व १९५८ सालीं लोहित विभागांत केलेल्या आक्रमणाबद्दल भारतानें चीनकडे निषेध नोंदविला.

२३ जानेवारी : श्री चौ-एन्-लाय यांनीं श्री नेहरूंना लिहिलेल्या उत्तरांत असा युक्तिवाद केला कीं, चीन-भारत सीमा कधींच आंखली गेली नव्हती व या प्रश्नाबाबत दोन्ही देशांत मतभेद आहेत. १९५४ सालीं हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीनें योग्य ती परिस्थिति निर्माण झालेली नव्हती. म्हणून चीननें तो प्रश्न काढला नाहीं, असेंहि त्यांनीं कळविलें.

'मॅकमहोन रेषा चीननें कधींच मान्य केली नव्हती' असें नमूद करून चिनी नकाशाच्या बाबतींत श्री चौ-एन्-लाय यांनीं असें स्पष्टीकरण दिलें कीं, पूर्वींचे नकाशे व नवे नकाशे यांत सीमारेषेच्या बाबतीत कांहींहि फरक नाहीं.

याचा अर्थ असा कीं, आजवर शेंकडों वर्षें उभय देशांना पूर्णपणें मान्य असलेली, परंपरागत सीमारेषा चीननें अधिकृतपणें धुडकावून लावली. १९५४ सालीं केलेल्या कराराचा भंग करून आतांपर्यंत दिलेलीं सारीं आश्वासनें धाब्यावर बसवून चीननें भारताच्या सुमारें ५० हजार चौरस मैल प्रदेशावर आपला हक्क सांगण्यास सुरुवात केली.

३१ मार्च : तिबेटचे सर्वाधिकारी दलाई लामा पळून भारतांत आले व भारतानें त्यांना राजकीय आश्रय दिला.

२६ एप्रिल : भारतानें दलाई लामांना राजकीय आश्रय दिल्याबद्दल चीन-मधील जबाबदार मंडळींनीं भारतावर आग पाखडून जी अत्यंत गलिच्छ व निराधार टीका करण्यास सुरुवात केली होती त्याबद्दल भारतानें चीनकडे निषेध नोंदविला.

१६ मे : भारताच्या 'दुटप्पी' धोरणाबद्दल चीननें भारताला समज दिली आणि असेंहि नमूद केलें कीं, यापुढें पंचशील तत्त्वांचा वापर चीनच्या सोयी-प्रमाणें केला जाईल.

२३ मे : चीन सरकारच्या या धोरणाबद्दल भारतानें खेद व्यक्त करून असें स्पष्ट केलें कीं, पंचशील तत्त्वांशीं एकनिष्ठ राहणें ही भारत सरकारची मूलभूत नीति आहे; केवळ संधिसाधूपणानें भारत या तत्त्वांना चिकटून राहिलेला नाहीं.

१४ जुलै : संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेनें चीनच्या प्रतिनिधित्वाचा प्रश्न हातीं घ्यावा असें भारतानें पुनः सुचविलें.

२८ जुलै : लडाखमधील पँगाँग सरोवराच्या भागांत एक चिनी हत्यारी तुकडी घुसली व तिनें ६ भारतीय शिपायांना अटक केली. शिवाय स्पँगूर येथें त्यांनीं एक ठाणेंहि स्थापिलें.

३० जुलै : चीनच्या आक्रमणांबद्दल भारतानें चीनकडे निषेध नोंदविला.

७ ऑगस्ट : नेफा विभागांतील खिझेमान या ठिकाणीं चीनचें एक हत्यारी टेहेळणी पथक घुसलें व त्यानें तेथील भारतीय टेहेळणी पथकाला मागें हटविलें.

११ ऑगस्ट : खिझेमान या ठिकाणीं भारतीय सीमेचें उल्लंघन केल्या-बद्दल भारतानें चीनकडे निषेध नोंदविला.

२५ ऑगस्ट : नेफा विभागांतील सुबानसिरी (सुवनशिरी = सुवर्णश्री) भागांत एक मोठी चिनी तुकडी सरहद्द ओलांडून भारतांत घुसली व भारताच्या लोंगजू या सीमेवरील ठाण्यावर गोळीबार करून तेथें असलेल्या थोड्याशा भारतीय सैनिकांना तिनें पिटाळून लावलें व ठाण्याचा ताबा घेतला.

२८ ऑगस्ट : भारताच्या लोंगजू ठाण्याचा ताबा घेतल्याबद्दल भारतानें चीनकडे निषेध-खलिता पाठविला.

२० ऑक्टोबर : दक्षिण लडाखच्या चांग चेन मो खोऱ्यांत, भारतीय प्रदेशांत, ४० मैल आंत चिनी लष्करी तुकडी घुसली. कांगका खिंडीपाशीं या तुकडीची भारतीय टेहळणी पथकाशीं चकमक उडाली. चिन्यांनीं गोळीबार केला, त्यांत ९ भारतीय सैनिक ठार झाले. बाकीच्या सैनिकांना कैद करून चिन्यांनीं त्यांना अत्यंत अमानुष वागणूक दिली व नंतर सोडून दिलें.

२३ ऑक्टोबर : या घटनेबद्दल भारतानें चीनकडे निषेध नोंदविला.

१६ नोव्हेंबर : सीमेचा प्रश्न शांततेच्या मार्गानें सोडवावा अशी भारताची इच्छा असल्यामुळें भारतानें एक तात्पुरता उपाय म्हणून असें सुचविलें कीं, लडाखमध्यें चीन ज्या रेषेपर्यंत आपली सीमा असल्याचा दावा करीत आहे तेथपर्यंत भारतानें आपलें सैन्य मागें घ्यावें आणि भारतीय नकाशांत जी परंपरागत सीमारेषा दाखविण्यांत आली आहे त्या रेषेच्या पलीकडे चीननें आपलें सैन्य न्यावें, म्हणजे सरहद्दीवर चकमकी उडणार नाहींत.

१७ डिसेंबर : लडाखमध्यें उभय देशांनीं आपापलें सैन्य मागें घ्यावें ही भारताची सूचना चीननें फेटाळून लावली. इतकेंच नव्हे तर चिनी सैन्य अकसाई चीन विभागाच्या पश्चिमेला व पूर्वेला आणखी पुढें घुसलें आणि चिन्यांनीं त्या विभागांत रस्ते तयार केले.

१९६०

१९ एप्रिल : श्री नेहरूंच्या निमंत्रणावरून श्री चौ-एन्-लाय दिल्लीला आले व त्यांनीं ६ दिवस श्री नेहरूंशीं बोलणीं केलीं. हीं बोलणीं संपल्यानंतर दोन्ही पंतप्रधानांनीं असें जाहीर केलें कीं, उभय देशांतील मतभेद आपण मिटवूं शकलों नाहीं, म्हणून असें ठरविण्यांत आलें कीं, सीमेबाबत सर्व कागदपत्रांची तपासणी करण्यासाठीं दोन्ही देशांतील अधिकाऱ्यांनीं एकत्र बसावें व अहवाल तयार करावा. दरम्यानच्या काळांत सीमा विभागामध्यें संघर्ष व चकमकी टाळण्यासाठीं योग्य ती उपाययोजना करावी.

३ जून : नेफाच्या कामेंग विभागांत, भारतीय प्रदेशांत, सुमारें ५ मैल आंत असलेल्या टाकसांग गोंपा येथें एका मोठ्या चिनी तुकडीनें आक्रमण केलें.

२९ जुलै : या आक्रमणाविरुद्ध भारतानें चीनकडे निषेध नोंदविला.

२२ सप्टेंबर : जेलेप ला खिंडीजवळ चिनी हत्यारी टेहेळणी पथक सिक्कीमच्या हद्दींत घुसलें.

२७ सप्टेंबर : वरील आक्रमणाबद्दल भारतानें चीनला निषेध–खलिता पाठविला.

१९६१

१४ फेब्रुवारी : सीमा प्रश्नाबाबतचा दोन्ही देशांच्या अधिकाऱ्यांचा अहवाल भारत सरकारनें प्रसिद्ध केला. भरपूर पुराव्यांच्या आधारें ह्या अहवालांत असें सिद्ध करण्यांत आलें होतें कीं, भारतीय नकाशांत दाखविलेली परंपरागत सीमारेषा हीच चीन व भारत यांच्यांतील खरी सीमा आहे आणि चीननें भारताच्या सुमारें ५० हजार चौरस मैलांवर सांगितलेला हक्क खोटा असून त्यापैकीं सुमारें १२ हजार चौरस मैलांचा टापू एव्हांना चीन बेकायदे-शीरपणें बळकावून बसला आहे. कित्येक दिवसपर्यंत चीन सरकारनें या अहवालाची दखलहि घेतली नाहीं. अखेर १९६२ च्या मे महिन्यांत चीननें वस्तुस्थितीचा विपर्यास करणारा एक जुजबी अहवाल प्रसिद्ध केला.

२० एप्रिल : जेलेप ला खिंडीजवळ चिनी सैनिक सिक्कीममध्यें घुसले.

मे : लडाखमधील चुशूल या ठिकाणाजवळ चिनी सैनिकांनीं भारतीय प्रदेशांत आक्रमण केलें.

ऑगस्ट : लडाखमध्यें ७८° १२′ पूर्व व ३५° १९′ उत्तर या अंशांवरील ठिकाणीं आणि डामबु गुरूजवळ न्यागझू येथें चिनी सैन्यानें नवीं ठाणीं स्थापन करून या ठाण्यांना पिछाडीच्या तळाशीं जोडणारे रस्ते तयार केले.

३१ ऑक्टोबर : वरील सर्व बेकायदेशीर प्रकारांकडे भारतानें चीनचें लक्ष वेधलें व भारतीय प्रदेशांतून चीननें आपलें सैन्य काढून घ्यावें व आक्रमक हालचाली थांबवाव्या अशी चीनकडे मागणी केली.

१९६२

१४ जानेवारी : लडाखमध्यें चिनी टेहेळणी पथकांनीं आणखी १२ मैल पुढें आगेकूच केली. तसेंच नेफांतील लोंगजू या ठिकाणाजवळ कांहीं लष्करी व बिनलष्करी चिनी अधिकाऱ्यांनीं भारतीय हद्द ओलांडली व भारतीय प्रदेशांत अर्धा मैल आंत रोई या खेड्यावर आक्रमण केलें.

२२ फेब्रुवारी : लडाखमध्यें पुढें पुढें सरकत असलेल्या चिनी टेहेळणी पथकाविरुद्ध भारतानें चीनकडे निषेध नोंदविला.

१५ एप्रिल : लडाखमध्यें सुमडो या ठिकाणाच्या ६ मैल पश्चिमेस चिनी सैन्यानें लष्करी ठाणें स्थापन केल्याबद्दल भारतानें निषेध नोंदविला.

१८ एप्रिल : नेफामधील रोई खेड्यावर चिनी सैन्यानें आक्रमण केल्याबद्दल भारतानें चीनकडे निषेध-खलिता पाठविला.

एप्रिल-मे : लडाखमधील चिपचाप विभागांत चिनी टेहेळणी पथकें सारखीं पुढें पुढें सरकत होतीं.

३० एप्रिल : चीन सरकारनें असें जाहीर केलें कीं, काराकोरम खिंडीपासून कांगका खिंडीपर्यंत सबंध विभागांत गस्त घालण्याबाबत चिनी पथकांना हुकूम देण्यांत आला आहे. चीनच्या प्रदेशांत येणारीं २ भारतीय ठाणीं भारतानें ताबडतोब हलवावींत अशी मागणीहि चीननें भारताकडे केली. चीननें अशीहि धमकी दिली कीं, वर सांगितल्याप्रमाणें भारतानें आपलीं ठाणीं हलविलीं नाहींत तर चीन संपूर्ण सीमेवर गस्त घालण्यास सुरुवात करील.

३ मे : पाकिस्तान व चीन यांच्यांत एक करार झाला. या करारान्वयें भारत-चीन सीमेवरील काराकोरम खिंडीच्या पश्चिमेला, पाकिस्ताननें बेकायदेशीरपणें बळकावलेल्या काश्मीरच्या भागाबद्दल चीन व पाकिस्तान यांच्यांत बोलणीं व्हावींत असें ठरलें.

१० मे : संपूर्ण जम्मू-काश्मीर प्रांत भारताच्या आधिपत्याखालीं येतो ही गोष्ट भारत सरकारनें चीनच्या नजरेस आणून दिली आणि असें स्पष्ट केलें कीं, काश्मीर प्रदेशाच्या कोणत्याहि भागाबद्दल चीननें पाकिस्तानशीं केलेला कोणताहि करार कायदेशीर होऊं शकत नाहीं.

मे : स्पँगूरच्या आग्नेयेस सुमारें १० मैलांवर भारतीय प्रदेशांत चीननें एक नवें ठाणें स्थापन केलें.

१४ मे : लडाखच्या चिपचाप विभागांत चिनी सैन्यानें केलेल्या हल्ल्याबद्दल भारतानें चीनला निषेध-खलिता पाठविला व पश्चिम विभागांतून उभय देशांनीं आपापलें सैन्य सीमारेषांच्या मागें न्यावें ही पूर्वीं केलेली सूचना पुनः केली. तसेंच सर्व गोष्टी शांततेच्या मार्गानें सोडविल्या जाव्यात यासाठीं

अकसाई चीनमध्यें चीननें बेकायदेशीरपणें बांधलेला रस्ता चीनला बिगर-लष्करी वाहतुकीसाठीं वापरूं देण्याची तयारी भारतानें दाखविली.

२१ मे : स्पँगूरजवळ चीननें नवीन लष्करी ठाणें स्थापन केल्याबद्दल भारतानें चीनकडे निषेध नोंदविला.

२ जून : १९५४ सालच्या भारत-चीन कराराची मुदत संपली. वस्तुत हा करार चीननें कधींच पाळला नव्हता. कागदोपत्रीं त्यानें हा करार केव्हांच धाब्यावर बसविला होता. शिवाय प्रत्यक्ष कृतींतहि भारतीय यात्रेकरू, व्यापारी व तिबेटी लोक यांना नाना प्रकारें छळून व भारतीय प्रदेशांवर हल्ले करून चीननें हा करार मोडला होता.

१६ जून : चिनी सैनिकांनीं लडाखमध्यें एक नवीन रस्ता बांधला व एक नवीन ठाणें स्थापन केलें. त्याबद्दल भारतानें निषेध नोंदविला.

२८ जून : चिनी सैनिकांनीं लडाखमध्यें चिपचाप नदीजवळ बेकायदेशीर-पणें एक ठाणें स्थापन केलें. त्या ठाण्याच्या आग्नेयेस ६ मैलांवर आणखी एक ठाणें स्थापिलें. त्याबद्दल भारतानें निषेध नोंदविला.

१० जुलै : लडाखमधील गालवान नदीवरील भारतीय ठाण्याला चिनी सैनिकांनीं वेढा दिल्याबद्दल भारतानें चीनला निषेध-खलिता पाठविला.

१२ जुलै : लडाखच्या चिपचाप, चांग चेन मो व पँगाँग या विभागांत चीननें नवीन ठाणीं स्थापन केल्याबद्दल भारतानें चीनकडे निषेध-खलिता पाठविला.

२२ ऑगस्ट : भारतानें चीनला कळविलें कीं, " दोन्ही देशांच्या सरकारी अधिकाऱ्यांनीं सादर केलेल्या अहवालाच्या आधारें वाटाघाटी चालू कराव्यात. परंतु तत्पूर्वी एक अट पूर्ण होणें आवश्यक आहे. ती म्हणजे लडाखमध्यें पांच वर्षांपूर्वी – चीननें अतिक्रमण करून जबरदस्तीनें सरहद्द बदलली तत्पूर्वी – जी परिस्थिति होती ती पुन: निर्माण करण्यासाठीं व या वाटाघाटी फलद्रूप व्हाव्यात म्हणून तेढ नाहींशी करण्यासाठीं कोणते उपाय योजावयाचे तें स्पष्ट शब्दांत नमूद करावें."

२० सप्टेंबर : चिनी सैन्यानें नेफा विभागांतील थागला भागांत सीमारेषा ओलांडून आक्रमण केलें.

६ ऑक्टोबर : हा प्रश्न वाटाघाटींनीं सोडवावा असें भारतानें पुन: चीनला कळविलें.

८ सप्टेंबर : नेफा विभागांत चिनी सैनिकांनीं सर्वसामान्य सीमारेषा ओलांडली.

२० ऑक्टोबर : (पहांटे) चिनी सैन्यानें लडाखमधील चिपचाप भागापासून नेफामधील खिझमाने व ढोलापर्यंतच्या भारतीय सरहद्दीवर प्रचंड प्रमाणावर हल्ला चढविला.

२५ ऑक्टोबर : नेफाच्या कामेंग डिव्हिजनमधील तावांग पडलें.

२६ ऑक्टोबर : राष्ट्रपतींनीं भारतांत आणीबाणीची परिस्थिति जाहीर केली.

२९ ऑक्टोबर : लडाखमधील दामचोक व जारखिड हीं ठाणीं पडलीं.

३१ ऑक्टोबर : संरक्षणमंत्री श्री कृष्ण मेनन यांची उचलबांगडी.

२ नोव्हेंबर : अमेरिकन विमानें शस्त्रें घेऊन भारताकडे निघालीं.

५ नोव्हेंबर : लडाखमधील दौलतबेग ओल्डी हें ठाणें पडलें.

१४ नोव्हेंबर : श्री यशवंतराव चव्हाण हिंदचे संरक्षणमंत्री झाले.

१८ नोव्हेंबर : नेफाच्या लोहित विभागांतील वालाँग पडलें. से ला खिडहि शत्रूच्या ताब्यांत गेली.

१९ नोव्हेंबर : नेफाच्या कामेंग विभागाचें मुख्य ठाणें बोमदि ला पडलें.

२० नोव्हेंबर : संपूर्ण भारत-चीन सरहद्दीवर एकतर्फी युद्धबंदी केल्याची चीनची नाटचपूर्ण घोषणा.

२१ नोव्हेंबर : आसामच्या तेजपूर शहरांतील लोकांना हलविण्यास सुरुवात. मध्यरात्रीपासून सरहद्दींवरील आघाड्यांवर गोळीबार बंद झाला.

१ डिसेंबर : नेफा आघाडीकडून चिनी सैनिक तुरळक प्रमाणांत मागें परतूं लागले. ७ नोव्हेंबर १९५९ ची ताबारेषा प्रमाण मानून तह करण्यास भारताचा स्पष्ट नकार.

८ डिसेंबर : 'पूर्वभागांतील मॅकमहोन रेषेच्या पलीकडे चिनी सैन्य माघार घेईल; परंतु ढोला व लोंगजू येथें चीन आपलीं मुलकी ठाणीं ठेवील' असें चीननें जाहीर केलें.

१० डिसेंबर : '८ सप्टेंबर १९६२ च्या ताबारेषेपर्यंत चीननें माघार घेतल्याशिवाय सीमेच्या प्रश्नाबाबत भारताला चीनशीं बोलणीं करतां येणार नाहींत ' अशी पंडित नेहरू यांची घोषणा.

१६ डिसेंबर : नेफाच्या कामेंग विभागाचें मुख्य ठाणें बोमदि ला येथें भारताचें मुलकी प्रशासन पुन: सुरू झालें.

२४ डिसेंबर : सिक्कीम व भूतान यांच्यामधील चुंबी खोऱ्यांत चिनी सैन्य गोळा झालें असल्याच्या बातम्यांची सेनाधिकाऱ्यांना माहिती आहे असें भारतीय परराष्ट्रखात्याच्या प्रवक्त्यानें सांगितलें.

२५ डिसेंबर : नेफाच्या लोहित विभागांतील वालाँगमध्यें व कामेंग विभागांतील दरांग झोंगमध्यें भारताचा मुलकी कारभार पुन: सुरू झाला.

२६ डिसेंबर : पाकिस्तानव्याप्त काश्मीर व चीनचा सिकियांग प्रांत यांच्यांतील सरहद्द रेषेबद्दल चीन व पाकिस्तान यांच्यांत पूर्णपणें एकमत झाल्याचें त्या दोन्ही देशांनीं जाहीर केलें.

चीन व बहिर्मंगोलिया यांच्यांतील २५०० मैलांची सरहद्द निश्चित करण्याच्या करारावर त्या दोन्ही देशांच्या पंतप्रधानांनीं सह्या केल्या.

२८ डिसेंबर : तिबेटमध्यें मोठ्या प्रमाणावर चिनी सैन्याची जमवाजमव. तेथें सुमारें १२ ते १४ डिव्हिजन चिनी सैनिक असावेत असा अंदाज आहे. (चीनच्या एका डिव्हिजनमध्यें १२ ते १५ हजार सैनिक असतात.)

३१ डिसेंबर : ७ नोव्हेंबर १९५९ च्या ताबारेषेपर्यंत नेफा विभागांत चिनी सेना मागें गेल्याचें चीनच्या संरक्षण खात्यानें जाहीर केलें.

१९६३

१ जानेवारी : 'चीननें युद्धबंदीसाठीं केलेल्या सूचना भारत अंमलांत आणीत नाहीं ' अशी तक्रार श्री चौ-एन्-लाय यांनीं श्रीमती सिरिमाओ भंडारनायक यांना दिलेल्या मेजवानीच्या प्रसंगीं पेकिंग येथें केली.

७ जानेवारी : भारताबरोबर असलेला सीमासंघर्ष सोडविण्यासाठीं कोलंबो परिषदेनें सुचविलेल्या तोडग्याबाबत चिनी सरकारनें अनुकूल प्रतिक्रिया व्यक्त केली असल्याचें पेकिंगहून जाहीर करण्यांत आलें.

११ जानेवारी : कोलंबो येथें सहा तटस्थ राष्ट्रांच्या परिषदेनें चीन-भारत सीमासंघर्षाविषयीं तयार केलेल्या योजनेच्या अनुरोधानें सीलोनच्या पंतप्रधान श्रीमती भंडारनायक यांनीं दिल्लीस श्री जवाहरलाल नेहरू यांच्याशीं वाटाघाटी सुरू केल्या.

१३ जानेवारी : भारत-चीन सीमा प्रकरणीं सहा तटस्थ राष्ट्रांच्या कोलंबो परिषदेनें मांडलेली योजना ता. २१ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या भारतीय लोकसभेपुढें विचारासाठीं ठेवण्यांत येईल व त्यावर होणारा लोकसभेचा निर्णय कोलंबो परिषदेच्या राष्ट्रांना नंतर कळविला जाईल असें भारतातर्फें आज जाहीर करण्यांत आलें.

अलीकडील चिनी आक्रमण मागें घेतलें जाईल, हें तत्त्व कोलंबो परिषदेची योजना व तिच्यासंबंधींचें स्पष्टीकरण यांत बऱ्याच प्रमाणांत मान्य करण्यांत आलें आहे, असें भारत सरकारला वाटत असल्याचें भारताच्या परराष्ट्र खात्याच्या अधिकाऱ्यानें सांगितलें.

ता. १५ जानेवारीपर्यंत चीन आपल्या फौजा ७ नोव्हेंबर १९५९ च्या प्रत्यक्ष ताबारेषेच्या २० किलोमीटर मागें घेईल असें चीनच्या संरक्षण खात्याच्या वतीनें आज जाहीर करण्यांत आलें.

२

गांधींचा गांधीवाद

✿

✿

' गांधीवाद ' म्हणजे काय ?

गांधीवाद म्हणजे महात्मा गांधी यांनीं प्रतिपादिलेलें व आचरिलेलें जीवनाचें एक सर्वांगीण दर्शन अथवा तत्त्वज्ञान. हें तत्त्वज्ञान भारताला कांहीं अगदींच नवें नव्हतें; किंबहुना भारताच्या परंपरागत संस्कृतींतील एका विशिष्ट भागावरच तें आधारलेलें होतें. परंतु त्याचबरोबर हेंहि तितकेंच खरें कीं, या तत्त्वज्ञानाच्या द्वारें गांधीजींनीं भारताला व भारताच्या मार्फत जगाला जी वेगळी दृष्टि दिली ती आमच्या तत्त्वज्ञानांत पूर्वी कोणीं दिलेली नव्हती, ती गांधीजींचीच देणगी होती. आणि म्हणून गांधीवाद ही सनातन सत्यांवर आधारलेली एक वैज्ञानिक व आधुनिक जीवनदृष्टि होती किंवा आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

गांधींच्या शब्दांत गांधीवाद :

गांधीवादाची चर्चा गांधीजींच्या हयातींतच सुरू झालेली होती. त्यामुळें त्याच्याविषयीं गांधीजींनीं व त्यांच्या अनुयायांनीं काय विचार प्रकट केले आहेत, तें या संदर्भांत पाहणें उद्बोधक ठरेल. मी येथें फक्त गांधीजींचेच विचार उद्धृत करणार आहें; कारण गांधीवादासंबंधीं अधिकारवाणीनें फक्त गांधीच बोलूं शकत होते.

स्वत: गांधीजींनीं या बाबतींत असें म्हटलें होतें कीं,

" ' गांधीवाद ' नांवाची कांहीं वस्तुच नाहीं; आणि माझ्यामागें एखादा

संप्रदाय ठेवून जाण्याचीहि माझी इच्छा नाही. मीं कांहीं नवीन तत्त्वांचा किंवा सिद्धान्तांचा आविष्कार केला आहे, शोध लावला आहे, असेंहि मला म्हणावयाचें नाहीं. मीं फक्त जीं कांहीं शाश्वत सत्यें आहेत तीं आपल्या नित्याच्या जीवनांत व रोज उत्पन्न होणाऱ्या प्रश्नांमध्यें उतरविण्याचा प्रयत्न केला आहे, इतकेंच ! ...माझें जें मत स्थिर झालें आहे व ज्या निर्णयांवर मी आलों आहें तेहि अंतिम असे नाहींत; कदाचित् ते मी उद्यां बदलीनहि... सारांश, जीवन व त्यांतील प्रश्न यांच्या द्वारां सत्य-अहिंसेचे प्रत्यक्ष प्रयोग करण्याची संधि मला मिळाली आहे...मी स्वभावतः सत्यवादी होतों; परंतु अहिंसक नव्हतों...सत्याची उपासना करतां–करतांच मला अहिंसाहि मिळाली आहे. हें जें मीं सांगितलें, त्यांतच माझें सारें तत्त्वज्ञान – जर त्याला 'तत्त्वज्ञान' हें मोठें नांव देतां येत असेल तर – सामावलें आहे. त्याला 'गांधीवाद' म्हणूं नका; कारण त्यांत 'वाद' म्हणण्याजोगें कांहींच नाहीं ! "

['गांधीवाद : समाजवाद' पृष्ठें : ८-९]

'गांधीवादी' म्हणवूं नका :

आपल्या तत्त्वज्ञानाला लोकांनीं 'गांधीवाद' असें नांव देऊं नये म्हणून गांधीजींनीं कितीहि आग्रहानें सांगितलें तरी लोकांना तो शब्द फार सोयीचा वाटल्यामुळें त्यांनीं तो वापरण्याचें चालूच ठेवलें. इतरांची गोष्ट दूरच, स्वतः गांधीजींच्या अनुयायांनींहि स्वतःला गांधीवादी म्हणवून घेण्याचें सोडलें नाहीं. आपल्या या अनुयायांना उद्देशून गांधीजींनीं खालील उद्‌गार काढले होते :–

"I would ask you to give up the names 'Gandhi-ites' and 'Gandhism'. You may call yourselves 'Ahimsaites', if you like, but 'Gandhi-ite' is meaningless. Gandhi is an erring mortal, a mixture of good and evil, so you cannot go by the name 'Gandhi-ites'. Ahimsa is not such adulterated ore, it is pure gold."

[Harijan : Mar. 2, 1940]

['गांधीवादी' आणि 'गांधीवाद' हीं नांवें तुम्हीं सोडून द्यावींत, असा सल्ला मी तुम्हांला देईन. तुम्हांला वाटल्यास तुम्ही स्वतःला 'अहिंसावादी' म्हणवून घ्या. परंतु 'गांधीवादी' हा एक निरर्थक शब्द आहे. गांधी हा

एक मर्त्य जीव आहे. त्याच्या हातून चुका होऊं शकतात. बरें व वाईट यांचें तें मिश्रण आहे. म्हणून तुम्ही 'गांधीवादी' हा शब्द वापरूं नये. याच्या उलट अहिंसा हें कांहीं भेसळ असलेलें अशुद्ध सोनें नसून शुद्ध, बावनकशी सोनें आहे.]

असल्या गांधीवादाचा नाश होवो !

आपला मुद्दा अधिक स्पष्ट करण्यासाठीं गांधीजी पुढें म्हणतात :

"Let Gandhism be destroyed if it stands for error. Truth and Ahimsa will never be destroyed, but if Gandhism is another name for sectarianism, it deserves to be destroyed. If I were to know, after my death, that what I stood for had degenerated into sectarianism, I should be deeply pained. We have to work away silently. Let no one say that he is a follower of Gandhi. It is enough that I should be my own follower. I know what an inadequate follower I am of myself, for I cannot live upto the convictions I stand for."

[Harijan : Mar. 2, 1940]

[गांधीवाद म्हणजे चुकांचें गांठोडेंच असेल तर त्याचा नाश झालेला बरा. सत्य आणि अहिंसा यांचा नाश कधींच होणार नाहीं ; परंतु गांधीवाद हें एखाद्या संकुचित संप्रदायवादाचेंच दुसरें नांव असेल तर तो नष्ट होण्याच्याच लायकीचा आहे, असें म्हटलें पाहिजे. माझ्या मृत्यूनंतर जर मला असें समजलें कीं ज्या तत्त्वांचा व सिद्धान्तांचा मीं पुरस्कार केला होता त्यांचा अधःपात होऊन त्यांतून एक पंथ अथवा संप्रदाय निर्माण झालेला आहे, तर मला अत्यंत दुःख होईल. आपण गाजावाजा न करतां काम करीत राहिलें पाहिजे. अमुक मनुष्य हा गांधीचा अनुयायी आहे, असें कोणाला म्हणतां येऊं नये. मी स्वतःच माझा अनुयायी बनूं शकलों तरी तें पुरेंसें आहे. ज्या श्रद्धा मीं उराशीं बाळगल्या आहेत, त्यांच्याप्रमाणें मी जीवन जगूं शकत नाहीं, त्यामुळें मी माझा स्वतःचाच किती कच्चा अनुयायी आहें, याची मला पूर्ण कल्पना आहे.]

वर्धिष्णु व विकसनशील तत्त्वज्ञान :

गांधीवादासंबंधीं विचार करतांना नेहमींच एक सावधगिरी बाळगली

पाहिजे – जी फारच क्वचित् लक्षांत घेतली जाते. ती अशी कीं, गांधीवाद हा कांहीं एखादा अटळ धर्मसिद्धान्त (rigid dogma) नव्हे. तें एक वर्धिष्णु व विकसनशील तत्त्वज्ञान आहे. गांधीजींनीं त्याचा विचार, प्रचार व प्रसार करण्याचा प्रयत्न केला म्हणून तें गांधींच्या नांवाशीं निगडित झालें. कालांतरानें गांधीजींसारखा दुसरा एखादा समर्थ पुरुष उदयास आला तर या तत्त्वज्ञानाला जीवनांत उतरविण्याचे मार्ग तो शोधून काढील, त्यांत नवीन भर घालील आणि त्याचें लोण पुढें नेऊन पोंचवील.

या बाबतींत गांधीजींनीं जें लिहून ठेवलें आहे, त्याचा विसर आपल्याला पडतां कामा नये. ते म्हणतात,

“ एखादा लेख लिहिण्याच्या वेळीं, त्यापूर्वी मीं कोणतें मत प्रकट केलें होतें याचा विचार मी कधीं करीत नाहीं. अमुक प्रश्नासंबंधीं पूर्वी आपण जें लिहिलें आहे, त्याच्याशीं आतांचें आपलें लिहिणें सुसंगत राहिलें पाहिजे, हें माझें उद्दिष्ट नसतें, तर त्या क्षणीं मला जें सत्य भासेल त्याच्याशीं सुसंगत राहणें हें उद्दिष्ट असतें. त्यामुळें सत्याच्या बाबतींत माझा उत्तरोत्तर विकास होत गेला आहे. स्मरणशक्तीवर पडणारा बोजा किंवा ताण कमी झाला आहे. शिवाय जेव्हां जेव्हां मला माझें पन्नास वर्षांपूर्वीचें लिखाण माझ्या आतांच्या लिखाणाशीं ताडून पाहण्याचा योग आला तेव्हां तेव्हां त्या दोहोंत मला कसलीहि विसंगति आढळून आलेली नाहीं; पण ज्या मित्रांना तशी विसंगति दिसून आली असेल त्यांनीं माझ्या अगदीं अलीकडील लिखाणांत जो अर्थ असेल तो घेणें बरें. अर्थात् त्यांना जुना अर्थच बरा वाटला तर माझें कांहीं म्हणणें नाहीं; पण ती निवड करण्यापूर्वी त्या दोन बाह्यतः विसंगत दिसणाऱ्या लिखाणांत मूलतः कायम राहणारी अशी सुसंगति आहे किंवा नाहीं, हें पाहून घेण्याचा त्यांनीं प्रयत्न करावा. ”

[Selections from Gandhi : Introduction : iii]

नौका नव्हे, दीपस्तंभ !

कर्मठ धर्म-पंथांनीं घालून दिलेले आचरणाचे नियम अथवा नीतितत्त्वें यांच्याशीं गांधीवादाचें साम्य कल्पून जे लोक विचार करतात त्यांची मोठीच फसगत होते; कारण समाजाला सुखरूपपणें परलोकींच्या पैलतीराला नेऊन

पोंचविण्याची हमी जसे हे धर्मपंथ घेतात, तसा गांधीवाद घेत नाहीं. गांधीवाद ही एखाद्या विशिष्ट स्थळीं नेऊन पोंचविणारी नौका नसून केवळ मार्गदर्शन करणारा दीपस्तंभ आहे. त्याच्याकडे पाहून ज्यानें त्यानें आपला मार्ग निश्चित करावयाचा आहे. गांधीजींचीहि या बाबतींत हीच भूमिका होती व त्यांनीं वेळोवेळीं ती स्पष्टहि केली होती. एके ठिकाणीं ते म्हणतात :

" मी जो कांहीं सल्ला देतों त्याच्या बाबतींत नेहमीं एक संरक्षक कलम असतें. तें असें कीं, तो सल्ला स्वतःच्या बुद्धीला व हृदयाला पटत नसेल तर त्याप्रमाणें कोणीं वागूं नये. ज्याला प्रामाणिकपणें अंतरांतून कांहीं वेगळा आदेश मिळाला असेल त्यानें, माझा सल्ला त्याहून वेगळा आहे म्हणून, त्या आदेशाच्या विरुद्ध वागण्याचें मुळींच कारण नाहीं. हेंच दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे, ज्यांना कसल्याहि आंतरिक आदेशाची जाणीव नसेल आणि ज्यांची माझ्या परिपक्व अनुभवावर व निर्दोष निर्णयबुद्धीवर श्रद्धा असेल त्यांनाच तो सल्ला लागू होतो. "

[Ibid : ix]

या दृष्टिकोणांतूनच गांधीवादाकडे आपण पाहिलें पाहिजे. तसें न केल्यास आपली पूर्वग्रहयुक्त दृष्टि आपल्याला खरा गांधीवाद दिसूं देणार नाहीं. ही दृष्टि पुष्कळदां आपल्याला फसविते, आणि मूळ गांधीवाद बाजूला राहून दुसऱ्याच एखाद्या बाह्य गोष्टीला आपण गांधीवाद समजून धिक्कारतों अथवा पूजितों.

युद्धाच्या बाबतींतील गांधींची भूमिका :

नरहिंसेपासून वानरहिंसेपर्यंत आणि संडास सफाईपासून सच्चिदानंदापर्यंत जीवनांतील प्रत्येक बारीक-सारीक गोष्टीविषयीं गांधीजींनीं विचार केला होता, प्रयोग केले होते. आधुनिक काळांत गांधीजींसारखा निर्भय प्रयोगवीर दुसरा कोणी आढळत नाहीं. अशा वेळीं गांधीवादासंबंधीं विचार करणाऱ्याला जीवनाच्या विविध अंगोपांगांमध्यें गांधीजींनीं केलेल्या प्रयोगांची व त्यांवरून काढलेल्या निष्कर्षांची सूक्ष्म छाननी करावी लागते. परंतु या वेळीं आपल्याला समग्र गांधी-विचार-दर्शनाची चर्चा करावयाची नसून चिनी आक्रमणाच्या संदर्भांत युद्ध व संरक्षण किंवा प्रतिकार या बाबतींतील गांधींची भूमिका समजून घ्यावयाची आहे. येथें एक गोष्ट नीट लक्षांत ठेवली पाहिजे. ती अशी

कीं, गांधीजींच्या ह्यातींत भारतावर मोठें असें परचक्र आलेलें नव्हतें. (जपानचा हल्ला हा वस्तुतः भारतावर नसून भारतावरील ब्रिटिश साम्राज्य-सत्तेवर होता.) अथवा निकट भविष्यांत तें येण्याचीं चिन्हेंहि दिसत नव्हतीं. त्यामुळें प्रत्यक्ष देशावर आक्रमण झालें असतां त्याचा प्रतिकार कसा करावा, हा एक गौण मुद्दा होता. त्याविषयीं केवळ थोडी तात्त्विक चर्चाच अधून मधून गांधीजींनीं केली होती. परंतु गांधीजींचें तत्त्वज्ञान हें कांहीं ठोकळेवजा नव्हतें. प्रत्यक्ष अनुभवांनीं त्यांत भर पडत होती. यामुळें आज गांधीजी असते तर त्यांनीं कोणती भूमिका घेतली असती हें ठामपणें कोणालाच सांगतां येणार नाहीं. तरीपण त्यांची एकूण झुंझार वृत्ति आणि त्यांनीं वेळोवेळीं काढलेले उद्गार यांच्या साह्यानें आजच्या परिस्थितींत गांधींनीं कोणता आदेश दिला असता, याचा अंदाज करणें फारसें अवघड जाणार नाहीं. आजच्या गांधीवाद्यांनीं युद्धाच्या बाबतींत जी भूमिका घेतली आहे, तिचें विवेचन अन्यत्र करण्यांत आलेलें आहे. स्वतः गांधीजींनीं अशीच भूमिका घेतली असती, असें मानण्यास आधार नाहीं. त्याची चर्चा स्वतंत्र प्रकरणांत केली जाईल.

भ्याडपणापेक्षां हिंसा बरी !

गांधीवादाचा विचार करतांना आपण एक गोष्ट सतत लक्षांत ठेवली पाहिजे कीं, गांधीवादाला जन्म देणारे गांधीजी हे अत्यंत निर्भय व शूर होते. शस्त्रास्त्रांनीं लढणाऱ्या कोणत्याहि श्रेष्ठ सैनिकापेक्षां त्यांच्यातील शौर्य कमी प्रतीचें नव्हतें — असलेंच तर कांकणभर सरसच असेल ! त्यांनीं ज्या अहिंसेचा प्रचार व पुरस्कार केला ती शूरांची, वीरांची अहिंसा होती. तिच्यांत भ्याड-पणाला मुळींच स्थान नव्हतें. अहिंसा हें भ्याडपणा लपविण्याचें एक आवरण बनतां कामा नये, यावर त्यांनीं शेवटपर्यंत भर दिला. एके ठिकाणीं ते म्हणतात :

" भ्याडपणा व हिंसा यांच्यांत निवड करण्याचा प्रसंग आला तर हिंसा करावी, असें मी म्हणेन. उदाहरणार्थ, माझ्या थोरल्या मुलानें जेव्हां मला विचारलें कीं, ' १९०८ सालीं तुमच्यावर प्राणघातक हल्ला झाला, त्या वेळीं मी हजर असतों तर मीं काय करायला हवें होतें ? पळून जाऊन तुम्हांला मारूं द्यायचें, हें योग्य झालें असतें ? कीं स्वतःच्या शरीरबळाचा जो उपयोग मला

करतां आला असता आणि करावासा वाटला असता तो करून तुमचा बचाव करणें योग्य झालें असतें ? ' मीं त्याला सांगितलें कीं, ' हिंसा वापरून सुद्धां माझा बचाव करणें, हेंच तुझें कर्तव्य ठरलें असतें. ' मीं बोअर युद्धांत, झुलूंच्या ' बंडांत ' आणि पहिल्या महायुद्धांत जो भाग घेतला तो माझ्या या मतामुळेंच. म्हणूनच हिंसामार्गावर विश्वास असणाऱ्यांनीं शस्त्रें चालविण्याचें शिक्षण घेतलें पाहिजे, असें मी सांगत असतों. हिंदुस्थाननें आपल्या सत्त्वाची पायमल्ली होत असलेली भ्याडपणें, उघडया डोळयांनीं पाहत राहण्यापेक्षां त्याचें रक्षण करण्याकरितां शस्त्रें हातीं घेतलेलीं मला पत्करतील. "

[' यंग इंडिया. ' ११-८-१९२०]

शूरांची अहिंसा

असें असलें तरी अहिंसा ही हिंसेपेक्षां अनंत पटींनीं श्रेष्ठ आहे, अशीच गांधीजींची श्रद्धा होती. परंतु ही अहिंसा दीनदुबळयांना कळणार नाहीं, व म्हणून माणसानें आधीं आपलें मन खंबीर बनवावें आणि मगच अहिंसेचा स्वीकार करावा, असें ते सांगत. एके ठिकाणीं ते म्हणतात,

' Ahimsa is not the way of the timid or cowardly. It is the way of the brave ready to face death. He who perishes sword in hand is no doubt brave, but he who faces death without raising his little finger and without flinching is braver. But he who surrenders his rice-bags for fear of being beaten is a coward and no votary of Ahimsa. "

[Young India : 11. 10. 1928]

" अहिंसा ही अमोघ शक्ति व्हावयाची असेल तर तिचा उगम मनांत झाला पाहिजे. मनाच्या सहकार्यावांचून केवळ शरीराची अहिंसा ही दुबळयाची किंवा भ्याडाची अहिंसा बनते. तिच्यांत वीर्य नसतें. आपल्या मनांत आपण हेवादावा व द्वेष बाळगला आणि उलट आघात करीत नाहीं, असें वरवर दाखविलें तर तें आपल्यावर उलटणारच आणि त्यांत आपला नाश होणारच. दुखापत न व्हावी म्हणून केवळ शारीरिक हिंसा वर्ज्य करून भागणार नाहीं,

प्रत्यक्ष प्रेमभाव जरी आपण निर्माण करूं शकलों नाहीं, तरी द्वेषभावनेला तरी निदान आपण थारा देतां कामा नये, हें अगत्याचें आहे...

"जो मनुष्य मरणाला भितो व ज्याच्यांत प्रतिकाराची शक्ति नाहीं, अशाला अहिंसा शिकवितां येणार नाहीं. अहिंसा काय आहे हें कळण्यापूर्वी त्याला नेटानें उभें राहण्यास आणि आपल्याला चीत करूं पाहणाऱ्या आक्रमकाला तोंड देऊन स्वतःचें रक्षण करण्याच्या प्रयत्नांत मरणदेखील पत्करण्यास शिकविलें पाहिजे. याहून वेगळें कांहीं करणें म्हणजे त्याचा भ्याडपणा तसाच ठेवणें आणि अहिंसेपासून त्याला आणखी दूर नेणेंच होईल. उलटून आघात करण्यास जशी मीं कोणाला मदत करूं नये, त्याचप्रमाणें भ्याडाला केवळ वेगडी अहिंसेच्या मार्गेंहि मीं लपूं देऊं नये. अहिंसेचें सत्त्व काय आहे तें न कळल्यामुळें संकट आलें कीं त्याला तोंड न देतां, विशेषतः जेव्हां त्यांत आपल्या जीवाला धोका असेल तेव्हां, त्यापासून दूर पळून जाणें हा गुण आहे, असा पुष्कळांचा प्रामाणिक समज असतो. असला नामर्दपणाचा समज न व्हावा म्हणून अहिंसेचा धडा देणारा शिक्षक या नात्यानें मला सावध राहिलें पाहिजे. आपल्या भावाच्या हातून जरूर तर मरण पत्करण्याची तयारी ठेवल्यानेंच मनुष्य मोकळेपणानें जगूं शकतो, त्याला मारून नव्हे. खून किंवा दुखापत, कोणत्याहि कारणानें कां असेना, करणें हा मानवसमाजाविरुद्ध केलेला गुन्हा आहे; परंतु अहिंसेसंबंधींचें हें सत्य दीनदुबळ्यांना सांगण्यासारखें नाहीं, हें मला स्पष्ट दिसत आहे. त्यांना अगोदर आत्मसंरक्षण करायला शिकविलें पाहिजे."

[**'गांधी विचारदर्शन' (सत्याग्रह-विचार)** पृष्ठें ३४, ३५.]

गांधीजींचा मोठेपणा :

गांधीजी अहिंसेचे इतके निष्ठावान् भक्त असले तरी हिंसेवर श्रद्धा असणाऱ्यांची त्यांनीं कधीं हेटाळणी केली नाहीं अथवा त्यांच्यांतील गुणांची कदर करण्यास मागें-पुढें पाहिलें नाहीं. एके ठिकाणीं ते म्हणतात,

"एखाद्याचा हिंसेवर विश्वास असला तरी ज्या बाबतींत तो गौरवाला पात्र असेल त्या बाबतींत त्याचा गौरव केलाच पाहिजे. तो नाकारणें हें

माझ्या अहिंसेंत बसत नाहीं. उदाहरणार्थ, सुभाषबाबूंचा हिंसेवरील विश्वास आणि तदनुसार त्यांच्याकडून झालेली कृति मला मान्य नव्हती तरी त्यांच्या देशभक्तीची, योजकतेची व शौर्याची मनसोक्त स्तुति करण्याला मीं मागेंपुढें पाहिलें नाहीं. त्याचप्रमाणें, काश्मीरी लोकांना मदत करण्याकरितां भारत सरकारनें जो शस्त्रांचा वापर केला तो मला मान्य नसला आणि शेख अबदुल्लांनीं जो शस्त्रांचा आश्रय घेतला तोहि मला पसंत नसला, तरी दोघांनींहि जी योजकता व प्रशंसनीय वर्तणूक दाखविली, विशेषतः काश्मीरी सैन्यांतील आणि त्यांच्या कुमकेला गेलेल्या हिंदी सैन्यांतील प्रत्येक सैनिक शूराच्या मरणानें मेला असेल, तर त्याबद्दल त्यांचा गौरव केल्यावांचून राहणें मला शक्य नाहीं. "

[कित्ता : पृष्ठें : १४१–१४२]

या संदर्भांत गांधीजींविषयींचा माझा स्वतःचा एक अनुभव नमूद करतां येईल. ' मीं पाहिलेले गांधीजी ' (पृष्ठें ५१–५२) यांतून तो प्रसंग खालीं देत आहें :—

मी तुरुंगांतून सुटल्यानंतर कांहीं दिवस घरच्या मंडळींना भेटण्यांत घालविले आणि ता. २२–१२–१९४४ रोजीं वर्ध्यास गेलों. त्याच दिवशीं रात्रीं सेवाग्रामला जाऊन मीं बापूजींना प्रणाम केला. जवळ जवळ अडीच वर्षांनंतर मी त्यांना भेटत होतों; त्यामुळें ते ओळख तर विसरले नसतील ना, अशी शंका मनांत येत होती. परंतु त्यांनीं मला तत्काळ ओळखलें आणि पहिलेंच वाक्य उच्चारलें, " अच्छा, तुम तो अब बडे हो गये हो ! "

मी कांहींसा ओशाळून म्हणालों, " जी नहीं ! "

" नाहीं ? " त्यांनीं हंसून विचारलें.

" छेः छेः ! मुळींच नाहीं. " मी पुनः म्हणालों.

आतांपर्यंत मला ही गंमतच वाटत होती. परंतु मीं मोठेपणाचा निक्षून इन्कार केल्यानंतर ते थोडा वेळ विचारमग्न झाले आणि म्हणाले, " क्यों नहीं ? मैंने तो तुम्हारे बारेमें सुना है ! "

मीहि थोडासा गंभीर झालों आणि विचारलें, " लेकिन यह बताइए कि मैं कैसे बड़ा हुआ ? "

" कामसे ! " ते उत्तरले.

" कामानं ? पण मीं जें कांहीं केलं, तें तर तुम्हांला पसंत नाहीं ! " मी म्हणालों.

" पण जें कार्य मला पसंत नसेल तें मोठं असणारच नाहीं असं थोडंच आहे ? ज्या गोष्टी मला पसंत नाहींत त्यांचंहि मोठेंपण ओळखणं नि त्यांची कदर करणं यांतच माझी परीक्षा आहे." गांधीजी उत्तरले.

ही भूमिका बाळगणाऱ्या गांधीजींनीं महापुराच्या लोंढ्याप्रमाणें प्रचंड संख्येनें भारतावर धाड घालणाऱ्या चिनी सैनिकांना धैर्यानें तोंड देणाऱ्या व इंच इंच भूमि लढविणाऱ्या मूठभर हिंदी सैनिकांचें किती कौतुक केलें असतें हें काय सांगावयास हवें ?

देशाचें संरक्षण महत्त्वाचें :

गांधीजींची हयात मुख्यत: देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यांतच खर्ची पडली. देशाच्या संरक्षणाचा प्रश्न त्या वेळीं फारसा पुढें आलेला नव्हता. परंतु वेगवेगळ्या प्रसंगांच्या संदर्भांत त्यांनीं देशाच्या संरक्षणाविषयींचे आपले विचार मांडलेले आहेत. त्यावरून त्यांनीं या प्रश्नाचा खूपच विचार केला होता असें दिसून येतें. अहिंसेच्या मार्गानेंहि देशाचें संरक्षण करतां आलें पाहिजे, अशी त्यांची श्रद्धा असली तरी ती गोष्ट निकट भविष्यांत शक्य कोटींतील नाहीं, हें ओळखण्याइतकें व्यवहारचातुर्य गांधीजींजवळ होतें. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पाकिस्ताननें भारताशीं जें शत्रुत्व आरंभिलें, त्यावरून पाकिस्तानशीं पुढेंमागें युद्धहि करावें लागेल, ही गोष्ट गांधीजींनीं ओळखली होती. एके दिवशीं दिल्लींतील प्रार्थनोत्तर प्रवचनांत ते म्हणाले होते,

" सर्व प्रकारच्या युद्धाला मी सदैव विरोधच करीत आलों आहें; परंतु पाकिस्तानपासून न्याय मिळविण्याचे सारेच उपाय थकले, शाबीत करून दिलेली चूक व पदरांत घातलेलें पापहि पाकिस्तान हटवादीपणानें नाकबूलच करीत राहिला, आणि आपण कांहींहि केलेलें नाहीं, असेंच म्हणत राहिला, तर हिंदी संघराज्याला पाकिस्तानशीं युद्ध करण्यावांचून गत्यंतर राहणार नाहीं. युद्ध म्हणजे थट्टा नव्हे. युद्ध कोणालाच नको. तो मार्ग विनाशाचा आहे; परंतु अन्याय सहन करा, असें मी कधींच कोणाला सांगणार नाहीं. न्याय्य गोष्टीसाठीं सारे हिंदू कामीं आले तरी मी त्याची पर्वा करणार नाहीं.

युद्ध आलेंच तर पाकिस्तानांतील हिंदूंनीं पंचमस्तंभी बनतां कामा नये. तें कोणीहि सहन करणार नाहीं. पाकिस्तानविषयीं त्यांना निष्ठा वाटत नसेल तर त्यांनीं निघून यावें. त्याचप्रमाणें हिंदी संघराज्यांतील ज्या मुसलमानांचा पाकिस्तानकडे ओढा असेल त्यांनीं पाकिस्तानांत जावें. हिंदू व शीख यांना न्याय मिळवून देण्याचें काम सरकारचें आहे. लोकांनीं आपल्या इच्छेप्रमाणें सरकारला करायला लावावें. माझा मार्ग विचाराल तर तो वेगळा आहे. मी ईश्वराचा पुजारी आहें; आणि सत्य-अहिंसा हें माझ्या ईश्वराचें स्वरूप आहे."

['दिल्ली डायरी' : पृष्ठें : ३९-४०]

गांधीजींची ही भूमिका कांहीं तात्कालिक कारणांनीं बनलेली नव्हती, अथवा केवळ पाकिस्तानचा धोका प्रत्यक्ष दिसूं लागल्यावरच बनलेली नव्हती. त्याच्या आधीं, पंचवीस वर्षांपूर्वीं वायव्य सरहद्द प्रांतांतील पंजाब्यांवर टोळीवाल्यांचे हल्ले सुरू झाले तेव्हांहि गांधीजींनीं असेंच लिहिलें होतें कीं,

"If we had charge of Frontier, I know what we would have done. We would certainly have died in the attempt to defend unarmed population of the districts. We would have, if necessary, armed the population for self-defence."

[Young India : 25-5-1921]

[सरहद्द प्रांताचीं सूत्रें आमच्या हातीं असतीं तर आम्हीं काय केलें असतें, याची मला चांगली कल्पना आहे. त्या प्रांतांतील निःशस्त्र जनतेच्या संरक्षणासाठीं आम्ही आमचे प्राणहि खर्ची घातले असते. जरूर भासली असती तर तेथील जनतेला स्वसंरक्षणासाठीं आम्हीं शस्त्रसज्जहि केलें असतें.]

अहिंसक प्रतिकाराचें तंत्र आणि मंत्र :

गांधीजींनीं सशस्त्र आक्रमणाला अहिंसक मार्गानें तोंड देण्याची कल्पना अनेक वेळां मांडली होती. 'अत्यंत दुर्बळ असलेलें राष्ट्रसुद्धां अहिंसेची विद्या शिकलें तर बाहेरच्या हल्ल्यापासून स्वतःला निर्भय राखूं शकेल.' अशी त्यांची श्रद्धा होती. 'हिटलरसारख्याला दयामाया नसते. तुमच्या आध्यात्मिक साधनेचा त्याच्यापुढें कांहीं उपयोग होणार नाहीं', या विधानाला उत्तर

देतांना ते म्हणाले होते कीं, " तुमचें म्हणणें बरोबर असूं शकेल. कोणाहि राष्ट्रानें अहिंसक प्रतिकार करण्याचें अंगीकारिलें असल्याचा दाखला आजवरच्या इतिहासांत नाहीं. माझ्या आत्मक्लेशांनीं हिटलरच्या मनावर कांहीं परिणाम झाला नाहीं तरी हरकत नाहीं. त्यामुळें मीं मोलाचें कांहीं गमावलें असें होत नाहीं. माझी इज्जत हीच एक संरक्षण करण्याजोगी वस्तु आहे. ती कांहीं हिटलरच्या कृपेवर अवलंबून नाहीं; पण अहिंसेवर माझी श्रद्धा असेल तर तिच्या शक्तीला मर्यादा आहे, असें मीं कां मानावें ? आजपर्यंत हिटलरनें आणि त्याच्यासारख्या इतरांनीं, माणसें बळजोरीपुढें वांकतात, या नित्याच्या अनुभवावर विश्वास ठेवला. स्त्रिया, पुरुष व मुलें निःशस्त्र राहून आपल्या अंतःकरणांत यत्किंचितहि कटुता न ठेवतां अहिंसक प्रतिकार करतात, हा त्यांना एक नवाच अनुभव येईल. अधिक उदात्त आणि सूक्ष्म अशा शक्तींना अनुकूल असा प्रतिसाद देणें हिटलरसारख्यांच्या स्वभावांत नाहीं, असें छातीठोकपणें कोण सांगेल ? माझ्यांत जो आत्मा आहे, तोच त्यांच्यांतहि आहे."

['हरिजन': १५-१०-१९३८]

अहिंसेवरील श्रद्धेच्या बाबतींत गांधीजी किती पुढें गेले होते हें पाहणें बोधप्रद होईल. त्यांना असा प्रश्न विचारण्यांत आला होता कीं,

" तुम्ही सांगतां ती अहिंसा विमानांतून चालणाऱ्या युद्धक्रियेला कशी सामना देऊं शकेल ? कारण त्या युद्धांत माणसाचा माणसाशीं वैयक्तिक संबंधच येत नाहीं."

यावर त्यांनीं असें उत्तर दिलें कीं, "याचें उत्तर असें कीं, या विनाशकारी बाँबच्यामागें तो टाकणारा हात आहे आणि त्या हाताच्यामागें त्याला गति देणारें मानवी हृदय आहे, हें गृहीत धरलें आहे. दहशतवादाच्या धोरणाच्या मागेंसुद्धां ही गोष्ट गृहीत धरलेली असते कीं, पुरेशा प्रमाणांत दहशतवाद लागू केला कीं इष्ट परिणाम घडून येणारच; म्हणजे जुलूम करणाऱ्याच्या इच्छेपुढें प्रतिपक्षी वांकणारच. पण समजा, लोकांनीं ठरविलें कीं जुलूम करणाऱ्याच्या इच्छेप्रमाणें आम्ही वांकणार नाहीं, किंवा त्याच्या पद्धतींनींच त्याच्यावर उलट आघात करणार नाहीं, तर जुलूम करणाऱ्याला आपला दहशतवाद चालू ठेवण्यांत कांहीं हंशील वाटणार नाहीं. जुलूम करणाऱ्याला

भरपूर खाद्य देत गेलें तर केव्हांतरी एक वेळ अशी येईल कीं, जेव्हां पोटाला तडस लागेल इतकें आपल्याला खायला मिळालेलें आहे, असें त्याला आढळून येईल."

['हरिजन' : २४-१२-१९३८]

याच संदर्भांत यानंतर सुमारें दोन वर्षांनीं त्यांनीं व्यक्त केलेले विचारहि पाहण्यासारखे आहेत. ते एके ठिकाणीं म्हणतात,

"आपला आत्मा जेत्याच्या स्वाधीन न करणें याचा अर्थ हा कीं, आपली सदसद्विवेकबुद्धि जें आपल्याला करूं नको म्हणून सांगेल तें करावयाचें नाकारणें; शत्रु ज्या अपमानकारक गोष्टी करायला सांगेल त्या न करणें; पण त्यानें तुमची मालमत्ता हिसकून घेतली तर ती तुम्ही त्याच्या स्वाधीन कराल; कारण, अहिंसेचा उपासक म्हणून तुम्हीं प्रारंभींच ठरविलें आहे कीं, ऐहिक परिग्रहाशीं आत्म्याला कांहीं कर्तव्य नाहीं. जें आपल्या मालकीचें आहे असें तुम्हांला वाटत असतें तें जग तुम्हांला तुमचें म्हणूं देतें तोंवरच तुम्ही तुमच्यापाशीं ठेवूं शकतां..."

"प्रभुत्व मानण्याला नकार देणें याचा अर्थ स्पष्ट आहे. जेत्याच्या श्रेष्ठत्वापुढें तुम्ही नमणार नाहीं. त्याच्या हेतुपूर्तीकरितां तुम्ही त्याला मदत करणार नाहीं. हिटलरला ब्रिटनचा ताबा घ्यावा असें स्वप्नांतहि वाटत नाहीं. ब्रिटिशांनीं पराभव मान्य करावा, हें त्याला हवें आहे. जेता मग जितांकडून हव्या त्या गोष्टींची मागणी करूं शकतो आणि जिताला नमल्यावांचून गत्यंतर राहत नाहीं. प्रतिस्पर्ध्यानें पराभव मान्य केला नाहीं तर शत्रु विरोध करणाऱ्याशीं लढतो आणि शेवटीं त्याला ठार मारतो. परंतु सत्याग्रह्याच्या बाबतींत शत्रूनें त्याला मारण्यापूर्वींच तो आपल्या शरीराला मेलेला असतो; म्हणजेच आपल्या शरीरविषयक आसक्तीपासून तो मुक्त झालेला असतो आणि केवळ आत्म्याच्या विजयाच्या रूपानेंच तो जगत असतो. म्हणून स्वतः अगोदर मरून गेलेला असल्यामुळें तो दुसऱ्याला मारण्याची तळमळ कशाला बाळगील? मारीत असतांना मरणें म्हणजे मुळांतच पराभूत होऊन मरणें आहे; कारण, शत्रूला तुमच्याकडून जिवंतपणीं जें हवें आहे तें मिळविण्याला तो असमर्थ ठरला तर तुम्हांला मारून तें मिळविण्याचें तो ठरवील. उलट त्याला असें समजून आलें कीं, आपला जीव वांचविण्यासाठीं सुद्धां त्याच्याविरुद्ध हात

उचलण्याचा लेशमात्रहि विचार तुमच्या मनांत नाहीं, तर तुम्हांला मारण्याचा उत्साहच त्यांच्यांत राहणार नाहीं. प्रत्येक शिकाऱ्याला याचा अनुभव येतो. गायींची शिकार कोणीं केल्याचें ऐकिवांत नाहीं."

['हरिजन' : १८-८-१९४०]

याचा अर्थ असा कीं, युद्धाकडे पाहण्याची गांधीजींची दृष्टि प्रामुख्यानें राजनीतिज्ञाची नसून तत्त्वज्ञाची होती. पूर्वीच्या काळीं ब्रह्म, आत्मा, परमात्मा, ईश्वर वगैरे गोष्टींविषयीं वेदान्ती मंडळी जशी चर्चा करीत, तशीच कांहींशी चर्चा गांधीजींनीं केली. त्यामुळें गांधींचा मार्ग हा आपल्यासाठीं नसून त्यांच्यासारख्या महात्म्यांसाठींच आहे, असा समज सर्वसामान्य लोकांमध्यें पसरला असल्यास नवल नाहीं. स्वतः गांधीजी मात्र तसें मानीत नव्हते. आपण सामान्यांहून कांहीं विशेष वेगळे नसून आपल्याला जें शक्य आहे तें इतर सामान्य लोकांनाहि शक्य झालें पाहिजे, असें ते म्हणत. "सत्य आणि अहिंसा हे कांहीं मठ-मंदिरांकरितां राखून ठेवलेले सद्‌गुण नसून ते जितके न्यायालयांत व कायदेमंडळांत तितकेच बाजारपेठेंतहि लागू करण्याजोगे आहेत." ['हरिजन' : ८-५-१९३७] किंबहुना "मी पुढें जाऊन असेंहि म्हणेन कीं, अहिंसा ही जर लक्षावधि लोकांना आचरणांत आणण्याजोगी नसेल तर मला स्वतःला तिचा काडीचाहि उपयोग नाहीं." [Last Phase II : पृष्ठ : ३२५] अशी त्यांची भूमिका होती. याच भूमिकेंतून त्यांच्या जीवनांतील घटनांचें परीक्षण व विश्लेषण केलें पाहिजे.

'काश्मीरला सैन्य पाठविणें रास्त होतें' :

या दृष्टीनें पाहिल्यास देशांतर्गत बाबींत व संरक्षणाच्या बाबतींत स्वतंत्र भारताच्या सरकारनें जीं पावलें उचललीं तीं गांधीजींच्या तात्त्विक भूमिकेशीं पूर्णपणें विसंगत, किंबहुना अगदीं विरुद्ध होतीं, हें तटस्थ व्यक्तीला मान्य करावें लागेल. अंतर्गत शांतता टिकविण्यासाठीं गांधीजींच्या आशीर्वादानें सत्तारूढ झालेल्या काँग्रेस-सरकारांनीं गांधीजींच्या हयातींतच बेछूटपणें लाठीमार व गोळीबार करण्यास सुरुवात केली होती; आणि उठल्या सुटल्या गांधीजींचा वारसा सांगणाऱ्या मोरारजी देसायांनीं मुंबईंत एकशेंपांच निरपराध आबालवृद्धांचे मुडदे पाडून त्यावर कळस चढविला; आणि गांधी

स्मारक निधीचे अध्यक्ष असलेल्या रंगराव दिवाकरांनीं बेळगांवच्या मराठी जनतेला म्हैसूर सरकारच्या लोखंडी टांचांखालीं दाबून ठेवण्यास नैतिक पाठिंबा देऊन गांधीवादाला अंतर्गत शांतता टिकविण्याच्या कामीं संपूर्णपणें अपयश आल्याचें जाहीर करून टाकलें. या अपयशाचीं ' प्रसाद-चिन्हें ' गांधीजींच्या हयातींतच दिसूं लागलीं होतीं आणि त्याबद्दल गांधीजींनीं वेळोवेळीं आपला खेदहि व्यक्त केला होता. एका प्रश्नाला उत्तर देतांना त्यांनीं सांगितलें होतें,

"आम्हांला येथें जातीय स्वरूपाचे व कामगारांचे दंगेधोपे शमवावे लागतात. जनतेच्या मंत्र्यांनीं कांहीं बाबतींत लष्करी व बहुतेक सर्व बाबतींत पोलीसबळाचा वापर केला आहे. मंत्र्यांना तसें करण्यावांचून गत्यंतर नव्हतें, असें जरी मीं मान्य केलें असलें तरी काँग्रेस-मंत्री आपल्या भांडवलाच्या बाबतींत दिवाळखोर ठरले, असें मीं म्हटलें आहे. भांडवल म्हणजे त्यांनीं स्वीकारलेलें अहिंसेचें शस्त्र. तरीपण तुमच्या प्रश्नासंबंधीं सांगायचें तर, जर जगांतील सर्वोत्तम व्यक्तींच्या मनावर अहिंसेचें तत्त्व बिंबलें नसेल तर त्यांना लुटारूपणाला जुन्या पद्धतीनेंच तोंड द्यावें लागेल. याचा अर्थ असा होईल कीं, आपण जंगलच्या कायद्याच्या पलीकडे फारसे गेलेलों नाहीं, ईश्वरानें दिलेल्या वारशाचें मोल ओळखायला आपण शिकलों नाहीं, अनेक महान् धर्मांची शिकवण असून सुद्धां माणूस या नात्यानें फारशी प्रगति केलेली नाहीं. अर्थात् ज्यांच्या चित्तांत अहिंसा ठसलेली नाहीं त्यांनीं बळाचा वापर केला तर तो मला समजूं शकेल; परंतु ज्यांना अहिंसा समजली आहे, त्यांनीं आपलें सारें वजन लुटारूपणालाहि अहिंसेनें तोंड दिलें पाहिजे, हें सिद्ध करण्याकरितां खर्च करावें, असें मी म्हणेन..."

['हरिजन' : १०-१२-१९३८]

परंतु आपले अनुयायी अहिंसेचे पुरस्कर्ते आहेत अशी जी कल्पना गांधीजींनीं करून घेतली होती ती चुकीची होती, तो एक भ्रम होता, असें नंतर त्यांना आढळून आलें आणि त्यांनीं तसें स्पष्ट कबूलहि केलें. ते म्हणतात,

"मीं माझी चूक कबूल केली आहे. आपला (स्वराज्याचा) लढा अहिंसेवर आधारलेला होता, असें मी समजलों; परंतु वस्तुतः तो केवळ निःशस्त्र प्रतिकार होता; आणि निःशस्त्र प्रतिकार हें दुबळ्यांचें शस्त्र आहे. शक्यता

निर्माण झाली कीं त्यांतून सहज सशस्त्र प्रतिकार उद्‌भवतो...आपला लढा अहिंसक नव्हता म्हणूनच आज तुम्हांला लुटालूट, जाळपोळ आणि रक्तपात दिसत आहे.

" आमचा लढा दुर्बळांचा कां असेना, तो अहिंसेवर आधारलेला आहे, असें मीं म्हटलें होतें. तें माझें विधान चुकीचें होतें. दुर्बळाची अहिंसा अशी वस्तुच नाहीं. अहिंसा व दुबळेपणा या परस्परविरोधी गोष्टी आहेत."

['हरिजन' २७-७-१९४७]

" हिंदुस्थानच्या लढ्यांतील अहिंसा ही केवळ नामधारी होती. खरोखर तो दुर्बळांचा शस्त्रविहीन प्रतिकार होता. हिंदुस्थानांतील अलीकडच्या घडामोडींनीं या विधानांतील सत्यता प्रकट झालेली आपल्याला दिसून येते.

" माझ्या बाबतींत जें काय स्पष्टपणें घडून आलें आहे तें हें कीं, माझ्या अहिंसेच्या तंत्रांत कांहींतरी महत्त्वाचा दोष राहिला आहे, याचा शोध मला लागला. ब्रिटिश सत्तेविरुद्ध केलेल्या गेल्या तीस वर्षांच्या लढ्यामध्यें अहिंसेसंबंधींचें खरें आकलन लोकांना झालेंच नाहीं. त्यामुळें गेल्या एका पिढीच्या काळांत झालेल्या लढ्यामध्यें लोकांनीं अत्यंत अनुकरणीय अशा सहनशीलतेनें जी शांति राखली ती अंतरांतून आलेली नव्हती. तो जो दडपून राहिलेला प्रक्षोभ, त्याला ब्रिटिश सत्ता जातांच वाव मिळाला, तो मग जाती-जातींतल्या अत्याचारांच्या रूपानें बाहेर पडला. हा जातीय विद्वेष कधींच नाहींसा झाला नव्हता. तो ब्रिटिश संगिनींमुळें दबून राहिला होता. अहिंसेच्या तंत्रांत मला अपयश आलें म्हणून खुद्द अहिंसेवरील माझ्या श्रद्धेंत मुळींच कमतरता येण्याचें कारण नाहीं; उलट ती श्रद्धा तंत्रांतील संभाव्य दोष दिसून आल्यामुळें अधिकच दृढ झाली आहे."

[Last Phase II : पृष्ठें ४६२–४६३]

चीननें भारतावर हल्ला करतांच आपण एका काल्पनिक जगांत वावरत असल्याचा साक्षात्कार जसा पंडित जवाहरलाल नेहरू यांना झाला तसाच महात्माजींना स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या हत्याकांडामुळें तो झाला. त्या दोघांनीं आपापल्या चुका मान्य केल्या, हा त्यांचा मोठेपणा. जपानच्या आक्रमणाला अहिंसक मार्गानें तोंड देण्याचा मार्ग सुचविणाऱ्या गांधीजींना काश्मीरवर टोळीवाल्यांच्या आडून पाकिस्ताननें चढविलेला हल्ला परतवून लावण्यासाठीं

भारतीय फौजा धाडण्यास संमति द्यावी लागली. हा एक प्रकारें गांधीवादाचा नसला तरी व्यक्तिशः गांधींजींचा पराभवच समजला पाहिजे. ता. २९-१०-४७ रोजीं दिल्लीच्या प्रार्थना प्रवचनांत गांधीजी म्हणाले होते,

" पाकिस्तान सरकारच्या प्रोत्साहनाशिवाय हें (काश्मीरवरील) आक्रमण होणें अशक्य आहे. एकंदर प्रकरणाबाबत सारा पुरावा अजून माझ्याजवळ नाहीं. त्याची आवश्यकताहि नाहीं. भारत सरकारनें सैन्य पाठविलें तें रास्त होतें, एवढेंच मला सांगायचें आहे. श्रीनगरला जें थोडें सैन्य पाठविलें, तें पाठविणें बरोबर होतें. त्यायोगें काश्मीरी जनतेंत आत्मविश्वास निर्माण होईल. ... परिणाम अखेर प्रभूच्या हातीं. करूं वा मरूं एवढेंच माणसाच्या हातीं. हिंदी संघराज्यानें पाठविलेलें छोटेंसें लष्कर स्पार्टन वीरांप्रमाणें काश्मीरच्या बचावांत सारें गारद झालें तरी मी एकहि अश्रु ढाळणार नाहीं. ... इतर हिंदुस्थानला तें भव्य-दिव्य उदाहरण होईल. असा शौर्यधैर्यशाली बचाव साऱ्या राष्ट्रास प्रेरणा देईल. "

[' दिल्ली डायरी ' : पृष्ठ ११५]

" भारत सरकार अधिक सैन्य व अधिक कुमक पाठवीत आहे. सरकारजवळ विमानें नाहींत. परंतु खाजगी कंपन्यांनीं आपलीं विमानें सरकारच्या हवालीं केल्याचें ऐकून मला आनंद झाला. शिस्तबद्ध सैन्य व शिस्तबद्ध व्यक्तिगत सरकार यांना काळ अनुकूल आहे. लुटारूंना तो प्रतिकूल आहे. "

[' दिल्ली डायरी ' : पृष्ठ १२२]

" काश्मीरमधून कोणीहि घाबरून पळून येऊं नये. शूर नि निर्भय व्हायला शिकलें पाहिजे. आपल्या घरादारांच्या रक्षणांसाठीं मरणाची तयारी ठेवली पाहिजे. तुम्ही तरुण असा वा वृद्ध असा; स्त्री असा वा मूल असा. सर्वांनीं उभें राहिलें पाहिजे. सुंदर काश्मीरच्या रक्षणासाठीं सारें हिन्दी सैन्य नि काश्मीरी जनता ठार झाली तरी मी चिंता करणार नाहीं. "

[' दिल्ली डायरी ' : पृष्ठें ११९-१२० [

हीं उद्धरणें नजरेखालीं घातलीं असतां आजच्या स्थितींत गांधीजींनीं देशाला कोणता आदेश दिला असता हें सांगण्यास फार मोठ्या विद्वानाची जरूर आहे, असें म्हणतां येणार नाहीं. 'आजकाल माझें वजन राहिलेलें

नाहीं.' ['दिल्ली डायरी' : पृष्ठ १५५] असें एकीकडे लोकांना सांगत असतांना दुसरीकडे देशरक्षणासाठीं लढणाऱ्या सैन्याला मनांत कसलाहि किन्तु न आणतां आशीर्वाद देणारे गांधीजी खरोखरींच 'महात्मा' या पदवीस पात्र होते, असें म्हणावें लागतें. अर्थात् पोलंडवरील हिटलरच्या आक्रमणाच्या वेळीं पोलंडनें संरक्षणासाठीं केलेली हिंसा ही जवळजवळ अहिंसाच होती,* असें म्हणणाऱ्या गांधीजींनीं पाकिस्तान व चीन यांच्या आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठीं भारतानें वापरलेल्या सैनिकी सामर्थ्याची गणना अहिंसक प्रतिकारांतच केली असती, तर त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं.

लष्करभरती व शिक्षण :

या संदर्भामध्यें गांधीजींनीं लष्करभरती व लष्करी शिस्त यांच्या बाबतींत वेळोवेळीं जे उद्गार काढले होते त्यांचा विचार केल्यास आजच्या परिस्थितींत त्यापासून खूपच चांगली प्रेरणा व बोध मिळूं शकेल. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरहि त्याला लष्कर ठेवावें लागेल ही गोष्ट गांधीजींनीं हेरली व मान्य केली होती. ते म्हणतात,

"Under Swaraj too I would not hesitate to advice those who would bear arms to do so and fight for the country."

[Young India : 17. 11. 1921]

[स्वराज्यांत देखील ज्या लोकांना शस्त्रें बाळगावयाचीं असतील व देशासाठीं युद्ध करावयाचें असेल त्यांनीं तसें अवश्य करावें, असा सल्ला देण्यास मी मुळींच मागें-पुढें पाहणार नाहीं.]

अर्थात् वर्तमान परिस्थितींत अस्तित्वांत येणाऱ्या भारतीय स्वराज्यांत सैनिक व शस्त्रें यांना स्थान असणार, याबद्दल त्यांना खेदच वाटत होता; परंतु आपलें मत व इच्छा हीं कांहींहि असलीं तरी भारतीय जनतेचें मत व

* "If Poland has that measure of uttermost bravery and an equal measure of selflessness, history will forget that she defeneded herself with violence. Her violence will be counted almost as non-violence."

[Harijan : 23. 9. 1939]

इच्छा हीच शेवटीं निर्णायक ठरणार याची जाणीव गांधीजींना होती आणि तीच निर्णायक ठरलीं पाहिजेत, असें लोकशाहीचा कट्टा पुरस्कर्ता या नात्यानें त्यांना वाटत होतें. भारतांत अनेक लढाऊ जमाती आहेत व त्यांना देशाचें संरक्षण शस्त्रांच्या साह्यानें करण्याची इच्छा असणार, हें त्यांना माहित होतें. म्हणून ते म्हणत,

" हिंदुस्थानांत पुष्कळ लढाऊ जमाती आहेत आणि त्या सर्वांचा त्या काळच्या (भावी) सरकारांत हात असणारच; तेव्हां राष्ट्राचें धोरण सौम्य स्वरूपाचें कां असेना, लष्करीकरण करण्याकडे झुकतें असेल, असा माझा अंदाज आहे. "

[गांधी विचार दर्शन–' सत्याग्रह-विचार ' पृष्ठ : २४३]

" मी लढाईच्या विरुद्धच आहें; परंतु ज्याला लढण्याची इच्छा असेल त्याला मी नक्कीच लढ म्हणून सांगेन. माणसाचें मन आवेशांनीं भरलेलें असतें, हें मी कबूल करतों. माणसानें मरायला शिकायचें तर त्या अगोदर त्याच्यांत मारण्याची शक्ति असली पाहिजे. लढणें हें योग्य कीं अयोग्य, या बाबतींत कोणी माझा सल्ला विचारायला आला तर मी त्याला स्पष्ट सांगेन कीं तें अयोग्य आहे. परंतु कोणी मनामध्यें लढणें हेंच योग्य होय अशी निश्चित प्रतीति घेऊन आला, परंतु आजच्या प्रसंगीं लढणें हें चांगलें आहे किंवा नाहीं याविषयीं त्याला शंका असेल तर मी त्याला असा सल्ला देईन कीं, आजचा क्षण लढाईत भाग घेण्याचा आहे. एक सरळच उदाहरण घेऊं. माझा मुलगा येऊन मला म्हणूं लागला कीं, ' लग्न केल्याशिवाय राहाणें मला शक्य नाहीं. ' आतां माझें निश्चित मत असें आहे कीं त्यानें ब्रह्मचर्य पाळणें उत्तम; परंतु मीं त्याचें लग्न करून दिलें पाहिजे. कारण हेंच कीं त्यानें वाकड्या मार्गाला जाऊं नये. अर्थात् लग्नानंतर तूं शक्य तितका अधिक संयम पाळ, असें मी त्याला समजावून देईनच. "

[' महादेवभाईनी डायरी ' भाग ४; पृष्ठ : ८६]

गांधीजींनीं आपला मुद्दा स्पष्ट करण्यासाठीं येथें वापरलेली लग्न व ब्रह्मचर्य यांची उपमा अत्यंत समर्पक आहे. अहिंसा, निर्लष्करीकरण वगैरे गोष्टी या ब्रह्मचर्यपालनाप्रमाणें खरोखरींच अत्यंत श्रेष्ठ आहेत. त्या ब्रह्मचर्यपालनाप्रमाणेंच

अनैसर्गिक व म्हणून त्याज्य आहेत, असें मानणारेहि लोक जगांत आहेत. परंतु त्यांचा विचार येथें केलेला नाहीं.) परंतु ज्याला त्या झेपणार नाहींत, त्यानें त्या करण्याचा हट्ट धरूं नये. आपल्याला झेपेल, पेलेल, तीच गोष्ट अंगीकारावी, हा गांधीजींचा उपदेश व आग्रह अयोग्य आहे, असें कोण म्हणेल ?

इंग्रजांनीं भारतीयांना निःशस्त्र करून एक प्रकारें अपंग बनविलें होतें; यामुळें निःशस्त्रांना शक्य असलेला अहिंसक प्रतिकाराचा मार्गच भारतीयांना खुला होता. तो मार्ग गांधीजींनीं दाखवून दिला, म्हणून गांधीजी हे राष्ट्रपिता ठरले, आणि देशाला स्वातंत्र्य मिळवून दिल्यानंतर ते अप्रिय बनूं लागले. देशानें एक प्रकारें स्वातंत्र्यप्राप्तीचें साधन म्हणूनच गांधींना वापरलें. परंतु त्याबद्दल गांधीजींनीं वाईट वाटून घेतलें नाहीं.* असें घडणार याची त्यांना बहुधा कल्पनाच असावी. दुसरें महायुद्ध जिंकून देणाऱ्या चर्चिलला ब्रिटिश जनतेनें सत्तेवरून खालीं ओढलेंच होतें नां ? देशाचें स्वातंत्र्य मिळविणें, तें चालवून दाखविणें व टिकवून धरणें या अगदीं वेगवेगळ्या गोष्टी आहेत आणि त्यासाठीं विभिन्न स्वभाव-प्रकृतींचीं व शक्ति-सामर्थ्याचीं माणसें लागतात, हा अनुभव आपणहि गेलीं पंधरा वर्षें घेत आहोंतच नां ? ज्यांनीं स्वराज्य मिळविलें त्यांना तें नीट चालवितां आलें नाहीं व त्याचें रक्षणहि नीट करितां आलें नाहीं, हें आपण पाहिलें नाहीं काय ?

भारतीय जनतेची नाडी गांधीजींना अचूक कळली होती, त्या बाबतींत ते मुळींच भ्रमांत नव्हते, असें त्यांच्या उद्गारांवरून व लिखाणावरून स्पष्ट दिसून येतें. भारतीय माणसाला अहिंसेचा कितीहि उपदेश केला तरी

* " तुम्ही मला अंतःकरणापासून ' राष्ट्रपिता ' म्हणत असाल तर तें या अर्थानें म्हणतां कीं १९१५ सालीं दक्षिण आफ्रिकेंतून आल्यानंतर काँग्रेसला आजचें स्वरूप देण्यांत माझा बराचसा भाग होता. दुसऱ्या शब्दांत सांगायचें म्हणजे देशावर माझा बराच परिणाम झाला आहे. परंतु **आजकाल माझें वजन राहिलेलें नाहीं**. परंतु त्याबद्दल मला वाईट वाटत नाहीं. वाईट वाटतांहि कामा नये. सर्वांनीं आपापलें कर्तव्य करावें. बाकीचें प्रभूच्या हातीं सोंपवावें. ईश्वरेच्छेशिवाय कांहीं घडत नसतें. प्रयत्न करणें आपल्या हातीं ! "

[' दिल्ली डायरी ' – पृष्ठ : १५५]

जोंपर्यंत त्याचें मन शस्त्रास्त्रांकडे ओढ घेत आहे, तोंपर्यंत त्या उपदेशाचा कांहींहि उपयोग होणार नाहीं, हें गांधीजींनीं ओळखलें होतें. अनेक वर्षेपर्यंत ज्याला पोटभर खायला मिळालेलें नाहीं असा माणूस अन्नाचें ताट दिसतांच त्यावर तुटून पडला तर त्याबद्दल त्याला दोष देतां येणार नाहीं. इंग्रजांनीं भारतीयांचीं शस्त्रें काढून घेतल्यामुळें शस्त्रास्त्रांबद्दल भारतीयांना एक विलक्षण ओढ, आकर्षण वाटूं लागलें. म्हणून भारतीयांना आधीं सशस्त्र बनवावें, लष्करी शिक्षण द्यावें, निर्भय बनूं द्यावें आणि मग शूरांची अहिंसा त्यांना शिकवावी, असें गांधीजींना वाटत होतें. एक प्रवीण मानसशास्त्रज्ञ या नात्यानें गांधीजींचें हें निदान व हा उपाय हीं दोन्ही बरोबरच होतीं, हें काळानें सिद्ध केलें आहे. या विषयासंबंधीं त्यांनीं वेळोवेळीं जीं विधानें केलीं होतीं त्यांच्यांत पूर्ण सुसंगति व सुसूत्रता होती, असें आपल्याला आढळून येतें.

भयंकर पण खरा शोध :

कुमारी एस्थर फेरिंग यांनीं गांधीजींना असा प्रश्न विचारला होता कीं, " ज्याचा अहिंसेवर दृढ विश्वास आहे आणि सत्याग्रहाच्या प्रयोगाकरितां ज्यानें आपलें सारें जीवन समर्पित केलें आहे, असा मनुष्य इतरांना कोणत्याहि रीतीनें युद्धांत सामील होण्याला आणि लढायला कसा सांगूं शकेल ?" त्यावर गांधीजींनीं असें उत्तर दिलें होतें कीं,

" जो मनुष्य (इतरांना) मारूं इच्छितो, पण अपंग करून टाकल्यामुळें मारूं शकत नाहीं अशा माणसाला मीं काय सल्ला द्यावा ? न मारण्याचा अहिंसेचा सद्‌गुण त्याला समजण्यापूर्वीं आपला जो हात तो गमावून बसला आहे तो मीं त्याला परत मिळवून दिला पाहिजे. **हिंदी जवानांना लष्करांत दाखल होण्याचा सल्ला मीं नेहमींच देत आलों आहें.** पण आजपर्यंत त्याचा सक्रिय प्रचार करण्याच्या बाबतींत मीं स्वतःला आवरलें होतें. त्याचें कारण एवढेंच होतें कीं देशाच्या केवळ राजकीय जीवनांत आणि खुद्द युद्ध-प्रयत्नांत पूर्ण लक्ष घालण्याची आंतरिक प्रेरणा मला झाली नव्हती. परंतु दिल्लींत माझ्यापुढें कठिण समस्या येऊन उभी राहिली. माझ्या मनांत अकस्मात् असा विचार आला कीं, लष्करांत सामील होण्याच्या प्रश्नाचा मीं गंभीरपणें विचार केला नाहीं तर जीवनांतील सर्वांत मोठ्या प्रश्नाला मीं महत्त्वच दिलें नाहीं,

असें होईल. **आपण एकतर या राज्याकडून मिळणाऱ्या सर्व लाभांचा त्याग तरी केला पाहिजे किंवा युद्धसंचलनाच्या कामीं आपल्या पूर्ण शक्तीनिशीं राज्याला मदत केली पाहिजे.** लाभांचा त्याग करण्याची आपली तयारी नाहीं. हिंदी लोकांना तर दुहेरी कर्तव्य बजावावयाचें आहे. त्यांना शांतीचा संदेश पसरवावयाचा असला तरी **त्यांनीं युद्ध करण्याची शक्ति प्रथम सिद्ध केली पाहिजे,** हा शोध मला लागला. तो भयंकर आहे, पण खरा आहे. जे लोक लढायला नालायक आहेत ते न लढण्यांत असलेल्या गुणांसंबंधींचे आपले अनुभव सिद्ध करून दाखवूं शकणार नाहींत. यावरून हिंदुस्थाननें लढलेंच पाहिजे, असा निष्कर्ष मला काढावयाचा नाहीं. पण माझें हें म्हणणें अवश्य आहे कीं, हिंदुस्थाननें लढण्याची विद्या अवश्य हस्तगत केली पाहिजे...... जगाच्या विरुद्ध आपण न डगमगतां उभें राहूं शकतों, एवढें पुरेंसे आहे. तशी धमक आपल्यांत असणें हें अगदीं आवश्यक आहे. कित्येक लोकांमध्यें अशी धमक त्यांनीं लढण्याचें शिक्षण घेतलें म्हणजेच येऊं शकते."

['महादेव भाईनी डायरी' भाग ४; पृष्ठें १३५-१३६]

"अहिंसा कोणाला शिकवितां येईल? ज्याला हिंसा कशी करावी हें समजत नाहीं तो अहिंसा काय पाळणार? मुक्याला मौनव्रताची खुबी काय समजणार? अनेक वर्षांपासून लढण्याची शक्तिच आमच्यांतून नष्ट झाली आहे. जिच्याकरितां पूर्वी ऋषी तप करीत, शस्त्रास्त्रें मिळण्यासाठीं गंभीर प्रतिज्ञा करीत, तो शक्ति आपल्यांत यावी, असें आपण इच्छितों. स्त्रियांत व पुरुषांत मनुष्यत्व यावें, पुरुषार्थ यावा, तो यावेळीं या संधीचा फायदा घेतल्यानेंच येण्यासारखा आहे."

['महादेव भाईनी डायरी' भाग ४ : पृष्ठें १२८, १२९]

दक्षिण आफ्रिकेमध्यें असतांना आणि त्यानंतर पहिल्या महायुद्धामध्यें गांधीजींनीं इंग्रजी लष्करांत स्वतःचें नांव दाखल केलें होतें आणि लष्कर-भरतीसाठीं खूप प्रयत्नहि केले होते. ज्या राज्याकडून आपण भरणपोषणाच्या व सरंक्षणाच्या साऱ्या सवलती उपभोगतों त्या राज्याच्या रक्षणासाठीं प्रत्येक नागरिकानें छाती पुढें काढून उभें राहिलें पाहिजे, हा गांधीजींचा मुद्दा सशस्त्र युद्धाला विरोध करणाऱ्यांनीं सदैव मनांत बाळगला पाहिजे. गांधीजी

हे केवळ स्वप्नदर्शी नव्हते, या जमिनीशीं त्यांचा अत्यंत निकटचा संबंध होता, हेंच यावरून सिद्ध होत नाहीं काय ?

आणखी एके ठिकाणीं ते म्हणतात,

" माझें नांव मीं लष्करभरतींत दाखल केलें त्या वेळींच सरकारी अधिकाऱ्याला मीं पत्रानें कळविलें होतें, कीं मी शत्रूला किंवा मित्राला, कोणालाहि मारणार नाहीं; परंतु ज्या लोकांची प्रत्यक्ष लढाई करण्यास हरकत नाहीं, पण भित्रेपणामुळें किंवा इंग्रजांविषयींच्या द्वेषामुळें जें लोक लढायला तयार होत नाहींत, त्यांच्या बाबतींत माझें कर्तव्य काय ? त्यांना मीं असें सांगूं नये काय कीं, माझा मार्ग तुम्ही घ्याल तर ती अतिशय चांगली गोष्ट आहे; पण माझा मार्ग तुम्ही स्वीकारीत नसाल तर तुम्हांला आपल्यांतील भ्याडपणा किंवा द्वेष, जें काय असेल तें सोडून दिलें पाहिजे आणि लढलें पाहिजे ? जो मनुष्य मारण्याची शक्ति बाळगीत नाहीं त्याला तुम्ही अहिंसा समजावून देऊं शकणार नाहीं. मुक्याला मौनाची खुबी व लाभ तुम्ही कसें काय समजावून देणार ? मौन हें उत्तम आहे हें मला माहीत असलें तरी मुक्या माणसाला वाचा मिळावी याकरितां जे उपाय करणें आवश्यक असेल ते करण्याला मीं मागें-पुढें पाहतां कामा नये. मी तर राज्यसंस्थाच मानीत नाहीं. पण स्वच्छंदी राजापेक्षां कदाचित् सांसदीय (पार्लमेंटरी) राज्य अधिक चांगलें असूं शकेल. हिंसक (लष्करी) माणसांना कमींत कमी अपायकारक पद्धतीनें हिंसा करण्याचें शिक्षण देतांना त्या प्रक्रियेंतूनच अहिंसेचे सद्गुण समजावून देण्यांत कदाचित् मी यशस्वी होऊं शकेन. या मार्गानेंच अहिंसेच्या किंवा सत्याग्रहाच्या सिद्धान्ताचा प्रचार मी अधिक चांगल्या प्रकारें करूं शकेन..."

['महादेव भाईनी डायरी,' भाग ४, पृष्ठें : १४१, १४२]

कुमारी वेस्ट (देवीबहन) यांना या संदर्भांत गांधीजींनीं लिहिलेलें पत्र विशेष उल्लेखनीय आहे. त्यांतून त्यांची भूमिका अधिक उत्तम प्रकारें विशद होते. तें पत्र असें आहे :—

" प्रिय देवी,

माझ्या लष्करभरतीच्या कार्यक्रमाविषयीं तुमचें काय मत आहे, तें मला समजलेलें नाहीं. माझा सर्व वेळ मी त्याच कामाला देत आहें. त्या बाबतींतील माझें म्हणणें पुढीलप्रमाणें आहे :—

हिंदुस्थान मारण्याची शक्ति गमावून बसला आहे. मारण्याच्या शक्तीचा त्यानें स्वेच्छापूर्वक त्याग करावयाचा तर त्यापूर्वी त्यानें मारणें शिकून घेणें आवश्यक आहे. अशा रीतीनें एकदां मारण्याची शक्ति मिळविल्यानंतर तो कधीं तिचा त्याग करणार नाहीं, अशी संभावना आहे. तसें घडलें तर पश्चिमे-कडील देशांसारखाच, किंवा अधिक चांगल्या शब्दांत मांडावयाचें तर, सर्व आधुनिक स्वतंत्र देशांसारखाच तो वाईट बनेल. आज तर त्याच्या ठिकाणीं हिंसेचीहि शक्ति नाहीं आणि तिच्या त्यागाचीहि शक्ति नाहीं. प्राचीन हिंदु-स्थानला युद्धकला अवगत होती. हिंसा करण्याची शक्ति त्याच्यांत होती. पण त्या प्रवृत्तीचा त्यानें शक्य तितक्या अधिक प्रमाणांत संकोच केला आणि जगाला शिकविलें कीं, मारण्यापेक्षां मरणें हें अधिक चांगलें. आज मला असें दिसत आहे कीं, प्रत्येक माणसाला इच्छा तर आहे मारण्याची; पण पुष्कळजण तें करायला भितात, किंवा ती शक्तिच त्यांच्यांत नसते. (ही शक्ति अंगीं आल्याचा) परिणाम वाटेल तो होवो; **मला निश्चितपणें असें वाटतें कीं, मारण्याची शक्ति हिंदुस्थाननें पुनः संपादन केलीच पाहिजे.** त्यामुळें देशांत मोठ्या कत्तली होतील तर हिंदुस्थानला त्यांतून जावें लागेल. आजची स्थिति मात्र असह्य आहे."

['महादेव भाईनी डायरी' भाग ४: पृष्ठ : १७१]

संतवाणीमधील तारतम्य :

भारतीय संतांनीं आमजनतेला प्रेमभावनेची शिकवण दिली. परंतु सर्वच संतांची शिकवण सारखी नव्हती. कांहीं संतांनीं जनतेला निष्क्रिय, नेभळट बनविलें तर कांहींनीं शूर बनविलें. गांधीजींनीं संतवाणींतील हा सूक्ष्म फरकहि उत्तम प्रकारें ओळखला होता, हें खालील पत्रावरून दिसून येतें :—

"चि. मगनलाल,

...स्वामीनारायण व वल्लभाचार्य यांनीं आमच्या मनुष्यत्वाचें हरण केलें, असें माझें मत आहे. त्यांनीं माणसांची रक्षणशक्तिच काढून घेतली. स्वामी-नारायण आणि वल्लभ यांनीं शिकविलेलें प्रेम भावनाविवश करणारें आहे. त्यांतून शुद्ध प्रेम निघणें शक्यच नाहीं. अहिंसेच्या शुद्ध लक्षणाचा त्यांनीं विचारच केलेला नाहीं. अहिंसा म्हणजे चित्तवृत्तींचा निरोध. मनुष्यामधल्या

परस्पर-संबंधांत तिचा मुख्य प्रयोग व्हायचा असतो. त्याचा गंधहि त्यांच्या लिखाणांत आढळून येत नाहीं. त्यांची छाप गुजरातवर फार अधिक पडली. तुकाराम व रामदास यांची छाप मात्र त्या स्वरूपाची पडली नाहीं. तुकारामाच्या अभंगांत व रामदासांच्या श्लोकांत पुरुषार्थ भरलेला आहे. तेहि वैष्णवच होते....हिंसेंतहि अहिंसा असते हें मला आतांपर्यंत कळलें नव्हतें. तें आतां मला दिसूं लागलें आहे. हा मोठा बदल झाला आहे. दारूच्या नशेंत अत्याचार करणाऱ्या माणसाला अटकाव करणें हें आपलें कर्तव्य ठरतें, ही गोष्ट नीटपणें माझ्या लक्षांत आली नव्हती. अतिशय व्यथेमुळें तडफडणाऱ्या कुत्र्याचा जीव घेण्याची आवश्यकता मला कळली नव्हती; पिसाळलेल्या कुत्र्याला ठार मारण्याची आवश्यकताहि कळली नव्हती. हिंसेच्या या सर्व कृत्यांत अहिंसा आहे. हिंसा हा शरीराचा गुण आहे. आपलीं मुलें शरीरानें बलवान् झालींच पाहिजेत. तीं हिंसावृत्तीचा सर्वस्वीं त्याग करूं शकलीं नाहींत तर त्यांना हिंसा करूं देऊन, लढण्याच्या शक्तीचा उपयोग करूं देऊन अहिंसक बनवितां येईल. अहिंसेचा उपदेश क्षत्रियांनीं क्षत्रियांना केलेला आहे"...

['महादेवभाईनी डायरी' भाग ४ : पृष्ठ १६६]

मरणाचें अस्वाभाविक भय :

आपल्या देशांत शूरांची अहिंसा विकसित झालीच नाहीं, भ्याडांनीं आपला भ्याडपणा लपविण्यासाठींच मुख्यतः अहिंसेची ढाल वापरली, याची जाणीव गांधीजींना तीव्रतेनें होत होती. त्याबद्दल त्यांना वाटणारें दुःख त्यांनीं वेळोवेळीं नमूद केलें आहे. दीनबंधु सी. एफ्. अँड्रूज यांना लिहिलेल्या एका पत्रांत ते म्हणतात :—

"जगांत युद्धें सदैव राहणार. साऱ्या मनुष्यजातीच्या स्वभावांत इतकें परिवर्तन होईल अशी शक्यता दिसत नाहीं. मोक्ष आणि अहिंसा यांची सिद्धि व्यक्तींनाच होऊं शकेल. मालमत्ता बाळगणें, जमीन धारण करणें किंवा संतति उत्पन्न करणें हें अहिंसेचें संपूर्ण पालन करण्याशीं विसंगत आहे.

"दुष्कृत्य करणाऱ्याला ठार मारण्यांत जी जोखीम आहे, ती पत्करूनहि त्याला मारून स्त्री-बालकांचें रक्षण करणें यांत खरी अहिंसा आहे...

" सैन्यभरती करण्यांत मला फार अडचणी येत आहेत. अजून एकहि मनुष्य मला असा भेटला नाहीं कीं, जो मानवहत्या करणें निषिद्ध वाटत असल्यामुळें लष्करांत भरती होत नाहीं. बहुधा मरणाच्या भीतीमुळेंच लोक लष्करभरतीला हरकत घेतात. मरणाचें हें अस्वाभाविक भय राष्ट्राची हानि करीत आहे. अर्थात् हें निवेदन फक्त हिंदूंनाच लागू आहे. मुसलमान तरुणांमध्यें मरणाविषयीं अत्यंत बेदरकारी असते. तो त्यांचा अद्भुत ठेवा आहे."

['महादेव भाईनी डायरी', भाग ४ : पृष्ठ : १६१]

वर दिलेली कै. महादेवभाईच्या डायरींतील उद्धरणें हीं इ. स. १९१८ सालच्या एप्रिल ते ऑगस्ट या महिन्यांतील आहेत. याचा अर्थ त्यानंतर गांधीजींच्या मतांत कांहीं आमूलाग्र परिवर्तन घडून आलें, असा मात्र नव्हे. इंग्रजांनीं भारतीयांना निःशस्त्र बनवून एक प्रकारें खच्ची केलें आहे, व म्हणून हत्याराचा कायदा रद्द झाला पाहिजे, तरुणांनीं लष्करांत शिरलें पाहिजे, बलोपासना केली पाहिजे, अशा प्रकारचे विचार त्यांनीं वारंवार मांडले आहेत. स्वतंत्र भारताला आपल्या संरक्षणासाठीं लष्कर ठेवावें लागेल, हें त्यांनीं गृहीतच धरलें होतें. हें लष्कर कसें असेल त्याचीहि कल्पना त्यांनीं फार पूर्वीं मांडली होती. 'यंग इंडिया' या आपल्या मुखपत्रांत ९-३-१९२२ रोजीं लिहिलेल्या एका लेखांत ते म्हणतात,

" भावी हिंदुस्थानचें लष्कर हें भाडोत्री शिपायांचें बनलेलें असणार नाहीं; आणि तें देशाला टांचेखालीं ठेवण्याकरितां व इतर देशांचें स्वातंत्र्य हिरावून घेण्याकरितां वापरलें जाणार नाहीं; तर तें पुष्कळसें कमी केलें जाईल. त्यांत स्वयंसेवकांचाच भरणा मोठ्या प्रमाणांत असेल आणि हिंदुस्थानचें रक्षण करण्यापुरतेंच तें वापरलें जाईल, एवढें मात्र मी जाणतों."

अर्थात् भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, तो स्वभावतःच शांतताप्रिय देश असल्यामुळें, त्याच्यावर कोणी स्वारी करणार नाहीं, असें गांधीजी धरून चालले, त्याबद्दल त्यांना दोष देतां येणार नाहीं. त्यांच्या हयातींत आशियामध्यें जपान हेंच एक आक्रमक राष्ट्र होतें, इतर सारीं आशियाई राष्ट्रें गरीबवाणीं, दबलेलीं अशीं होतीं. जपानपासून भारत खूप दूर असल्यामुळें तो भारतावर स्वारी करील असा विचार स्वप्नांतहि येण्याची शक्यता नव्हती. पाश्चात्य राष्ट्रेंहि स्वतंत्र भारतावर स्वारी करणार नाहींत, असें वाटत होतें.

त्यामुळें भारताला स्वसंरक्षणासाठीं फार मोठें लष्कर ठेवावें लागेल, अशी कल्पना कोणीं केली नाहीं. परंतु भारतानें आक्रमणापुढें शरणागति पत्करतां कामा नये, या बाबतींत सर्वांचेंच एकमत होतें. इंग्रजांनीं भारताला बळजबरीनें निःशस्त्र बनविलें होतें. त्यामुळें त्याला पुनः सशस्त्र बनविणें हा भारतीय नेत्यांना एक निकडीचा प्रश्न वाटत होता. १९२५ सालीं लिहिलेल्या एका लेखांत महात्मा गांधी म्हणतात,

"...शस्त्रांचा वापर करण्यावर जरी माझा विश्वास नसला आणि तो वापर मी मानीत असलेल्या अहिंसा धर्माला विरोधी असला, तरी देशाच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणणारा हत्यारांचा कायदा रद्द करण्याकरितां एखादी चळवळ झाली तर तिच्यांत सामील व्हायला मी कचरणार नाहीं. ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थानच्या बाबतींत केलेल्या असंख्य घोर गुन्ह्यांपैकीं हा एक आहे असें मीं मानलें आहे. प्रतिहल्ला करावा असें मी मानीत नसलों तरी चार वर्षांपूर्वीं बेतियाजवळच्या एका खेडयांतील लोकांना मीं हें सांगायला मागें-पुढें पाहिलें नाहीं कीं, 'अहिंसेचा तुम्हांला गंधहि नसतांना जर तुम्हीं आपल्या बायका-मंडळींची अब्रू आणि आपली मालमत्ता शस्त्रांच्या बळावर रक्षण केली नाहींत, तर तुम्ही भ्याड ठराल'...मीं नुकतेंच हिंदूंनाहि सांगितलें कीं, 'तुमच्या स्त्रियांना पळवून नेण्यास कोणी आलें आणि तुमचा अहिंसेवर पूर्ण विश्वास नसेल अथवा ती तुम्ही आचरणांत आणूं शकत नसाल तर शस्त्रांच्या मदतीनें तुम्ही त्यांचें रक्षण केलें पाहिजे; तुम्ही तसें न कराल तर भ्याड ठराल, तुम्ही स्व-धर्माच्या विरुद्ध वर्तन केलें असें मी म्हणेन.' हा माझा सारा उपदेश आणि माझें मागचें वर्तन हें, मी पूर्णपणें अहिंसेचें पालन करतों, या माझ्या दाव्याशीं कोणत्याहि प्रकारें विसंगत नाहीं; इतकेंच नव्हे तर तें त्या पालनाचेंच फलित आहे. त्या उदात्त सिद्धान्ताचें प्रतिपादन करणें सोपें आहे. तो जाणणें आणि कलहांनीं, कोलाहलांनीं व मनोविकारांनीं भरलेल्या या जगांत तो आचरणांत आणणें हें किती कठिण आहे, याची मला दिवसेंदिवस अधिकाधिक जाणीव होत आहे. पण त्याचबरोबर त्याच्यावांचून जीवन हें जगण्यासारखें राहणार नाहीं, याविषयींहि माझी दिवसेंदिवस पक्की खात्री होत आहे."

['गांधीविचारदर्शन' – 'सत्याग्रह विचार' : पृष्ठें २००–२०१]

" एका बाजूनें मी लोकांना लष्करी शिक्षण द्यावें अशी सरकारला विनंती करतों, तर दुसऱ्या बाजूनें सत्याग्रहाला उच्च स्थान देतों. अर्थात् सत्याग्रहामध्यें शस्त्राचा वापर करण्यास वाव असणें शक्यच नाहीं; आणि तसा तो नाहींहि. परंतु लष्करी शिक्षण हें ज्यांचा सत्याग्रहावर विश्वास नाहीं त्यांच्यासाठीं अभिप्रेत आहे. साराच्या सारा हिंदुस्थान सत्याग्रहाचा स्वीकार करील, ही माझ्या कल्पनेपलीकडील गोष्ट आहे. दुर्बळाच्या संरक्षणासाठीं उभें न राहणें म्हणजे केवळ नपुंसकपणाच होय. तो सर्वथैव त्याज्य आहे. एखाद्या निष्पाप भगिनीवर हात टाकणाऱ्या एखाद्या पुरुषापासून तिचें रक्षण करण्याकरितां आपण आपलें बलिदान करण्यास आनंदानें तयार असलें पाहिजे. आणि प्रेमाच्या बळावर त्या मनुष्यांतील पशुवृत्तीला जिंकलें पाहिजे. पण ती शक्ति आपल्यांत आलेली नसेल तर त्या माणसाचा तो नीचपणा थांबविण्यासाठीं आपण आपलें सारें शरीरबळ खर्ची घातलें पाहिजे, यांत मुळींच शंका नाहीं. "

[कित्ता : पृष्ठें ३८-३९]

विवेचनाचा सारांश :

या साऱ्या विवेचनाचा सारांश म्हणून असें सांगतां येईल कीं, गांधीजींचा पिंड हा अहिंसक वीराचा होता. जगांतील संघर्ष अहिंसेच्या द्वारें थांबवितां आले पाहिजेत, असें त्यांना वाटत होतें. परंतु तसे ते थांबवितां येतीलच असा विश्वास मात्र वाटत नव्हता.* भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी भारतावरील विदेशी आक्रमण ही केवळ एक कल्पनेंतील गोष्ट होती. परंतु अशाप्रकारें

* " मी अहिंसेला कायमचा बांधला गेलों आहें, आणि मी युद्धाचा कधींहि पुरस्कार करणार नाहीं. मीं चालविलेल्या राज्यांत पोलीस आणि लष्कर मुळींच असणार नाहीं. परंतु भारतीय संघराज्याचें सरकार मी चालवीत नाहीं....भारतानें व पाकिस्ताननें आपले तंटे एकमेकांशीं सल्लामसलत करून, विचारविनिमयानें सोडवावेत आणि त्यांत अपयश आलें तर लवादाचा आसरा घ्यावा. परंतु एका पक्षानें जर अन्याय करण्याचेंच चालू ठेवलें आणि वर उल्लेखिलेल्या उपायांपैकीं एकहि स्वीकारला नाहीं, तर एकच मार्ग खुला राहतो. तो म्हणजे युद्धाचा. "

['दिल्ली डायरी', पृष्ठ ४४ : ता. २७–९–४७]

आक्रमण झाल्यास आक्रमकांपुढें भारतीयांनीं शरणागति न पत्करतां शत्रूच्या हल्लचाला वीरोचितपणें तोंड दिलें पाहिजे, असें गांधीजी सांगत असत. प्रसंगीं आपल्याला पराभव पत्करावा लागला तरी त्या वेळीं शत्रूशीं तह करून योग्य वेळेची वाट पाहावी आणि ती संधि मिळतांच शत्रूला आपल्या देशांतून हाकलून लावावें, असाहि सल्ला त्यांनीं दिला होता. त्याची आजच्या परिस्थितींत आठवण होणें स्वाभाविक आहे.●

हिंसा हा मानवतेवरील कलंक आहे, हिंसेच्या मार्गानें गेल्यास मानवाची अधोगतिच होते, मानवी मनाचा व संस्कृतीचा विकास अहिंसेच्या द्वारेंच होऊं शकेल आणि मानवाचें अंतिम हित अहिंसेच्या स्वीकारांतच आहे, ही गांधीजींची श्रद्धा होती. तात्त्विक दृष्टचां त्यांत कांहीं चूक होती, किंवा आहे, असें कोणीहि विचारवंत म्हणू शकणार नाहीं. गांधींची अहिंसा आणि बौद्ध-जैनांनीं पुरस्कारिलेली अहिंसा यांच्यांत जमीनअस्मानाचें अंतर होतें, हें ज्यांना समजलें नाहीं, त्यांनीं गांधीजींच्या अहिंसेवर डॉन क्विक्झोटच्या

●" However, let us consider the worst that can happen to India on a sudden evacuation of India by the British. What does it matter that the Gurkhas and the Pathans attack us? Surely we would be better able to deal with their violence than we are with the continued violence, moral and physical, perpetrated by the present Government. Mr. Stokes does not seem to eschew the use of physical force. Surely the combined labour of the Rajput, the Sikh and the Mussalman warriors in a united India may be trusted to deal with plunderers from any or all the sides. Imagine, however, the worst : "Japan overwhelming us from the Bay of Bengal, the Gurkhas from the Hills, and the Pathans from the North-west. **If we do not succeed in driving them out, we make terms with them, and drive them out at the first opportunity.** This will be a more manly course than a helpless submission to an admittedly wrongful State. "

[Young India : 29. 12. 1920]

आवेशांत हल्ले चढविले. वस्तुतः बौद्ध-जैनांची अहिंसा ही अगदींच स्थूल व मानवी जीवनाशीं प्रत्यक्ष संबंध नसलेली अशी आहे. त्या बाबतींत गांधीजींनीं एकदां असे उद्‌गार काढले होते की, “बौद्ध धर्म म्हणजे भूतमात्राविषयीं दया. या दृष्टीनें त्याचा विचार केला तर तो पूर्णतः अयशस्वी ठरला आहे... नंतरचा ब्रिटिश काळ घ्या. आज लोकांना सक्तीनें निःशस्त्र करण्यांत आलें आहे. पण त्यांच्या मनांतून मारण्याची इच्छा काडीमात्रहि गेलेली नाहीं. जैनांतहि हा सिद्धान्त पूर्णपणें असफल झालेला आहे. त्या लोकांत रक्त बघितलें कीं भ्यावें अशी भ्रामक समजूत मोठ्या प्रमाणांत आहे. पण त्यांना-सुद्धां शत्रूच्या प्राणांविषयीं कोणत्याहि युरोपीय माणसाइतकीच तुच्छता वाटते. म्हणजे, शत्रूचा निःपात झाल्यानें पृथ्वीवरच्या इतर कोणाहि लोकांना जितका आनंद होईल तितकाच जैनांनाहि होईल.”

[‘महादेव भाईनी डायरी’ भाग ४, पृष्ठ : १४२]

धनिकांनीं गरिबांची केलेली आर्थिक पिळणूक, काळाबाजार, भेसळ वगैरे गोष्टी अहिंसक व्यापाऱ्यांनीं केल्या तरी ती भयंकर स्वरूपाची हिंसाच आहे, असें गांधीजींनीं स्पष्टपणें नमूद केलें आहे. ‘अहिंसेच्या सिद्धान्तामध्यें कोणत्याहि प्रकारच्या पिळणुकीपासून अलिप्त राहणें हें अगत्याचें असतें’ आणि ‘पिळणूक हा हिंसेचा गाभा आहे’ असें म्हणणाऱ्या गांधीजींची अहिंसा ही परंपरागत अहिंसेहून अगदीं भिन्न होती, हें सहज लक्षांत यावें.

अहिंसेच्या मार्गानें जमाती-जमातींतील किंवा राष्ट्रां-राष्ट्रांतील भांडणें मिटवितां येतील अशी श्रद्धा गांधीजी बाळगत असले तरी सामान्य माणसाचा सांस्कृतिक विकास ती उच्च प्रकारची अहिंसा पेलण्याइतका झालेला नाहीं, हेंहि त्यांना दिसत होतें; आणि भ्याडपणापेक्षां हिंसा परवडली, हें तर त्यांच्या जीवनाचें प्रमुख सूत्र होतें. म्हणून त्यांनीं लोकांना निर्भय बनण्याचा उपदेश केला. ही निर्भयता शस्त्र चालविण्याच्या शिक्षणांतून येऊं शकेल असें वाटल्या-वरून त्यांनीं बदनामीची मुळींच पर्वा न करतां लोकांना सैन्यांत शिरण्याचा आदेश दिला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पाकिस्तानकडून काश्मीरवर हल्ला होतांच तो हल्ला परतविण्याचें सामर्थ्य भारतांतील अहिंसक सैनिकांमध्यें नाहीं, हें ओळखून गांधीजींनीं भारतीय सैन्याला काश्मीरांत जाऊन लढण्याच्या कामीं आशीर्वाद दिला.

या साऱ्या गोष्टी इतक्या स्पष्ट आहेत कीं, त्यांवर अधिक भाष्य करण्याची गरजच नाहीं. चीननें दगलबाजपणें केलेल्या हल्ल्याच्या वेळीं गांधीजी हयात असते तर त्यांनीं कोणती भूमिका घेतली असती, हें सांगणें, मागील इतिहास पाहातां, मुळींच अवघड नाहीं. साऱ्या सामर्थ्यानिशीं शत्रूला भारताच्या सीमेपार हांकलून लावण्याचाच संदेश त्यांनीं भारताला दिला असता यांत शंका नाहीं. त्यामुळें गांधीवादाच्या नांवानें जर कोणी शत्रूला पिटाळून लावण्याऐवजीं त्याच्याशीं समेटाचीं बोलणीं करण्याचे प्रस्ताव जनतेपुढें ठेवीत असतील तर त्यांचा गांधीवाद हा गांधींच्या गांधीवादाहून सर्वस्वीं भिन्न आहे, असेंच म्हणावें लागेल. गांधींचा गांधीवाद मानणाऱ्यांनीं भारतीय भूमीवरून शत्रूचा अखेरचा सैनिक परत जाईपर्यंत किंवा परलोकवासी होईपर्यंत, देशरक्षणाचा लढा नेटानें चालू ठेवण्याचाच आग्रह बाळगला पाहिजे.

परंतु आज प्रत्यक्ष परिस्थिति काय आहे ?

त्याचें विवेचन 'गांधीवाद्यांचा गांधीवाद' या चौथ्या प्रकरणांत करण्यांत आलेलें आहे !

३

आमचा पराभव कां झाला ?

पराभवाचा फायदा :

वाइटांतूनहि पुष्कळ वेळां चांगलें निष्पन्न होतें म्हणतात. चीनच्या दगलबाज हल्ल्यामुळें व त्या हल्ल्यांत पहिल्या सपाटयास भारताचा पराभव झाल्यामुळें भारताचा एक प्रकारें फायदाच झाला असें म्हणावें लागतें. चीनच्या दगलबाजीमुळें प्रत्येक प्रामाणिक भारतीयाच्या अंतःकरणांत चीड निर्माण झाली आणि साऱ्या भारतानें चीनच्या हल्ल्याला निर्धारानें तोंड देण्याचा निश्चय केला. त्यासाठीं त्यांनीं आपसांतील मतभेद व झगडे बाजूला सारले. शिखांनीं पंजाबी सूब्याची मागणी स्थगित केली, तर द्रविड मुन्नेत्र कळघम्नें द्राविडिस्तानचा विचार तात्पुरता बाजूस ठेवून देशाच्या रक्षणासाठीं कंबर कसली. बेळगांवच्या मराठी लोकांनींहि आणीबाणीची परिस्थिति असेपर्यंत महाराष्ट्राशीं एकीकरण घडवून आणण्याची आपली चळवळ थांबविली. विद्यार्थ्यांनीं हुल्लडी करणें बंद केलें, तर मजुरांनीं संपाचें हत्यार म्यानांत घातलें. आमचे आपसांत कितीहि मतभेद असले आणि शांततेच्या काळांत आम्ही कितीहि भांडत असलों तरी बाहेरचा शत्रु चालून येतांच आम्ही सारे एक होऊं शकतों व त्याला पिटाळून लावण्यासाठीं एकमेकांच्या खांद्याला खांदा भिडवून एकदिलानें रणांगणाकडे धांव घेऊं शकतों, हा एक अत्यंत आनंददायक व आशास्पद अनुभव भारतीय जनतेला आला. हा देश व विशेषत: पंजाब-बंगालसारखे सरहद्दीवरील प्रांत कम्युनिस्टांनीं पोखरून टाकले आहेत आणि चीनचें आक्रमण होतांच तेथील लोक मोठ्या आनंदानें

आक्रमकांचें स्वागत करण्यास पुढें होतील अशी भीति भारतांतील देशभक्तांना आणि अशी आशा चीनला व त्याच्या भारतीय एजंटांना वाटत होती. परंतु ही भीति अगदींच निराधार ठरली. चीनला व त्याच्या भारतीय पंचम-स्तंभीयांना तोंडघशीं पडावें लागलें. भारतीय लोक पहिल्या पराभवानें दबून जातील असें शत्रूनें गृहीत धरलें असावें; परंतु त्या बाबतींतहि त्याला वेगळाच अनुभव आला. 'केला जरी पोत बळेंचि खालें, ज्वाला तरी ते वरतीं उफाळे' या उक्तीप्रमाणें युद्धांतील पराभवामुळें खचून जाण्याऐवजीं भारतीय जनता जिद्दीला पेटली आणि सर्वस्व पणाला लावून धोकेबाज शत्रूशीं दोन हात करण्यासाठीं ईर्ष्येनें पुढें सरसावली.

चीननें हें आक्रमण करून भारतावर व त्याच्यासारख्या इतर भोळ्या-भाबड्या आशियाई देशांवर एक प्रकारें अनंत उपकार करून ठेवले आहेत, असें म्हणावें लागेल. आपली संस्कृति भारताइतकीच प्राचीन व उदात्त असल्याचा दाव करणारा चीन वस्तुतः खऱ्या संस्कृतीपासून किती दूर आहे, त्याच्या शब्दावर विश्वास ठेवणें किती धोक्याचें आहे व त्याच्या मैत्रीवर विसंबून राहणें किती मूर्खपणाचें आहे, याचा चांगला अनुभव आशियाई देशांना आला.

१४ नोव्हेंबर १९६२ रोजीं भारतीय लोकसभेनें चिनी आक्रमणासंबंधीं जो ठराव* मंजूर केला त्या ठरावावरील चर्चेला उत्तर देतांना भारताचे

---

* हा ठराव असा होता :—

"परस्परांच्या स्वातंत्र्याला मान्यता देणें, एकमेकांवर आक्रमण न करणें, एकमेकांच्या कारभारांत ढवळाढवळ न करणें, आणि शांततापूर्ण सहजीवन जगणें या गोष्टी आधारभूत धरून भारतानें चीनच्या सरकारविषयीं नेहमीं सद्भाव व मित्रभाव बाळगला असतांना त्यानें विश्वासघात केला, दोन्ही देशांनीं मान्यता दिलेल्या 'पंचशीला'चा भंग केला आणि आपल्या सैन्यानिशीं भारतावर प्रचंड प्रमाणावर हल्ला केला, याबद्दल या सभागृहाला अत्यंत खेद होतो.

"आपल्या सरहद्दींचें रक्षण करतांना आपल्या सैनिकांनीं व अधिकाऱ्यांनीं जें शौर्य दाखविलें त्याचा हें सभागृह गौरव करतें आणि आपल्या मातृभूमीचें रक्षण करतांना जे धारातीर्थीं पडले त्यांच्या स्मृतीला श्रद्धांजलि वाहतें.

पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं जे उद्‌गार काढले ते समस्त भारतीयांच्या भावनांचेच द्योतक होते यांत शंका नाहीं. ते म्हणाले होते :—

" चीन सरकारनें जें कांहीं केलें त्यामुळें त्यानें भारताला खडबडून जागें केलें याबद्दल त्याचे आभार मानणारा एखादा लहानसा परिच्छेद या ठरावाला जोडला असता तर बरें झालें असतें, असा विचार माझ्या मनाला चाटून गेला. गेल्या सुमारें तीन आठवड्यांत सामर्थ्यसंपन्न परंतु शांत व निश्चयी भारताचें आपल्याला दर्शन घडलें. पुरातन परंतु सदैव चैतन्यपूर्ण असलेल्या या भारतवर्षाच्या आत्म्याचा साक्षात्कार आपल्याला घडला.

" आपणां सर्वांना आलेला हा अनुभव अनन्यसाधारण आहे. आपलीं सर्वांचीं मनें एकाच अनुभवानें व एकाच भावनेनें उजळून निघालीं, हें आपलें महद्‌भाग्य. भविष्यकाळांत कांहींहि घडो, आज भारताच्या कानाकोपऱ्यांत आबालवृद्ध स्त्रीपुरुषांच्या अंतःकरणांत भावनांचा जो उद्रेक झाला आहे, तो आपण कधींहि विसरणार नाहीं. जो कोणी या सर्व गोष्टींचा विचार करील तो प्रत्येकजण व जगांतील सर्व देश, विशेषतः चीन सरकार, भारतांतील या भावनात्मक स्थित्यंतराचा काय अर्थ आहे हें जाणून घेईल अशी मी आशा करतों. ज्या देशांत आणीबाणीची परिस्थिति निर्माण झाली असतां अशा प्रकारची प्रखर भावना निर्माण होते, त्या देशाला दडपून टाकतां येणार नाहीं,

" चीननें केलेल्या आक्रमणामुळें जी आणीबाणीची परिस्थिति उद्‌भवली आहे, तिला तोंड देण्याचा संपूर्ण देशांतल्या लोकांनीं जो स्वयंस्फूर्त, एकमुखी निर्धार व्यक्त केला आहे, त्याबद्दल या सभागृहाला समाधान वाटतें.

" सारी साधनसामग्री व शक्ति एकवटून देशावरील या मोठ्या संकटाला सुसंघटितपणें तोंड देण्यासाठीं, समाजाच्या सर्व थरांतील लोकांकडून जे प्रचंड प्रयत्न सुरू आहेत त्याबद्दल या सभागृहाला संतोष वाटतो. स्वातंत्र्याची व त्यागाची ज्योत पुनः प्रज्वलित झाली असून, देशाच्या स्वातंत्र्यासाठीं स्वतःला वाहून घेण्याचा निश्चय लोकांनीं पुनः व्यक्त केला आहे.

" आपल्या पवित्र भूमीवर हल्ला करणाऱ्या आक्रमकाला हांकलून लावण्यासाठीं कितीहि प्रदीर्घ व खडतर लढा द्यावा लागला तरी तो देण्यास सिद्ध राहण्याचा भारतीय लोकांचा दृढ निर्धार हें सभागृह व्यक्त करतें. "

ही गोष्ट स्पष्ट आहे. पाश्चात्य देशांपैकीं आणि पौर्वात्य देशांपैकींहि बऱ्याच देशांना या गोष्टीची जाणीव आज झाली आहे. देशांत एवढी प्रचंड भावनात्मक खळबळ उडालेली पाहून आणि क्षणार्धांत आपल्यांतले सारे वाद, सारे मतभेद यांचा लोप होऊन संपूर्ण देशांतले लोक एकमुखानें व निश्चयानें आक्रमणाला तोंड द्यायला सिद्ध झाले, हें पाहून या देशांना आश्चर्य वाटलें."

आमच्या पराभवाचीं कारणें :

पराभवाचे हे फायदे मान्य करूनहि आपला पराभव झाला हें कांहीं बरें झालें नाहीं, असें म्हणावें लागतें. आपला पराभव कां झाला त्याचीं कारणें आपण शोधलीं पाहिजेत. तरच पुढील पराभव आपल्याला टाळतां येतील. पराभवाच्या पहिल्या फटकाऱ्यासरशीं देशाच्या नेत्यांची जी सदसद्विवेकबुद्धि जागृत झाली तिनें आपला पराभव कां झाला याची पद्धतशीर चौकशी करण्याचें देशांतील जनतेला आश्वासन दिलें. परंतु दोन महिने होत आले तरी तें आश्वासन अद्यापि पुरें करण्यांत आलेलें नाहीं. यापुढेंहि तें पुरें केलें जाईल कीं नाहीं, याविषयीं लोकांच्या मनांत संशय निर्माण होऊं लागला आहे. कारण ज्यांच्याबद्दल चौकशी करावयाची ते निर्दोष असल्याचा निर्वाळा देशाचे सर्वश्रेष्ठ नेते, चौकशी करण्यापूर्वींच, जाहीरपणें देऊं लागले आहेत. त्यामुळें चौकशीचें आश्वासन हें तापलेल्या लोकमताला थंड करण्यासाठींच दिलें गेलें असावें, असा लोकांचा साधार समज होऊं लागला आहे. ज्या देशांत राष्ट्राच्या संरक्षणाच्या बाबतींत घोडचुका करणाऱ्यांनाहि पाठीशीं घालण्याची प्रवृत्ति राजरोसपणें चालू शकते त्या देशाचें संरक्षण स्वतः परमेश्वरहि करूं शकणार नाहीं, हें उघड आहे. वस्तुतः लोकशाही राजवटींत राज्यकर्त्यांनीं आपली जाहीर चौकशी करून घेण्यास सदैव तयार राहिलें पाहिजे. तसें नसेल तर ती लोकशाही म्हणजे बहुमताची हुकूमशाहीच ठरते ; आणि हुकूमशाहीचे फायदे कांहींच पदरांत न पडतां तिचे तोटे मात्र त्या देशाच्या जनतेला भोगावे लागतात. भारतीय जनतेच्या नशिबीं आजवर तरी हे तोटेच आलेले दिसतात !

आमचा गाफीलपणा :

चिनी आक्रमणाच्या पहिल्या फेरींत आपला सपशेल पराभव झाला याला मुख्यतः आमचा गाफीलपणा कारणीभूत होता, हें आतां सर्वांनीं मान्य केलें

आहे. वस्तुतः चिन्यांचें आक्रमण हें कांहीं अगदींच अकल्पित नव्हतें. उत्तर प्रदेशाच्या बडाहोटी (बाराहोती) या ठिकाणीं १९५४ च्या ऑगस्टमध्यें चिनी सैनिक घुसले तेव्हांपासूनच या अघोषित युद्धाला सुरुवात झाली होती. प्रत्यक्ष युद्ध घोषित न करतां, एखाद्या उंदरानें सुंदर गालिचा एका बाजूनें कुरतडत पुढें सरकावें त्याप्रमाणें, दुसऱ्याच्या भूमीवर आक्रमण करून ती गिळंकृत करावयाची आणि त्याच वेळीं प्रतिपक्षाशीं मैत्रीचीं व सलोख्याचीं बोलणीं चालू ठेवावयाचीं, ही चीनची परंपराच आहे. कोरियाचें एवढें महाभारत झालें, त्यांत चिन्यांनीं आपले लाखों जवान बळी दिले आणि अर्धा कोरिया लाल निशाणाखालीं आणला, परंतु त्यांनीं शेवटपर्यंत युद्ध जाहीर केलें नाहीं. त्यांच्या युद्धतंत्रांतील ही मेख आमच्या राज्यकर्त्यांना व राजनीतिज्ञांना कळली तरी नाहीं, किंवा कळूनहि त्यांनीं तिच्याकडे दुर्लक्ष केलें. दोन्ही परिस्थितींत त्यांच्यावरील गाफीलपणाचा दोष कमी होत नाहीं.

हेरखात्याचा अक्षम्य झोंपाळूपणा :

जबरदस्त व अद्ययावत् लष्करी सामर्थ्य आणि अमर्याद मनुष्यबळ असलेला शत्रु जेव्हां दगलबाजपणें हल्ला करतो तेव्हां प्रारंभीं तरी त्याचा हमखास जय होतो, असें गेल्या दोन युद्धांतील अनुभवांनीं दाखवून दिलें आहे. जर्मनी व जपान यांचे प्रारंभिक जय याच प्रकारचे होते. प्रतिपक्षाचा गाफीलपणा हेंच त्यांचें भांडवल असतें. त्यामुळें चीननें दगलबाजीनें मिळविलेल्या या विजयाबद्दल आश्चर्य वाटूं नये अथवा त्यायोगें नाउमेदहि होऊं नये. परंतु चीनच्या बाबतींत त्याच्या दगलबाजपणाची ढाल पुढें करून आपल्या पराभवाची अब्रू झांकण्याचा प्रयत्न करण्यांतहि कांहीं अर्थ नाहीं. तैमूरलंग आणि चंगेजखान यांना आदर्श पुरुष मानणाऱ्या त्यांच्या वंशजांकडून याहून वेगळ्या प्रकारच्या वागणुकीची अपेक्षा करणेंच चूक होतें. लांडग्याचीं पिलें कोंकरांसारखीं गरीब निघालीं नाहींत, म्हणून त्यांना दोष देण्यासारखेंच आहे हें.

या साऱ्या प्रकरणांत आमच्या हेरखात्याचा अक्षम्य झोंपाळूपणा मात्र चव्हाटयावर आला. युद्ध व शांति या दोन्ही प्रसंगीं ज्याचें हेरखातें अधिक हुशार व कार्यक्षम असेल तोच देश मानानें व विजयानें जगूं शकतो, असें इतिहास सांगतो. स्वतंत्र भारतानें इतिहासाच्या या शिकवणुकीकडे फार

दुर्लक्ष केलें असें दुर्दैवानें म्हणावें लागतें. आपले संभाव्य शत्रू (व मित्रहि) काय करीत आहेत, त्यांच्या देशांत काय चाललें आहे, याची बित्तंबातमी आपल्याजवळ असली पाहिजे. चीन व पाकिस्तानजवळ भारताविषयींची अशी बातमी सतत पोंचत असली पाहिजे, असें दिसतें. भारतांतील कोणत्या पलटणी कोठें आहेत, त्यांना कोठून कोठें हलविलें आहे, वगैरे जी माहिती भारतीयांपासून गुप्त ठेवली जाते ती पाकिस्तानचे अध्यक्ष अयूबखान हे परदेशी वृत्तपत्रांच्या वार्ताहरांना दिलेल्या मुलाखतींत अचूकपणें सांगतात, हें पाहिलें कीं आपल्याला आश्चर्य वाटतें. चिन्यांचे हेर तर भारतांत राजमान्य पक्षाच्या रूपानें राजरोसपणें वावरत आहेत. भारतीय सैन्यांतहि कम्युनिस्टांचे सहप्रवासी व हेर असण्याची शक्यता आहे. आमच्या सैन्यांत ब्रिगेडियर म्हणून वावरणारा व चुकीचे हुकूम देऊन आमच्या सैनिकांना शत्रूच्या घशांत लोटणारा एक रशियन हेर फार उशीरां उघडकीस आल्याचें अनेकांनीं वृत्तपत्रांत वाचलें असेल. नेफा व नागभूमि या भागांतील आदिवासी लोकांशीं चिनी मुलींनीं लग्नें करून तो भाग पार पोखरून टाकल्याचें आतां आम्हांला कळत आहे. हजारों चिनी व्यापारी भारतांत राजरोसपणें हेरगिरी करीत होते व स्वतःला साम्यवादी म्हणविणारे शेंकडों भारतीय, सत्तास्थानांवरील आपल्या सहप्रवाशांकडून बातम्या मिळवून त्या त्यांना पोंचवीत होते. हें सारें आम्ही उघडया डोळयांनीं पाहत राहिलों. चिनी व पाकिस्तानी लोकांकडून व त्यांच्या वतीनें केल्या जाणाऱ्या गोष्टी जेव्हां उजेडांत येतात तेव्हां पुष्कळदां आपल्याला असा प्रश्न पडतो कीं, आपल्या देशाजवळ हेरखातें आहे तरी कीं नाहीं ? असल्यास तें काय काम करतें ? गेलीं आठ वर्षें भारताच्या उत्तर सरहद्दीवर हजारों-लाखों सैनिक गोळा होत आहेत, तेथें ठाणीं उभारत आहेत, रस्ते बांधीत आहेत, परंतु आम्हांला त्याचा कांहींच पत्ता नाहीं. २० ऑक्टोबर १९६२ रोजी पहांटे ज्या १३ डिव्हिजन चिनी फौजेनें भारतीय प्रदेशावर प्रचंड हल्ला चढविला, ती कांहीं एका रात्रींत तेथें आली नसणार. हजारों मैल दूर असलेल्या चीनच्यां मुख्य भूमीपासून तेथपर्यंत येण्यास त्या फौजेला कित्येक दिवस, किंबहुना कित्येक महिने लागले असतील. तज्ज्ञांच्या मतें एवढी फौज आणण्यास निदान पांच-सहा वर्षें तरी लागलीं असतील. कारण तो सारा प्रदेश डोंगरांनीं व दऱ्याखोऱ्यांनीं व्यापलेला आहे.

तेथील सारी वाहतूक याक व खेंचरें यांच्या पाठीवरूनच होऊं शकते. तेथें विमानें किंवा मोटारी यांचा उपयोग होत नाही. अशा स्थितींत आक्रमक सैन्याच्या हालचालींची माहिती आमच्या हेरखात्याला कशी मिळाली नाहीं? कीं हेरांनीं माहिती पुरविल्यानंतरहि सैन्याधिकाऱ्यांनीं व देशाच्या नेत्यांनीं ती दडपून ठेवली? चिन्यांनीं हिंदी गणवेश घालून व वायरलेसवर हिंदी-इंग्रजीमध्यें हुकूम देऊन आपल्या सैन्याची फसवणूक केली असें आतां उघडकीस आलें आहे. या बाबतींतील त्यांची तयारी आम्हांला कां कळूं शकली नाहीं?

शांतताभिमुख मनःप्रवृत्ति :

या गाफीलपणाला दुसरीहि एक कांहींशी समर्थनीय बाजू आहे. भारत हा नेहमींच अनाक्रमणशील राहिलेला आहे. त्याच्या ज्ञात इतिहासांत त्यानें दुसऱ्या देशावर स्वारी केल्याची घटना आढळत नाहीं. आक्रमकांचे हल्ले परतवून लावणें आणि इतर वेळीं आपसांत लढणें एवढ्याच कामांत भारतीय फौजा आजवर गुंतलेल्या असत. भारताची ही वृत्ति योग्य आहे कीं अयोग्य यासंबंधीं चर्चा होऊं शकेल. भारतानें इतर देशांप्रमाणें आक्रमक बनलें पाहिजे, इतरांवर हल्ले चढवून मुलुखगिरी केली पाहिजे, असें प्रतिपादणारे विद्वान् भारतांतहि आहेत. परंतु त्यांच्या दुर्दैवानें व जगाच्या सुदैवानें अजून तरी भारताची वृत्ति शांतताभिमुखच राहिलेली आहे. वर उल्लेखिलेल्या व्याख्यानांत पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं या संदर्भांत जे उद्‌गार काढले होते त्यांच्याशीं प्रत्येक विचारवंत भारतीय नेहमींच सहमत राहील यांत शंका नाहीं. पंडितजी म्हणाले होते,

"आपल्याला कांहीं बाबतींत अपयश आलें असेल. या आक्रमणाला तोंड द्यायला आपण कदाचित् पूर्णपणें सुसज्ज नसूं. परंतु आपली मनःप्रवृत्तिच शांतताभिमुख आहे. आपण कोणत्याहि परिस्थितीला तोंड द्यायची तयारी केली असली तरी लोकांचें मन आणि सरकार हीं नेहमीं शांतता स्थापनेच्या इच्छेनेंच भारावलेलीं होतीं; आणि त्याबद्दल मला वाईट वाटत नाहीं. हीच इच्छा, हीच मनःप्रवृत्ति योग्य आहे, असें मला वाटतें; आणि तिच्यामुळेंच भारतीय अंतःकरणांत इतकी खळबळ माजली यांत शंका नाहीं.

"...आपली मनःप्रवृत्ति पूर्णतया शांतताभिमुख आहे, याचा अर्थ असा नव्हे कीं, युद्धाच्या शक्यतेचा किंवा देशाचें रक्षण करण्याचा विचार आपल्या

मनांत आला नाहीं. या दोन्ही गोष्टींचा आपण नेहमींच विचार केला; परंतु मनाची स्वाभाविक प्रवृत्ति किंवा प्रकृतिधर्म या नांवाची एक गोष्ट असते आणि आज सुद्धां आपली ही प्रवृत्ति कायम आहे, असें मला वाटतें.

" आपल्या देशानें आतां अमानुष बनलें पाहिजे, पाशवी वृत्ति अंगीकारिली पाहिजे, जवाहरलाल नेहरूंनीं अमानुष झालें पाहिजे, माणुसकी सोडून दिली पाहिजे, असें श्री फ्रँक अँथनी म्हणाले. परंतु कुणालाहि सामर्थ्यसंपन्न व्हावयाचें असेल तर त्यानें अमानुष, पशुतुल्य बनलेंच पाहिजे, ही कल्पनाच चमत्कारिक असल्यामुळें आपला देश तर नव्हेच, पण मी सुद्धां, कधींहि माणुसकीचा त्याग करणार नाहीं, असें मला वाटतें. ती कल्पना मला पूर्णपणें अमान्य आहे. आपलें सामर्थ्य इतर गोष्टींवर अवलंबून असतें. अमानुषता हा शब्द उच्चारल्याबरोबर ज्या गोष्टी डोळ्यांसमोर उभ्या राहतात त्यांना आपण आक्षेप घेतला आहे, किंवा त्या अमान्य केल्या आहेत. अमानुष बनल्यानें व पाशवी मार्गाचा अवलंब केल्यानें आपण आपलें स्वत्व गमावून बसतों आणि ही हानि सदैव अपरिमित असते. भारत हा निःसंशय सौजन्यशील व शांतताप्रिय देश आहे आणि त्याला युद्ध करावें लागलें व त्याचे भयंकर परिणाम भोगावे लागले, तरी तो आपलें हें स्वत्व कायम राखील, अशी मला आशा वाटते.

" सामर्थ्यसंपन्नता व अमानुषता यांच्यांतला फरक स्पष्ट आहे. ज्या गोष्टीमुळें आपल्या देशाला व आपल्या इतिहासाला प्रतिष्ठा लाभली, तिचा उल्लेख मीं केलाच पाहिजे, असें नाहीं. ती गोष्ट म्हणजे गांधीजींनीं आपल्या स्वातंत्र्यलढ्याचें मार्गदर्शन ज्या पद्धतीनें केलें ती पद्धत. गांधीजी अमानुष होते, असें कोणी म्हणू शकणार नाहीं. नम्रता, विनयशीलता व शांतताप्रियता यांचें मूर्तिमंत उदाहरण म्हणजे गांधीजी. ते दुबळे होते, असें कोणीहि म्हणू शकणार नाहीं. भारतानें किंवा इतर कोणत्याहि देशानें निर्माण केलेल्या थोर व्यक्तींपेक्षांहि ते अधिक सामर्थ्यवान् होते. सामर्थ्य, कमालीचा त्याग करण्याची वृत्ति, विनयशीलता आणि आपल्या प्रतिस्पर्ध्याकडे व शत्रूकडेहि पाहण्याचा स्नेहपूर्ण दृष्टिकोन, या मानवतावादी गुणांचें अद्‌भुत मीलन त्यांच्या व्यक्तिमत्वांत झालें होतें; आणि म्हणूनच ते इतक्या उच्च कोटीला पोंचले. आपल्यापैकीं ज्यांना त्यांच्याबरोबर व त्यांच्या मार्गदर्शनानें कार्य

करण्याचें भाग्य लाभलें ते आम्ही, त्यांच्यापेक्षां श्रेष्ठ आहोंत, असा दावा करीत नाहीं. आम्ही सामान्य माणसें आहोंत. त्यांच्या महानतेशीं आमची तुलनाच होऊं शकणार नाहीं. परंतु त्यांनीं जी कांहीं शिकवण दिली ती आपण थोडी फार आत्मसात् केली. ती आपल्याला जितकी आत्मसात् करतां आली तितकेच आपण, अमानुष नव्हे तर सामर्थ्यवान् बनलों. म्हणून मी हें ठामपणें सांगूं इच्छितों कीं अमानुष बनण्याची माझी इच्छा नाहीं. एखाद्या देशांतल्या सर्वच्या सर्व लोकांविषयीं द्वेषभाव किंवा शत्रुत्व बाळगणारें किंवा त्यांना हीन लेखणारें शीतयुद्ध किंवा प्रत्यक्ष युद्ध मला नको आहे.

"युद्धें भयंकर असतात. त्यांत लाखों माणसें मरण पावतात; आणि पुष्कळ विनाश होतो. अर्थात् मरण कुणालाहि चुकलेलें नाहीं; आणि एखाद्या महान् कार्यसिद्धीसाठीं जरा लवकर मरण ओढवलें तर त्यांत दुःख वाटायचें कांहीं कारण नाहीं. खंबीर मनानें आपल्याला त्याला तोंड द्यावयाचें असतें. मृत्यूमुळें होणारा आपल्या सहकाऱ्यांचा व मित्रांचा चिरवियोग दुःखदायक असला तरी महान् कार्य सिद्धीला नेतांना मरण आलें तर त्यांत दुःखदायक असें कांहींच नसतें. परंतु अमानुषता ही गोष्ट अशी आहे कीं, जिच्यामुळें मानवाची अवनति होते."

शांतता-प्रियता म्हणजे बेसावधपणा नव्हे !

पंडितजींच्या या विधानाशीं भारतीय संस्कृतीची व मनःपिंडाची ओळख असलेली कोणीहि व्यक्ति सहमत होईल. परंतु व्यक्तीनें किंवा देशानें शांतता-प्रिय राहावयाचें म्हणजे बेसावध राहावयाचें, असा का त्याचा अर्थ? गांधीजींच्या जीवनाचा व तत्त्वज्ञानाचा अल्पसा परिचय असणाराहि हें सांगूं शकेल कीं, त्यांच्या जीवनांत अथवा तत्त्वज्ञानांत बेसावधपणा किंवा गाफील-पणा यांना तिळमात्रहि थारा नव्हता; उलट सदैव जागरूकता हाच त्यांच्या जीवनाचा आत्मा होता. गांधीजींचें नांव घेणाऱ्यांनीं प्रथम या प्रश्नाचें उत्तर दिलें पाहिजे कीं, 'देशरक्षणाच्या बाबतींत आम्ही पुरेसे जागृत होतों काय?' आमच्या पराभवामुळें निर्माण झालेली चीड ही आमच्या शांततेच्या धोरणा-बद्दलची नसून आमच्या नेत्यांच्या गाफीलपणाबद्दलची आहे, ही गोष्ट किंचित् खोलवर विचार करणाऱ्याला सहज दिसून येईल. आमच्या नेत्यांना शांततेचें

वेड लागलें होतें, किंबहुना शांतीचा नशा चढला होता ! व्यक्तिशः नशा चांगला असेलहि, परंतु राष्ट्राच्या दृष्टीनें नशा हा विनाशाकडे नेणारा ठरतो – मग तो शांतीचा असो कीं क्रान्तीचा ! जगांतील धूर्त लोकांनीं भारताला व पंडित नेहरूंना शांतिदूत म्हणून गौरविलें आणि त्यांनीं तें खरें मानलें. गांधीजींनाहि लोक महात्मा म्हणत असत, परंतु त्या शब्दाचा खरा अर्थ काय आहे हें ओळखून गांधीजी कधीं वाहवले नाहींत. पंडितजींच्या बाबतींत मात्र उलटें घडलें. त्यांना तो नशा पेलला नाहीं; आणि नशा अंगावर उलटल्यानंतर नशाबाजाची जी अवस्था होते, तीच त्यांचीहि झाली. त्यांचा उदोउदो करणाऱ्यांनींच त्यांची छीः थूः केली. भारतीय जनतेला राग आला तो या गोष्टीचा. गेलीं कित्येक वर्षें प्रजासमाजवादी, समाजवादी, स्वतंत्र व जनसंघ या पक्षांतील जबाबदार पुढारी चीनच्या आक्रमक धोरणाबद्दल, त्याच्या दगलबाजीबद्दल राज्यकर्त्या पक्षाला सतत इशारे देत होते. परंतु त्यांनाच उलट 'युद्धखोर' ठरवून राज्यकर्त्या पक्षानें त्यांच्या सूचनांकडे दुर्लक्ष केलें.

संरक्षणमंत्री श्री कृष्ण मेनन हे कम्युनिस्टांचे सहप्रवासी आहेत, त्यांनीं चीनच्या आक्रमक हालचालींकडे जाणूनबुजून डोळेझांक केली आणि त्यांच्या आहारीं गेलेल्या पंडित नेहरूंना शेवटपर्यंत अंधारांत ठेवलें, असा आरोप केला जातो. त्यांत कितपत तथ्य आहे हें शोधून काढण्यांत आलें पाहिजे. त्यासाठीं पहिल्या पराभवाची कसून छाननी व चौकशी झाली पाहिजे. परंतु त्या चौकशीपूर्वींच श्री कृष्ण मेनन यांना पाठीशीं घालण्याची धडपड पंडितजींनीं सुरू केली आहे, असें दिसतें. अशा स्थितींत सत्यसंशोधन कितपत होईल, याविषयीं शंकाच आहे.

तें कसेंहि असलें तरी यापुढें मात्र हा गाफीलपणा राहतां कामा नये. आम्ही गैरसावध होतों म्हणून आमचा पराभव झाला, असें म्हणण्याची पाळी येऊं नये. तहाचीं व मैत्रीचीं बोलणीं चालू ठेवून चिनी सरकार आम्हांला पुनः बेसावध ठेवण्याचा प्रयत्न केल्याशिवाय राहणार नाहीं. त्यांच्या त्या जाळ्यांत आपण पुनः सांपडूं नये, एवढीच जनतेची अपेक्षा व इच्छा आहे. आपण एक प्रकारच्या काल्पनिक जगांत, स्वप्निल जगांत वावरत होतों, ही गोष्ट पंडित नेहरूंनीं मोठ्या दिलदारपणानें मान्य केली आहे आणि चिनी नेत्यांच्या शब्दावर विश्वास ठेवतां येणार नाहीं, हेंहि

जाहीरपणें सांगितलें आहे. यापुढें त्यांनीं वास्तविक भूमि सोडूं नये आणि विश्वासघातकी शत्रूच्या शब्दांत अडकूं नये – मग तो चीन असो कीं पाकिस्तान असो – एवढीच अपेक्षा.

सैन्यांतील राजकारणाचा परिणाम :

संरक्षणमंत्री श्री कृष्ण मेनन यांनीं भारतीय सैन्यांत राजकारण खेळण्याचा जो प्रमाद केला तोहि आपल्या पराभवास कारणीभूत झाला. 'आम्ही राजकारण्यांचं युद्ध लढत आहोंत. लष्कराला त्याच्या परंपरेप्रमाणं हें युद्ध लढायला मिळालं नाहीं.' हा खेद प्रत्येक सैनिकाच्या मनांत राहून गेला असल्याचें आढळतें. आपल्या मनांतील हा संताप कित्येक सैनिक व अधिकारी स्पष्टपणें व्यक्तहि करतात. या बाबतींत आचार्य कृपलानींनीं संसदेमध्यें कडक टीका केली होती व सेनाधिकाऱ्यांवरील अन्यायाला वाचा फोडली होती; परंतु त्या वेळीं राज्यकर्त्या पक्षानें बहुमताच्या जोरावर त्यांचा आवाज दडपून टाकला. आज आपल्या पराभवाचें सिंहावलोकन करतांना आचार्य कृपालानींची टीका योग्य होती व त्या वेळीं तिच्याकडे दुर्लक्ष करावयास नको होतें, असेंच कोणालाहि आढळून येईल. लष्कराच्या कांहीं विशिष्ट परंपरा असतात, बढतीचे वगैरे नियम असतात. त्या परंपरा व नियम कांटेकोरपणें अमलांत आणले गेले नाहींत तर सैनिकांचें मनःस्वास्थ्य बिघडतें, त्यांच्या निष्ठा विचलित होतात. एक प्रकारची अनिश्चिततेची भावना त्यांच्यांत पसरते; आणि त्यांच्या कार्यक्षमतेवर या साऱ्या गोष्टींचा अनिष्ट परिणाम होतो. श्री कृष्ण मेनन यांनीं लष्कराच्या परंपरा व नियम यांत हस्तक्षेप केला, आपल्या मर्जींतील अधिकाऱ्यांना त्यांचा हक्क नसतांना इतरांचा हक्क डावलूनहि वरच्या जागा दिल्या आणि एकूण सैन्याच्या मनांत अनिश्चिततेची भावना निर्माण केली, अशी तक्रार आहे. या तक्रारीची नीट चौकशी झाली पाहिजे आणि यापुढें अशा प्रकारचा अन्याय सैनिक व सेनाधिकारी यांच्यावर होणार नाहीं, याची खबरदारी घेतली गेली पाहिजे.

श्री रा. कृ. पाटील यांचे अभिप्राय :

पूर्वीचे आय्. सी. एस्. अधिकारी व आतांचे सात्त्विक सर्वोदयी नेते श्री रा. कृ. पाटील यांनीं भारतावर चीनची पहिली धडक बसल्यानंतर थोड्याच

दिवसांत आसाम व नेफा विभागाचा दौरा काढला होता. तेथील पाहणीनंतर त्यांनीं आपले जे अभिप्राय व्यक्त केले ते अत्यंत महत्त्वाचे आहेत. भारतीय सैन्यासंबंधीं ते म्हणतात :

" नेफा भाग हा शत्रूला तोंड देण्याच्या दृष्टीनें अत्यंत सोयीचा असूनहि आपल्या सैन्याला त्या भागांत तग धरतां आली नाहीं. आपलें सैन्य शौर्यांत कमी नव्हतें, तर सेनापति आंखणींतच उणे ठरले. आसाम रायफल्समधील लोकांनीं ज्या वीरश्रीनें आणि निर्धारानें शत्रूशीं मुकाबला केला तेवढेंहि त्राण सैन्यानें दाखविलें नाहीं.

" बोमदी ला येथून आमच्या सैन्यानें जी माघार घेतली तिच्यामुळें चीनच्या हातीं प्रचंड युद्धसामग्री पडली. ॲव्हरेल हॅरिमन हे अमेरिकन तज्ज्ञ भारताला शस्त्रपुरवठा करण्यासंबंधीं चौकशी करण्यासाठीं आले होते. त्यांच्या म्हणण्या-प्रमाणें अमेरिकेनें भारताला जेवढीं शस्त्रें पुरविलीं त्यापेक्षां कितीतरी जास्त शस्त्रास्त्रें से ला येथें आपल्या सैन्यानें गमावलीं ! त्या भागांतील आपल्या सैन्याबद्दल अभिमानानें बोलण्यासारखी परिस्थिति नव्हती. आपले त्या भागांतील अधिकारी अननुभवी व सुखासीन होते. लेपटेनंट जनरल कौल यांच्याबद्दल बराच प्रवाद होता. लडाखमध्यें मात्र आपल्या सैन्यानें शर्थीनें लढा दिला – विशेष अनुकूलता नसतांहि लढा दिला.

" फौजेच्या कारभारांत राजकीय पुढाऱ्यांनीं निष्कारण ढवळाढवळ केली. याला मुख्यत्वें भूतपूर्व संरक्षणमंत्री श्री कृष्ण मेनन हे जबाबदार आहेत. फौजेंतील अधिकाऱ्यांच्या आपसांतील स्पर्धेंत राजकीय पुढारी पडतील तर यांतून काय धोके निर्माण होतात तें या लढाईमुळें चांगलेंच निदर्शनास आलें आहे. "

[' साधना ' १२-१-१९६२]

श्री रा. कृ. पाटील यांचे हे अभिप्राय इतके स्पष्ट व बोलके आहेत कीं, त्यांवर अधिक भाष्य करण्याची आवश्यकताच नसावी. परंतु आमचें आत्म-संतुष्ट सरकार व सत्ताधारी नेते या अभिप्रायांकडे लक्ष देतील अशी फारशी आशा बाळगण्यासारखी स्थिति मात्र दिसत नाहीं.

पक्षपाती तटस्थता :

याच संदर्भांत भारताच्या तटस्थतेचीहि थोडी अधिक छाननी केली पाहिजे. भारतानें स्वतंत्र झाल्यापासून कोणत्याहि लष्करी गटांत सामील न होण्याचें धोरण (non-alignment policy) अवलंबिलें आहे, तें योग्यच आहे. परंतु त्या धोरणाची अमलबजावणी मात्र नीट झाली नाहीं. ज्या ज्या वेळीं पाश्चात्य लोकशाही राष्ट्रें आणि साम्यवादी राष्ट्रें यांच्यांत निवड करण्याचा प्रसंग आला तेव्हां भारतानें साम्यवादी राष्ट्रांची बाजू घेऊन लोकशाही राष्ट्रांवर शाब्दिक हल्ला चढविला आहे. कांहीं वेळां हा हल्ला योग्य असला तरी अनावश्यक होता. उदाहरणार्थ, सुवेझच्या प्रश्नावर इंग्लंड व ईजिप्त यांच्यांत संघर्ष निर्माण झाला असतां आम्ही ईजिप्तच्या बाजूनें इतक्या हिरीरीनें इंग्लंडवर तुटून पडलों कीं तेवढी ईर्ष्या खुद्द ईजिप्तनेंहि दाखविली नाहीं. याच्या उलट हंगेरीमध्यें रशियानें केलेली अमानुष कत्तल व तिबेटमध्य चीननें घातलेला नंगा नाच आम्हीं उघड्या डोळ्यांनीं पाहिला व त्याविरुद्ध निषेधाचा एक शब्दहि न उच्चारतां गप्प बसलों. अशा प्रकारें आमची तटस्थता ही साम्यवाद्यांच्या बाबतींत पक्षपात करणारी असल्याचें जगाला दिसल्यानंतर तिची किंमत घसरली असल्यास नवल काय ? तटस्थता हें एक अत्यंत उत्तम मूल्य आहे आणि त्या ला शक्यतोंवर आपण चिकटून राहिलें पाहिजे यांत शंकाच नाहीं. परंतु वेळीं अवेळीं तिचें ढोलकें वाजवून लोकशाही राष्ट्रांन ि डवचण्यांत व दुखविण्यांत आपण फार मोठी चक केली, हें आपण आता तरी ओळखलें पाहिजे. आमच्याकडून अपमानित होऊनहि लोकशाही राष्ट्रें चीननें आमच्यावर हल्ला करतांच आमच्या मदतीला धांवून आलीं आणि, आमच्याशीं मैत्रीचें नातें सांगणारा रशिया कबूल केलेलीं मिग विमानें देण्याचीहि टाळाटाळ करूं लागला, यांतील फरक आपण जाणला पाहिजे. याचा अर्थ असा मुळींच नव्हे कीं भारतानें कोणत्या तरी एका सत्तागटांत सामील झालेंच पाहिजे. तसें करणें म्हणजे आपल्या सर्वनाशाला आमंत्रण देण्यासारखेंच होईल. परंतु आम्ही कोणाच्या बाजूचे नाहीं, हें जाहीरपणें सांगण्याची फार घाईहि करण्याची जरूर नाहीं. पतिव्रता स्त्रीहि जेव्हां 'अहो, मी पतिव्रता आहें' असें जाहीरपणें सांगूं लागते तेव्हां तिच्याबद्दल लोकांना शंकाच येते. म्हणून भारतानें निःपक्षपाती तटस्थताच राखावी, परंतु उठल्या

सुटल्या तिची जाहिरात करण्याचा मोह मात्र टाळावा. ज्यांना शंका वाटेल त्यांच्यासाठीं खुलासा अवश्य करावा.

आमची तयारी झालेली नव्हती :

चीन इतक्या प्रचंड संख्येनें आमच्यावर हल्ला चढवील असें आम्हांला वाटलें नव्हतें, आणि म्हणून त्या दृष्टीनें आम्हीं तयारी केली नव्हती, ही गोष्ट पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंनींहि संसदेंतील आपल्या भाषणांत मान्य केली. ते म्हणाले,

" आपल्यासमोर कोणतीं संकटें उभीं राहण्याची शक्यता आहे याची जाणीव २० ऑक्टोबरपूर्वीं लोकांना नव्हती. लोकांना वाटलें कीं, सरहद्दीवर किरकोळ प्रकार घडत आहेत. लडाखमधून चिनी सैनिकांना हुसकावून लावणें ही कांहीं वाटते तितकी सोपी गोष्ट नाहीं, हें लक्षांत न घेतां या सभागृहाच्या कांहीं सभासदांनीं चिनी सैनिकांची हकालपट्टी न केल्याबद्दल सरकारवर टीका केली. ती गोष्ट कांहीं सोपी नाहीं आणि ती करण्यासाठीं केवळ सामर्थ्य असून भागणार नाहीं, तर सामर्थ्याचा योग्य रीतीनें, योग्य दिशेनें उपयोग करायला हवा, प्रचंड तयारी करायला हवी आणि लष्करी बाबी विचारांत घ्यायला हव्या, याची आतां सभासदांना थोडी जास्त जाणीव झाली असेल. जेथें या गोष्टी आपल्याला प्रतिकूल असतील तेथें स्वाभाविकपणें आपल्याला माघार घ्यावी लागते – मग आपलें सामर्थ्य कितीहि असो. आपले जवान अत्यंत खंबीर आहेत. सभागृहाच्या माहितीसाठीं मी हें येथें सांगूं इच्छितों कीं, कांहीं वर्षांपूर्वीं लडाखमध्यें चिनी सैनिकांनीं सरहद्द भागांत आपले हातपाय पसरायला सुरुवात केली त्या वेळींच या सैनिकांनीं या प्रदेशांत आपल्यावर हल्ला केला तर काय करायचें याचा सरकारनें विचार केला. ते तेथें हल्ला करणार नाहींत, कित्येक डिव्हिजन फौजा आणून ते सरळ सरळ आक्रमण करणार नाहींत, असें आपल्याला वाटत होतें. तरीसुद्धां चिनी सैनिक मोठ्या संख्येनें चाल करून आले तर काय करावयाचें, याचा सरकारनें विचार केला होता. त्यावेळीं आम्हांला असा सल्ला देण्यांत आला कीं, अगदीं मॅकमहोन रेषेला चिकटून राहणें व ती रेषा लढविणें आपल्या फायद्याचें ठरणार नाहीं; संरक्षणाची खरी आघाडी या रेषेच्या खालीं असावयास हवी; तरीपण आपण

शत्रुसैनिकांच्या मार्गांत अडथळे आणावेत, त्यांना त्रास द्यावा व त्यांच्याशीं थोडीफार लढाई करावी. चीनचे सैनिक इतक्या मोठ्या संख्येनें धाड घालतील असें शेवटच्या क्षणापर्यंत वाटलें नाहीं; आणि आपल्याच प्रदेशांत, शत्रूला कांहीं प्रतिकार न करतां, मागें हटण्याची कल्पना आपल्याला नापसंत होती. या दोन कारणांस्तव लष्करी दृष्टचा अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत आपल्या सैनिकांनीं चिनी सैनिकांशीं सामना दिला. चिनी सैनिकांच्या प्रचंड संख्या-बळामुळें आपल्या अधिकाऱ्यांना व सैनिकांना माघार घेऊन अधिक चांगल्या बचावासाठीं मोर्चे बांधावे लागले, ही कांहीं आपल्या अधिकाऱ्यांवरील किंवा सैनिकांवरील टीका नव्हे."

एक प्रकारें पाहिल्यास आमची पुरेशी तयारी नव्हती, ही आमच्या गाफील-पणाच्या किंवा अजागरूकतेच्या नाण्याचीच दुसरी बाजू होती. डोंगर-दऱ्यांतून याक-खेंचरांवर सामान लादून लक्षावधि सैनिक महिनानुमहिने भारतीय सीमेकडे वाटचाल करीत होते, आणि आम्ही त्या वेळीं झोंपा काढीत होतों. ज्यांनीं आम्हांला जागें करण्याचा प्रयत्न केला त्यांना आम्ही मूर्खांत काढलें, त्यांचा उपहास केला. सैनिकांना व जनतेलाहि दुःख होतें तें याच गोष्टीचें !

थंड प्रदेशास न सरावलेले सैनिक :

आमच्या सैनिकांना बर्फाळ प्रदेशांत लढण्याची संवय नव्हती. उलट चिनी सैनिक गेलीं आठ वर्षें हिमालयांतील लढाईचा सराव करीत होते. अशा स्थितींत आपला पराभव होणें स्वाभाविक, किंबहुना अटळ होतें. ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्यें लडाखमधील चुशूलच्या आसपासच्या भागाचें उष्णतामान शून्याच्या खालीं ३० अंश होतें, यावरून तेथें किती कडाक्याची थंडी असेल याची कल्पना येऊं शकेल. तो भाग समुद्रसपाटीपासून १४ हजार फूट उंच आहे. इतक्या उंचीवर राहण्याची संवय नसलेल्या माणसाला तेथें श्वासो-च्छ्वास घेणेंहि अवघड जातें. त्यामुळें ऐनवेळीं तेथें पाठविलेले सैनिक कांहीं करूं शकले नाहींत. त्या हवेचा सराव होण्यांतच चार सहा महिने निघून जातात. लडाखमध्यें व नेफामध्येंहि कित्येक ठिकाणीं १६००० ते १८००० फूट उंचीवर आपल्या सैनिकांना लढावें लागलें. इतक्या उंचीवर डोकें दुखणें, झोंप न येणें, धाप लागणें, भूक नाहीशी होणें, वगैरे शारीरिक विकार होतात

आणि माणसाची कार्यक्षमता ५० टक्के कमी होते. अशा स्थितींत दक्षिणे-कडील उष्ण हवामानाची संवय असलेले सैनिक तेथें काय करूं शकणार ? पंधरा वर्षांपूर्वी पाकिस्ताननें काश्मीरवर हल्ला करून आमच्यावर जे उपकार करून ठेवले होते, त्यांचा या वेळीं आम्हांला थोडा फार उपयोग झाला. तो असा कीं, काश्मीरमध्यें पाकिस्तानच्या संभाव्य हल्ल्यापासून देशाचें रक्षण करण्यासाठीं आपल्या फौजा ठेवाव्या लागल्या आहेत. त्यामुळें नाइलाजानें कां होईना, आमच्या कांहीं सैनिकांना बर्फाळ प्रदेशांत राहण्याची संवय करून घ्यावी लागली. हेच सैनिक चीनच्या सैनिकी लोंढ्याला थोपवून धरण्याच्या कामीं उपयोगीं पडले. यापुढें ही अडचण भासूं नये म्हणून आमच्या जास्तींत जास्त सैनिकांना १५-१६ हजार फूट उंचीवरील बर्फाळ प्रदेशांत राहण्याची व लढण्याची संवय कशी होईल याची खबरदारी आपण घेतली पाहिजे.

आमचीं शस्त्रें मागासलेलीं होतीं :

आमच्या सैनिकांना देण्यांत आलेलीं शस्त्रें अद्यतन नव्हतीं, किंबहुना मागासलेलीं होती; याच्या उलट शत्रु-सैनिकांजवळ अद्ययावत् धर्तीचीं स्वयं-चलित (ऑटोमॅटिक) शस्त्रें असल्यामुळें त्यांच्यापुढें आमचा निभाव लागला नाहीं, हा आरोप आमच्या पंतप्रधानांनीं अमान्य केला आहे. ते म्हणतात :—

" आपल्या सैनिकांजवळ योग्य शस्त्रें नव्हतीं, असा आणखी एक आरोप करण्यांत आला आहे. त्यासंबंधीं सांगावयाचें म्हणजे आपले जे जवान आघाडीवर गेले त्यांना नेहमींची सामग्री म्हणजे ·३०३ बंदुकी, आणि हलक्या व मध्यम आकाराच्या मशीनगन्स यांसारखीं स्वयंचलित शस्त्रें देण्यांत आलीं होतीं. त्यांच्याजवळ निमस्वयंचलित बंदुकी नव्हत्या; कारण आपल्या लष्कराजवळ या बंदुकी नाहींत. इथें मला हें सांगावेंसें वाटतें कीं, पाश्चात्य देशांतील बऱ्याच अद्ययावत् सैन्यांजवळहि अजून या बंदुकी नाहींत. इंग्लंडमध्यें सुद्धां निम-स्वयंचलित बंदुकी नुकत्याच दिल्या गेल्या आहेत. या बंदुकी पुरवायला ४ ते ५ वर्षें लागलीं. हें काम थोड्याच महिन्यांपूर्वी पूर्ण झालें. हें काम करायला फार वेळ लागतो आणि तुलनात्मक दृष्टचा ब्रिटिश लष्कर आपल्या लष्करापेक्षां लहान आहे.

" गेलीं चार वर्षें आपण या गोष्टीचा विचार करीत आलों आहोंत. त्या बाबतींत निरनिराळ्या अडचणी उपस्थित झाल्या. निरनिराळीं मतें

व्यक्त करण्यांत आलीं. तयार वस्तू मागविणें हा केव्हांहि सर्वांत सोपा मार्ग; परंतु सर्वांत सोपा मार्ग हा नेहमींच सर्वांत चांगला मार्ग असतो असें नाहीं. परकी चलनाची टंचाई वगैरेसारख्या कांहीं अडचणी सतत आपल्यासमोर असल्यामुळें देशाचें सामर्थ्य वाढविण्याचा खरा मार्ग तो नव्हे, हें आपण ओळखलें पाहिजे. आज आपल्याला कांहीं शस्त्रें मिळालीं तरी त्यांच्यासाठीं दारूगोळा मिळवायला हवा; आणि मग आपल्याला सर्वस्वीं कोणत्या तरी देशावर, विशेषतः इतर देशांच्या खाजगी व्यापाऱ्यांशीं आपल्याला व्यवहार करावा लागणार असेल तर त्यांच्यावर अवलंबून राहावें लागेल. शस्त्रास्त्रें पुरविण्याच्या बाबतींतले गैर व्यवहार हे सर्वांत वाईट व्यवहार होत; कारण आपल्याला कांहीं तरी शस्त्रें हवीं असतात आणि मग शस्त्रें पुरविणारे अवाच्या सवा किंमत देण्यास आपल्याला भाग पाडतात.

" म्हणून इतर देशांतल्या खाजगी कंपन्यांकडून किंवा व्यापाऱ्यांकडून शस्त्रात्रें घेण्याच्या आपण अगदीं विरुद्ध होतों; आणि आपण स्वतःच निम-स्वयंचलित बंदुका तयार कराव्यात असें आपल्याला वाटूं लागलें. हे सर्व निर्णय करायला, विशेषतः शांततेच्या काळांत फार वेळ लागतो. अर्थात् आणीबाणीची परिस्थिति या आधीं निर्माण झाली असती तर आपण अधिक चांगल्या प्रकारें कार्य केलें असतें ; परंतु आपल्याला कोणत्या प्रकारचीं शस्त्रें हवींत, हें ठरवायला दोन-तीन वर्षें लागलीं. अखेरीस आपण तीं तयार करण्याची प्राथमिक प्रक्रिया सुरू केली आणि आज* आपण अशा अवस्थेला येऊन ठेपलों आहोंत कीं सुमारें ३–४ आठवड्यांत हीं शस्त्रें मोठ्या प्रमाणावर तयार होऊं लागतील. वस्तुतः या शस्त्रांचे कांहीं नमुने तयार करण्यांत आले आहेत. २-३ महिन्यांत हीं शस्त्रें आणखी जास्त प्रमाणांत तयार होऊं लागतील.......

" आपल्याला माघार घ्यावी लागली याचें खरें मूलभूत कारण म्हणजे चीननें प्रचंड संख्येनें आमच्या प्रदेशावर धाड घातली हें होय. त्यांची संख्या आपल्यापेक्षां इतकी जास्त होती, कीं शस्त्रें कुणाचीं अधिक चांगलीं होतीं, हा

* हे भाषण पंतप्रधानांनीं ता. १४ नोव्हेंबर १९६२ रोजीं संसदेमध्यें केलें होतें.

प्रश्नच उद्भवत नाहीं. वस्तुत: आपलींच शस्त्रें त्यांच्यापेक्षां थोडीं अधिक चांगलीं होतीं. परंतु त्यांच्याजवळच्या तोफा अधिक चांगल्या होत्या. त्या भागांतली भौगोलिक परिस्थिति आपल्याला प्रतिकूल होती आणि आपण जें केलें त्यापेक्षां आपल्याला आणखी जास्त कांहींहि करतां आलें नसतें. आपली जर कांहीं चूक झाली असेल तर ती एवढीच कीं लष्करी दृष्टचा जो भाग फारसा अनुकूल नाहीं, अशा भागामध्यें सुद्धां आपण पाय रोंवून उभे राहिलों. सैनिकांना तसें करायला आपण सांगितलें नाहीं; परंतु आपले सैनिकच माघारीं यायला नाख़ुष होते आणि आपले प्राण धोक्यांत घालून त्यांनीं हा भाग लढविला. "

पंडितजींचा हा सारा खुलासा ऐकल्यानंतरहि सामान्य माणसाचें समाधान होत नाहीं. दरसाल तीन-चारशें कोटि रुपये ज्या सैन्यावर खर्च होत होते, त्याच्याकडे आधुनिक शस्त्रात्रें कां नसावींत, हें कोडें शेवटपर्यंत तसेंच न उकललेलें राहतें. अर्थात् एक गोष्ट आपण लक्षांत घेतली पाहिजे कीं आपण लष्करी दृष्टचा पूर्ण जागरूक असतों आणि आपल्याकडे शत्रूसारखींच अद्ययावत् शस्त्रें असतीं, तरी कदाचित् आपला पराभव टळलाहि नसता. कारण मानवी शरीरांचा प्रचंड तट करून लाखोंच्या संख्येनें चाल करून येणाऱ्या शत्रुसैनिकांच्या लाटा थोपवून धरणें त्या डोंगराळ प्रदेशांत कोणालाहि शक्य झालें नसतें. परंतु त्या परिस्थितींत शत्रूला इतक्या वेगानें आगेकूच करतां आली नसती. इतकेंच नव्हे तर आपण आपलें कर्तव्य चोख बजावल्याचें समाधानहि आपल्याला लाभलें असतें. आज आपण शत्रूच्या तुलनेनें शौर्यांत कमी नसतांहि केवळ शस्त्रांस्त्रांतील मागासलेपणा व गाफीलपणा यांमुळें आपल्याल पराभव पत्करावा लागला, ही गोष्टच आपल्याला भयंकर नामुष्कीची वाटते. मानवाच्या जीवनांत स्वाभिमान ही मुख्य गोष्ट असते. शांति ही दुय्यम गोष्ट आहे. शांतीसाठीं स्वाभिमान गमवावा लागत असेल तर अशी शांति आमच्या शत्रुलाच लखलाभ होवो. भारतीय नेत्यांनीं शांतीच्या नादानें स्वाभिमानाकडे दुर्लक्ष केलें असें भारतीय जनतेला वाटतें. आमचे सैनिकहि तसेंच मानतात. काश्मीरच्या मुक्तीसाठीं धांवलेल्या सैनिकांनीं संपूर्ण काश्मीरांतून त्या वेळीं नक्कीच शत्रूला पिटाळून लावलें असतें. परंतु त्यांना आपल्या नेत्यांनीं पुढें जाऊं दिलें नाहीं. चीनच्या बाबतींतहि असेंच घडणार नाहीं ना ?–

अशी भीति आमच्या सैनिकांच्या मनांत घर करून राहिली असल्यास आश्चर्य नाहीं. चीननें एकतर्फी युद्धबंदी करून भारताचा जो अपमान केला आहे तो रणांगणावरील प्रत्यक्ष पराभवापेक्षांहि अधिक असह्य आहे, असें आमच्या सैनिकांना वाटतें. परंतु आमच्या नेत्यांना मात्र तसें कांहीं वाटत असल्याचें दिसत नाहीं. ' कितीहि किंमत द्यावीं लागली तरी शांततेचा ध्यास सोडावयाचा नाहीं. ' (peace at any cost) अशीच वृत्ति ज्या देशांतील नेत्यांमध्यें असेल त्याचे सैनिक कितीहि शूर असले तरी काय उपयोग ?

सारेजण सारखेच गुन्हेगार :

सैन्याला गाफील ठेवलें व त्याला योग्य तीं शस्त्रें पुरविलीं नाहींत असा आरोप संरक्षणमंत्री श्री कृष्ण मेनन यांच्यावर साम्यवादी वगळून काँग्रेससकट साऱ्या पक्षांनीं केला आणि त्यामुळें त्यांना व इतर उच्चपदस्थ सेनाधिकाऱ्यांना राजीनामा द्यावा लागला. परंतु त्या गुन्ह्याची जबाबदारी एकट्या मेनन-साहेबांवर ढकलून इतरांनीं नामानिराळे राहण्याचा आव आणणें म्हणजे खरोखरीं एक प्रकारें देशाची वंचनाच होय. सरकारनें घेतलेल्या निर्णयांची जबाबदारी संपूर्ण मंत्रिमंडळाची असते, एकट्या-दुकट्या मंत्र्याची नसते. त्यामुळें सरकारचें एखादें धोरण फसलें कीं त्याबद्दल सर्वच मंत्र्यांना जबाबदार धरलें जातें; आणि तेंच बरोबर आहे. अशा स्थितींत बिचाऱ्या मेनन यांना बळी देण्यांत काय अर्थ ? अर्थात् पंडितजींनीं म्हटल्याप्रमाणें अशा वेळीं जनमताचा क्षोभ शमविण्यासाठीं कोणाला तरी बळी द्यावेंच लागतें व त्याप्रमाणें श्री मेनन यांना बळी देण्यांत आलें, एवढाच त्याचा अर्थ.

आणीबाणीची परिस्थिति निर्माण होण्यापूर्वीं सैन्यासाठीं श्री मेनन यांनीं ५० कोटि रुपये मागितले होते. परंतु ' कुठं आहे आणीबाणी ? ' असें म्हणून अर्थमंत्र्यांनीं ती मागणी फेटाळून लावली व पंडितजींनींहि अर्थमंत्र्यांनाच पाठिंबा दिला, असें म्हणतात. हें खरें असेल तर सैन्याला आवश्यक शस्त्रास्त्रें न मिळाल्याबद्दल मेनन यांच्या इतकेच, मंत्रिमंडळांतील त्यांचे इतर साथी-दारहि गुन्हेगार ठरतात, हें स्पष्ट नाहीं काय ?

आपल्या देशाला कोणी शत्रुच नाहीं, तेव्हां शस्त्रास्त्रें तयार करण्यांत कांहीं अर्थ नाहीं, असें मानून आमच्या शस्त्रांच्या कारखान्यांत कॉफी-पात्रां-सारख्या जीवनोपयोगी वस्तूंची निर्मिति करण्यास ज्या मंत्रिमंडळानें संमति

दिली तें भारतीय सैन्याच्या पराभवाला संयुक्तपणें जबाबदार नाहीं काय ? सत्ताधारी पक्षाचे प्रवक्ते सांगतात त्याप्रमाणें शस्त्रें तयार करणारीं यंत्रें फावल्या वेळांत जीवनोपयोगी वस्तू निर्माण करीत होतीं, हें खरें मानलें तर मग आजहि तीं जीवनोपयोगी वस्तू निर्माण करीत आहेत काय ? तें शक्य नाहीं. वस्तुस्थिति अशी होती कीं आपल्याला एका भयंकर व क्रूर शत्रूला तोंड द्यावयाचें आहे, याचा विसरच आमच्या संरक्षणमंत्र्यांना, प्रधानमंत्र्यांना अर्थमंत्र्यांना व त्यांच्या इतर सहकाऱ्यांना पडला होता. प्रक प्रकारें ती सर्वांचीच कर्तव्यच्युति होती. परंतु प्रत्यक्ष पराभव झाल्यानंतर मात्र 'अजापुत्रं बलिं दद्यात्' या न्यायानें श्री कृष्ण मेनन यांना बळी देण्यांत आलें एवढेंच.

श्री कृष्ण मेनन हे साम्यवाद्यांचे सहप्रवासी आहेत, ही गोष्ट काँग्रेसची मंडळी नाकारीत असली तरी जोंपर्यंत साम्यवादी मंडळी त्यांना आपलें मानतात, ते निवडून यावेत म्हणून आपली सारी शक्ति पणाला लावतात, तोंपर्यंत त्यांच्या बाबतींत सत्ताधारी पक्षानें व भारतानें अधिक जागरूक राहिलें पाहिजे. श्री मेनन यांची आजवरची कृति व उक्ति यांवरून एक गोष्ट दिसून येते कीं, साम्यवादाचा विचार, साम्यवादी पक्ष आणि साम्यवादी देश यांच्याविषयीं त्यांच्या मनांत विशेष आपुलकी व जिव्हाळा आहे. त्यामुळें साम्यवादी शत्रूविरुद्ध ते त्वेषानें विचारच करूं शकत नाहींत. ज्या देशाशीं साम्यवादी राष्ट्रानें उघड शत्रुत्व मांडलें आहे त्याला असा संरक्षणमंत्री केव्हां नां केव्हां खड्डयांत नेऊन टाकल्याखेरीज राहणार नाहीं युद्धाचा ताण थोडा कमी होतांच आमचे पंतप्रधान श्री कृष्ण मेनन यांना पुन: मंत्रिमंडळांत घेण्याच्या गोष्टी बोलूं लागले आहेत. त्यांतील धोका देशानें ओळखला पाहिजे व त्याबाबतींत पंतप्रधानांवर दडपण आणून त्यांना त्या विचारापासून परावृत्त केलें पाहिजे.

या संदर्भांत आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. आपल्या देशानें लोकशाही राज्यपद्धतीचा स्वीकार केलेला असल्यामुळें येथें विचार-स्वातंत्र्य हें एक महत्त्वाचें मूल्य आहे. आमचे सैनिक व सेनाधिकारी आतां सुशिक्षित असल्यामुळें त्यांनाहि विचार करतां येतो, हें ओळखलें पाहिजे. त्यांच्यांत साम्यवादी विचाराचा प्रसार श्री मेनन यांच्या कारकीर्दींत फार मोठ्या

प्रमाणावर झाला असल्याची तक्रार आहे. ती खरी असल्यास त्याचा योग्य तो बंदोबस्त झाला पाहिजे. या देशांत प्रजासमाजवादी, जनसंघ व स्वतंत्र या पक्षांचे लोक सत्ताधारी पक्षाला व साम्यवादी पक्षालाहि विरोध करीत आहेत. अशा वेळीं साम्यवादी पक्ष सत्ताधारी पक्षाशीं हातमिळवणी करून इतर राष्ट्रीय पक्षांना चिरडून टाकण्याचे मनसुबे रचीत आहे, हें आपण ओळखलें पाहिजे. प्रजासमाजवादी, समाजवादी, जनसंघ, स्वतंत्र वगैरे पक्षांनीं राज्यकर्त्यांना कितीहि विरोध केला तरी त्यांच्या निष्ठा भारतभूमींतच दृढमूल आहेत, त्यांच्यापासून भारताला धोका नाहीं, परंतु साम्यवाद्यांच्या निष्ठा मॉस्को व पेकिंगहून येणाऱ्या असल्यामुळें त्यांच्या बाबतींत अधिक जागरूक राहण्याची गरज आहे. दुर्दैवानें सत्ताधारी पक्षाला हा विवेक अजून तरी सुचलेला नाहीं, यामुळें साम्यवाद्यांच्या राष्ट्रद्रोही कारवाया राजरोसपणें चालू शकतात आणि राष्ट्रीय वृत्तीच्या पक्षांकडे या देशांत संशयी नजरेनें पाहिलें जातें.

अपुरी साधनसामग्री :

आपले जवान चिन्यांशीं मोठ्या शर्थीनें लढले, परंतु अत्यंत थंड प्रदेशांत वावरण्यासाठीं आवश्यक असलेली साधनसामग्री त्यांच्याजवळ नसल्यामुळें त्यांना हार खावी लागली, असा एक मोठा आक्षेप घेण्यांत येतो. शस्त्रास्त्रां-प्रमाणें आपण परदेशांकडून कपडालत्ताहि मागवला आणि देशांतील स्त्रियां-कडून लोकरीचे कपडे तयार करवून घेतले, यावरून हा आरोप खराच होता, असें सिद्ध होतें. अर्थात् याहि बाबतींत पंतप्रधानांचा खुलासा आपण प्रथम जाणून घेतला पाहिजे. ते म्हणतात :

" ईशान्य सरहद्द प्रदेशाच्या डोंगराळ भागांत लढण्यासाठीं आपण आपल्या सैनिकांना पुरेसे गरम कपडे न देतां व अनवाणी पाठवलें, असें कांहीं सभा-सदांना वाटतें. म्हणून आपल्या सिद्धतेच्या सर्वसाधारण प्रश्नावर मला आतां भर द्यावासा वाटतो. आपल्या सैनिकांपाशीं शस्त्रें अशीं जवळ जवळ नव्हतींच आणि ते अनवाणी होते, असें म्हणणें हें खरोखरींच चमत्कारिक आहे. "

" कांहीं सैनिक त्या भागांत अगोदरपासून होते आणि कांहींना सप्टेंबर-मध्यें धींईघाईनें पाठविण्यांत आलें. साधारणपणें सप्टेंबरच्या मध्यास

सैनिकांना गरम कपडे दिले जातात. या सैनिकांना तेथें पाठविण्यांत आलें तेव्हां ते पूर्ण गणवेषांत होते. त्यांच्याजवळ जरूर ते सर्व लोकरी कपडे होते. प्रत्येकाजवळ चांगल्या बुटांचे दोन-दोन जोड होते. त्यांना रवाना करायच्या वेळीं प्रत्येकाला तीन ब्लँकेटें देण्यांत आलीं. नंतर आणखी एक-एक ब्लँकेट देण्यांत आलें. सैनिकांना आतां चार जाडजूड ब्लँकेटें दिलीं जातात. परंतु या सैनिकांना विमानानें पाठविलें जात होतें आणि त्यांच्याजवळच्या ब्लँकेट-मुळें विमानांतली पुष्कळ जागा अडत होती; म्हणून सैनिकी-अधिकाऱ्यांनीं व स्वतः सैनिकांनीं असें सांगितलें कीं ब्लँकेटमुळें जास्त जागा अडत असल्या-मुळें तीं नंतर पाठवून द्यावींत. त्यांना पाठविलें त्या वेळीं फार थंडी नव्हती. म्हणून प्रत्येकानें एकेक ब्लँकेट घेतलें; आणि बाकीचीं नंतर पाठविण्यासाठीं म्हणून ठेवून दिलीं. परंतु दुर्दैवानें नंतर अशी परिस्थिति निर्माण झाली कीं त्यांना ब्लँकेटें मिळावींत म्हणून तीं विमानांतूनच टाकावीं लागलीं. हें काम जोखमीचें होतें; कारण तसें करतांना चिन्यांना आमच्या विमानांवर गोळ्यांचा वर्षाव करितां आला असता. शिवाय आणखीहि एक अडचण अशी होती कीं या दऱ्याखोऱ्यांच्या डोंगराळ भागांत व दाट जंगलांत ब्लँकेटें नेमकीं आपस्या सैनिकांच्या हातीं पडतील इतक्या अचूकपणें तीं टाकतां येत नव्हतीं. कित्येकदां हीं ब्लँकेटें खोल दऱ्यांमध्यें पडायचीं आणि मग तीं तेथून काढणें जवळ जवळ अशक्य व्हावयाचें. अशा प्रकारें आपलीं पुष्कळशीं ब्लँकेटें आणि इतर सामग्री वांया गेली.

" वस्तुतः जे सैनिक या भागांत कायमचे म्हणून ठेवले होते त्यांच्याजवळ नेहमींच्या बुटांखेरीज बर्फावरून चालतांना घालावयाचे बूटहि होते. ठोकळ-मानानें बोलावयाचें झाल्यास मी असें म्हणेन कीं ईशान्य सरहद्द प्रदेशांतील (नेफामधील) आपल्या सर्व सैनिकांजवळ जरूर ते गरम कपडे आणि बूट होते. परंतु चिनी सैनिकांची संख्या झपाट्यानें वाढत आहे असें सप्टेंबरच्या अखेरीस आढळल्यानंतर आणखी सैनिक तावडतोब पाठविण्याचा निर्णय घेण्यांत आला. हे सैनिक घाईघाईनें पाठविण्यांत आले. केव्हां केव्हां तर असें घडलें कीं अमुक एका ठिकाणीं जात असलेल्या सैनिकांना वळवून या प्रदेशा-कडे पाठविण्यांत आलें. त्यांच्याजवळ त्यावेळीं थंडीच्या दिवसांत लागणाऱ्या सर्व गोष्टी नव्हत्या हें उघडच आहे. अर्थात् त्या त्यांना नंतर पाठविण्याचें

ठरलें होतें. जे सैनिक या प्रदेशाकडे गेले त्यांच्याजवळ आवश्यक त्या सर्व वस्तू नव्हत्या. परंतु त्या नंतर पाठविण्यांत आल्या. उरलेल्या सर्वांजवळ मात्र पूर्ण लष्करी सामग्री आणि गरम कपडे वगैरे होते; आणि त्यांच्यापैकीं बऱ्याच जणांजवळ तर, बर्फावरून चालतांना घालायचें बूटसुद्धां होते. सर्वांजवळ हे बूट कदाचित् नसतीलहि, परंतु प्रत्येकाजवळ जाडजूड व दणकट बूट होते, हें नक्की.

" सैनिकांना हिमबाधा झाल्याचें कांहीं लोकांच्या कानांवर आलें आहे. दोन ते तीन हजार लोकांपैकीं सुमारें ४० जणांना हिमबाधा झाली असावी. तिथली परिस्थिति लक्षांत घेतां, हें प्रमाण फारच कमी आहे, असें म्हणावें लागेल. या ४० लोकांपैकींसुद्धां निम्म्या लोकांना ते अनवाणी होते, म्हणून नव्हे तर ते फार उंचीवर होते म्हणून हिमबाधा झाली. आघाडीवरल्या आपल्या नियमित फौजांपैकीं कुणाला हिमबाधा झाली नाहीं. २० ऑक्टोबर रोजीं चीननें मोठ्या संख्येनें भडिमार केला तेव्हां एकदोन ठिकाणीं आपल्या सैनिकांची पांगापांग झाली. ते आपल्या तळाकडे परत येऊं शकले नाहींत. त्यांना कांहीं दिवस डोंगराळ भागांत, रानावनांत इकडे-तिकडे भटकावें लागलें. पुढें कांहीं दिवसांनीं ते आपल्या तळावर परत आले. आपले बरेच सैनिक जायबंदी झाले असें लोक म्हणूं लागले होते याचें एक कारण बहुधा हेंहि असावें. थोड्या दिवसांनीं आपले जे सैनिक तळावर परतले त्यांची संख्या माझ्या कल्पनेप्रमाणें एक हजार सहाशेंहून जास्त होती. रानावनांत भटकत असतांना ते सुरक्षित नव्हते, हें सांगायला नकोच. ते तळावर असते तर लष्कराला मिळत असलेल्या सर्व सुखसोयी, ब्लँकेटें व इतर वस्तू त्यांना मिळाल्या असत्या. या सोयी त्यांना भटकत असतांना कशा मिळणार ? हे सैनिक अत्यंत उंच भागांत भटकत होते, आणि त्यांना पुष्कळच हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. ज्यांना हिमबाधा झाली त्यांतले बहुतेक याच सैनिकांपैकीं होते...

" लदाखमध्यें चुशूलच्या आसपास सध्यांचें उष्णतामान शून्याच्या खालीं ३० अंश आहे, हें सभासदांनीं ध्यानांत घ्यावें. तिथलें हवामान आणि थंडी किती कडाक्याची असेल याची यावरून सभासदांना कल्पना येईल. हा भाग समुद्रसपाटीपासून १४ हजार फूट उंच आहे; आणि इतक्या उंचीवर, इतक्या

कमी उष्णतामानांत राहण्याची संवय नसेल तर अंगावर वाटेल तितके कपडे घातले तरी त्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं. आतां अनुभव आल्यानंतर आपल्या सैनिकांना थंडीपासून स्वतःचें रक्षण करण्याच्या आवश्यक वस्तूंबरोबरच कापसाचे पॅड्स असलेले जाड कोट आणि पाटलोणी देण्यांत आल्या आहेत. हे कपडे दिसायला इतर कपड्यांइतके चांगले नसतील, परंतु त्यांच्यामुळें थंडीपासून पुष्कळच बचाव होईल. २० तारखेनंतर थोड्याच दिवसांनीं आपल्या सैनिकांना हे कपडे पुरवायला सुरुवात करण्यांत आली. सुरुवातीस दररोज असे ५०० कोट व पाटलोणी आणि नंतर हजार कोट व पाटलोणी पाठविल्या जाऊं लागल्या."

पंडितजींनीं दिलेला हा खुलासा आपण खराच मानला पाहिजे, परंतु खुद्द सैनिकांना मात्र तसें वाटत नसावें अशी शंका येते. आघाडीवरील जवानांना जे भारतीय पत्रकार भेटले त्यांच्याजवळ आमच्या जवानांनीं अशी तक्रार केली कीं, " तुम्ही सैन्याला कंजूषपणानं वागवलं, त्याची ही किंमत आम्ही देतों आहोंत."

खरी गोष्ट अशी आहे कीं, आम्हीं सैन्य ठेवलें, परंतु तें सैन्यासारखें ठेवलें नाहीं. त्याच्या गरजा काय आहेत, त्याला जास्तींत जास्त निश्चितता व सुखसोयी कशा पुरवितां येतील याची काळजी आपण घेतली नाहीं. पारतंत्र्याच्या काळांत सैनिकाला जेवढी प्रतिष्ठा होती, तेवढीहि स्वातंत्र्यामध्यें राहिली नाहीं, अशी तक्रार अनेकजणांकडून ऐकावयास मिळते. सैन्यासाठीं पैसा खर्च करणें म्हणजे आपल्या गांधीवादाला बट्टा लावून घेणें होय, अशी तर आमच्या तथाकथित गांधीवादी अर्थमंत्र्यांची समजूत नाहीं ना ? त्यांच्या आशीर्वादानें लक्षाधीशांचे कोट्याधीश बनत आहेत, शिक्षण व संस्कृतीचा गंध नसलेले मंत्री बनून खोऱ्यानें पैसा ओढीत आहेत, जेथें दहा मंत्र्यांवर उत्तम प्रकारें भागूं शकतें तेथें चाळीस मंत्र्यांची वर्णी लावून जनतेच्या पैशाचा चुराडा केला जात आहे, आणि हें सारें गांधीजींच्या आशीर्वादानें चाललें आहे असा आभास निर्माण केला जात आहे. परंतु देशाच्या स्वातंत्र्यासाठीं प्राणांवर उदार होऊन लढणाऱ्या सैनिकांना काळे चष्मे (गॉगल्स) न मिळाल्यामुळें डोळे अधू करून घ्यावे लागत आहेत व पुरेसे गरम कपडे

नसल्यामुळें शरीराचे अवयव बधिर होऊं द्यावे लागत आहेत, हें दृश्य कोणत्याहि स्वाभिमानी राष्ट्राला शोभणारें नाहीं, एवढें खास. असो.

पहिल्या फेरींत आपला दणदणीत पराभव झाला असला तरी आम्ही हरलों नाहीं, आमचीं मनें अजून खंबीर आहेत, अखेर जय आमचाच होणार आहे, कारण सत्य आमच्या बाजूला आहे, अशी आमची श्रद्धा आहे. परंतु केवळ सत्य आपल्या बाजूला असल्यानेंच आपण विजयी होऊं शकणार नाहीं. विजयासाठीं आपल्याला कसून तयारी करावी लागेल. थंडी संपल्यावर कदाचित् पावसाळा सुरू होईल आणि मग आम्ही थंडीसाठीं तयारी केली होती, पावसाची आम्हांला कल्पना नव्हती, असें म्हणण्याचा प्रसंग आपल्यावर येईल. तो येऊं नये, एवढीच सर्वसामान्य भारतीयांची इच्छा. या पहिल्या पराभवाच्या वेळीं ज्या सबबी आम्हीं पुढें केल्या त्या पुनः पुढें कराव्या लागूं नयेत असेंच कोणीहि म्हणेल. कुरापत काढणाऱ्याला आम्ही ठणकावून जाब विचारला किंवा दोन दणके देऊन मागें सारलें तर त्यामुळें जागतिक युद्ध पेटेल ही भाबडी भीति आतां आपण सोडून दिली पाहिजे. जागतिक युद्ध पेटावयाचेंच असेल तर पेटूं द्या, त्यांत जगाबरोबर आमचें जें कांहीं व्हावयाचें असेल तें होवो; पण जागतिक युद्धाच्या व विनाशाच्या काल्पनिक भीतीमुळें आम्ही आमच्या स्वाभिमानाला मरूं देणार नाहीं, शांतताभंग होईल म्हणून आक्रमण सहन करण्याचा गुन्हा यापुढें आम्ही करणार नाहीं, हें जगाच्या निदर्शनाला आणून देण्याची संधि लवकरच येणार अशीं चिन्हें दिसत आहेत. आपली खरी सत्त्वपरीक्षा त्याच वेळीं होईल !

४

गांधीवाद्यांचा गांधीवाद

दोन गांधीवादांतील फरक :

गांधीजींचा गांधीवाद आणि गांधीवाद्यांचा गांधीवाद असा फरक आम्हीं जाणीवपूर्वक केलेला आहे. त्याचें कारण असें कीं, गांधीजींचा गांधीवाद हा सतत विकसनशील होता, त्यांत सुधारणा करण्यास, भर घालण्यास वाव होता. आपल्या चुकांना 'हिमालया'-एवढें बनवून त्याबद्दल दिलगिरी प्रदर्शित करण्यास व आपल्या विचारांत बदल करण्यास गांधीजी सदैव तयार असत. त्यांचा मोठेपणा, त्यांचें माहात्म्य यांतच होतें. त्यामुळें आजच्या परिस्थितींत गांधीजी असते तर त्यांनीं कोणता मार्ग अवलंबिला असता, देशाला कोणता सल्ला दिला असता हें सांगणें सोपें नाहीं. १९४२ सालीं जपानी आक्रमणाच्या छाया भारतावर पडल्या असतां आक्रमकांशीं असहकार करून अहिंसक मार्गानें युद्धाचा मुकाबला करण्याचा सल्ला ज्यांनीं जनतेला दिला त्यांनींच १९४७ सालीं स्वातंत्र्यप्राप्तीनंतर टोळीवाल्यांना पुढें करून काश्मीरवर हल्ला करणाऱ्या पाकिस्तानला काश्मीरांतून हुसकून लावण्यासाठीं गेलेल्या भारतीय सैन्याला आशीर्वाद दिला, पाकिस्तानी आक्रमकांसमोर आपली अहिंसक शांतिसेना उभी करण्याचा विचारहि मांडला नाहीं, हा फरक लक्षांत घेतां भारताचें लोकशाही अस्तित्व जगाच्या नकाशावरून पुसून त्याला लाल बनवून टाकण्यासाठीं चीननें त्याच्या-वर स्वारी केली असतां गांधीजींनीं कोणता मार्ग प्रतिपादिला असता हें निश्चितपणें सांगणें कठिण आहे. अर्थात् गांधी हा हाडाचा शूर होता, भ्याड-

पणाचा त्याला तिटकारा होता, ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट व अनेक घटनांनीं सिद्ध झालेली असल्यामुळें गांधींचा मार्ग हा शूरपणाचा, निर्भयपणाचा व दुष्मनाला केवळ थोपविण्यावरच समाधान न मानतां त्याला सीमेपार हुसकून लावण्याचाच राहिला असता, याविषयीं आम्हांला मुळींच शंका वाटत नाहीं. 'गांधीजींचा गांधीवाद' या प्रकरणांत या विषयाचें साधार व सांगोपांग विवेचन केलेलें असल्यामुळें त्याची येथें पुनरुक्ति करण्याची आवश्यकता नाहीं.

गांधीवाद्यांचा गांधीवाद हा मुख्यत: शब्दप्रामाण्यावर आधारलेला असणार हें उघड आहे. गांधीजींनीं सत्य, अहिंसा, वगैरेसंबंधीं वेळोवेळीं जे विचार व्यक्त केले ते जणूं मौलवींनीं दिलेले फतवेच आहेत अशा श्रद्धेनें व निष्ठेनें गांधीजींच्या उक्तींचा विचार व वापर करणारे गांधीवादी वेदप्रामाण्यवादी आर्यसमाजी किंवा चातुर्वर्ण्य मानणारे सनातनी यांच्याहून कांहीं विशेष वेगळे असतील असें समजण्याचें कारण नाहीं. परंतु परका माणूस जेव्हां हिंदुधर्मासंबंधीं विचार करतो तेव्हां तो जातपात मानणाऱ्या, सामाजिक-आर्थिक विषमतेवर आधारलेल्या प्रचलित हिंदु समाजव्यवस्थेचें निरीक्षण करूनच आपलें मत बनवितो त्याप्रमाणें सर्वसामान्य माणूस गांधीवादाविषयीं मत बनवितांना आज स्वत:ला गांधीवादी म्हणवून घेणाऱ्या व्यक्तींचीं जीवनें व विचार यांचाच आधार घेतो व तें स्वाभाविकच आहे, असें म्हणावें लागेल. म्हणून आम्हीं या दोन प्रकारच्या गांधीवादांचा वेगवेगळा विचार केला आहे.

गांधींचा जनसंपर्क :

गांधीजींच्या बाबतींत एक गोष्ट आपण लक्षांत ठेवली पाहिजे कीं, त्यांनीं भारतीय जनतेशीं अत्यंत जवळचा व जिव्हाळ्याचा संपर्क प्रस्थापित केला होता. त्या जनतेचें मन त्यांना जेवढें कळलें तेवढें फार थोड्या नेत्यांना कळूं शकलें; आणि म्हणूनच ते भारताच्या कोटि कोटि जनतेला आपल्याबरोबर नेऊं शकले. गांधीवाद्यांच्या बाबतींत असें म्हणतां येत नाहीं. भारतीय जनतेचें मन जाणून घेण्यास ते असमर्थ ठरले आहेत, असें अनेक प्रसंगांवरून दाखवून देतां येईल. उदाहरणादाखल आपण स्वातंत्र्योत्तर काळांतील भाषावार प्रांतरचनेची चळवळ घेऊं. ही चळवळ योग्य होती कीं अयोग्य, तिच्यापासून

देशाचें हित झालें कीं अहित, वगैरे गोष्टी विवादास्पद असूं शकतील. परंतु या चळवळीच्या प्रसंगीं गांधीवादी मंडळी जनतेचा पक्ष सोडून राज्यकर्त्यांच्या बाजूनें उभी राहिली, हें दृश्यच गांधीवाद्यांच्या गांधीवादाचा पराभव सूचित करणारें होतें. संयुक्त महाराष्ट्राचें महाभारत चालू असतां तो प्रश्न जनतेच्या जिव्हाळ्याचा, किंबहुना जिव्हारीं लागलेला आहे, हें गांधीवाद्यांना ओळखतां आलें नाहीं. गांधीजींनीं जन्मभर अन्यायाचा प्रतिकार केला, अन्यायपीडितांची बाजू घेतली, परंतु गांधीवाद्यांना मात्र अन्यायपीडितांची बाजू घेण्याचें धैर्य झालें नाहीं. श्री ढेबरभाई किंवा श्री मोरारजी देसाई यांच्यासारखे सत्ताधारी गांधीवादी आणि आचार्य विनोबा भावे, आचार्य काकासाहेब कालेलकर, गांधीनिधीचे श्री रंगराव दिवाकर वगैरे राजसत्तेच्या बाहेर असणाऱ्या गांधीवाद्यांनीं आपापल्या परीनीं त्या अन्यायाला हातभारच लावला, अशी जनतेची समजूत झाली. आजहि कर्नाटकांतील ज्या मराठी भाषिकांना त्यांच्या इच्छेविरुद्ध म्हैसूरमध्यें डांबून ठेवण्यांत आलें आहे, ते आपल्या सुटकेसाठीं धडपड करीत असतां एकजात सारे गांधीवादी उघड उघड दिसणारा तो अन्याय निमूटपणें पाहत आहेत. ज्या वेळीं तो अन्याय अगदीं असह्य झाल्यामुळें त्या भागांत असंतोषाचा भडका उडेल त्या वेळीं ही मंडळी जागी होतील आणि सरकारी शस्त्रास्त्रांनीं जनतेला दडपून टाकल्यानंतर तेथें शांतता प्रस्थापित करण्यासाठीं शांतिसैनिक म्हणून जाऊन पोंचतील. गांधीजी हयात असते तर अशा प्रकारच्या अन्यायांना तोंड देणाऱ्या जनतेच्या साह्याला ते धांवून गेले असते, अशीच आजहि सर्वसामान्य माणसाची भावना आहे.

हा फरक पडण्याचें एक कारण असें कीं, गांधीजी कोणतीहि गोष्ट क्षुल्लक समजत नसत. कोणताहि अन्याय ते क्षम्य समजत नसत – मग तो व्यक्तीवर झालेला असो, समाजावर झालेला असो कीं प्रांतावर झालेला असो. याच्या उलट गांधीवाद्यांनीं कांहीं गोष्टी श्रेष्ठ, महत्त्वाच्या व मूलभूत मानलेल्या आहेत. विधायक कार्यक्रम (खादी, ग्रामोद्योग, हरिजनसेवा वगैरे), भूदान, ग्रामदान, गांधी-विचार-प्रचार वगैरे वेगवेगळीं कामें घेऊन बसलेल्या गांधीवाद्यांना आपापलेंच काम मूलभूत वाटतें आणि मग साहजिकच इतर आवश्यक गोष्टींकडे, जनतेवरील अन्यायांकडे त्यांचें दुर्लक्ष होतें. आपण हातीं घेतलेल्या कामाच्या द्वारेंच सारे प्रश्न चुटकीसरशीं सुटतील, असा त्यांचा दावा असतो.

त्यामुळें भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न असो कीं आसाममध्यें बेकायदेशीरपणें घुसलेल्या मुसलमानांचा प्रश्न असो, तो ग्रामदानानेंच सुटेल असें आचार्य विनोबा भावें आत्मविश्वासपूर्वक सांगतात, तर शांतिसेना हाच बहात्तर रोगां-वरील एकमेव उपाय असल्याचें आचार्य काकासाहेब कालेलकर आश्वासन देतात. तटस्थपणें पाहणाऱ्याला मात्र हे दोन्ही उपाय काल्पनिक जगांतलेच असल्याचें दिसून येतें. आसाममध्यें शेंकडों ग्रामदानें झालीं असलीं तरी पाकिस्तानी मुसलमानांचें अतिक्रमण थांबलेलें नाहीं; अथवा देशांतील अंतर्गत अन्यायांना तोंड देण्याच्या बाबतींत कोणी शांतिसैनिक पुढें आलेला नाहीं. त्यामुळें अन्यायांना वाचा फोडून जनतेच्या संघटित बळावरच अन्याय दूर करवून घेणारे अशांति सैनिकच जनतेंत अधिकाधिक लोकप्रिय होत आहेत.

सर्व सेवा संघाची भूमिका :

गांधीजींच्या महानिर्वाणानंतर देशांतील बहुतेक सर्व महत्त्वाचे गांधीवादी पुढारी व कार्यकर्ते १९४८ सालीं सेवाग्रामला जमले होते. तेथें गांधी-विचारा-प्रमाणें सर्वांनीं सहकार्यानें काम करावयाचा निर्णय घेतला व सर्वोदय समाज या नांवाची एक संघटना तेथें तयार करण्यांत आली. नेहमींच्या संघटनांप्रमाणें ती कायदेकानू व नियम यांनीं बांधलेली कडक संस्था नसून एक प्रकारची बंधुत्वभावना (भाईचारा) निर्माण करणारी संस्था आहे. ' गांधीवाद ' हा शब्द सोडून त्याऐवजीं ' सर्वोदय ' हा गांधीजींनींच सुचविलेला व वापरलेला शब्द तेव्हांपासून विशेष प्रचारांत आणला गेला ; आणि आचार्य विनोबा भावे हे या सर्वोदय विचाराचे प्रवक्ते मानले गेले. भूदानाचा प्रचार करण्या-साठीं विनोबांनीं सबंध देशभर पदयात्रा सुरू केली. त्यामुळें ते जेथें असतील तेथें या सर्वोदय समाजाचें वार्षिक सम्मेलन भरविलें जाऊं लागलें. मौलाना आझाद, राष्ट्रपति डॉक्टर राजेन्द्रप्रसाद, पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू, श्री चक्रवर्ती राजगोपालाचार्य वगैरे वरिष्ठ भारतीय नेते या सम्मेलनांना हजर राहत असत; यावरून त्यांचें महत्त्व लक्षांत यावें. परंतु सर्वोदय समाज ही एक सैलशी (loose) संघटना आहे. तिनें विचार–प्रसाराव्यतिरिक्त इतर कांहीं भरीव काम करावें, अशी अपेक्षाहि नाहीं. म्हणून गांधीविचाराप्रमाणें भरीव काम करणाऱ्या अखिल भारतीय चरखा संघ, ग्रामोद्योग संघ, मूलोद्योग

शिक्षण संघ (हिंदुस्तानी तालीमी संघ), हिंदुस्तानी प्रचार सभा, वगैरे विधायक कार्याच्या संस्थांचा एक संघ (federation) दैनंदिन कामें चालविण्यासाठीं बनविण्यांत आला. त्याचें नांव 'सर्व सेवा संघ'. या सर्व सेवा संघाचें मत म्हणजे भारतांतील गांधीवाद्यांचें प्रातिनिधिक मत, असें समजलें जातें. म्हणून भारत-चीन संघर्षाच्या बाबतींत सर्व सेवा संघानें प्रसिद्ध केलेलें निवेदन हें आपण प्रथम पाहिलें पाहिजे. बंगाल प्रदेशांतील पश्चिम दिनाजपूर जिल्ह्यांत पिपला या गांवीं आचार्य विनोबा भावे यांच्या सान्निध्यांत ता. १० ते १३ नोव्हेंबर-पर्यंत सर्व सेवा संघाच्या प्रबंध समितीची (व्यवस्थापिका समितीची) बैठक झाली. या बैठकीच्या शेवटीं चीन-भारत संघर्षाविषयीं प्रबंध समितीनें खालीं दिलेलें निवेदन स्वीकृत केलें :–

"भारत-चीन संघर्षानें जगासमोर एक गंभीर समस्या उभी केली आहे. विश्वशांति आणि जय जगत्‌ची भावना यांवर श्रद्धा असणाऱ्या व्यक्तींच्या दृष्टीनें तर ही परिस्थिति कसोटीचीच आहे. हा संघर्ष भारतावर चीनकडून लादण्यांत आला आहे, असें आम्ही मानतों. कारण भारत हा नेहमींच शांतता-पूर्ण उपायांनीं आपला सीमावाद सोडविण्याचा प्रयत्न करीत आला आहे. ज्या वेळीं एक पक्ष शांततेच्या व कायदेशीर मार्गांनीं एखादा प्रश्न सोडविण्यास तयार असेल त्या वेळीं दुसऱ्या पक्षानें शस्त्राच्या जोरावर तो प्रश्न सोडविण्याचा अथवा आपला निर्णय दुसऱ्यावर लादण्याचा प्रयत्न करणें म्हणजे तें आक्रमणच होय. म्हणून युद्धांत सहभागी न होण्याच्या आमच्या मूलभूत तत्त्वावर आम्ही अढळ राहणार असलों तरी आमची सहानुभूति भारताकडे आहे. आजच्या संकटकालीन परिस्थितींत भारत आपली निर्वैर वृत्ति कायम ठेवील अशी आम्ही आशा करतों ; कारण परिस्थितिवशात् एखाद्या वेळीं लढाईनें लढाई बंद होऊंहि शकेल, परंतु वैरानें वैर मात्र कधींच शमत नसतें.

"निर्वैर वृत्तीचें लक्षण असें कीं, वाटाघाटी, मध्यस्थी (arbitration) वगैरेसाठीं आपलीं दारें सदैव उघडीं असलीं पाहिजेत. दोन्ही देशांची प्रतिष्ठा सुरक्षित ठेवून निर्णय घेण्याची आपली तयारी असली पाहिजे. संघर्षाची परिस्थिति (युद्धजन्य स्थिति) असली तरीहि दोन्ही देशांच्या जनतेंत द्वेष असतां कामा नये ; आणि देशामध्यें युद्ध-ज्वर निर्माण होतां कामा नये.

" या प्रसंगाचें गांभीर्य व आमच्या शक्तीची मर्यादा लक्षांत घेऊन अहिंसा व शांतता यांवरील आमची निष्ठा अढळ असल्याचें आम्ही पुनः जाहीर करूं इच्छितों. शस्त्रांमुळें कोणाचेंहि कल्याण होत नाहीं आणि युद्धानें – विशेषतः या अणुयुगांतील युद्धानें – कोणताहि प्रश्न सुटूं शकत नाहीं. म्हणून अहिंसेवर श्रद्धा असणारी कोणतीहि व्यक्ति अथवा शांतिसैनिक युद्धांत सामील होणार नाहीं. लवकरांत लवकर युद्धाचा शेवट व्हावा, यासाठीं अविरतपणें प्रयत्न करीत राहणें हें त्याचें परम कर्तव्य असेल. युद्ध ताबडतोब थांबणें हें केवळ भारताच्याच नव्हे तर चीनच्या व साऱ्या मानवजातीच्या हिताच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यक आहे. याच व्यापक भूमिकेवरून या दिशेनें आपले प्रयत्न झाले पाहिजेत.

" म्हणून चीनलाहि आमचें आग्रहपूर्वक सांगणें आहे कीं, त्यानें युद्ध ताबडतोब थांबविण्याच्या दृष्टीनें सारे संभाव्य शांततापूर्ण उपाय शोधावेत आणि ते अमलांत आणावेत. चीनमधील सर्व शांतिनिष्ठ लोकहि युद्ध अनर्थकारक असतें हें ओळखून या प्रयत्नांमध्यें पुढाकार घेतील, असा विश्वास आम्हांला वाटतो.

" या संदर्भामध्यें आपल्याला हें मान्य करावें लागेल कीं, ही समस्या सोडविण्यासाठीं आवश्यक असलेली अहिंसक शक्ति आज देशांत विकसित झालेली नाहीं. परंतु त्यांत निराश होण्याचें कांहीं कारण नाहीं. या आपत्तीच्या प्रसंगांतूनच भारतीय जनतेंत अहिंसेची अमोघ शक्ति प्रकट होईल, अशी शक्यता आहे. देशाच्या रक्षणासाठीं आज जनतेमध्यें त्यागाची व बलिदानाची जी अपूर्व भावना जागृत झाली आहे तिच्यांतून पुढें वीरांची अहिंसा विकसित करतां येईल अशी आमची श्रद्धा आहे. म्हणून अहिंसेवर विश्वास असणाऱ्या कोणाहि व्यक्तीनें या संकटकाळीं निष्क्रिय राहतां कामा नये; एवढेंच नव्हे तर देशाचें अहिंसक सामर्थ्य वाढविण्याच्या कामीं आपली सारी शक्ति वापरली पाहिजे. अहिंसक प्रतिकार हा एखाद्या विशिष्ट पक्षाच्या विजयासाठीं नसून तो सत्य आणि बंधुत्व यांच्या प्रस्थापनेसाठींच असूं शकतो. म्हणून अहिंसक प्रतिकार हा नेहमीं संघर्षाच्या भूमिकेहून अधिक वरच्या पातळीवरूनच केला जात असतो.

" अहिंसक प्रतिकाराचा विचार येतांच युद्धक्षेत्रावर जाऊन आक्रमकाचा मुकाबला करण्याची कल्पना उभी राहते. आज देशांतील कित्येक शांति-सैनिकांनीं अशा प्रकारच्या कार्यक्रमासाठीं आपले प्राणहि समर्पित करण्याची उत्कटता व्यक्त केली आहे, ही आनंदाची व अभिनंदनीय अशी गोष्ट आहे. आजच्या परिस्थितींत हा कार्यक्रम व्यवहार्य नाहीं, म्हणून आत्मबलिदानास तयार असलेल्यांची शक्ति देशाचें अहिंसक सामर्थ्य वाढविण्याच्या कामीं लागेल अशी आम्ही आशा करतों.

" अशा स्थितींत भारताच्या सरहद्दीवरील जनतेंत अहिंसक प्रतिकाराचें सामर्थ्य निर्माण करणें हें आपलें एक महत्त्वाचें काम राहील. त्या प्रदेशांत जेथें अनुकूलता असेल तेथें शांतिसैनिक खेड्यापाड्यांतील लोकांना ग्राम-स्वावलंबन आणि आक्रमकाशीं असहकार करण्याची प्रेरणा देईल. जरूर पडल्यास या प्रयत्नामध्यें आपले प्राणहि अर्पण करण्यास शांतिसैनिक तयार राहील व इतर लोकांनाहि तसें करण्यास प्रोत्साहन देईल.

" परंतु तितकाच महत्त्वपूर्ण व त्याहूनहि अधिक व्यापक कार्यक्रम म्हणजे देशाची शक्ति वाढविणें हा होय. राष्ट्रीय ऐक्य व जनतेचें मनोधैर्य (मोराल) हें देशाचें सर्वांत मोठें संरक्षण होय. त्यासाठीं राष्ट्राचा आर्थिक व सामाजिक पाया, न्यायाच्या व समतेच्या नवीन मूल्यांची स्थापना करून, मजबूत बनविला पाहिजे. सुदैवानें या दिशेनें अहिंसेनें थोडीफार प्रगति केलेली आहे. ग्रामस्वराज्य आंदोलनानें देशासमोर जो कार्यक्रम ठेवला आहे त्यांत मानवी मूल्यें, वैज्ञानिकता व संरक्षण यांची त्रिविध शक्ति निहित आहे. आजच्या परिस्थितींत खेडोंपाडीं ग्रामपंचायतींच्या द्वारें संरक्षणाचा कार्यक्रम म्हणून असा दृढ संकल्प करण्यांत आला पाहिजे कीं, आमच्या गांवांत कोणीहि बेकार व निराश्रित राहणार नाहीं, भूमिहीनांना यथासंभव भूदान देऊन त्यांना ग्रामपरिवारांत सामील करून घेतलें जाईल, उत्पादनाच्या प्रत्येक साधनाचा योग्य उपयोग केला जाईल, कोणत्याहि प्रकारचा सामजिक अथवा आर्थिक जुलूम होणार नाहीं, गांवांतील भांडणें गांवांतच मिटविलीं जातील, धार्मिक व इतर अल्पसंख्यकांना संरक्षण मिळेल आणि गांवाचें रक्षण खुद्द गांवचे लोक करतील. याचप्रमाणें शहरांमध्येंहि तेथील परिस्थित्यनुसार काम केलें गेलें पाहिजे.

" या महान् कार्याच्या पूर्ततेसाठीं देशाची सारी अहिंसक शक्ति एकत्रित व संयोजित करण्यांत आली पाहिजे हें सांगावयास नकोच. संकटाच्या व कसोटीच्या या प्रसंगीं विश्वमैत्रीची भावना अभंग ठेवून राष्ट्रीय एकात्मता निर्माण करणें व अहिंसक प्रतिकाराची क्षमता वाढविणें या द्विविध कार्यांत सहकार्य देण्यासाठीं अहिंसेवर विश्वास असणाऱ्या, देशांतील सर्व संस्था, प्रवृत्ती व व्यक्ती यांनीं पुढें यावें असें त्यांना आवाहन आहे.

" आज जगामध्यें असे अनेक मनीषी, संस्था व समुदाय आहेत कीं, ज्यांनीं प्रतिकूल परिस्थितींतहि आपल्या वाणीच्या व कृतीच्या द्वारें मोठ्या शौर्यानें शांततेचें प्रतिपादन केलें आहे, ही मोठी भाग्याची गोष्ट आहे. अशा साऱ्या व्यक्ती, संस्था, समुद्राय व अखिल मानवतेचा अंतरात्मा यांना या कसोटीच्या क्षणीं आम्ही आवाहन करतों आणि हा संघर्ष त्वरित समाप्त करविण्यासाठीं ते आपली संपूर्ण शक्ति ताबडतोब कामीं लावतील असा विश्वास बाळगतों. "

[' भूदान-यज्ञ ' (हिंदी) : २३-११-१९६२]

सर्व सेवा संघाच्या अधिवेशनांतील चर्चा :

वरील निवेदन ता. १९ ते २३ नोव्हेंबर (१९६२) पर्यंत वेडछी (गुजरात) येथें भरलेल्या सर्व सेवा संघाच्या अधिवेशनामध्यें सभासदांच्या विचारार्थ मांडण्यांत आलें व त्यावर खूप साधक-बाधक चर्चा झाली. या चर्चेचा मागोवा घेतल्यास गांधीवादी मंडळींच्या विचारसरणीची कल्पना येऊं शकेल. म्हणून या चर्चेंतील महत्त्वाचा भाग येथें उद्धृत करण्यांत येत आहे.

हें निवेदन श्री जयप्रकाश नारायण यांनीं अधिवेशनासमोर मांडलें त्या वेळीं त्यांनीं केलेलें भाषण गांधीवादी विचारकांमधील मतभिन्नतेवर चांगला प्रकाश पाडतें. ते म्हणाले,

" आपल्यासमोर विचारार्थ असलेलें निवेदन हें एका समुदायाचें (एक जमात का) निवेदन आहे; तें एखाद्या विशिष्ट व्यक्तीचें नाहीं. या बाबतींत बाबांना (विनोबांना) कांहीं सांगावयाचें असेल तर ते त्यांच्या पद्धतीनें सांगतील, शंकरराव देवांना बोलावयाचें असेल तर त्यांची पद्धत दुसरी असेल, दादा धर्माधिकारी किंवा नवकृष्ण चौधरी यांना विचार मांडावयाचे असतील तर त्यांची शैली वेगळी असेल. माझी पद्धत वेगळी असेल. परंतु आम्हीं सर्वांनीं

मिळून हें निवेदन तयार केलें आहे. त्यांत बाबा (विनोबा) हि सामील होते. आम्ही सर्वांनीं एकमतानें या निवेदनाला मान्यता दिलेली आहे......

" आज जी परिस्थिति निर्माण झालेली आहे तिच्या बाबतींतील जबाबदारी आम्हां सर्व सेवा संघवाल्यांवरहि कांहीं कमी नाहीं. भूदान, ग्रामदान ग्रामस्वराज्य वगैरेचा कार्यक्रम आम्हीं वेगानें व तीव्रतेनें अमलांत आणला नाहीं, एवढ्याच अर्थानें ती जबाबदारी आमच्यावर येऊन पडते असें नाहीं, तर सर्व सेवा संघानें आपली शक्ति फार परिमित आहे असें मानलें आणि देशाची बदलत असलेली राजकीय परिस्थिति व निर्माण होत असलेली आंतरराष्ट्रीय परिस्थिति यांच्याकडे सर्व सेवा संघानें कधीं लक्ष दिलें नाहीं, या दृष्टीनेंहि त्याच्यावर ही जबाबदारी येते.

" आज आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठीं अहिंसक शक्ती संघटित झालेल्या नाहींत. शांतिसेनेचें काम ज्या पद्धतीनें चालू आहे तिच्यांत कांहीं फेरफार केले पाहिजेत असें मला वाटत होतें. त्याप्रमाणें कांहीं फेरबदल आतां करण्यांत येत आहेत, परंतु आतां फार उशीर झाला आहे. शांतिसेनेचें प्रतिज्ञापत्र कांहींसें सोपें (हलकें) असतें, अटी थोड्या सैल असत्या तर मी शांतिसेनेचा 'रिक्रूटिंग ऑफिसर' बनून, सबंध देशभर हिंडून लोकांना शांतिसेनेंत दाखल होण्यास सांगितलें असतें. परंतु आतां तशी परिस्थिति राहिलेली नाहीं. या वेळीं आपण काय केलें पाहिजे ? आम्हीं भूदान-ग्रामदान-ग्रामस्वराज्याचें काम अधिक केलें असतें, शांतिसेनेंत लाखों सैनिक असते, लोक-मानसामध्यें परिवर्तन घडून आलें असतें, चीनच्या लोकांशीं परिचय झाला असता तर आमची एक नैतिक शक्ति निर्माण झाली असती परंतु आज मात्र तशी परिस्थिति नाहीं.......

" आतां आपल्याला सरहद्दीवरील कांहीं प्रदेशांत जाऊन तेथील लोकांचें मनोधैर्य वाढविण्याचें काम करितां येईल. लोकांमध्यें निर्भयता व ऐक्य स्थापन करितां येईल. आक्रमणाला भिऊन त्यांनीं पळून जाऊं नये, त्यांच्याशीं असहकार करावा, जशी परिस्थिति असेल तसें तिला तोंड द्यावें, हें आपण लोकांना समजावून सांगू शकतों. सबंध देशांत शांतता राहावी, बजबजपुरी माजू नये आणि चिनी नागरिक व कम्युनिस्ट यांच्याशीं लोकांनीं सभ्यपणानें वागावें, वगैरे गोष्टींकडे आपल्याला लक्ष देतां येईल. या सर्व गोष्टींचा युद्धाशीं पुष्कळ

सम्बन्ध आहे. हें आपल्याला करितां येईल. भूदान-ग्रामदान व शांतिसेना हीं कामें तर आजच्या परिस्थितींत अधिकच निकडीचीं आहेत."

या निवेदनावर अनेक गांधीवाद्यांनीं वेगवेगळे आक्षेप घेतले व आपापल्या दुरुस्त्या सुचविल्या. बुद्धिवादी नास्तिक प्रा. गोरा म्हणाले, "या निवेदनांतील 'आजच्या परिस्थितींत शांति सैनिकांनी रणक्षेत्रावर जाऊन आक्रमकाचा मुकाबला करणें व्यवहार्य नाहीं,' हें वाक्य बरोबर नाहीं. त्याऐवजीं या कार्य-क्रमावर गंभीरपणें विचार करण्याची जरूर आहे, असें आपण म्हणूं शकतों. त्यायोगें शांतिसेनेला आघाडीवर जाण्याचा दरवाजा बंद होणार नाहीं...... आज आपल्या देशांत विषमतेची जी हिंसा चालू आहे ती या चिनी आक्रमणा-पेक्षांहि जास्त वाईट आहे. तिच्याकडेहि आपण लक्ष दिलें पाहिजे. देशांतील पक्षभेदहि कमी झाले पाहिजेत. सरकारच्या समर्थनार्थहि वेगवेगळ्या पक्षांच्या वेगवेगळ्या मिरवणुका निघत आहेत. हें सारें बंद झालें पाहिजे. मला असें वाटतें कीं आपण पुनः सेवाग्रामहून पदयात्रा काढावी आणि लोकांना आपला कार्यक्रम समजावून द्यावा. लोकांनीं आम्हाला धोकेबाज म्हटलें तरी हरकत नाहीं, परंतु आपण माणुसकीशीं धोकेबाजी करूं नये."

हिंदीचे सुप्रसिद्ध कादंबरीकार व विचारक श्री जैनेन्द्र कुमार यांनीं आपलें असें मत मांडलें कीं, "हिंसा व अहिंसा यांची चर्चा पुष्कळ दिवसांपासून चालत आलेली आहे. हिंसेचा निषेध सर्वत्र केला जातो, परंतु ज्यावेळीं एखादें राष्ट्र आपल्या संरक्षणासाठीं संघटित हिंसा करतें तेव्हां तिचा निषेध करावा कीं करूं नये, हा खरा प्रश्न आहे. सर्वोदयवादी किंवा अहिंसावादी लोकांची भूमिका अधिक तात्त्विक होत गेली आहे, आणि राजनैतिक हाल-चालींकडे तिनें पाठ फिरविली आहे, हें जयप्रकाशजींचें म्हणणें बरोबर आहे. अहिंसक शक्ति व पराक्रम या गोष्टी कांहीं तात्कालिक किंवा अमुक आघाडी-वरच असूं शकतात असें नव्हे. त्या मृत्यूच्या क्षणींच उभ्या राहातात असें नसून जीवनाच्या प्रत्येक् क्षणीं त्यांचें अस्तित्व असतें. आपण राजकीय प्रश्नां-पासून दूर राहातां कामां नयें. आमच्या अहिंसेंत कांहींतरी उणीव राहून गेली असली पाहिजे; म्हणूनच आपण आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत मित्रहीन व राष्ट्रीय क्षेत्रांत दुबळे बनलों आहोंत. आमची अहिंसा मोडकीतोडकी नसती तर चीनचें हें आक्रमणच झालें नसतें, असें मला वाटतें."

राजस्थानचे एकेकाळचे मंत्री व थोर समाजसेवक श्री गोकुळभाई भट्ट यांनीं भारत सरकारच्या भूमिकेला संपूर्णपणें पाठिंबा दिला. ते म्हणाले, "आज जें युद्ध सुरू झालें आहे त्यांत भारताची भूमिका न्यायाची आहे. भारत हा विस्तारवादी देश नाहीं. शांतता व निर्वैरता यांच्या साह्यानें अन्यायाला तोंड देण्यासाठीं भारत लढत आहे. म्हणून आपण दबकत-दबकत नव्हे तर खुल्या मनानें भारताविषयीं सहानुभूति व्यक्त केली पाहिजे. तशी ती या निवेदनांत दिसत नाहीं, ही या निवेदनांतील उणीव आहे, असें मला वाटतें. वस्तुतः आपण युद्धविरोधी आहोंत असें सर्व सेवा संघानें कधीं जाहीर केलेलें नाहीं; आणि जरी तो युद्धविरोधी असला तरी कोणत्या प्रकारच्या युद्धाला त्याचा विरोध आहे? खरी दुःखाची गोष्ट अशी आहे कीं आपण निष्क्रियपणें बसलों आहोंत. आपण सेनापतीचा हुकूम मानला पाहिजे, हें खरें परंतु आम्ही मंडळींनीं आमच्या सेनापतीला (विनोबांना) असें सांगितलें पाहिजे कीं, तुम्ही या बाबतींत आणखी थोडा विचार करा. बंदूक चालविणारे सैनिक हीं माणसें नसून यंत्रें आहेत, असें मी मानीत नाहीं. विनोबांनीं आम्हांला आघाडीवर जाण्याची आज्ञा दिली आणि तेथें आमच्यापैकीं दोन-चार हजार माणसें मारलीं गेलीं, तरी त्यामुळें कांहीं नुकसान होणार नाहीं, उलट आमच्या देशाचें नांव उज्ज्वल होईल."

गांधीवाद्यांमध्यें गोकुळभाईंसारखे सरकार-प्रेमी, उजवे (rightist) कार्यकर्ते जसे आहेत, तसेच सरकारशीं उभा दावा असणारे प्रा. गोरा, प्रा. ठाकुरदास बंग, श्री वसंत नारगोलकर यांच्यासारखे कट्टर डावेहि आहेत. गांधीजींनीं सांगितलेले सिद्धान्त प्रमाण मानून ते शब्दशः आचरणांत आणण्याची त्यांची धडपड असते. त्यांत पाणी मिसळलेलें त्यांना आवडत नाहीं. त्यामुळें ही मंडळी सर्वसामान्यांना अव्यवहारी वाटत असल्यास आश्चर्य नाहीं. तरुण कार्यकर्त्यांवर या अव्यवहारी पुढाऱ्यांच्या विचारांचा पुष्कळच प्रभाव असणें स्वाभाविक आहे. अर्थात् सरतेशेवटीं 'बाबा (विनोबा) वाक्यम् प्रमाणम्' हीच भूमिका सर्वांची असल्यामुळें या तरुणांच्या विरोधाला फारसा अर्थ उरत नाहीं. तरी पण त्यांचे विचार समजून घेणें बोधप्रद होईल.

प्रा. ठाकुरदास बंग म्हणाले, "आपली भूमिका विवेकपूर्ण युद्धविरोधकाची (डिसक्रिमिनेटिंग वॉररेझिस्टरची) असली पाहिजे. आपण निष्कारणच न्यून

मनोगंडाच्या आहारीं गेलों आहोंत. आजहि शांतिसेनेसाठीं आवाहन केलें गेल्यास लाख-दोन-लाख माणसें सहज मिळूं शकतील. युद्धबंदी व्हावी म्हणून सर्वांत श्रेष्ठ अशीं पंचवीस माणसें आघाडीवर जातील आणि जाण्यापूर्वी भरपूर प्रचार करतील तर त्यांना चिनी सैनिक ठार मारूं शकणार नाहींत. तसा हुकूम पेकिंगहूनच येईल. हीं सर्वोत्तम माणसें मारलीं गेलीं तर युद्धहि थांबेल आणि त्यांच्या बलिदानाचा व्यापक परिणामहि जगावर होईल.

श्री वसंत नारगोलकर यांनीं आपल्या भाषणांत विनोबांच्या वक्तव्याबद्दल आश्चर्य व्यक्त केलें; आणि त्यांतून विनोबांच्या तटस्थ भूमिकेविषयीं शंका निर्माण होते असें सांगितलें. ते पुढें म्हणाले, "जवाहरलालजींच्या विषयीं विनोबांच्या मनांत नुसता 'सॉफ्ट कॉर्नर'च आहे असें नव्हे तर त्यांच्याविषयीं विनोबांना पूर्णपणें सहानुभूति वाटते. हिंसेवर विश्वास असणारी मंडळी त्यांच्या तत्त्वाच्या बाबतींत इमानदार आहेत, परंतु आम्ही अहिंसेच्या बाबतींत किंचित्‌हि विन्मुख बनलों तर ती तत्त्वच्युति होईल. कोणताहि प्रश्न हिंसेनें सुटूं शकत नाहीं. अमेरिका लष्करावर दरसाल चाळीस हजार कोटि रुपये खर्च करते, रशिया वीस हजार कोटि रुपये, इंग्लंड दोन हजार कोटि रुपये, फ्रान्स दीड हजार कोटि रुपये, चीन एक हजार कोटि, भारत चारशें कोटि आणि पाकिस्तान ऐंशी कोटि रुपये खर्च करतो. याचा अर्थ कोणत्या तरी बाहेरच्या देशांकडून साह्य घेतल्याशिवाय आपण कांहीं करूं शकणार नाहीं आणि बाहेरून मदत घ्यावयाची म्हणजे कोणत्या तरी एका पक्षांत आम्हांला सामील व्हावेंच लागेल."

अशा प्रकारें आघाडीवर जाऊन आत्मबलिदान करण्याची आपली तयारी असतांहि केवळ विनोबांनीं अडविल्यामुळें आपण जाऊं शकत नाहीं, असा सूर वक्त्यांच्या भाषणांतून दिसूं लागतांच श्री राधाकृष्ण बजाज यांनीं असा खुलासा केला कीं, "विनोबांशीं नंतर जें बोलणें झालें त्यांत त्यांनीं असें सांगितलें कीं, 'आघाडीवर शांतिसेनेच्या तुकड्या पाठविण्यास माझा पूर्णपणें विरोध आहे, असें नव्हे. १४ हजार शांतिसैनिक आघाडीवर जाण्यास तयार असतील तर शांतिसेनेसाठीं नेफामध्यें एक आघाडी मोकळी ठेवावी, असें आम्ही सरकारला सांगूं शकूं.' परंतु त्याचबरोबर विनोबांनीं असा एक प्रश्न उपस्थित केला कीं, 'याच्या मागें तुमच्याजवळ 'सँक्शन' (सामर्थ्य) काय

आहे ? तुम्हीं एखादें विशिष्ट क्षेत्र निवडून तेथील एकहि भांडण कोर्टांत जात नाहीं, असें सिद्ध करून दाखविलें पाहिजे."

विनोबांचे विशेष शिष्य श्री वल्लभ स्वामी यांनीं अहिंसेंतील भेसळीला विरोध करून सांगितलें, "आपण प्रत्यक्ष युद्धाला मदत करतां कामा नये. कांहीं मंडळी म्हणतात कीं, आमची भूमिका श्रीकृष्णाची असली पाहिजे. आम्ही सारथी बनूं परंतु हातांत शस्त्र धरणार नाहीं. परंतु मला वाटतें, अहिंसा-निष्ठा व युद्ध-प्रचार या दोन गोष्टी परस्परविसंगत आहेत. अहिंसा-निष्ठ व्यक्ति विश्वनागरिक व युद्धविरोधीच असली पाहिजे. म्हणून आपण कोणत्याहि स्थानिक संरक्षण समितींत सहभागी होतां कामा नये अथवा कोणत्याहि सर्वोदय मंडळानें युद्धासाठीं निधि गोळा करितां कामा नये. आघाडीवर जाण्यासंबंधीं येथें चर्चा झाली. हा कार्यक्रम एकदां सुरू केल्या-नंतर जनता तो पुढें चालवील असें त्याचें स्वरूप नाहीं. आघाडीवर शांति-सैनिक म्हणून जाण्याची पात्रता आपल्यांत आहे, हें सिद्ध करण्यासाठीं आपण आपल्या विशिष्ट क्षेत्रांत कोर्ट-मुक्ति व पोलिस-मुक्ति करून दाखविली पाहिजे. भारतांतील चिनी लोक व कम्युनिस्ट यांच्या संरक्षणाची जबाबदारी आपण विशेष प्रयत्नपूर्वक पार पाडली पाहिजे."

युद्धाच्या प्रारंभिक दिवसांत भारतांतील चिनी रहिवासी व भारतीय कम्युनिस्ट यांच्यावर चिडलेल्या जनतेनें किरकोळ हल्ले केले. त्याविरुद्ध स्वतः पंडित जवाहरलाल नेहरूंनींहि आपली नापसंती व्यक्त केली होती, त्यामुळें गांधीवादी मित्रांनीं पुढें होऊन त्यांच्या संरक्षणाचा विचार मांडला तर त्याबद्दल त्यांना कोणी दोष देणार नाहीं. परंतु सर्वसामान्य जनतेच्या मनांत या विषयासंबंधीं एक बारीकशी शंका उत्पन्न होण्याची शक्यता आहे. भारत सरकारनें मुख्यतः चीनच्या वतीनें हेरगिरी करणाऱ्या चिन्यांना व चिनी आक्रमणाचें समर्थ करणाऱ्या साम्यवाद्यांनाच बंदिस्त केलें आहे. त्यांच्या व्यतिरिक्त इतरहि कांहीं चिनी व साम्यवादी मंडळी चीनसाठीं हेरगिरी करीत असल्याचें सामान्य लोकांना आढळलें व त्यांनीं त्यांना त्रास दिला तरी गांधीवादी मंडळी त्या देशद्रोह्यांच्या मदतीला धांवून जाणार काय ? किंवा ही देशद्रोही मंडळी गांधीवाद्यांच्या आड दडून आपला हेरगिरीचा कार्यक्रम राजरोसपणें चालवीत राहतील अशी शक्यता नाहीं काय ? म्हणजे या युद्धांत

गांधीवाद्यांचें सहकार्य तर भारत सरकारला मिळणार नाहींच, उलट भारताच्या शत्रूंनाच संरक्षण देण्याचें 'पुण्यकृत्य' त्यांच्या हातून घडावयाचें ! गांधीवाद्यांच्या व्यावहारिकतेवर लोकांचा विश्वास कां बसत नाहीं, याचें हें एक कारण होय.

आचार्य काकासाहेब कालेलकर यांनीं आपल्या भाषणांत शांतिसेनेचें महत्त्व प्रतिपादिलें. ते म्हणाले, "मीं पुष्कळ दिवसांपूर्वींच पंडित जवाहरलालजींना असें सुचविलें होतें कीं सशस्त्र विभाग आणि निःशस्त्र विभाग असे सैन्याचे दोन विभाग (विंग्ज) करावेत. परंतु त्यांतून कांहीं निष्पन्न झालें नाहीं. अहिंसक समाजाची स्थापना ही प्रारंभींच तंत्रमुक्ति* केल्यानें होऊं शकणार नाहीं. पंचायती राज्याचा कार्यक्रम आपण आपल्या हातीं घेतला पाहिजे. विधायक कार्यक्रमांत क्रांतिकारक भावना राहिली नाहीं तर तो विधवांचा कार्यक्रम बनेल. आपण आपल्याविषयीं जनतेंत विश्वास निर्माण केला पाहिजे. जनतेंतील या विश्वासाच्या आधारावरच आपणांला क्रांतिज्योत प्रज्वलित करतां येईल; आणि हें काम शांतिसेनेच्या द्वारेंच होऊं शकेल."

एका अतिरेकी सर्वोदयवाद्यानें गांधीजींच्या समाधीजवळ बसून सामुदायिकपणें आमरण उपोषण करण्याचीहि सूचना मांडली, त्यावरून गांधीवाद्यांमधील विचार-स्वातंत्र्याची चुणुक दिसून येईल. गांधीवाद्यांवर इतर कोणतेहि आरोप केले जाऊं शकतील, परंतु त्यांच्याजवळ कल्पनादारिद्र्य आहे, असा आरोप मात्र कोणीहि करूं शकणार नाहीं. जयप्रकाशजींच्या पत्नी श्रीमती प्रभावतीदेवी यांनीं आपले सोन्याचे दागिने संरक्षण निधीला दिले होते, त्यावरहि कांहीं वक्त्यांनीं टीका करून आमचा नेताच हिंसक युद्धाला सक्रिय मदत करतो, असा त्यांच्यावर आरोप केला. या चर्चेचा समारोप करितांना जयप्रकाशबाबू म्हणाले,

"हे जें निवेदन आपल्यासमोर मांडण्यांत आलें आहे त्याच्या बावतींत विनोबांनीं असे उद्‌गार काढले होते कीं, 'या निवेदनावर मीं जेवढा वेळ

* तंत्रमुक्ति म्हणज कामासाठीं संस्था किंवा संघटन न बनविणें. अध्यक्ष, उपाध्यक्ष, मंत्री वगैरे स्थानें, पगार, मोबदला वगैरे आर्थिक बाबी इत्यादि बंधनांतून मुक्त होणें म्हणजे तंत्रमुक्ति.

खर्च केला तेवढा यापूर्वी कोणत्याहि पत्रकावर केला नव्हता. या निवेदनांत दोन टोकांचा समन्वय करण्यांत आलेला आहे. एका टोकाला शुद्ध युद्धविरोधक आहेत, तर दुसऱ्या टोकाला भारताच्या युद्धप्रयत्नांचें नैतिक समर्थन करणारी मंडळी आहेत. प्रारंभीं माझी अशी भूमिका होऊं लागली होती कीं युद्ध हा मानवजातीविरुद्ध केला जाणारा गुन्हा आहे. परंतु आतां मात्र माझ्या अंतःकरणाराला जी गोष्ट पटणार नाहीं, ती मी मान्य करूं शकत नाहीं. युद्ध हा गुन्हा आहे, असें आपण मानलें तर पंडितजी हे गुन्हेगार ठरतील. दोन्ही पक्षांचें समाधान होईल अशी भाषा वापरण्याचा प्रयत्न या निवेदनांत करण्यांत आलेला आहे. युद्धांतील अपूर्व बलिदान व त्यागभावना यांची अधिक प्रशंसा आपण केली असती तर युद्ध हें वाईट आहे, अशी श्रद्धा असणाऱ्यांना दुःख झालें असतें. माझी स्वतःची भूमिका वेगळीच आहे. कांहीं दिवसांपूर्वी पाटण्यामध्यें प्रबंध समितीच्या बैठकीपूर्वीच प्रभावतीनें मला विचारलें होतें कीं, 'हे जे दागिने माझ्याजवळ आहेत ते मी बाबूजींना (राजेंद्रप्रसादजींना) देऊन येऊं काय ?' प्रभावती ही व्रजकिशोर बाबूंची मुलगी. ते स्वतः दागिन्यांचे समर्थक नव्हते. तरी पण त्यांनीं जे थोडे बहुत दागिने दिले होते ते प्रभावती (संरक्षण निधीला) देऊन आली.

"आतां ही मदत हिंसेला झाली कीं अहिंसेला, याचा निर्णय आपणच करा. दुसरें टोक म्हणजे संपूर्ण सामर्थ्यानिशीं युद्धाला विरोध करणाऱ्याचें. या निवेदनांत ती भावना असती तर माझ्यासारख्या व्यक्तीला याच्याशीं सम्बद्ध होतांच आलें नसतें. म्हणून हें जें निवेदन तयार करण्यांत आलेलें आहे ते दोन्ही पक्षांच्या दृष्टीनें योग्य आहे, आणि आपण सर्वांनीं त्यांत आवश्यक दुरुस्त्या करून त्याला मान्यता दिली पाहिजे. जेथें अहिंसेचा मुद्दा असेल तेथें मी माझी बुद्धि विनोबांना समर्पित करीन. या प्रश्नाच्या बाबतींत आपणां सर्वांची एकत्रित शक्ति एका बाजूला आहे आणि विनोबांची शक्ति दुसऱ्या बाजूला आहे. विनोबांनीं मला पटवून दिलें तर सर्वांत आधीं मी आघाडीवर जाईन."

दुसऱ्या दिवशीं या ठरावांत पुढीलप्रमाणें दुरुस्त्या करून तो सर्वांनुमतें मंजूर करण्यांत आला :–

(ओळींचे आंकडे पृष्ठ ९५ ते ९८ वरील ठरवाच्या ओळींचे आहेत.)

ओळ १ : 'भारत-चीन संघर्षानें' याऐवजीं 'चीन-भारत संघर्षानें' असा शब्दप्रयोग करण्यांत आला.

ओळ ९ : 'युद्धांत सहभागी न होण्याच्या आमच्या मूलभूत तत्त्वावर आम्ही अढळ राहणार असलों तरी' हें वाक्य गाळण्यांत आलें.

ओळ १२ : 'परिस्थितिवशात् एखाद्या वेळीं लढाईनें लढाई बंद होऊंहि शकेल परंतु' हें वाक्य गाळण्यांत आलें.

ओळ १८ : 'युद्धज्वर निर्माण होतां कामा नये' या वाक्यानंतर 'भारतांत राहणारे चिनी आणि चीनमध्यें राहणारे भारतीय यांना सहृदयतापूर्ण वागणूक मिळाली पाहिजे' हें वाक्य जोडण्यांत आलें.

ओळ ३८ : 'देशाच्या रक्षणासाठीं...भावना जागृत झाली आहे' या वाक्यानंतर 'तिची आम्ही प्रशंसा करतों' हें वाक्य जोडण्यांत आलें.

ओळ ४२ : 'देशाचें अहिंसक सामर्थ्य' या वाक्यांशापुढें 'आणि अहिंसक प्रतिकाराची क्षमता' हा वाक्यांश जोडण्यांत आला.

ओळ ५१ : 'आजच्या परिस्थितींत हा कार्यक्रम...आशा करतों' हें वाक्य गाळून त्याऐवजीं 'परंतु आजच्या परिस्थितींत या कार्यक्रमाविषयीं गंभीरपणें विचार करण्याची आवश्यकता आहे' हें वाक्य घालण्यांत आलें.

ओळ ७४ : 'शहरांमध्येंहि' यापुढें 'आर्थिक व सामाजिक समतेच्या दृष्टीनें' हे शब्द जोडण्यांत आले.

हा ठराव व त्यावरील चर्चा इतक्या विस्तारानें देण्याचें कारण एवढेंच कीं, स्वत:ला गांधीवादी म्हणविणारी मंडळी आज कोणत्या मन:स्थितींत आहेत व त्यांच्या विचारांची दिशा काय आहे, याची कल्पना वाचकांना यावी. या चर्चेवरून निघणारे कांहीं निष्कर्ष वाचकांसमोर मांडण्यापूर्वीं आणखी दोन महत्त्वाचे ठराव उद्‌धृत करणें आवश्यक वाटतें. तें केल्यानंतर एकूण परिस्थिति व गांधीवाद्यांची भूमिका यांविषयीं ठामपणें मत बनविणें वाचकांना सोपें जाईल.

मध्यस्थीचा मार्ग :

वेडछीच्या सर्वोदय सम्मेलनांत सर्व सेवा संघातर्फें मांडण्यांत आलेलें जें निवेदन (ठराव) स्वीकृत करण्यांत आलें व त्याला अनुसरून शांतिसेना

मंडळाच्या वतीनें प्रत्यक्ष कार्यक्रमाची जी रूपरेखा तयार करण्यांत आली तिच्या बाबतींत देशांतील विधायक कार्य करणाऱ्या प्रमुख संस्थांचा विचार व सहकार्य मिळविण्याच्या दृष्टीनें सेवाग्राममध्यें ता. १५ व १६ डिसेंबर रोजीं सर्व सेवा संघाच्या वतीनें एक संयुक्त परिषद् भरविण्यांत आली होती. या परिषदेसाठीं खालील संस्थांना निमंत्रण देण्यांत आलें होतें :–

(१) गांधी स्मारक निधि, (२) गांधी पीस फाउंडेशन, (३) खादी ग्रामोद्योग आयोग, (४) कस्तुरबा ट्रस्ट, (५) हरिजन सेवक संघ, (६) भारत सेवक समाज, (७) रामकृष्ण आश्रम, (८) आदिम जाति सेवा संघ, (९) क्वेकर सेंटर, (१०) वर्ल्ड पीस ब्रिगेड, (११) अखिल भारत पंचायत परिषद, (१२) प्रमुख खादी संस्थांचे प्रतिनिधी व इतर प्रमुख व्यक्ती.

यांपैकीं भारत सेवक समाज, हरिजन सेवक संघ, रामकृष्ण आश्रम व कस्तुरबा ट्रस्ट या संस्थांचा कोणी प्रतिनिधि परिषदेला हजर राहिला नाहीं. सर्व सेवा संघाचे अध्यक्ष श्री मनमोहन चौधरी यांच्या अध्यक्षतेखालीं परिषदेचें कामकाज चाललें.

या परिषदेंत खालील प्रमुख व्यक्तींनीं भाग घेतला :–

सर्वश्री काकासाहेब कालेलकर, तुकडोजी महाराज, स्वामी रामानंद तीर्थ, शंकरराव देव, दादा धर्माधिकारी, अण्णासाहेब सहस्रबुद्धे, रघुनाथ श्रीधर धोत्रे, रा. कृ. पाटील, श्रीमन्नारायण, आर्यनायकम्, ढेबरभाई, जी. रामचन्द्रन्, ध्वजाबाबू, श्रीकांत भाई, नवकृष्ण चौधरी, ए. जे. मस्ते, रसेल जॉन्सन, जेम्स ब्रिस्टल, सिद्धराज ढड्ढा, करणभाई, वैद्यनाथ बाबू, के. अरुणाचलम्, मार्जरी साइक्स, व्ही. रामचंद्रन्, ओमप्रकाश गुप्त, डॉक्टर अरम्.

चीनच्या आक्रमणाला प्रतिकार करण्याचा अहिंसक मार्ग, प्रतीकरूपानें कां असेना, जोंपर्यंत स्पष्ट दिसत नाहीं तोंपर्यंत इतर सारीं विधायक कामें निस्तेजच राहतील व अहिंसक प्रतिकाराची चर्चा नुसती हवेंतच राहील, म्हणून या विषयावर विशेष चर्चा करण्यांत आली.

तसेंच देशामध्यें लष्करी शिक्षणाची जी जोरदार तयारी चाललेली दिसते तिचा विचार करतां विधायक कार्यक्रम व शांतिसेना हीं कामें कशीं चालूं शकतील याचाहि विचार करण्यांत आला.

तटस्थ राष्ट्रांच्या कोलंबो परिषदेला श्री जयप्रकाश नारायण व श्री शंकरराव देव यांनीं मध्यस्थी (आर्बिट्रेशन) च्या दिशेनें कांहींतरी उपाय शोधून काढण्याची विनंती तारेनें केली होती. तिच्या बाबतींत चर्चा होऊन परिषदेनें तिला मान्यता दिली व खालील ठराव मान्य केला :–

" चीननें केलेली एकतर्फी युद्धतहकुबी आणि १ डिसेंबर १९६२ पासून चिनी फौज परत जाऊं लागल्यामुळें बदललेली परिस्थिति याविषयीं विधायक कार्यक्रमांत गुंतलेल्या प्रतिनिधींची सेवाग्रामला ता. १५ व १६ डिसेबर रोजीं जी संयुक्त परिषद् भरली होती तिनें विचार केला. चीनकडून जाहीर करण्यांत आलेली युद्धतहकुबी पुढेंहि चालू राहावी आणि चीन-भारत सीमातंटा वाटाघाटींच्या शांततापूर्ण मार्गानें सोडविण्याच्या दृष्टीनें उपाय शोधण्यासाठीं सहा आफ्रो-एशियन देशांची जी परिषद् कोलंबो येथें भरली तिचें ही परिषद् स्वागत करते.

" आम्ही पुनः एकदां हें जाहीर करूं इच्छितों कीं, कोणताहि प्रश्न सोडविण्याचा शस्त्रबळाच्या ऐवजीं एकमेव पर्याय म्हणजे आपसांतील वाटाघाटी किंवा मध्यस्थी हाच होय. आजच्या परिस्थितींत चीन व भारत यांच्यांत प्रत्यक्ष वाटाघाटी होण्याची शक्यता दिसत नाहीं. मध्यस्थी किंवा न्यायालय यांच्या द्वारें हा प्रश्न सोडविण्याची तयारी भारत सरकारनें आपल्या वतीनें दाखविली आहे. चीन सरकारकडूनहि अशा प्रकारची तयारी दाखविली जावी या दृष्टीनें प्रयत्न व्हावेत, अशी आमची इच्छा आहे. भारतीय जनतेला आमचें असें आवाहन आहे कीं, हा प्रश्न शांततेनें व सन्मानानें सुटावा म्हणून मध्यस्थीच्या दिशेनें केल्या जाणाऱ्या प्रयत्नांना तिनें आपला पाठिंबा द्यावा. मध्यस्थीच्या अटी व इतर प्राथमिक तयारी यांच्या बाबतींत चीन व भारत यांच्याशीं वाटाघाटी करून योग्य मार्ग शोधून काढण्यांत यावा. "

दिल्ली ते पेकिंग–' मैत्रीयात्रा ' :

जागतिक शांततावादी व गांधीवादी यांनीं सेवाग्रामच्या या संयुक्त परिषदेंत चिनी आक्रमणाला तोंड देण्याचा एक अभिनव उपाय शोधून काढला. तो म्हणजे दिल्ली ते पेकिंग मैत्रीयात्रा करण्याचा. त्याचें सूतोऽवाच विश्वशांति

सेना (वर्ल्ड पीस ब्रिगेड) या संस्थेचे सह-अध्यक्ष* श्री ए. जे. मस्ते यांनीं केले. ते म्हणाले,

"या नाजुक परिस्थितींत अहिंसेवर श्रद्धा असणारे व गांधीवादी यांचे विचार काय आहेत, ते कोणता कार्यक्रम हातीं घेऊं इच्छित आहेत तें जाणून घेण्यासाठीं मी येथें आलों आहें. भारतानें या आक्रमणाचा प्रतिकार शस्त्र-बळानें आणि ब्रिटन-अमेरिकेच्या हत्यारांच्या आधारावर करण्याचें ठरविलें, तर पाश्चात्य राष्ट्रें ज्या दलदलींत रुतलीं आहेत तिच्यांतच भारतहि रुतून जाईल. म्हणून पेकिंगवाल्यांना समजावण्यासाठीं शांततावाद्यांच्या एका आंतर-राष्ट्रीय तुकडीनें दिल्लीहून पेकिंगपर्यंत 'पीस मार्च' (शांति-यात्रा) करीत जावें आणि सीमातंटा शस्त्रांच्या साह्यानें नव्हे तर शांततेच्या उपायांनीं सोडविला जाईल असें वातावरण दोन्ही देशांत निर्माण केलें जावें, असें मला वाटतें. त्या दिशेनें प्रयत्न करण्याच्या दृष्टीनें विचार केला जावा."

श्री शंकरराव देव यांनीं या सूचनेला पाठिंबा देतांना सांगितलें, "वेडछी येथील सर्व सेवा संघाच्या निवेदनांत मला एक उणीव दिसते. संघर्षाहून वरच्या वातावरणांत प्रवेश करून, मैत्रीच्या भावनेनें चीन व भारत यांच्यांत संपर्क स्थापित करून, चिनी जनतेच्या अंत:करणापर्यंत जाऊन पोंचण्याची प्रक्रिया झाली पाहिजे. समोरच्या माणसाला, प्रतिपक्षाला जेव्हां याची जाणीव होते कीं मीहि त्याचा हितेच्छु मित्र आहें, तेव्हांच अहिंसेचा परिणाम होऊं शकतो. सरकारकडून लष्कराच्या द्वारें आक्रमणाचा प्रतिकार केला जात असतांना शांतिसेनेच्या द्वारें अहिंसक प्रतिकार कसा करतां येईल, अशा प्रकारें केवळ या प्रतिकाराच्या संदर्भातच आपण विचार करीत राहिलों तर अहिंसक प्रक्रियेचा विकास आपल्याला करतां येणार नाहीं. म्हणून दिल्लीहून पेकिंगला 'पीस मार्च' नेण्याचा जो कार्यक्रम आंखला जात आहे, त्यांत मीहि माझें नांव दाखल करूं इच्छितों; आणि चीनच्या हृदयापर्यंत जाऊन पोंचण्याची अहिंसक प्रक्रिया आमच्या देशांतील लोकांना समजावून सांगण्यासाठीं आवश्यकता असल्यास मी देशामध्यें हिंडण्यासहि तयार आहें."

* या संस्थेचे तीन अध्यक्ष आहेत :–(१) श्री मायकेल स्कॉट, (२) श्री जयप्रकाश नारायण, व (३) श्री ए. जे मस्ते.

अखिल भारत शांति सेना मंडळानें या सूचनेवर सविस्तर चर्चा केली आणि सध्यांचा संघर्ष दूर करण्याच्या दृष्टीनें हें एक प्रत्यक्ष व स्वागतार्ह पाऊल ठरेल असें त्याला आढळून आलें. म्हणून त्यानें मैत्री–यात्रेचा हा कार्यक्रम हातीं घेण्याचें ठरविलें आणि विश्व शांति सेना, फ्रेंड्स सर्व्हिस कमिटी, दि कमिटी फॉर नॉन-व्हॉयोलंट ॲक्शन आणि जगांतील शांततेला व अहिंसेला वाहिलेल्या इतर संस्था, यांना ही मोहीम यशस्वी बनविण्याची विनंती करण्यांत आली.

ही मैत्री–यात्रा ३० जानेवारी १९६३ किंवा जास्तींत जास्त उशीरां म्हणजे १२ फेब्रुवारी १९६३ रोजीं दिल्लीच्या राजघाटावरील गांधीजींच्या समाधीपासून सुरू होईल. या यात्रेंत सुमारें २०-२५ मंडळी राहतील. त्यांच्या-पैकीं अर्धे परदेशी शांततावादी असतील. अमेरिका, इंग्लंड, आफ्रिका, पाकिस्तान व इतर शेजारी राष्ट्रें यांतील शांततावादी मंडळी या यात्रेंत सहभागी होतील अशी अपेक्षा आहे. श्री शंकरराव देव या यात्रेंत सामील होणार आहेत.

अन्यायाचा प्रतिकार कसा करणार ?

या दोन ठरावांचा सर्व सेवा संघाच्या वेडछी निवेदनाच्या संदर्भांत विचार केला असतां आपल्याला काय आढळून येतें ?

या सर्व प्रकारांत मनाला खटकणारी सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्या देशावर दुसऱ्या देशानें हल्ला केल्यास अहिंसक पद्धतीनें त्याचा प्रतिकार कसा करतां येईल याचा कांहींच विचार गांधीजींच्या मृत्यूनंतर गेल्या पंधरा वर्षांत गांधीवाद्यांनीं केला नाहीं. वेडछीच्या सर्व सेवा संघाच्या अधिवेशनांत श्रीमती कांता बहन यांनीं सांगितल्याप्रमाणें आजवर गांधी-वाद्यांनीं नेहमीं तहान लागल्यावर विहीर खणण्याचाच खटाटोप केला आहे. या बाबतींत आचार्य विनोबा भावे यांनीं थोडा विचार केला होता असें दिसतें. वेडछीच्या सर्वोदय सम्मेलनाला धाडलेल्या संदेशांत ते म्हणतात,

" आज आपल्या देशावर जो प्रसंग ओढवलेला आहे तो अनपेक्षित नव्हता. कित्येक वर्षांपासून त्याची आशंका मला होती; आणि म्हणूनच गेलीं साडे अकरा वर्षें माझी पदयात्रा सतत चालू आहे. आमच्या विचारांच्या दृष्टीनें

काळ अनुकूल होता, परंतु लोक-मानस तितकेंसें अनुकूल नव्हतें. आतां आजच्या संदर्भांत लोकमानसहि अनुकूल झालें आहे, असें मला दिसत आहे. आज सर्वोदय-विचार पूर्णपणें अकुंठित आहे. साऱ्या प्रतिगामी शक्ती नष्ट झाल्या आहेत. 'अनिकेतः स्थिरमतिः' हा गीतेचा संदेश माझ्या कानांत घुमत आहे. या वेळीं भारतांत शेंकडों पदयात्रा चालू होतील तर सर्वोदयाचें स्वरूप प्रत्यक्षांत अवतरण्यास मुळींच विलंब लागणार नाहीं." (१४-११-१९६२)

सुमारें पांच वर्षांपूर्वीं येलवाल (म्हैसूर) येथें भरलेल्या सर्वपक्षीय परिषदेंत विनोबांनीं ग्रामदान हें संरक्षणाचें प्रभावी साधन (डिफेन्स मेझर) असल्याचें सांगितलें होतें; आणि सर्व पक्षांनीं त्या कामीं सहकार्य करावें असें आवाहन केलें होतें. परंतु त्या दिशेनें इतरांनीं कांहींच वाटचाल केली नाहीं. या बाबतींत गांधीवादावर श्रद्धा असलेली मंडळी असें म्हणतात कीं, "चीन-भारत सीमावादहि तेव्हांपासूनच चालू आहे. या वादाच्या संदर्भांत आणि त्यांतून निर्माण होणारा संभाव्य संघर्ष जमेला धरून विनोबांनीं 'डिफेन्स मेझर' हा शब्दप्रयोग कां केला, याचा वेळींच सखोल असा विचार सर्वोदय कार्यकर्त्यांनीं केला असता तर चीन-भारत विवादाचें स्वरूप, त्या-बाबतची अहिंसेची व सर्वोदयाची भूमिका, वादांतील प्रश्नांची योग्यायोग्यता, दोन्ही पक्षांचें बलाबल, न्याय-अन्यायाचा विचार, अहिंसक प्रतिकाराची शक्याशक्यता इत्यादि प्रश्नांबाबत सर्वोदय कार्यकर्त्यांचीं मतें स्पष्ट, निःसंदिग्ध व कांटेकोर झालीं असतीं. पण तीं तशीं नव्हतीं, म्हणूनच सर्व सेवा संघाच्या प्रबंध समितींत केलेल्या भाषणांत विनोबा म्हणाले, 'या काळांत आपण कोणती कार्यपद्धति स्वीकारावी याचें संशोधन आधींच केलें असतें तर या विवादांत आपण कांहीं सुचवूं शकलों असतों; आणि त्याप्रमाणें वागूं शकलों असतों. अहिंसक प्रतिकार म्हणजे एकटचादुकटचानें मोर्चावर धांवून जाणें नव्हे. सर्व वातावरणावर, सर्व युद्धचमान राष्टांच्या मनांवर व जागतिक लोकमतावर अहिंसक हल्ला करावा लागतो.'......युद्धविरोधी भूमिका असणाऱ्यांना उद्देशून विनोबा म्हणाले, 'जगांत इतरत्र जे शांततावादी लोक आहेत त्यांच्याबद्दल माझ्या मनांत आदर असूनहि मला त्यांची भूमिका– मुख्यतः आपल्या देशाच्या दृष्टीनें–एकांगी आहे, असें वाटतें. आपला देश नुकताच गुलामगिरींतून मुक्त झाला आहे. तो आजवर परतंत्र होता आणि

त्याला निःशस्त्र बनविण्यांत आलें होतें. त्यामध्यें आजहि अनेक अंतर्गत भेद आहेत. अशा देशांत मी पॅसिफिस्ट – शांततावादी – वृत्ति धारण करीन तर अहिंसा विकसित होणार नाहीं.' या स्पष्ट शब्दांत त्यांनीं भारतांतील शांततावादाचें स्वरूप व्यक्त केलें आणि अन्यायाच्या प्रतिकारांत शस्त्रांचा वापर अहिंसेला नेहमीं सर्वस्वीं प्रतिकूल नसल्याचा निर्वाळा दिला. विनोबांची ही भूमिका व सर्व सेवा संघाचा पाठिंबा यांचें महत्त्व संख्येचा विचार करून मापणें बरोबर ठरणार नाहीं. थोडीं माणसें आहेत म्हणून त्यांचें मत कवडी-मोलाचें आहे, असें मानणें हा डोळसपणा नव्हे; आणि एवढा गंभीर प्रसंग ओढवला असतां सत्य-अहिंसेची शुष्क चर्चा करीत बसण्याबद्दल त्यांची हेटाळणी करणें तर अगदींच अयोग्य होय. 'हें विश्वचि माझें घर' ही ज्यांची वृत्ति आहे, प्राण गेला तरी आपलें व्रत सोडणार नाहीं हा ज्यांचा निश्चयीपणा आहे, निःस्पृहपणें व निर्भीडपणें जे लोक आपलें म्हणणें सतत मांडीत आले आहेत, पावलागणिक आपली भूमिका जे न्यायाच्या, नीतीच्या कसोटीवर घांसून बघतात, त्यांचा पाठिंबा ज्या बाजूला मिळेल ती बाजू नैतिक बळाच्या दृष्टीनें अधिक वजनदार होणार हें निःसंशय आहे. जागतिक लोकमताच्या दृष्टीनें विनोबांचा नेहरूंना पाठिंबा लाभला ही फार महत्त्वाची घटना आहे, यांत शंका नाहीं."*

आचार्य विनोबा भावे यांनीं भूदान-ग्रामदान हें 'डिफेन्स मेझर' आहे असें म्हटलें तेव्हां त्यांच्या मनांत चिनी आक्रमणाला तोंड देण्याची कल्पना विद्यमान होती असें गृहीत धरलें, तरी तेवढयानें प्रश्न सुटत नाहीं. आपण अशी कल्पना करूं कीं, भारतामध्यें सर्वत्र ग्रामदानें मिळालीं असतीं, विनोबांच्या कल्पनेप्रमाणें सगळीकडे ग्रामराज्यें स्थापन झालीं असतीं, तर चीननें भारता-वर आक्रमण केलें नसतें काय ? आसाममधील तेलावर डोळा ठेवून भारताकडे येणाऱ्या चीनचीं पावलें वाटेंतील ग्रामदानांमुळें थोडींतरी अडखळलीं असतीं काय ? आतांपर्यंतचा अनुभव तसा नाहीं. वाटेंतील ग्रामीण जनतेनें आक्रमकांशीं सहकार्य केलें नाहीं तरी त्याची कांहीं पर्वा न करतां क्रूर चिनी सैनिक बेधडकपणें पुढें घुसले. जाणीवपूर्वक असंस्कारी बनविण्यांत येणारे सैनिक

* 'भारतावरील चिनी आक्रमणासंबंधीं सर्वोदयाची दृष्टि' (लेखक : श्री गो. बा. देशपांडे. 'साधना' २२-१२-१९६२)

परक्या देशांतील जनतेची भाषा किंवा संस्कृति न जाणतां तिच्या बलिदानानें सुसंस्कृत बनतील, त्यांचें हृदयपरिवर्तन होईल, अशी आशा बाळगणें म्हणजे भाबडेपणाची कमालच होय. म्हणून विनोबांच्या कल्पनेप्रमाणें भारतीय जनतेनें ग्रामदानांचा अंगीकार केला असता तरी चीनच्या आक्रमक भूमिकेवर त्याचा कांहीं परिणाम झाला असता असें मानतां येत नाहीं. जगांत भारताची प्रतिष्ठा वाढत आहे, ही गोष्ट सहन न झाल्यामुळेंच ज्या चीननें, आपलें नाक कापून दुसऱ्याला अपशकून करणाऱ्या अधम माणसाच्या वृत्तीनें, आक्रमक म्हणून बदनाम होण्याचा धोका पत्करूनहि भारतावर दगलबाजपणें हल्ला चढविला त्यानें, भारत अधिक सज्जन बनला असता तर तो हल्ला कदाचित् त्याआधींच चढविला असता अशी शक्यता आहे. काश्मीरचें उदाहरण घेऊन हा मुद्दा अधिक स्पष्ट करतां येईल. काश्मीरच्या सरकारनें आपल्या प्रांतांतील जमीन भूमिहीनांना वांटून दिली आहे. आतां तेथें मोठे जमीनदार जवळजवळ नाहींतच. कसेल त्याची जमीन झाली आहे. म्हणजे विनोबांच्या दृष्टीनें तेथें आक्रमकाला आक्रमण करण्याची बुद्धिच होऊं नये, अशी परिस्थिति निर्माण झाली आहे. परंतु प्रत्यक्षांत काय स्थिति आहे? पाकिस्तानव्याप्त काश्मीरच्या सरहद्दीवरून भारतानें आपल्या सैन्याचा थोडा जरी भाग हलविला, तरी कोणत्या क्षणीं पाकिस्तानी हल्लेखोर काश्मीर व्यापतील हें सांगतां येत नाहीं. हीच गोष्ट चीनच्या बाबतींतहि खरी आहे. एखाद्या माणसानें वाजवीपेक्षां जास्त दारू ढोसली कीं त्याचा त्याच्या मेंदूवरील ताबा जातो, तो माणूसच राहत नाहीं, तो पशु बनतो. त्या अवस्थेंत त्याचें हृदयपरिवर्तन करणें मानवाला तरी अशक्य असतें. तें हृदयपरिवर्तन करण्यासाठीं आधीं त्याला शुद्धींत आणावें लागतें. झिंगलेल्या माणसाला तावडतोब शुद्धीवर आणण्याचा मार्ग म्हणजे काडकन् त्याच्या थोबाडांत मारणें हा होय. या मार्गानें तो शुद्धीवर आला कीं मग फार झालें तर त्याच्या अंतःकरणाला स्पर्श करण्याची खटपट करतां येते.

चीन हें राष्ट्र असेंच झिंगलेलें आहे. साम्यवादाचा नशा त्याला चढलेला आहे आणि हा नशा जगांतील साऱ्या राष्ट्रांना चढविल्याशिवाय त्याला चैन पडणार नाहीं. आपल्या शेजारच्या राष्ट्रांना लाल रंग फासल्याखेरीज तो

स्वस्थ बसणार नाहीं. त्याचा हा नशा उतरावयाचा असेल तर त्याला कोणीतरी जोराची थप्पड मारली पाहिजे. अमेरिकेच्या वाटेला गेल्यास अशी सणसणीत थप्पड बसेल हें ओळखून फोर्मोसावर स्वारी करण्याऐवजीं त्यानें भारतावर हल्ला चढविला. आपण सुसज्ज असतों तर आपल्याकडून त्याला ही थप्पड मिळाली असती व त्याचा नशा खाडकन् उतरला असता. व्यक्ती-प्रमाणेंच राष्ट्राचाहि नशा उतरविणें हा वस्तुत: त्याच्यावर उपकारच असतो. चीनवर हा उपकार करण्याची जबाबदारी भारतावर येऊन पडलेली आहे. ती आपण पार पाडली नाहीं तर झिंगलेला चीन भारताला चिरडून टाकल्या-शिवाय राहणार नाहीं. त्याच्यावर भूदान, ग्रामदान, ग्रामस्वराज्य वगैरे गोष्टींचा कांहींहि परिणाम होणार नाहीं.

गांधीवाद्यांनीं पुरस्कारलेला विधायक कार्यक्रम देशांतील अन्तर्गत शांतता व सुव्यवस्था टिकविण्याच्या कामीं पुष्कळच उपयोगी पडूं शकेल यांत शंका नाहीं. या मुद्याचें विवेचन शांतिसेनेच्या संदर्भात नंतर करण्यांत येईल. येथें लक्षांत ठेवण्याचा मुद्दा एवढाच कीं, या कार्यक्रमाचा उपयोग चीनच्या आक्रमणाला तोंड देण्याच्या दृष्टीनें होण्यासारखा नाहीं.

गांधीवाद्यांची या बाबतींतील दुर्बलता ही गांधीवादाच्या मूलभूत तत्त्वाचा त्यांनीं त्याग केल्यामुळें निर्माण झालेली आहे असें मला वाटतें. तें मूलतत्त्व म्हणजे अन्यायाचा प्रतिकार. गांधीजींच्या मृत्यूनंतर या देशांत राज्यकर्त्या पक्षाकडून जनतेवर नाना प्रकारचे अन्याय झाले; आणि राष्ट्रीय स्वरूपाच्या चुका झाल्या. त्या वेळीं गांधीवादी मंडळी एक तर मूग गिळून गप्प बसली, किंवा राज्यकर्त्यांच्या बाजूनें उभी राहिली. उदाहरणादाखल मागें उल्लेखिलेला भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न आणि आसामांत झालेली पाकिस्तानी मुसलमानांची बेकायदा आयात यांचा येथें निर्देश करतां येईल. भाषावार प्रांतरचना तत्त्वत: बरोबर असो कीं चूक असो, ती करण्याचें एकदां देशानें ठरविल्यानंतर त्या बाबतींत कोणावरहि अन्याय होऊं नये, एवढें पाहणें या देशांतील निष्पक्ष म्हणविणाऱ्या व्यक्तींचें कर्तव्य होतें. परंतु प्रत्यक्ष काय अनुभव आला? आपली न्याय्य मागणी आपल्याच सरकारकडून मान्य करवून घेण्यासाठीं जनतेला आपलें रक्त सांडावें लागलें, आजहि सांडावें लागत आहे. आणि हें सारें तटस्थपणें पाहत गांधीवादी स्वस्थ बसले आहेत. महाराष्ट्रा-

पुरतेंच बोलावयाचें तर बेळगांव-कारवारच्या जोडीला आतां गोव्यांतहि स्फोटाची दारू भरण्याचें काम चालू आहे. परंतु तेथील जनतेला नाहक बलिदान करावें लागूं नये, तिची शक्ति सरकारविरुद्ध झगडण्यांत वांया जाऊं नये, तिच्यावरील अन्याय त्वरित दूर व्हावा, यासाठीं एकहि गांधीवादी धडपडत असलेला दिसत नाहीं. अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठीं निकरानें लढण्याची जिद्दच गांधीवाद्यांमध्यें उरलेली नाहीं, असें दु:खानें म्हणावें लागतें.

आसाममध्यें गेलीं कांहीं वर्षें पाकिस्तानांतून बेकायदेशीरपणें येणाऱ्या मुसलमानांचे लोंढे लागले आहेत. गेले कांहीं महिने आचार्य विनोबा भावे हे आसाममध्यें पदयात्रा करीत होते. त्यांना ही परिस्थिति कळली नसेल तर त्यांची पदयात्रा डोळे झांकूनच झाली असें म्हणावें लागेल. पाकिस्तानी मुसलमानांच्या या अहिंसक आक्रमणाला आसामच्या कॉंग्रेस सरकारचा – व विशेषत: त्या सरकारमधील पूर्वाश्रमींच्या मुस्लिम लीगी मंत्र्यांचा – पाठिंबा आहे, असें बोललें जातें. या बाबतींत आचार्य विनोबा भावे आणि इतर गांधीवादी यांनीं कांहीं लक्ष घातल्याचें दिसत नाहीं. सरकारची ही चूक सरकारच्या नजरेस आणण्याची जबाबदारी त्यांच्यावर नव्हती काय? उलट बहात्तर रोगांवरील ग्रामदानाचें आपलें औषध पाकिस्तानी मुसलमानांच्या बेकायदा अतिक्रमणावरहि लागू होईल अशी भोळसट आशा त्यांनीं व्यक्त केल्यामुळें त्या प्रश्नाचें गांभीर्य कमी लेखलें गेलें आणि पाकिस्तान्यांनीं त्याचा भरपूर फायदा घेतला.

चिनी आक्रमणाच्या संदर्भांत ही चर्चा उपस्थित करण्याचें कारण एवढेंच कीं, अन्यायाची तिडीकच गांधीवाद्यांमधून नाहींशी झाली असल्यामुळें चिनी आक्रमणाबद्दलची चीड गांधीवाद्यांत दिसून येत नाहीं – जणूं चीड येणें हें अहिंसेंतच बसत नसावें! चिनी आक्रमणाची बातमी ऐकतांच सामान्य भारतीयाचेंच नव्हे तर जगांतील इतर अनेक न्यायप्रेमी लोकशाहीनिष्ठ व्यक्तींचें रक्त खवळलें. परंतु भारतांतील गांधीवादी पुढारी मात्र आघाडीवर लढणाऱ्या सैनिकांसाठीं गरम कपडे व खाद्यवस्तू पाठविणें अहिंसेंत बसतें कीं नाहीं, याचा काथ्याकूट करण्यांत गढून गेले. अहिंसक पद्धतीनें आक्रमकांचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य आपल्यामध्यें नाहीं हें लक्षांत येतांच ज्या गांधीनें काश्मीरमध्यें देशसंरक्षणासाठीं जाणाऱ्या भारतीय सैन्याला मन:पूर्वक आशीर्वाद दिला, त्याचा गांधीवाद आणि दगलबाज चीनला आक्रमक

ठरविण्यासाठींहि ज्यांना चर्चा करावी लागली त्या गांधीवाद्यांचा गांधीवाद यांतील फरक सहज लक्षांत यावा. अशा स्थितींत भारतीय जनता व गांधीवादी पुढारी यांच्यांत एक अनुल्लंघ्य खाई निर्माण झाली असल्यास काय आश्चर्य ? आपली अहिंसा सर्वसामान्य माणसालाहि आचरणांत आणतां आली पाहिजे, अशा प्रतिज्ञेनें काम करणारे गांधीजी कोणीकडे आणि आपली अहिंसा जनतेलाच काय पण आपल्या सहकाऱ्यांनाहि कळणार नाहीं (मग आचरणांत आणण्याचा तर प्रश्नच नाहीं !), अशा आविर्भावांत वावरणारे गांधीवादी कोणीकडे ! सारांश, गांधीवाद्यांनीं चिनी आक्रमणाच्या बाबतींत घेतलेली भूमिका सामान्य माणसाला अनाकलनीय वाटली एवढेंच नव्हे, तर एकूण देशाच्या दृष्टीनेंहि ती कचखाऊ ठरली.

युद्ध थांबणें महत्त्वाचें कीं अन्याय दूर होणें ?

विश्वासघातकी चीननें बेसावध भारतावर युद्ध लादून हां हां म्हणतां २५०० चौरस मैलांचा मुलूख गिळंकृत केला. अशा वेळीं स्वाभिमानी व्यक्तीच्या मनांत काय विचार आले असते ? गेलेला मुलूख परत मिळवावा, आक्रमकाला हुसकून लावावें, आणि त्याला पुन: एक पाऊल पुढें टाकतां येणार नाहीं असा बंदोबस्त करावा, असेंच कोणाहि जिवंत माणसाला वाटलें असतें. त्या दृष्टीनें भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कणखरपणाची व स्वाभिमानाची कदर केली पाहिजे. क्षणाक्षणाला भारतीय सैन्याच्या पराभवाच्या व पीछेहाटीच्या बातम्या येत असतांहि चीननें ८ सप्टेंबर १९६२ च्या सीमारेषेपर्यंत मागें गेलें पाहिजे, तरच वाटाघाटीला बसतां येईल, हा आपला मुद्दा त्यांनीं सोडला नाहीं. वस्तुत: भारताची ही अट चीननें मान्य केली तरी त्याच्या ताब्यांत भारताची १२ हजार चौरस मैल भूमि राहतेच; आणि कोणाहि स्वाभिमानी भारतीयाला ही गोष्ट सहन होणें शक्य नाहीं. परंतु ८ सप्टेंबर १९६२ च्या सीमारेषेचा मुद्दा ज्या जिद्दीनें जवाहरलालजींनीं पकडून धरला आहे, तिच्यामुळें त्यांचे लाख अपराध पोटांत घालण्यास भारतीय जनता तयार झाली आहे.

सत्याबद्दल, अन्यायाचा मुकाबला करण्याबद्दल अशी जिद्द गांधीवाद्यांमध्यें दिसते काय ? कोलंबो येथील तटस्थ राष्ट्रांच्या परिषदेला मध्यस्थीच्या दिशेनें

कांहींतरी उपाय शोधून काढण्याची विनंती (तारेनें) करण्याच्या बाबतींत गांधीवाद्यांनीं जी उतावीळ दाखविली तिच्यांत गांधीवादाची तेजस्विता दिसण्याऐवजीं लाचारीच दिसून आली; आणि चीननें केलेल्या एकतर्फी युद्ध-तहकुबीचें त्यांनीं ज्या घाईनें स्वागत केलें तिच्यामुळें त्या लाचारीवर जणूं कळस चढला.

चीननें केलेली एकतर्फी युद्ध तहकुबी हा वस्तुत: भारताचा भयंकर अपमान आहे. नाकासमोर पाहत, निमूटपणें रस्त्यानें चाललेल्या एखाद्या सभ्य माणसाला एखाद्या मवाल्यानें मागून येऊन सुरा भोंसकावा आणि त्या अनपेक्षित आघातानें तो सभ्य माणूस खालीं कोसळतांच, त्याला एक लाथ मारून त्या मवाल्यानें विजयी मुद्रेनें फिदीफिदी हंसत आल्या मार्गानें परत जावें, तशी ही चीनची एकतर्फी युद्धबंदी आहे.* तिच्यांत धमकीहि आहे. ही धमकी तर कोणतेंहि स्वाभिमानी राष्ट्र कधींहि सहन करूं शकणार नाहीं. परंतु चीनच्या युद्धतहकुबीचें स्वागत करणाऱ्या गांधीवाद्यांनीं ही धमकी – जणूं कांहीं विशेष घडलेलेंच नाहीं अशा आविर्भावांत – गिळून टाकली; आणि चिनी राज्यकर्त्यांचें हृदयपरिवर्तन करण्यासाठीं दिल्लीपासून पेकिंगपर्यंत शांतियात्रा करण्याचा अत्यंत निरुपद्रवी (व कदाचित् निरुपयोगीहि) कार्यक्रम हातीं घेतला.

* या युद्धबंदींतील भारताचा अपमान गांधीवाद्यांप्रमाणेंच भारतीय राज्यकर्त्यांना व सरकारी अधिकाऱ्यांनाहि कळला नाहीं. या परिस्थितीचें मोठें विदारक वर्णन पंजाबचे माजी राज्यपाल श्री काकासाहेब गाडगीळ यांनीं सोलापूर येथें ता. ८-१-६३ रोजीं दिलेल्या भाषणांत आपल्या मिस्किल शैलींत केलें. चिनी लष्कर बोमदिला सोडून परत गेल्यावर तेजपूरहून तेथें गेलेल्या भारतीय अधिकाऱ्यांनीं उत्साहानें जें ध्वजारोहण केलें व उत्सव साजरा केला त्याबद्दल तीव्र नापसंती व्यक्त करून काकासाहेब म्हणाले, "स्वत:ची बायको मवाल्यानें पळवून नेली आणि नंतर ती परत आणून दिली म्हणून दीड पावशेराचा सत्यनारायण करण्यासारखीच ही गोष्ट आहे. शरमेची गोष्ट कोणती नि अभिमानाची गोष्ट कोणती हेंहि लोकांना शिकवायची पाळी यावी, यापरतें दुर्दैव तें काय ?"

या ठिकाणीं असा प्रश्न उपस्थित होतो कीं या साऱ्या प्रकरणांत युद्ध थांबणें महत्त्वाचें आहे कीं अन्याय्य आक्रमण दूर होणें? गांधीवाद्यांचे एकूण प्रयत्न पाहतां त्यांना चिनी आक्रमणापेक्षां शांततेची अधिक काळजी लागून राहिली असावी असें दिसतें. शांतता, जागतिक शांतता ही अत्यंत महत्त्वाची व मोलाची गोष्ट आहे, यांत शंका नाहीं. पण तिच्यासाठीं कितीहि किंमत द्यावी लागली (peace at any cost) तरी ती द्यावयाची काय? आणि अशा प्रकारें भरमसाट किंमत देऊन शांतता विकत घेतां येते काय? जुना इतिहास जाऊं द्या, अगदीं अलीकडील घटना काय सिद्ध करतात? दुसऱ्या महायुद्धाच्या आधीं इंग्लंडचे पंतप्रधान चेंबरलेन यांनीं तसा प्रयत्न केला होता, परंतु त्याच्या बदल्यांत त्यांना शांततेऐवजीं महायुद्धच मिळालें, आणि पंडित नेहरूंनीं शांतीच्या प्राप्तीसाठीं गेलीं बारा वर्षे केलेल्या तपश्चर्येला चिनी आक्रमणाचें फळ मिळालें. हा सारा इतिहास डोळ्यांसमोर असतांना होणाऱ्या अन्यायाकडे डोळेझांक करून, कसेंहि करून युद्ध थांबावें, हिंसा थांबावी, शांतता प्रस्थापित व्हावी, अशी धडपड करणाऱ्या शांततावादी व गांधीवादी पुढाऱ्यांना जनतेच्या अंतःकरणांत कसें स्थान मिळूं शकेल?

याचा अर्थ असा नव्हे कीं, युद्ध थांबूं नये अथवा तें थांबविण्याचा प्रयत्न करूं नये. युद्ध हें थांबलेंच पाहिजे, कारण त्याशिवाय वाटाघाटी होणें शक्य नसतें. परंतु अन्यायानें जिंकून घेतलेला प्रदेश वाटाघाटींच्या मार्गें राजरोस-पणें गिळंकृत करतां यावा, यासाठीं जेत्यानें मग्रूरपणें केलेली युद्धबंदी ही कोणाहि स्वाभिमानी राष्ट्रानें स्वागतार्ह मानतां कामा नये. म्हणून या प्रकरणांत युद्ध बंद होणें ही दुय्यम गोष्ट असून चीनचें आक्रमण नाहींसें होणें ही महत्त्वाची गोष्ट आहे, हें ओळखून चीननें मतलबीपणानें केलेल्या धोकेबाज युद्धबंदीचें स्वागत करतांना गांधीवाद्यांनीं अधिक विचार करावयास हवा होता, असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं.

शांतिसेनेचें मर्यादित क्षेत्र :

भारतावर चीनचें आक्रमण होतांच जनतेचें मन आणि व्यावहारिक जग यांची कल्पना असणारे श्री जयप्रकाश नारायण व त्यांच्यासारखे इतर गांधीवादी बरेच गडबडले. ज्या युद्धाचा आपण आजवर निषेध केला आणि युद्धाला विकल्प म्हणून अहिंसक शांतिसेनेचा पुरस्कार केला त्या युद्धाला

पाठिंबा द्यावयाचा कीं त्याला उघडपणें विरोध करावयाचा असा पेंचप्रसंग त्यांच्यासमोर येऊन ठेपला. याचें कारण असें कीं प्रत्येक युद्ध हें पाप (evil) च असतें, अशा प्रकारची पुस्तकी भावना त्यांनीं उराशीं बाळगलेली होती. भारत हा हाडाचाच शांततावादी व अनाक्रमणशील देश असल्यामुळें तो कधीं कोणावर हल्ला करणार नाहीं हें स्पष्ट होतें. परंतु जोंपर्यंत लांडगे शाकाहारी बनत नाहींत तोंपर्यंत कोंकरांनीं अहिंसक बनल्यानें लांडग्यांचा मार्ग सोपा झाला तरी कोंकरांच्या रक्षणाचा प्रश्न सुटत नाहीं, त्यांच्या जीवनाचाच निकाल लागतो, हें सत्य त्यांनीं डोळ्यांआड केलें. ज्या वेळीं एखादें क्रूर सैन्य निरपराध जनतेवर चालून येतें त्या वेळीं त्याला शस्त्रानें अडवून धरणें व परतवणें हें एक पवित्र युद्ध असूं शकतें, प्रत्येक स्वाभिमानी व जिवंत व्यक्तीचें तें कर्तव्य असतें, ही गोष्ट त्यांच्या लक्षांत त्या वेळीं आली नाहीं. यामुळेंच चीननें आक्रमण करून त्यांना मोठ्या धर्मसंकटांत टाकलें. श्री वसंतराव नारगोळकरांसारखे कांहीं कट्टर गांधीवादी चीनच्या या जाळ्यांत मुळींच अडकले नाहींत; कारण त्यांच्या दृष्टीनें देशाचें स्वातंत्र्यरक्षण, जनतेचा स्वाभिमान, मानवी जीवनाचें महत्त्व वगैरे गोष्टी क्षुद्र – निदान दुय्यम स्वरूपाच्या – असून तत्त्वनिष्ठा हेंच एकमेव जीवनमूल्य आहे. म्हणून त्यांनीं हिंसक युद्धप्रयत्नांना आपला विरोध दर्शविला. ते म्हणाले, " गांधी विचार मानणाऱ्यांपुढें हा (युद्धाशीं सहकार्य करण्याचा) प्रश्नच पडूं नये. युद्धानें प्रश्न सुटले नाहींत, सुटणार नाहींत. युध्द, मग तें कोणत्याहि प्रकारचें असो, मानवहितविरोधीच आहे, म्हणून त्याला विरोध केलाच पाहिजे. नेहरू हे गांधी-विनोबांना मानणारे. त्यांची आजवरची भाषा अहिंसेची, जागतिक शांततेची. पण प्रत्यक्ष प्रसंग स्वतःवर येतांच त्यांचें धोरण डळमळीत झालें. ही खरोखर तत्त्वच्युति आहे. देशांत गांधीजींच्या पुण्याईमुळें अहिंसेची शक्ति आहे. तिचा उपयोग झाला पाहिजे. त्यासाठीं नेहरू, जयप्रकाश यांनीं पुढाकार घेऊन जनतेला अहिंसक प्रतिकाराचें आवाहन केलें पाहिजे. तसें झाल्यास हजारों शांतिसैनिक चीन-भारत सीमेवर जाऊन उभे राहतील व युध्दाचा प्रतिकार करतील. चालू युध्दप्रयत्नांत मदत करणें अयोग्य आहे...अण्वस्त्रांमुळें युध्दाची, संरक्षणाची, सशस्त्र प्रतिकाराची कल्पना कालबाह्य (out of date) झाली आहे.

देशांच्या राजकीय सीमा पुसल्या गेल्या आहेत. त्यामुळें फक्त अहिंसात्मक प्रतिकारालाच वाव उरला आहे." *

श्री नारगोळकर व त्यांच्याप्रमाणें विचारसरणी असणारे इतर गांधीवादी यांचा मुख्य आक्षेप हिंसेला आहे, अन्यायाला नाहीं. अन्याय चालू राहिला तरी त्यांना त्याची पर्वा नाहीं, कोणत्याहि परिस्थितींत हिंसा थांबली पाहिजे, एवढेंच ते पाहणार. श्री जयप्रकाश नारायण व श्री शंकरराव देव यांनीं तटस्थ राष्ट्रांच्या कोलंबो परिषदेला चीन-भारत संघर्षात मध्यस्थीच्या दिशेनें कांहींतरी उपाय शोधून काढण्याची तारेनें केलेली विनंती हीहि याच प्रकारांत मोडते. कारण तेथें अन्याय दूर व्हावा, हा महत्त्वाचा मुद्दा न राहतां कोणीकडून तरी भांडण थांबावें, याच मुद्यावर भर दिला गेला आहे, असें म्हणावें लागतें. कोणतीहि स्वाभिमानी जनता ही भूमिका घेऊं शकणार नाहीं. आमच्यावर निष्कारण हल्ला करणाऱ्या शत्रूला आम्ही प्राणपणानें विरोध करून परतवून लावूं किंवा तसें करतांना सर्वनाश पत्करूं, परंतु जुलुमाशीं समझोता करणार नाहीं, हीच कोणत्याहि प्राणवान् जनतेची भूमिका असूं शकते. म्हणून या दृष्टीनें गांधीवादी हे पूर्णपणें अपेशी ठरले, गांधींनीं प्रचारिलेला व पुरस्कारिलेला स्वाभिमान व अन्यायाच्या प्रतिकाराची जिद्द ते दाखवूं शकले नाहींत, असें स्पष्टपणें नमूद करावेंसें वाटतें.

आतां गांधीवाद्यांनीं पुरस्कारिलेल्या शांतिसेनेसंबंधीं थोडा विचार करूं.

आक्रमणापुढें मान न तुकविणें, हिंसेचा मुकाबला अहिंसेनें करणें आणि अन्यायाचा प्रतिकार करणें, या दृष्टीनें शांतिसेनेची कल्पना अत्यंत स्वागतार्ह आहे, हें प्रथमच मान्य केलें पाहिजे. अर्थात् तिला आम जनतेचा पाठिंबा किती मिळतो, तसा पाठिंबा मिळाला नाहीं तर ती कितपत यशस्वी होऊं शकेल वगैरे गोष्टींवरून शांतिसेनेच्या मर्यादा स्पष्ट होतील. तत्पूर्वी शांति-सेनेसंबंधींची थोडक्यांत माहिती करून घेतली पाहिजे. वेडछीच्या सर्व सेवा संघाच्या अधिवेशनांत शांतिसैनिकाचें जें प्रतिज्ञापत्रक स्वीकृत करण्यांत आलें

* श्री गोविंदराव कोरगांवकर, धर्मादाय संस्था, कोल्हापूर, या संस्थेच्या सेवक संघाचें सम्मेलन गोकाक येथें ता. ४–५ नोव्हेंबर १९६२ रोजीं भरलें होतें. त्या वेळीं केलेल्या भाषणांतून.

तें खालीं दिलें आहे. त्यापूर्वी हें प्रतिज्ञापत्र सर्वसामान्य माणसाला न पेलण्या-इतकें अवघड होतें. म्हणून त्यांत कांहीं सुधारणा करून तें सर्वसुलभ बनविण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे.

शांतिसैनिकाचें प्रतिज्ञापत्रक :

१८ वर्षांहून अधिक वय असलेला कोणीहि भारतीय नागरिक खालीं दिलेली घोषणा व प्रतिज्ञा करून शांतिसैनिक बनूं शकेल :–

माझी अशी श्रद्धा आहे कीं,

(१) सत्य व अहिंसा यांवर आधारलेला नवा समाज निर्माण झाला पाहिजे.

(२) समाजांतील सारे संघर्ष – विशेषत: या अणुयुगामध्यें – अहिंसक मार्गांनीं सुटूं शकतात व सुटले पाहिजेत.

(३) मनुष्यमात्रांत मूलभूत एकता आहे.

(४) युद्ध हें मानवतेच्या विकासास बाधक असून तो अहिंसक जीवन-पद्धतीचा विपर्यय आहे.

म्हणून मी अशी प्रतिज्ञा करतों कीं :—

(१) मी शांततेसाठीं काम करीन आणि जरूर पडतांच आपले प्राण अर्पण करण्यास तयार राहीन.

(२) जाति, संप्रदाय, रंग (वर्ण) व पक्ष वगैरे भेदांहून वर उठण्याचा मी पूर्णपणें प्रयत्न करीन, कारण हे भेद मानवाची एकता मान्य करण्याचें नाकारतात.

(३) कोणत्याहि युद्धांत मी सहभागी होणार नाहीं.

(४) संरक्षणाचीं अहिंसक साधनें व वातावरण तयार करण्याच्या कामीं मी मदत करीन.

(५) मी माझा थोडा वेळ नियमितपणें मानवबंधूंची सेवा करण्यांत खर्च करीन.

(६) शांतिसेनेच्या शिस्तीचें मी पालन करीन.

*

असा हा शांतिसैनिक देशाच्या संरक्षणासाठीं निश्चितपणें काय करील हें सांगणें सध्यां तरी शक्य नाहीं; कारण त्या दृष्टीनें अजून प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाहीं. 'मी कोणत्याहि युद्धांत सहभागी होणार नाहीं' ही त्याची प्रतिज्ञाहि कांहींशी लवचिक आहे. सशस्त्र युद्धासाठीं आर्थिक साह्य देणें, आघाडीवरील सैनिकांसाठीं गरम मोजे, स्वेटर वगैरे तयार करून देणें, किंबहुना सैनिकांना वाचण्यासाठीं पुस्तकें-मासिकें देणें हें सुद्धां तात्त्विक दृष्टया युद्धाशीं सहकार्य करणेंच आहे. या बाबतींतील निर्णय प्रत्येकानें आपापल्या सदसद्विवेक बुद्धीला कौल लावून त्याप्रमाणें घ्यावा, अशी अपेक्षा असली पाहिजे. कारण या सम्मेलनांत पहिले शांतिसैनिक म्हणून ज्यांनीं आपलें नांव नोंदविलें ते आचार्य काकासाहेब कालेलकर आपल्या भाषणांत म्हणाले, "लोकांनीं मला विचारलें कीं 'तुम्ही अहिंसक आहांत, तर मग या हिंसक युद्धाला कशी मदत करतां?' त्यावर मीं उत्तर दिलें कीं, 'या युद्धासाठीं असलेल्या संरक्षणनिधीला मीं पैसा दिला आहे नि देणार आहें.'...आज जें युद्ध चाललें आहे तें आम्हांला पसंत नाहीं. चीन व भारत यांच्यांत बंधुभाव निर्माण व्हावा असाच आमचा प्रयत्न राहील. आम्ही चीनशीं लढूं, परंतु त्यामुळें शत्रुत्व वाढणार नाहीं, अशी आमची वृत्ति राहील. प्रत्यक्ष लढाई-साठीं जें सैन्य धाडण्यांत आलेलें आहे, त्याला आम्ही विरोध करणार नाहीं. किंबहुना मदतच करूं. अहिंसा व हिंसा यांच्या समन्वयाचा हा मार्ग आहे. याचा प्रसार आपण करूं शकतों. आपल्या देशांत हिंसावाद्यांचें बहुमत आहे, हेंहि आपण विसरतां कामा नये. आपण एका श्रेष्ठ संस्कृतीचे प्रतिनिधी आहोंत हें खरें, परंतु आपलें बहुमत नाहीं. या देशांतील बहुमताला त्याच्या पद्धतीनें काम करण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्या पद्धतीवर ज्यांचा विश्वास आहे ते संपूर्णतया मदत करतीलच.

"महात्माजींची एक आठवण मी तुम्हांला सांगतों. त्यांनीं मला ब्रिटिश साम्राज्यासाठीं युद्ध लढण्याकरितां पाठविण्याचें ठरविलें तेव्हां ते मला म्हणाले, 'मी तुम्हांला सर्वप्रकारें साह्य करीन. व्यक्तिशः मी हिंसा करणें शक्य नाहीं; म्हणून हिंसेच्या कामांत मुळींच मदत करणार नाहीं.' त्यांचें म्हणणें नीट समजावें म्हणून मीं त्यांना विचारलें, 'मी घोड्यावर बसून रायफल चालवतों आहें, अशा वेळीं तुम्ही त्या बंदुकींत गोळ्या भरण्याचें

काम कराल काय ?' त्यावर ते म्हणाले, 'तुम्हांला मदत करण्याचा प्रसंग आला तर मी अवश्य करीन. माझें शरीरच तसें बनलेलें आहे!' याचा अर्थ असा कीं महात्माजी हे उत्तम क्षत्रिय होते....माझ्याकडे जे तरुण सल्ला मागण्यासाठीं येतात त्यांना मी असें सांगतों कीं, भ्याड बनून घरांत बसूं नका. एक तर जवाहरलालजींच्या हांकेला ओ द्या, नाहीं तर विनोबांचें म्हणणें ऐका. आपण कोणाचेंच ऐकणार नाहीं, असें म्हणूं नका. दोन्ही मार्गांनीं जातां येईल. माझ्या सल्ल्यावरून कित्येक तरुण (आघाडीवर) गेले आहेत.

"अखेरशेवटीं राष्ट्राचें रक्षण हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे...शांतिसेनेमुळें भारत सरकारलाहि आनंद होईल. आम्ही सशस्त्र सैनिकांना मागें हटण्यास सांगत नाहीं. देशांतील सैनिक आघाडीवर गेल्यानंतर त्यांच्या मागें दंगेधोपे होणार नाहींत, एवढी निश्चितता आपण त्यांना मिळवून दिली तर सरकार खुष होईल."*

व्यावहारिक दृष्टचा विचार केल्यास आजच्या परिस्थितींत शांतिसेना एवढेंच काम करूं शकेल असें आढळून येईल. अर्थात् युद्धकाळामध्यें अंतर्गत सुरक्षा ही एक अत्यंत महत्त्वाची बाब असते यांत शंका नाहीं. खेडयांची व शहरांची अंतर्गत सुरक्षितता सांभाळण्याची जबाबदारी शांतिसेनेच्या द्वारें उचलली गेली तर सैन्यावरील ताण पुष्कळच कमी होईल. सैनिक कमी पडल्यास गोळीबाराचें शिक्षण मिळालेले पोलीस आघाडीवर जाऊं शकतील. म्हणजे एक प्रकारें सशस्त्र प्रतिकाराच्या कार्यालाच शांतिसैनिक हातभार लावतील. परंतु एवढ्या मर्यादित अर्थानेंहि शांतिसेनेकडे पाहिलें तरी ती कल्पना स्वागतार्हच आहे, असें म्हणतां येईल. आचार्य काकासाहेबांनीं म्हटल्याप्रमाणें, 'प्रत्यक्ष आघाडीवर जाऊन लढण्याची ज्यांची तयारी नाहीं, ज्यांना तें शक्य नाहीं, त्यांना या शांतिसेनेमुळें एक उत्कृष्ट संधि मिळल. त्यांना कोणी भ्याड म्हणूं शकणार नाहीं'.

हिंसक सैन्य हें फार थोडया काळांत तयार करतां येतें. तसें अहिंसक सैन्याचें असत नाहीं. शांतिसैनिक ही एक मनःप्रवृत्ति आहे. माणसाचें मन

* 'भूदान यज्ञ' (हिन्दी) : १४–१२–१९६२ : वेडछी येथील सर्वोदय सम्मेलनांत दिलेलें भाषण.

एका क्षणांत बदलतां येत नाहीं. त्यावर वर्षांनुवर्षें संस्कार करावे लागतात. म्हणून युद्ध सुरू झाल्यावर शांतिसेना उभारतां येत नसते. तें काम पुष्कळ आधींपासून व्हावें लागतें. हें ओळखून शांतिसेनेच्या कामाला आतां सुरुवात केल्यास तिचा उपयोग जरी आजच्या आज होऊं शकला नाहीं तरी भविष्य-काळीं निश्चित होऊं शकेल. परंतु एवढ्या मर्यादित कामासाठीं तरी शांति-सेना तयार करतां येईल काय? आजपर्यंतचा अनुभव काय आहे? काकासाहेबांनीं आपल्या भाषणांत म्हटल्याप्रमाणें, "आजपर्यंत आपण शांति-सेनेचें नुसतें नांव घेत राहिलों. ज्या देशांत भगवान् बुद्ध, महावीर यांच्या-सारखे तपस्वी निर्माण झाले, तेथें विनोबाजींसारख्यांनीं दहा वर्षें धडपड केल्या-नंतर किती शांतिसैनिक मिळाले? तर तीन हजारांहून कमी! हें कांहीं चांगलें लक्षण नव्हे!"

शांतिसेनेचा प्रभाव पडावयाचा असेल तर तिच्यांत किती सैनिक असले पाहिजेत? श्री जयप्रकाश नारायण व श्री काकासाहेब कालेलकर यांनीं या शांतिसेनेंत एक कोटि सैनिक असावेत अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. अर्थात् ती कांहीं अट नव्हे. त्यामुळें तेवढी संख्या पूर्ण होईपर्यंत शांतिसेनेचें काम चालूच होणार नाहीं, असें नाहीं. जसजसे शांतिसैनिक येत जातील, तसतसें काम हातीं घेतलें जाईल, अशी अपेक्षा आहे. अशी भूमिका ठेवली नाहीं तर 'न नौ मन तेल होगा, न राधा नाचेगी' अशी स्थिति होईल हें उघड आहे. कारण आजच्या एकूण वातावरणाचा विचार करतां सामान्य लोकांना शांतिसेनेच्या कल्पनेचें फारसें आकर्षण वाटलेलें दिसत नाहीं. ज्या वेळीं शांति-सेना कांहीं भरीव काम करून दाखवील, तेव्हांच लोक मोठ्या संख्येनें शांतिसैनिक बनतील, हें उघड आहे.

गांधीजींची शुद्ध अहिंसा :

या संदर्भांत युद्ध व अहिंसा यांच्या बाबतींतील गांधीजींची भूमिका किती एकांतिक होती, हें पाहणेंहि उद्बोधक होईल. एके ठिकाणीं ते म्हणतात,

"माझा असा विश्वास आहे कीं, जनतेपैकीं बहुसंख्य लोक जर अहिंसक असतील तर अहिंसेच्या आधारावर सरकारचा कारभार हांकतां येईल. माझ्या माहितीप्रमाणें हिंदुस्थान हाच एक असा देश आहे कीं, जेथें अशा प्रकारचें

राज्य स्थापन होण्याचा संभव आहे. त्या श्रद्धेवरच मीं माझा प्रयोग चालविला आहे. म्हणून, समजा, हिंदुस्थाननें शुद्ध अहिंसेच्या मार्गानें स्वातंत्र्य संपादन केलें तर हिंदुस्थानला त्याच मार्गानें त्याचें संरक्षणहि करतां येईल. अहिंसक व्यक्ति किंवा समाज बाहेरून हल्ले होण्याची कल्पना अगोदरच करून ठेवीत नाहीं किंवा त्याकरितां तरतूदहि करीत नाहीं. उलट, अशा व्यक्तीचा किंवा समाजाचा दृढ विश्वास असतो कीं, कोणीहि आपल्याला त्रास द्यायला येणार नाहीं. पण समजा, नको तें घडलें, तर अहिंसेपुढें दोन मार्ग खुले आहेत : आक्रमकाला आपलें सर्व, असेल तें देऊन टाकावयाचें, पण त्याच्याशीं असहकार करावयाचा. उदाहरणार्थ समजा, नीरोसारख्या क्रूर, जुलमी बादशहाचा दुसरा अवतार हिंदुस्थानवर स्वारी करून आला तर येथील सरकारचे प्रतिनिधी त्याला आंत येऊं देतील, पण सांगतील कीं, तुला लोकांकडून कसलेंहि सहकार्य मिळणार नाहीं. शरण जाण्यापेक्षां ते मरण पत्करतील. दुसरा मार्ग म्हणजे, अहिंसक प्रतिकाराचें शिक्षण मिळालेल्या लोकांकडून होणारा अहिंसक प्रतिकार. स्वतः निःशस्त्र राहून आक्रमकाच्या तोफांचें ते स्वतः खाद्य बनतील. दोन्ही उदाहरणांत मुळांत असा विश्वास बाळगण्यांत आला आहे कीं, नीरोसारख्या पाषाणहृदयी सत्ताधाऱ्याला सुध्दां हृदय असतें. आक्रमकाच्या इच्छेला शरण जाण्याऐवजीं स्त्रियांच्या व पुरुषांच्या अखंड रांगा एकामागून एक मरण पत्करीत आहेत, या अनपेक्षित दृश्यानें त्या आक्रमकाचें अंतःकरण आणि त्याच्या सैनिकांचींहृदयें अखेर विरघळलींच पाहिजेत. व्यावहारिक दृष्टचा विचार केला तर सशस्त्र प्रतिकारामध्यें जितकी मनुष्यहानि होण्याचा संभव असतो त्याहून जास्त हानि या मार्गानें होणार नाहीं. शिवाय शस्त्र-सज्जते-करितां आणि तटबंद्या उभारण्याकरितां लागणारा खर्च त्यांत नाहीं. लोकांना मिळालेल्या अहिंसेच्या शिक्षणानें त्यांच्या नैतिक उंचींत फार मोठी भरच पडेल. असे स्त्री-पुरुष ज्या दर्जाचे वैयक्तिक शौर्य दाखवितील तें सशस्त्र युध्दांत दाखविल्या जाणाऱ्या शौर्याहून किती तरी उच्च प्रतीचें असेल. दोहोंतहि जें शौर्य आहे तें मरण पत्करण्यांत आहे, मारण्यांत नाहीं; आणि शेवटचा मुद्दा हा कीं, अहिंसक प्रतिकारांत पराजय असा नसतोच.

" पूर्वीं असें कधीं घडलें नाहीं, हें मीं रेखाटलेल्या या चित्राला उत्तर नव्हे. मीं कांहीं अगदींच अशक्य चित्र रेखाटलेलें नाहीं. मीं उल्लेखिलेल्या

नमुन्याच्या व्यक्तिगत अहिंसेच्या उदाहरणांनीं इतिहास ओतप्रोत भरलेला आहे. स्त्रियांच्या किंवा पुरुषांच्या समूहांना पुरेसें शिक्षण दिल्यास सामूहिक स्वरूपांत – म्हणजे समूह किंवा राष्ट्र या नात्यानें – ते अहिंसकपणें वागणार नाहींत, असें म्हणण्यास किंवा समजण्यास कांहीं आधार नाहीं."

['Satyagraha' : पृष्ठें ३८५ ते ३८७]

" (देशरक्षणाचें) जें अहिंसक तंत्र मी सुचवूं इच्छितों तें हें कीं, संरक्षक स्वयंसैनिकांना कसलीहि शस्त्रांची मदत पुरवावयाची नाहीं. अहिंसक मदत भारत सरकारकडून यावयाची असेल तर ती त्यानें वाटेल तेवढी पाठवावी. परंतु अशी मदत येवो न येवो, हे अहिंसक संरक्षक, चढाई करून येणाऱ्याच्या बळाला किंवा प्रचंड संख्येनें असलेल्या शिस्तबद्ध सैन्यालाहि तोंड देतील आणि असे हे संरक्षक, अंतःकरणांत किंचित्‌हि द्वेषभावनेला किंवा क्रोधाला थारा न देतां आणि शस्त्रांचाच काय पण आपल्या हातांचाहि उपयोग न करतां आपल्या नेमलेल्या ठिकाणीं मरत आहेत, हें शौर्याचें दृश्य इतिहासांत सुध्दां अभूतपूर्व असें होईल. मग काश्मीर हिंदुस्थानांतच नव्हे तर साऱ्या जगभर आपला सुवास दरवळून सोडणारी पुण्यभूमि होईल."

[Selections from Gandhi : पृष्ठ ५३६]

कट्टर गांधीवादी जेव्हां अहिंसक प्रतिकाराचा विचार बोलून दाखवितात, तेव्हां त्यांना गांधीजींनीं कल्पिलेला हा प्रतिकार अभिप्रेत असतो. परंतु या प्रतिकाराची कल्पना मांडणारे गांधीजी स्वतः या मार्गानें गेले नाहींत, जाऊं शकले नाहींत, या गोष्टीचा मात्र त्यांना विसर पडतो. याच लेखांत गांधीजींनीं पुढें म्हटलें आहे कीं,

" अहिंसक उपाययोजना म्हणजे काय तें मीं सांगितलें खरें, परंतु माझ्या शब्दांत आज ती ताकद उरलेली नाहीं. त्या दृष्टीनें माझी दुर्बळता मला कबूल केली पाहिजे. ही ताकद, गीतेच्या स्थितप्रज्ञ वर्णनांत सांगितल्याप्रमाणें स्वतःवर पूर्ण स्वामित्व मिळविल्यानेंच येते. त्याकरितां आवश्यक असणारी तपश्चर्या माझी नाहीं. देवाजवळ माझी अशी प्रार्थना आहे कीं, त्याच्या मनांत असेल तर तशी पात्रता देऊन त्यानें मला सबळ करावें".

याचा अर्थ उघड आहे. अहिंसक प्रतिकाराचा मार्ग हाच सर्वश्रेष्ठ मार्ग असल्याबद्दल गांधीजींची खात्री असली तरी अगदीं जीवनाच्या अंतिम

समयीं देखील या मार्गाचा अवलंब ते स्वत: करूं शकले नाहींत, अथवा आपल्या अनुयायांकडून करवून घेऊं शकले नाहींत. त्यामुळें त्या मार्गाच्या मर्यादा स्पष्ट झाल्या. अशा स्थितींत चिनी आक्रमणाला आपण अहिंसक मार्गानें तोंड देऊं शकलों नाहीं यांत आपला पराभव आहे, असें मानून गांधीवाद्यांनीं व्यथित कां व्हावें ? जी गोष्ट आपण आचरणांत आणूं शकत नाहीं ती श्रेष्ठ नसते असें नव्हे, तर ती पेलण्याचें सामर्थ्यच आपल्यांत नसतें.

भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयानें आंखलेल्या योजनेप्रमाणें तारीख २८, २९ व ३० सप्टेंबर १९६२ रोजीं पुण्यास श्री चक्रवर्ती राजगोपालाचार्य यांनीं जीं भाषणें दिलीं त्यावेळीं परदेशी विचारकांनीं गांधीजींच्या तत्त्व-ज्ञानाचा अभ्यास कसा दृढतेनें व अणुयुगाच्या शृंखला तोडण्याच्या जिद्दीनें चालविला आहे, तें सांगून राजाजी म्हणाले,

" A comparatively weak country like us surrounded by unfriendliness all round is perhaps not very good soil for the Gandhian way of offering spiritual resistance ".

[लष्करी दृष्टचा कमकुवत असलेल्या आणि भोंवतालीं मित्र नसलेल्या राष्ट्रांच्या वेढयांत सांपडलेल्या आपल्या देशासारख्या देशांत गांधीमार्गानुसार आत्मिक प्रतिकार करण्यासारखी परिस्थिति नाहीं, हें खरें आहे.]

या व्याख्यानानंतर झालेल्या प्रश्नोत्तरांच्या वेळीं ' गांधीजींचें तत्त्वज्ञानच कमकुवत असल्यामुळें तें सद्य:स्थितींत भारतामध्यें प्रभावी वाटत नाहीं ? कीं तें तत्त्वज्ञान आचरणांत आणणाऱ्या भारतीय जनतेची लायकीच खालावलेली आहे ?' या प्रश्नाला उत्तर देतांना जनतेची कुवतच तें तत्त्वज्ञान पेलण्या सारखी राहिलेली नाहीं असा निर्वाळा राजाजींनीं दिला.

अर्थात् हा ज्याच्या त्याच्या मताचा व स्वानुभवाचा प्रश्न आहे. चिनी आक्रमणापुढें गांधीवाद पराभूत झाला असें सर्वसामान्य लोकच नव्हेत तर अनेक गांधीवादीहि कबूल करतात; परंतु आचार्य विनोबा भावे यांनीं यांतूनहि एक उत्तर शोधून काढलें आहे. ते एके ठिकाणीं म्हणाले,

" कांहीं लोक आम्हांला विचारतात, ' आतां अहिंसेचें काय होणार ? या परिस्थितींत अहिंसेचा काय उपयोग होणार ?' आम्ही त्यांना म्हणतों, ' अरे बाबांनो ! देशाच्या या संकटकाळीं लोकांनीं अहिंसेचा आश्रय केला नाहीं,

तर देशांत दंगे-मारामाऱ्या होतील. आजवर कोठें मालक-मजूर संघर्ष चालू असे तर कोठें हिंदुमुसलमानांचे दंगे चालत; आणि जागजागीं गोळीबार होत. हें सारें तुम्हीं पाहिलें होतें ना? त्याचा अर्थ काय? त्या साऱ्या गोष्टी आतां या वेळीं तुम्ही कराल काय?' लोक म्हणतात, 'छेः छेः! या वेळीं असलें कांहीं आम्ही करणार नाहीं.' मग त्याचा अर्थ काय? ही अहिंसा झाली कीं हिंसा? मोठी विचित्र गोष्ट आहे! ज्या अहिंसेच्या आधारें सारा देश एक होऊं शकतो व थोडीशी फौज आघाडीवर धाडावी लागते, तिला कांहीं महत्त्वच नाहीं? इतकें असूनहि अहिंसेची कांहीं जरूर नाहीं असें मानावयाचें, म्हणजे किती विचित्र गोष्ट आहे!"*

एखाद्या देशावर परचक्र आलें कीं त्या देशांतील लोक आपसांतील मतभेद बाजूला सारून एक होतात, अंतर्गत शांतता राखण्यासाठीं स्वयंस्फूर्तीनें पुढें येतात, आणि सारें सामर्थ्य आक्रमक शत्रूविरुद्ध एकवटतात हा तर साऱ्या जगाचा आजवरचा अनुभव आहे. त्याच्याशीं हिंसा-अहिंसेचा प्रत्यक्ष असा कांहीं संबंध नसतो. रशिया-चीनसारख्या लाल साम्राज्यवादी देशांतहि तीच स्थिति असते. जर्मनी-जपानसारख्या हुकूमशाही देशांतहि तीच स्थिति होती आणि इंग्लंड-फ्रान्ससारख्या लोकशाही देशांतहि याहून वेगळी स्थिति नव्हती. यांपैकीं एकाहि राष्ट्रानें या मुद्यावर अहिंसेचा विजय झाल्याची प्रौढी कधीं मिरविली नाहीं. तेव्हां भारतांत शांतता राहिली ह्या गोष्टीचा अहिंसेशीं कांहीं संबंध नसून आक्रमकाचा मुकाबला करण्याची प्राणवान् जनतेची नैसर्गिक प्रेरणाच तिच्या मुळाशीं होती. अर्थात् त्यावरून अहिंसेच्या भक्तांनीं त्यांना अनुकूल असे निष्कर्ष काढले व त्यांतून समाधान मिळविलें, तर त्याबद्दल इतरांनीं वाईट वाटून घेण्याचें कांहींच कारण नाहीं! परंतु आपण शांततावादी आहोंत, अहिंसक आहोंत, म्हणून इतरांपेक्षां श्रेष्ठ आहोंत असा ब्राह्मणी अहंकार जर गांधीवादी मंडळी बाळगतील तर ब्राह्मणांचें जें झालें तेंच त्यांचेंहि होईल. आपण मांसमच्छर खात नाहीं, सोवळें-ओवळें, शिवाशीव पाळतों, सात्त्विक जीवन आचरतों, तेव्हां आपण इतरेजनांहून वेगळे व श्रेष्ठ आहोंत, असा अहंकार ब्राह्मणांना ज्या दिवशीं झाला त्याच दिवशीं त्यांच्या

* मुर्शिदाबाद (पश्चिम बंगाल) येथें ता. १० डिसेंबर १९६२ रोजीं दिलेलें भाषण. 'भूदानयज्ञ': २१-१२-६२.

अध:पातास सुरुवात झाली. आमच्या देशाचे नेते पंडित जवाहरलाल नेहरू यांची शांततावाद्याची भमिका इतर देशांना अशीच सोवळेपणाची व अहंकाराची वाटली. त्यामुळें त्यांनीं निष्कारणच विरोध ओढवून घेतला. गांधीवाद्यांनीं आपण अहिंसेचे पाईक आहोंत आणि म्हणून इतरेजनांपासून वेगळे व श्रेष्ठ आहोंत, असा आव आणला तरी लोक त्यानें दबत नाहींत, उलट तेच जनतेपासून दूर जातात आणि तिच्या उपहासाला पात्र होतात. तटस्थ राष्ट्रांच्या कोलंबो परिषदेला कसेंहि करून समेट घटवून आणण्याची जी विनंती गांधीवाद्यांच्या वतीनें श्री जयप्रकाश नारायण व श्री शंकरराव देव यांनीं केली ती भारतांतील लोकांना मुळींच आवडली नाहीं, या एकाच गोष्टीवरून देशाचें मत व गांधीवाद्यांची विचारसरणी हीं एका दिशेनें जात नसल्याचें दिसून आलें आहे. अर्थात् कुणा तत्त्वनिष्ठानें केवळ जनतेला आपलें मत आवडत नाहीं म्हणून तें बदलावें, असें सांगण्याचा यांत हेतु नाहीं; फक्त वस्तुस्थितीचें निर्देशन करण्यासाठींच हा उल्लेख केला आहे.

समाजामध्यें तात्कालिक आवश्यकतेच्या गोष्टी सांगणारे व आचरणांत आणणारे लोक जसे हवे असतात तसेच शाश्वत मूल्यांच्या गोष्टी सांगणारे व आचरणारे साधुपुरुषहि हवे असतात, कारण त्यांच्या जीवनाकडे पाहूनच सामान्य जनता सांस्कृतिक विकासाच्या पायऱ्या चढत असते. परंतु शाश्वत मूल्यांचें आचरण केल्यानें तात्कालिक जीवनाचाच नाश होण्याचा धोका निर्माण झाला तर त्या वेळीं त्या मूल्यांना तात्पुरता रामराम ठोकणेंच योग्य ठरतें असें म्हणावें लागतें.

गांधी स्मारकनिधीची भूमिका :

गांधीवाद्यांच्या गांधीवादाचा विचार करतांना गांधी स्मारकनिधीच्या भूमिकेचाहि विचार करणें क्रमप्राप्त आहे. गांधीजींच्या नांवानें जमविलेल्या दहा-बारा कोटि रुपयांचा निकाल कसा लावावा हेंहि ज्यांना गेल्या बारा-पंधरा वर्षांत उमगूं शकलेलें नाहीं त्या मंडळींकडून देशाच्या रक्षणाच्या बाबतींत कांहीं विशेष मार्गदर्शन मिळूं शकेल अशी अपेक्षा करणें म्हणजे स्वत:च्या कर्तबगारीनें कोटयवधि रुपये मिळविलेल्या एखाद्या धनिकाच्या निर्बुध्द व निष्क्रिय विधवेकडून धनप्राप्तीच्या बाबतींत मार्गदर्शनाची अपेक्षा

करण्यासारखेंच आहे. तरीपण देशांतील कांहीं थोर गणले जाणारे विचारवंत या संस्थेशीं संबध्द असल्यामुळें आणि तिच्याजवळ संपतां न संपणारा पैसा असल्यामुळें या विषयासंबंधीं त्या संस्थेचें अधिकृत मत जाणून घेणें या संदर्भांत उचित होईल. मुंबईजवळील बोरिवलीच्या कोरा केंद्रांत निधीचे अध्यक्ष श्री रंगराव दिवाकर यांच्या अध्यक्षतेनें गांधी स्मारकनिधीचे प्रांतिक अध्यक्ष व चिटणीस यांची जी परिषद् ता. १५ व १६ नोव्हेंबर १९६२ रोजीं भरली होती, तिच्या वतीनें एक निवेदन काढण्यांत आलें होतें. तें संपूर्ण निवेदन पुढें दिलें आहे.

या निवेदनाचा मथितार्थ असा कीं, "चीनच्या सरकारनें भारतावर केलेलें आक्रमण हें एक क्रूर व असमर्थनीय कृत्य आहे. त्याचा प्रतिकार करण्यासाठीं आपलें लष्करी सामर्थ्य एकवटण्याखेरीज भारताला अन्य मार्ग नव्हता. गांधी स्मारक निधि ही संस्था गांधीजींनीं दाखवून दिलेल्या विधायक कार्यक्रमाच्या द्वारें लोकांमध्यें अहिंसक सामर्थ्य निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु आज देशासमोर उभ्या असलेल्या संकटाला अहिंसक मार्गानें तोंड देण्याइतकें सामर्थ्य ती निर्माण करूं शकलेली नाहीं. म्हणून हिंसा व युध्दें यांच्या द्वारें केव्हांहि शांतता प्रस्थापित होऊं शकणार नाहीं, अशी या संस्थेची ठाम श्रध्दा असली तरी भारत सरकारनें आक्रमणाला सशस्त्र प्रतिकार करण्याचें जें धोरण हातीं घेतलें आहे, त्यांत जनतेकडून देशप्रेमानें मिळणाऱ्या सहकार्याची आम्ही कदर व स्वागत करतों. तरीपण सध्यांच्या युध्दप्रयत्नांत अडथळा न आणतां आक्रमणाला अहिंसक प्रतिकार कसा करतां येईल याचा विचार अहिंसक प्रतिकारावर श्रध्दा असलेल्या व विधायक कार्य करणाऱ्या मंडळींनीं करावा असें आम्हांला वाटतें. असा अहिंसक प्रतिकार संघटित करण्यास ही चांगली संधि आहे. या दिशेनें काम करणाऱ्या मंडळींशीं सहकार्य करण्यास ही संस्था उत्सुक आहे."

मूळ निवेदन असें आहे :–

STATEMENT issued by the Conference of Chairmen and Secretaries of the State Boards of the Gandhi Smarak Nidhi, held on 15 and 16 November 1962 at Kora Kendra, Borivli, Bombay, and

presided over by Sri. R. R. Diwakar, Chairman of the Nidhi.

The people of the world are today, more than ever, hungry for peace. They are trying to find peaceful methods for solving their problems and for achieving progress.

India, by her long tradition and on account of the undisputed leadership of Gandhiji in recent times, during her historic struggle for freedom, has always tried to exert for peace and adopt peaceful ways.

The people of India and her Government have been following a defensive, non-aggressive and friendly policy towards all neighbours and nations and have adopted Panchsheela as the foundation of her foreign policy. But in spite of all efforts to solve her border problem with China, and even in the midst of such efforts, China has led her armies in a large-scale mass-attack on India's northern frontiers and is trying to force her will on India.

This aggression by the Government of China cannot be called anything but wanton and wholly unjustifiable.

In the circumstances, the only way our Government could accept this military challenge was to mobilise her armed strength and resist the aggressor with all her might and defend our sacred and time-honoured frontiers. It is highly commendable that the whole nation has rallied to the call of our Prime Minister and is trying to strengthen the forces of resistance against the aggressor.

The Gandhi Smarak Nidhi has been following the constructive programme as laid down by Gandhiji and through it to build in its own humble way the non-violent strength of the people and to lead us to a social order based on non-violence and non-exploitation. It is obvious that it has not been possible either for the Nidhi

or for anyone else to build up, in a non-violent manner. adequate strength to face the aggressor in a crisis such as the one in which we find ourselves.

Therefore, while we continue to have faith in the principle that violent and destructive wars and hatred of one another can never usher in the era of peace, we welcome and fully appreciate the patriotic response of the people to the call made by our Government to organise armed resistance to aggression.

We, however, see that this is an opportunity for all those who believe in non-violent resistance and who have been working in the constructive field to get together and organise all kinds of non-violent resistance such as does not come into conflict with the efforts which are already being made, so that the nation's full strength may be able to resist and throw back the foreign forces which are threatening our very freedom and peaceful existence.

With this in view, the conference proposes to work in coordination and full cooperation with all who stand for such non-violent resistance and draw up a plan of work among the people, especially in the border areas and also in the whole of the country, which would keep up the morale, promote self-help and keep peace, and so serve the people as to increase their power of resistance and their will to fight for freedom even to death.

एक आदर्श व अनुकरणीय कार्यक्रम :

गांधीवादी मंडळींनीं हातीं घेतलेल्या ज्या कार्यक्रमांचा येथवर विचार करण्यांत आला त्यांत सर्वसामान्य लोकांना आकर्षून घेईल किंवा बुद्धिमंतांच्या बुद्धीला प्रभावित करील असें फारसें नाहीं. परंतु त्यांनीं आंखलेला एक कार्यक्रम मात्र सर्वच पक्षांना व व्यक्तींना आदर्श व अनुकरणीय वाटेल असा आहे. तो म्हणजे सरहद्दीवरील प्रदेशांत जाऊन तेथील जनतेला जागृत करण्याचा.

दिनांक १९ ते २२ नोव्हेंबर (१९६२) पर्यंत वेडछी (गुजरात) येथें चाललेल्या अखिल भारत सर्व सेवा संघाच्या प्रबंध समितीच्या बैठकींत जो भावी कार्यक्रम स्वीकृत करण्यांत आला त्यांत एक कलम असें होतें :–

"देशाच्या सरहद्दीवरील आसाम, बिहार व उत्तराखंड या तीन प्रांतांत शांतिसेनेच्या आघाड्या उघडण्यांत याव्यात. तेथें शांतिसैनिकांनीं गांवोंगांवीं जाऊन जनतेला निर्भय बनवावें, ग्रामस्वावलंबन शिकवावें आणि आक्रमण झाल्यास आक्रमकांशीं असहकार करण्याचा प्रयत्न करावा."

या कार्यक्रमाची पूर्वतयारी म्हणून श्रीमती मार्जरी साइक्स, श्री रा. कृ. पाटील, श्री नारायण देसाई व श्री राधाकृष्ण यांनीं सम्मेलनानंतर ताबडतोब नेफा विभागांत जावें आणि उत्तराखंड भागासाठीं श्री ब्रह्मदत्त वाजपेयी व श्री करणभाई यांनीं योजना बनवावी, असें ठरविण्यांत आलें.

यासंबंधीं बोलतांना एक जुने गांधीवादी पुढारी श्री धीरेन्द्रभाई मजुमदार म्हणाले, "आपण सरहद्दीवरील प्रदेशांत दीर्घकाळपर्यंत बसून खिस्ती मिशनऱ्यांप्रमाणें काम केलें पाहिजे." गांधी स्मारक निधीचे मंत्री श्री श्रीकान्त-भाई यांनीं अशी सूचना केली कीं, दोनशें स्त्रीपुरुष कार्यकर्त्यांनीं यापुढील दहा वर्षें सीमेवरील प्रदेशांतील आदिवासींची सेवा करण्यांत घालविलीं पाहिजेत.

त्यानंतर १५ व १६ डिसेंबर रोजीं सेवाग्राम येथे भरलेल्या संयुक्त परि-षदेंत सीमाप्रदेशांतील परिस्थितीचें अध्ययन करण्यासाठीं गेलेल्या मंडळींनीं आपापले अहवाल सादर केले. खादी-ग्रामोद्योग-आयोगानें (कमिशननें) सीमावर्ती प्रदेशांत खादी ग्रामोद्योगाचें कार्य चालविणें कितपत शक्य आहे, हें पाहण्यासाठीं नेमलेल्या समितीचाहि अहवाल वाचण्यांत आला; आणि सीमे-वरील प्रदेशांत करावयाच्या विधायक कार्यक्रमाची योजना बनविणें व ती अमलांत आणणें यासाठीं पुढील सभासदांची एक संयोजन समिति (को-ऑर्डि-नेटिंग कमेटी) नेमण्यांत आली :–

सर्वश्री जयप्रकाश नारायण, श्रीकांतभाई, वैकुंठलाल मेहता, ढेबरभाई, नारायण देसाई, करणभाई, जी. रामचन्द्रन्, मनमोहन चौधरी, राजलक्ष्मी बहन व राधाकृष्ण (मंत्री).

श्री वैकुंठभाई मेहतांनीं देशांतील कार्यकर्त्यांना उद्देशून केलेल्या आवाहनांत म्हटल्याप्रमाणें, "चीननें भारतावर जें पाशवी आक्रमण केलें व जोरांत चालू

ठेवलें आहे त्याचा विचार करतां कांगडा व कुलू खोऱ्यांपासून अलमोडचा-पर्यंतच्या हिमालयीन प्रदेशाला एक नवीन महत्त्व प्राप्त झालेलें आहे.

"हे प्रदेश चिनी आक्रमणापासून अद्यापि मुक्त आहेत. तेथील लोकसंख्या फार विरळ आहे. या प्रदेशांतील अत्यंत उंच भागांत राहणाऱ्या लोकांकडे भारत सरकार व संबंधित राज्यसरकारें यांनीं विशेष लक्ष देण्यास नुकतीच सुरुवात केली आहे. त्यांचें माध्यम आहे सामुदायिक विकासयोजना व प्रादेशिक विकास कामें."

या प्रदेशांतील धट्टेकट्टे व कष्टाळू लोक आजपर्यंत लोकरीचाच उद्योग करीत आले आहेत. त्या कामीं त्यांना तिबेटकडून मिळणाऱ्या लोकरीवर अवलंबून राहावें लागत असे. परंतु आतां चीननें तिबेट व्यापल्यामुळें तिकडून येणारी लोकर बंद झाली असून, या हिमालयाच्या लेकरांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली आहे. त्यांना लोकरीचा ग्रामोद्योग पुन: मिळवून देण्याची धडपड सर्व सेवा संघ व खादी-ग्रामोद्योग कमिशन या संस्थांनीं चालविली आहे. तिचें वर्णन करून श्री वैकुंठभाई आपल्या पत्रकांत म्हणतात, "त्या प्रदेशांत उपलब्ध असलेल्या स्थानीय कच्च्या मालाचा उपयोग करून लोकरी खादी व तेथील परिस्थितीला अनुकूल असणारे इतर ग्रामोद्योग यांच्या विकासाचा एखादा समग्रतायुक्त कार्यक्रम हातीं घेतला गेल्यास तेथील लोकांचें आर्थिक जीवन पुष्कळच सुदृढ व संपन्न बनेल आणि आपल्या विस्तृत सीमांच्या संरक्षणासाठीं अत्यंत आवश्यक असलेली स्वसंरक्षणाची महत्त्वपूर्ण जाणीव, सामाजार्थिक सुरक्षा व समृद्धि यांच्या द्वारें तेथील स्थानिक जनतेंत निर्माण होईल. हे ग्रामोद्योग व अशाच प्रकारचीं इतर कामें तेथें सुरू झाल्यास तेथें समृद्धि व सामाजार्थिक सुरक्षा निर्माण करणें सहज शक्य होईल. हिमालयाच्या परि-सरांतील जनतेचें जीवन सुदृढ व संपन्न बनेल तरच ती आपली इच्छाशक्ति व नैतिक बळ प्रकट करूं शकेल आणि बाहेरून होणाऱ्या प्रत्यक्ष आक्रमणाला खंबीरपणें तोंड देऊन देशाच्या रक्षणाची आपली जबाबदारी यशस्वीपणें पार पाडूं शकेल. निर्णायक व अंतिम विजयासाठीं आमची सेना जीं पावलें टाकील तीं यशस्वी ठरण्याच्या कामीं हिमालयीन जनतेच्या या इच्छाशक्तीचें व नैतिक सामर्थ्याचें महत्त्व फार मोठें व अत्यंत आवश्यक आहे."

या दृष्टीनें सर्व सेवा संघ, गांधी स्मारक निधि व खादी-ग्रामोद्योग आयोग

यांनीं कामास सुरुवातहि केली आहे, ही मोठी आशास्पद व अभिनंदनीय गोष्ट आहे. तात्त्विक चर्चेचें एक महत्त्व असतें हें मान्य करूनहि शेवटीं प्रत्यक्ष कामावरूनच त्या त्या विचारप्रणालीचें मूल्यमापन होत असतें, हें विसरतां कामा नये. चिनी आक्रमणामुळें गांधीवादी कार्यकर्त्यांना प्रत्यक्ष कामाची प्रेरणा मिळाली व त्याप्रमाणें त्यांनीं कांहीं भरीव काम येत्या कांहीं दिवसांत करून दाखविलें तर गांधीवाद्यांसंबंधींचे बरेचसे गैरसमज दूर होतील आणि गांधीवादाच्या अहिंसक निखाऱ्यावरील राख झाडली जाईल यांत मुळींच शंका नाहीं; तसें घडलें नाहीं तर मात्र १९४२ चे क्रान्तिवीर व थोर विचारक श्री अच्युतराव पटवर्धन यांनीं म्हटल्याप्रमाणें, "गांधीजींनीं जें कांहीं केलें व जगाला दिलें त्याचा नाश करण्याच्या बाबतींतील गुन्हेगार गांधी-विरोधक नसून गांधीभक्तच आहेत; कारण कोणाहि महापुरुषाच्या विचारांची अमलबजावणी विवेकपूर्वक आणि गतिशील समाजांतील परिवर्तनें लक्षांत घेऊन केली गेली तरच त्या विचारांचा विकास व प्रसार होतो. गांधीजी सदैव याच गोष्टीवर जोर देत असत."* असेंच भावी पिढ्या गांधीवादाबद्दल म्हणतील यांत शंका नाहीं !

* गोरखपूर (उत्तरप्रदेश) येथें गांधी स्वाध्याय संस्थेंत ता. ९ सप्टेंबर १९६२ रोजीं केलेल्या भाषणांतून.

['भूदानयज्ञ' : १२–१०–६२]

५

पुढें काय ?

युद्धाची संभाव्य व्याप्ति :

हल्लेखोर चीननें एकतर्फी युध्दतहकुबी करून आपणच शांततेचे खरे पुरस्कर्ते आहोंत असा जरी आव आणला असला तरी त्याच्या या मानभावीपणावर स्वतः त्याचाच विश्वास बसणार नाहीं, मग इतरांची गोष्ट दूरच! शांततेसाठीं माघार घेत असतांनाच त्यानें ज्या धमक्या देण्यास सुरुवात केली आहे, ७ नोव्हेंबर १९५९ ची प्रत्यक्ष ताबारेषा आधारभूत मानून दोन्ही देशांनीं त्या रेषेच्या दोहों बाजूस २० किलोमीटर (१२॥ मैल) पर्यंत मागें हटण्याची आपली अट भारतानें मान्य न केल्यास युध्दतहकुबी अस्तित्वांत राहणार नाहीं, अशी जी दमदाटी चालू ठेवली आहे, तिचा विचार करितां, चीन सुखासुखीं किंवा सहजासहजीं भारतीय हद्दींतून बाहेर जाईल असें वाटत नाहीं. योग्य संधि मिळतांच तो पुनः जय्यत तयारीनिशीं व अधिक प्रखरपणें भारतावर हल्ला केल्याशिवाय राहणार नाहीं, हें सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट आहे.

परंतु यापुढील चिनी हल्ला कसा असेल? चुशूल ते वॉलाँग (लडाख ते नेफा) या २४०० मैल सरहद्दीवर तो आतांप्रमाणेंच पुनः हल्ला चढवील? कीं एके ठिकाणीं आपलें सामर्थ्य केंद्रित करील ?

खरी लढत लडाखसाठीं :

आमच्या मतें यापुढें चीन व भारत यांच्यांतील खरी लढत किंवा निकाली कुस्ती ही नेफामध्यें होणार नसून लडाखमध्येंच होणार आहे. याचें कारण

असें कीं, लष्करी दृष्टचा लडाख हा अत्यंत मोक्याचा प्रदेश आहे. तेथें भारत, पाकिस्तान, अफगाणिस्तान, रशिया व चीन या पांच देशांच्या सरहद्दी एकमेकांना भिडतात. त्यामुळें जें राष्ट्र त्या भागावर आधिपत्य ठेवील त्याच्या जरबेंत इतर देश राहूं शकतील. सध्यां लडाखसमोर काश्मीरच्या पाकिस्तानव्याप्त गिलगिट भागांत अमेरिकेनें प्रचंड विमानतळ बांधून आपलें सामर्थ्य तेथें एकवटलें आहे. त्यांच्यामुळें रशिया व चीन या दोन्ही देशांना धोका निर्माण झाला असल्यास आश्चर्य नाहीं. म्हणून त्याच्या समोर लडाखमध्यें तसेच विमानतळ बांधून चीन त्या बाजूची आपली तटबंदी भक्कम करूं इच्छित आहे. त्यासाठीं त्याला लडाख हवें आहे. १ डिसेंबर १९६२ पासून चीननें आपल्या फौजा मागें घेण्यास सुरुवात केल्याचें जाहीर झालें आहे व त्याप्रमाणें नेफांतील बरेंच चिनी सैन्य कित्येक ठिकाणीं मॅकमहोन रेषेच्याहि पलीकडे गेलें असल्याच्या बातम्या येत आहेत. (माघारीं जाणाऱ्या चिनी सैन्यानें ता. १४ जानेवारी १९६३ रोजीं तावांग सोडल्याचें वृत्त आलें आहे.) परंतु लडाख आघाडीवर मात्र चिनी सैनिक आपले पाय भक्कमपणें रोंवून उभे आहेत. पंतप्रधान नेहरूंनीं म्हटल्याप्रमाणें चिनी सेना नेफा विभागांत मॅकमहोन रेषेच्या पलीकडे जातीलहि; परंतु खरा प्रश्न लडाखमध्यें त्यांनीं व्यापिलेल्या मुलुखाचा आहे. तो मुलूख ते सहजासहजीं सोडतील असें दिसत नाहीं. किंबहुना त्या मुलुखावरील भारताचें लक्ष दुसरीकडे वेधावें व तेथील सैनिकी दडपण कमी व्हावें म्हणूनच चीननें नेफा विभागांत दुसरी आघाडी उघडली होती, असें मानण्यास सबळ पुरावा आहे. भारत म्हणतो कीं, चीननें ८ सप्टेंबर १९६२ च्या सीमारेषेपर्यंत मागें जावें, आणि चीन म्हणतो, आम्ही त्याच्याहि पूर्वीं तीन वर्षें म्हणजे ७ नोव्हेंबर १९५९ रोजीं जेथें होतों तेथें जाण्यास तयार आहोंत. तरीहि तडजोड होत नाहीं. याचें इंगितहि या लडाख आघाडींतच आहे.

१९५९ च्या नोव्हेंबर महिन्यांत चीन लडाखमध्यें खूपच पुढें आलेला होता. म्हणून त्याला आतां त्या वेळची ती ताबारेषा भारताकडून राजरोसपणें मान्य करवून घ्यावयाची आहे. युद्धानें, बळजबरीनें भारताचा मुलूख बळकावावयाचा आणि धाकदपटशा दाखवून त्यावर तहनाम्याच्या रूपानें सक्तीच्या मान्यतेचें शिक्कामोर्तब करून घ्यावयाचें व जगाकडून भलेपणा मिळवावयाचा, अशी

ही चिनी क्लृप्ति आहे. याच्या उलट भारतानें लडाखमध्यें आपली पीछेहाट थांबवून १९५९, १९६० व १९६१ मध्यें मोठ्या नेटानें अधिक आंत प्रवेश करून सुमारें ४० ठाणीं स्थापन केलीं होतीं. हेतु हा कीं, चिनी सैनिकांना जोराचें युद्ध केल्याशिवाय पुढें सरकतां येऊं नये. आगगाडीच्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत एकाच बाकावरील उतारू प्रत्यक्ष भांडणाचा प्रसंग न येऊं देतां हलकें हलकें दुसऱ्याला मागें रेटून स्वतःसाठीं जागा करून घेतात, तसेंच कांहींसें तेथें चाललें होतें. आपली युक्ति पुष्कळ अंशीं सफलहि झाली. कारण लडाखमध्यें चिन्यांना फार पुढें येतां आलें नाहीं. तेथें प्रथमपासून आपण सावध असल्यामुळें नेफाप्रमाणें 'पळतां भुई थोडी' अशी स्थिति झाली नाहीं. तेथें आपण चिन्यांचा अगदीं 'डटकर मुकाबला' केला. अर्थात् चिन्यांना मानवी जीविताची कांहींच पर्वा नसल्यामुळें त्यांनीं प्रचंड प्रमाणावर आपले सैनिक नेफाप्रमाणेंच लडाखच्या आघाडीवरहि ओतले व त्यामुळें आपल्या सैन्याला कांहीं ठिकाणीं बरेंच मागें सरकावें लागलें. परंतु आपण अधिक तयारी केल्यास चिन्यांना पुनः पूर्वींच्या रेषेपर्यंत मागें रेटूं शकूं, असा लडाखमधील सैनिकांना आत्मविश्वास वाटतो. तरीपण शक्यतोंवर शांततेच्या मार्गानें हा वाद मिटावा, त्यांतून जागतिक युद्ध भडकूं नये, म्हणून भारतानें ८ सप्टेंबर १९६२ ची सीमारेषा चीनकडून मान्य करवून घेण्याचा आग्रह धरला आहे. तो आग्रह चीननें मान्य केला तर त्यानें ८ सप्टेंबर ते २० नोव्हेंबर १९६२ पर्यंतच्या काळांत व्यापलेला सुमारें २५०० चौरस मैलांचा प्रदेश त्याला भारताच्या स्वाधीन करावा लागेल. अक्साई चीन, लडाख व नेफा विभाग वगैरे मिळून भारताच्या एकूण ५५ हजार चौरस मैल भूभागावर चीन आपला हक्क सांगत असून त्यापैकीं सुमारें १४५०० चौरस मैल प्रदेश त्यानें आपल्या घशांत घातलाहि आहे. जमेल तेव्हां लूटमार करावयाची आणि जरूर तेव्हां तहाची बोलणीं सुरू करावयाचीं असें अत्यंत धूर्त व संधिसाधू धोरण चीननें प्रथमपासूनच अवलंबिलेलें असल्यामुळें आतां गिळलेल्या मुलुखाचें रवंथ करण्यासाठीं चढाईनंतरचीं तहाचीं बोलणीं त्यानें सुरू केलीं आहेत. सहा आफ्रो-आशियाई तटस्थ राष्ट्रांच्या कोलंबो परिषदेंत या बाबतींत काय निर्णय घेतला गेला आहे तें अद्यापि (ता. १२ जानेवारी १९६३ पर्यंत) गुलदस्तांत आहे. तरी परंतु ८ सप्टेंबर १९६२ च्या ताबारेषेपर्यंत चीननें मागें जावें

आणि ७ नोव्हेंबर १९६२ च्या ताबारेषेपर्यंत भारतानें मागें सरकावें व या दोन ताबारेषांमधील प्रदेश आघात-निवारक (बफर) प्रदेश म्हणून ठेवावा, त्यांत कोणींहि आपलें सैन्य घुसवूं नये, अशा प्रकारची योजना या परिषदेनें स्वीकृत केली असावी, असा अंदाज आहे.* या योजनेला चीनची मान्यता असावी, व पराभूत भारताला नाइलाजानें तिचा स्वीकार करावा लागेल अशी निरीक्षकांची कल्पना आहे. याचा अर्थ सध्यां कांहीं दिवस तरी चीन-भारत आघाडीवर सामसूम राहील अशी अपेक्षा आहे.

कांहीं जाणकारांच्या मतें चीननें केलेली एकतर्फी युद्धबंदी, सैन्याची माघार व तहाचीं बोलणीं हा सारा एक कुटिल डाव असून हिंवाळा संपेपर्यंत काळ काढण्याची त्याची ती युक्ति आहे. हिंवाळा कमी होतांच (एप्रिल-मे मध्यें) तो पुनः दुप्पट जोरानें धडक मारील आणि विशेषतः लडाख भागांत तो आपलें सारें बळ एकवटून हिंदी सैन्याला त्या भागांतून हुसकून लावील. त्यासाठींच त्याची पाकिस्तानशीं हातमिळवणी चालू आहे; आणि भारतद्वेषानें आंधळ्या बनलेल्या पाकिस्तानला आपण आपल्या हातांनीं आपला भावी शत्रु आपल्या घरांत आणीत आहोंत, हें कळेनासें झालें आहे.

भारतीय शहरांवर बॉंबवर्षाव :

येत्या उन्हाळ्यांत चीननें खरोखरींच मोठ्या प्रमाणावर पुनः चढाई केली तर भारतीय सेनेचें लडाखवरील दडपण कमी व्हावें म्हणून तो पूर्वीप्रमाणें नेफा विभागांतच घुसेल असें समजण्याचें कारण नाहीं. भारतीय जनतेचें मनोधैर्य (morale) खच्ची व्हावें म्हणून दिल्ली, कलकत्ता, मुंबई, मद्रास वगैरे मोठमोठ्या भारतीय शहरांवर बॉंबवर्षाव करण्यासहि तो मागेंपुढें पाहणार नाहीं. दुसऱ्या महायुद्धांत जर्मनीनें धक्का देण्याच्या या तंत्रानें (shock-technic नें) फ्रान्सला हां हां म्हणतां पराभूत केलें; कारण फ्रेंच जनतेचें मनोधैर्य फारच कच्चें होतें. याच्या उलट इंग्लिश व रशियन जनतेचें मनोधैर्य खंबीर असल्यामुळें शत्रूचे कितीहि बॉंबहल्ले झाले, आणि स्वतःची कितीहि भयंकर प्राणहानि किंवा वित्तहानि झाली तरी ती डगमगली नाहीं, जेरीस आली नाहीं व शेवटीं तीच विजयी झाली.

* पाहा : 'भूमिका'

तेजपूरचा अनुभव :

या बाबतींत आपण कोठें आहोंत याची चांगली कल्पना नेफा-आसाम सरहद्दीवरील सुमारें ६० हजार लोकवस्तीच्या तेजपूर या शहरांत १९ नोव्हेंबर १९६२ रोजीं उडालेल्या धमालीवरून चांगली येऊं शकेल. सरकारी व लष्करी अधिकारीच जेथें घाबरून पळूं लागले तेथें सामान्य जनतेची काय अवस्था होणार? * म्हणून असा प्रसंग आज ना उद्यां भारतांतील कोणत्याहि शहरावर येण्याची शक्यता गृहीत धरून आपण आपल्या संरक्षणाची योजना आंखली पाहिजे. आपण सैन्यांत शिरलें पाहिजे, उत्पादन वाढविलें पाहिजे, आपलें काम चोख रीतीनें बजावलें पाहिजे, सैनिकांसाठीं गरम कपडे व खाद्य-पदार्थ पाठविले पाहिजेत, अन्न, पाणी व वीज काटकसरीनें वापरून त्यांत बचत केली पाहिजे, वगैरे साऱ्या गोष्टी खऱ्या आहेत, परंतु त्या सर्वांहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपलें मनोधैर्य काळ्या खडकासारखें भक्कम, अभंग, स्थिर राहिलें पाहिजे, ही होय.

मनांत गोंधळ नको !

चीन-भारत युद्धाचा अनुभव असलेल्या एका लष्करी अधिकाऱ्याशीं संरक्षणासंबंधीं चर्चा करतांना आघाडीवरील सैनिकांची एक मानसिक अडचण मला कळली. तो अधिकारी म्हणाला, "आम्ही एकीकडे शत्रूशीं निकरानं लढत असतों, तर दुसरीकडे आमचं मन दुसऱ्याच एका विवंचनेंत

* सर्वोदयी नेते श्री रा. कृ. पाटील जनतेच्या नीतिधैर्याबद्दल म्हणतात :— "सर्वसामान्य लोकांचें नीतिधैर्य मात्र चांगलें दिसलें. ४०-५० मैलांवर चिनी सैन्य येऊनहि लोकांत कोठें भीतीचें वातावरण आढळलें नाहीं. खेड्यांत तर पूर्वीसारखीच स्थिति दिसली. मोठे व्यापारी, चहाच्या मळ्यांचे मालक, व इतर पैसेवाले पळाले. त्यामुळें आसामांत त्यांच्याविरुध्द वातावरण निर्माण झालें आहे. पण एवढी गोष्ट सोडली तर शहरांत सुध्दां सर्व व्यवहार सुरळीत चाललेले दिसत होते. लोकांनीं धैर्य व शांतता राखली, एवढेंच नव्हे तर सरकारला मदत करण्याचे प्रयत्न केले. सदियाजवळ विमानतळाची पट्टी तयार करण्यासाठीं भोंवतालच्या प्रदेशांतून अडीच-तीन हजार लोक स्वेच्छेनें कामासाठीं आले व त्यांनीं मजुरी न घेतां काम केलें."

व्यग्र असतं. ती म्हणजे आमचं हें सारं शौर्य वांया तर जाणार नाहीं ना ? आम्हीं तिकडे मोठ्या जिद्दीनं लढावं आणि इकडे पंडितजींनीं शत्रूशीं समेटाचीं बोलणीं सुरू करून आमच्या उत्साहावर पाणी ओतावं ! काश्मीरच्या बाबतींत तेंच झालं. चीनच्या बाबतींतहि तसंच होणार नाहीं ना, अशी भीति पदोपदीं वाटत असते." त्याच्या या उद्गारांनीं मला इतिहासांतले कांहीं प्रसंग आठवले. शहाजी राजे अहमदनगरच्या गादीच्या रक्षणासाठीं लढत होते. त्यासाठीं त्यांनीं निजामशाहाच्या घराण्यांतील एका छोटया मुलाला मुर्तजा निजामशाह या नांवानें सिंहासनावर बसविलें व त्याच्या नांवानें ते राज्य चालवूं लागले. त्या वेळीं शाहजहानानें निजामशाहीवर हल्ला केला. तेव्हां मुर्तजा निजामशाहाला बरोबर बाळगून शहाजी राजांना पळापळी करावी लागली; कारण तें पोर हातांतून गेलें तर सारेंच ऑफस् व्हायचें ! आज आपल्या देशांत पंडित जवाहरलाल नेहरू यांची स्थिति कांहींशी मुर्तजा निजामशाहासारखी झालेली आहे. त्यांना शत्रूबद्दल केव्हां प्रेमाचें भरतें येईल आणि ते आमच्या सैनिकांना शस्त्रें खालीं ठेवण्यास सांगतील, याचा कोणाला भरंवसा वाटत नाहीं. त्यामुळें एका हातानें पंडितजींचा निर्धार कायम ठेवण्याची धडपड करावयाची व दुसऱ्या हातानें शत्रूच्या आक्रमणाला तोंड द्यावयाचें, अशी आमची स्थिति आहे. त्यामुळें श्री कृष्ण मेनन हे पुनः मंत्रिमंडळांत येऊं शकतील असें पंडितजींनीं वृत्तपत्रकारांशीं बोलतांना सूचित केलें कीं, आमच्या सैनिकांचे हातपाय लटपटूं लागतात व असैनिक नागरिकांचा युध्दप्रयत्नांच्या बाबतींतील उत्साह थंड होऊं लागतो.

ही परिस्थिति पालटली पाहिजे. आमचे शत्रुमित्र कोण आहेत हें ओळखून पंडितजींनीं आपलें मन स्पष्ट ठेवलें पाहिजे, त्यांत गोंधळ उडालेला आहे, अशी शंकाहि कोणाला येतां कामां नये. त्याकरितां आतां त्यांनीं अधिक वास्तववादी बनलें पाहिजे. याचा अर्थ चिन्यांना जसा युद्ध-ज्वर चढला आहे, साम्यवादाची नशा चढली आहे, तसा आम्हांलाहि युद्धज्वर चढला पाहिजे असा मुळींच नव्हे; परंतु आम्हांला जागतिक शांतीची नशाहि चढतां कामा नये. जागतिक शांतता राखण्याची जबाबदारी केवळ भारताचीच आहे व त्यासाठीं त्यानें प्रसंगीं अपमान व नुकसानहि सोसलें पाहिजे, हा अहंकार कशाला हवा ? उद्यां कांहीं कारणानें जागतिक युद्ध पेटलेंच तर त्याची झळ

फक्त भारतालाच लागणार नाहीं; ती सर्वांनाच लागणार आहे. मग जागतिक शांततेची काळजी सर्वांनींच करायला नको काय? जागतिक युद्धांत आपलाहि सर्वनाश होईल हें न कळण्याइतका चीन निर्बुद्ध आहे काय? जागतिक अशांततेचें हें भूत फक्त भारताच्या मानगुटीस बसेल असें कां समजावें? म्हणून शांततेची फाजील चिंता करीत न बसतां आम्ही आमचें स्वत्व, आमचा स्वाभिमान यांचीच चिंता वाहिली तर अधिक बरें. तसें झाल्यास उठल्या-सुटल्या आम्हांला धमकावणारा पाकिस्तान व येतां-जातां थप्पड मारणारा चीन हे दोघेहि आमच्या वाटेस जाण्यापूर्वीं शंभर वेळां विचार करतील.

रस्त्यांचें जाळें विणलें पाहिजे :

नेफा आघाडीवरील आपल्या पराभवाचें मुख्य कारण त्या भागांत सैन्य व सामग्री यांच्या वाहतुकीला योग्य असे रस्ते नाहींत, हें होय. या रस्त्यांच्या अभावामुळें आपण आघाडीवरील आपल्या सैनिकांना कुमक पाठवूं शकलों नाहीं. विमानांतून सैन्याची व शस्त्रास्त्रांची वाहतूक करणें अत्यंत खर्चाचें असतें व आपल्याजवळील विमानांची तुटपुंजी संख्या लक्षांत घेतां तशा प्रकारच्या वाहतुकीला आपोआप मर्यादा पडतात. शिवाय डोंगराळ भाग असल्यामुळें मनांत आणलें असतें तरी तेथें विमानें फारशीं उपयोगी पडूं शकलीं नसतीं. चिन्यांनीं गेलीं कित्येक वर्षें लडाख ते नेफा या संपूर्ण सरहद्दी-वर रस्त्यांचें जाळें विणण्याचें काम चालविलें होतें. आजहि त्यांनीं रस्ते बांधण्याचें काम थांबविलेलें नाहीं. आपण मात्र बावळटांप्रमाणें त्यांनीं बांधलेले रस्ते नुसते पाहत आहोंत. यावर असें सांगण्यांत येतें कीं, डोंगराळ प्रदेशांत रस्ते बांधणें फार अवघड व खर्चाचें असतें आणि तो भाग अत्यंत कडक थंड हवेचा असल्यामुळें तेथें काम करण्यास मजूरहि मिळत नाहींत. चिन्यांनीं तिबेटी लोकांना गुलामांप्रमाणें वेठीला धरून राबविलें म्हणून ते रस्ते बांधूं शकले. आपण तसें करूं शकत नाहीं म्हणून आपले रस्ते तयार होत नाहींत. यावर असें उत्तर देतां येईल कीं, दक्षिण भारतांतील मजूर तिकडे नेण्यापेक्षां स्थानिक लोकांतून मजूर तयार करण्याचा पद्धतशीर प्रयत्न आपण केला असता तर एव्हांना आपल्याला त्यांत पुष्कळच यश आलें असतें. डॉक्टर व्हेरियर एल्विनसारख्या मंडळींचा सल्ला मानून आपण ब्रिटिश साम्राज्य-

शाहीचा वारसा पुढें चालविण्यासाठीं सरहद्दीवरील आदिवासींचा प्रदेश हें परदेशी मिशनऱ्यांना धर्मप्रसाराचें मुक्त कुरण बनविलें आणि भारतीयांना तेथें जाण्यास बंदी घातली. त्याचा परिणाम असा झाला कीं, आमचेच लोक आम्हांला परके समजूं लागले. आतां आपण आपल्या या धोरणाचा फेर-विचार करून आसाम व नेफा-नागा प्रदेशांतील जनतेला आपण कुणीतरी वेगळे आहोंत, एकाकी पडलों आहोंत, असें वाटणार नाहीं, इतक्या प्रचंड प्रमाणावर त्या भागाशीं इतर भारतीयांचें दळणवळण वाढविलें पाहिजे. आदिवासी प्रदेशांत लोकवस्ती वाढविली पाहिजे आणि तेथें रस्त्यांचें जाळें विणलें पाहिजे. या कामीं गांधीवादी कार्यकर्ते खूपच मदत करूं शकतील.

साम्यवाद्यांचा नवा साम्राज्यवाद :

इंग्लंड, फ्रान्स, पोर्तुगाल वगैरे पाश्चात्य देशांच्या साम्राज्यवादाला आतां ओहोटी लागलेली स्पष्ट दिसत असून त्यांच्या साम्राज्यवादावर हल्ला करणें म्हणजे नुसती शेपटी वळवळविणाऱ्या मरणोन्मुख सापावर दगड मारण्या-सारखें आहे. आज जगाला खरा धोका आहे विस्तारवादी साम्यवादाचा. तो ताज्या दमानें बिगर साम्यवादी देशांना गिळंकृत करण्यासाठीं पुढें सरसावला आहे. युरोपांतील रशियन साम्यवादाला इतकें अधिक खाद्य मिळालें आहे कीं, एखादें प्रचंड जनावर गिळल्यामुळें अजगराला सुस्ती यावी तशी रशियन अस्वलाला सुस्ती आलेली आहे. परंतु आशियांतील चिनी अजगर मात्र अनेक शतकांची भूक पोटांत घेऊन जागा झाला आहे. त्याला रशियाचा समन्वयवाद मुळींच पसंत नाहीं, त्याबद्दल तो रशियावर अधून-मधून टीकास्त्रहि सोडतो. त्यावरून त्या दोन सुंदोपसुंदांत द्वंद्वयुद्ध सुरू होईल अशी भोळी आशाहि कांहीं मंडळी बाळगून आहेत. परंतु त्या अजगराला भरपूर खायला मिळाल्याखेरीज तो शांत होणार नाहीं, हें भारतानें ओळखलें पाहिजे व त्या दृष्टीनें तयारींत राहिलें पाहिजे. या चिनी अजगराचा (dragon चा) भारताभोंवतीं पडलेला व आंवळत चाललेला विळखा हा या जागतिक साम्य-वादाचाच प्रताप आहे, हें आपण लोकांना पटवून दिलें पाहिजे. एकदां भारताला पोटांत रिचवलें कीं मग संपूर्ण आशिया निमूटपणें उदरस्थ होईल अशी या अजगराची कल्पना आहे. ती खोटीहि नाहीं; आणि म्हणून आपल्या

जन्मापासूनच त्यानें भारताकडे झेंप घेण्यास प्रारंभ केला होता. परंतु आम्हीं तिकडे जाणून-बुजून दुर्लक्ष केलें. आम्ही म्हणजे आमच्या संरक्षणमंत्र्यांनीं; कारण त्या अजगरापासून देशाचें रक्षण करण्याची जबाबदारी त्यांचीच होती.

१९५६ पर्यंत चिनी अजगरानें तिबेट गिळंकृत केला होता, उत्तर प्रदेशांतील बाराहोतीला विळखा घातला होता, नकाशामध्यें भारतीय प्रदेशाचा सुमारें ५० हजार मैलांचा टापू आपल्या हद्दींत दाखविला होता, उत्तर प्रदेशांतील डामझान घशांत घातलें होतें, निलांग व शिपकी खिंड ओलांडून भारताच्या दिशेनें आगेकूच केली होती, तरीहि १६ नोव्हेंबर १९५६ रोजीं यूनो (संयुक्त राष्ट्रसंघा)मध्यें भारतीय शिष्टमंडळाचे नेते या नात्यानें भारताचे माजी संरक्षणमंत्री श्री कृष्ण मेनन मात्र म्हणत होते,

"चीन हा एक मोठा प्रबळ देश आहे. त्याचें सैन्य व त्याचे उद्योगधंदे प्रचंड आहेत. पण यापेक्षांहि एक महत्त्वाची गोष्ट – मग ती तुम्हांला आवडो कीं न आवडो, तुम्ही ती नाकारूं शकत नाहीं. ती – म्हणजे चालू पिढींतील चिनी जनतेची तेथील विद्यमान राजवटीवर (अर्थात् कम्युनिस्ट सरकारवर) अत्यंत भक्ति आहे. आपल्या देशाचें पुनरुज्जीवन करण्याचें काम त्यांना प्रिय आहे, हें आम्ही प्रत्यक्ष माहितीवरून म्हणूं शकतों.

"म्हणून आम्हां आशियांतील लोकांचें मत विचाराल, तर हे **(चिनी) लोक कोणत्याहि प्रकारें विस्तारवादी, लढाईची इच्छा असलेले किंवा साम्राज्यवादी आहेत असें आम्हांला वाटत नाहीं**. आपल्या शेजाऱ्यांबरोबर शांततेनें नांदण्याची त्यांची इच्छा आहे. चीनचे व भारताचे संबंध अत्यंत सलोख्याचे आहेत. चिनी म्हणतील ती प्रत्येक गोष्ट आम्हांला मान्य असते, म्हणून हा सलोखा नाहीं; किंवा आम्हांला परस्परांतील कांहीं अडचणी सोडवावयाच्या नाहींत, असेंहि नाहीं. भारत व चीन यांच्यांत ३००० मैलांची प्रदीर्घ सरहद्द आहे आणि त्या सीमेवर आमचें मुळींच सैन्य नाहीं. आमचीं ठाणीं (चेकपोस्ट्स) आहेत व त्यांचीं ठाणीं आहेत. त्यांचा एखादा रक्षक कदाचित् आमच्या रक्षकाला एखाद्या वेळीं म्हणेल कीं, 'तूं चुकीच्या भागांत आलास.' किंवा आमचे रक्षकहि उलट तसें म्हणतील. परंतु आमच्या संपूर्ण इतिहासांत आम्हीं परस्परांशीं कधीं लढाई केलेली नाहीं. गेलीं ३ हजार वर्षें आमचे चीनशीं संबंध आहेत.

" आम्ही चीनच्या सरहद्दीला लागून आहोंत. एखाद्या आततायी किंवा आंतरराष्ट्रीय नीतिनियम मोडणाऱ्या देशाला जागतिक राष्ट्रांच्या या मेळाव्यांत आपण आणीत आहोंत असें जर आम्हांला वाटलें असतें तर तसें सांगण्यास आम्हीच प्रथम पुढें आलों असतों ; कारण त्याच्यापासून आम्हांलाच सर्वांत अधिक धोका पोंचण्याचा संभव होता. एका थोर सहकाऱ्याला घाबरून आम्ही कांहीं करतों, असें कोणीं समजूं नये. तशा स्थितींत आम्ही नांदत नाहीं."

एकीकडे चीनला अतिक्रमणाबद्दल निषेध खलिते रवाना होत असतांना दुसरीकडे तो विस्तारवादी किंवा साम्राज्यवादी नसल्याबद्दल जागतिक राष्ट्रांच्या मेळाव्यांत त्याला शिफारसपत्र बहाल करण्यांत भारताचें प्रतिनिधित्व करणाऱ्या मेननसाहेबांचा धूर्तपणा होता कीं मूर्खपणा ? तो धूर्तपणा असला पाहिजे, असें नंतरच्या घटनांवरून वाटतें ; कारण चीननें धडधडीत हल्ले चढविण्यास सुरुवात केल्यानंतरहि चीनबद्दल त्वेषाची किंवा निर्धाराची भाषा श्री मेनन यांच्या तोंडून बाहेर पडली नाहीं. याचा अर्थ त्यांच्या अंतःकरणांत चीनबद्दल, किंबहुना साऱ्या साम्यवादी देशांबद्दल एक प्रकारचा soft corner, जिव्हाळा, आपुलकी आहे. तथाकथित भांडवलवादी व साम्राज्यवादी देश या साम्यवादी देशांना गिळंकृत करायला टपले आहेत व त्यांचें रक्षण करण्याची जबाबदारी आपल्यावर येऊन पडलेली आहे, अशा आवेशांत श्री कृष्ण मेनन अजूनहि बोलत असतात.

पंडित नेहरूंची भूमिका याहून थोडी वेगळी आहे. १९५८ सालापर्यंत लाल चीनचे गोडवे गाणारे नेहरू तिबेट प्रकरणानंतर थोडेफार वास्तव जगांत आले. ५ नोव्हेंबर १९५९ रोजीं वार्ताहर परिषदेंत त्यांनीं स्पष्ट शब्दांत असें सांगितलें कीं, " गेल्या दोन हजार वर्षांत चीन ज्या ज्या वेळीं सामर्थ्यशाली झाला त्या त्या वेळीं त्यानें विस्तारवादी धोरण स्वीकारलें आहे व तेंच सध्यांच्या भारतावरील चिनी आक्रमणाचें कारण आहे. " अर्थात् हा साक्षात्कार झाल्यानंतरहि देशाच्या रक्षणासाठीं पंतप्रधान या नात्यानें पंडितजींनीं कांहीं विशेष हालचाल केली असल्याचें दिसून आलें नाहीं. कारण तें काम संरक्षणमंत्री या नात्यानें श्री कृष्ण मेनन यांचें होतें आणि त्यांच्या-वर पंडितजींचा स्वतःपेक्षांहि अधिक विश्वास होता,—आणि देशाच्या दुर्दैवानें आजहि आहे !

वस्तुत: चीनचा धोका हा विस्तारवादी साम्यवादाचा धोका आहे, हें जोंपर्यंत भारताच्या राज्यकर्त्यांच्या व विशेषत: पंडित नेहरूंच्या गळीं उतरणार नाहीं, तोंपर्यंत भारताच्या संरक्षणाची योग्य तरतूद होऊंच शकणार नाहीं. दुर्दैवानें साम्यवाद, साम्यवादी पक्ष व साम्यवादी नेते यांच्या-संबंधीं श्री नेहरूंच्या अंत:करणांतहि श्री कृष्ण मेनन यांच्याप्रमाणेंच कोठेंतरी आपुलकीची भावना लपलेली आहे. त्यामुळें चीनचें आक्रमण हें साम्यवादाचें आक्रमण आहे, हें मान्य करण्यास ते तयार होत नाहींत. भारतीय कम्युनिस्ट पक्षानें २० ऑक्टोबरच्या चिनी आक्रमणानंतर त्या आक्रमणाबद्दल नापसंती दर्शविणारा जो ठराव केला, त्यावर भारतामध्यें बहुधा कोणाचाच विश्वास बसला नाहीं. कारण एकीकडे तो ठराव करीत असतांनाच दुसरीकडे नेफा-आसाम सरहद्दीवर चिनी सैनिकांचें स्वागत करण्याच्या तयारींत ते गुंतले होते. त्या भागांत हिंदी कम्युनिस्टांनीं केलेल्या पंचमस्तंभी व देशद्रोही कारवाया भारताचे माजी सरसेनापति जनरल करिअप्पा यांनीं पुराव्यानिशीं सिद्ध केल्या आहेत. मुंबईंतील सभांमधून त्यांनीं सरहद्दीवरील भागांत कम्युनिस्टांनीं वांटलेलीं पत्रकेंच लोकांना दाखविलीं. आणि आसाममधील चहाच्या मळ्यांतील कामगारांमध्यें कम्युनिस्टांनीं केलेल्या चीनधार्जिण्या व भारतद्रोही प्रचाराचें बेंड फोडलें. परंतु भारत सरकार मात्र हिंदी कम्युनिस्ट देशभक्त असल्याबद्दल जगाला ग्वाही देण्यासाठीं स्वखर्चानें पुस्तिका प्रकाशित करीत आहे. स्वत: नेहरूंनीं ता. १४-११-६२ रोजीं संसदेंत केलेल्या भाषणांत असे उद्गार काढले होते कीं,

"कम्युनिस्टांसंबंधींहि मला थोडें सांगावेंसें वाटतें. कम्युनिस्ट पक्षाचा (चीन-भारत युद्धासंबंधींचा) जाहीरनामा हा जाहीरनामा म्हणून चांगला आहे. त्यांत त्यांचे खरे विचार व्यक्त झालेले नसून बाहेरचें दडपण आल्यामुळें तो तसा तयार करण्यांत आला आहे असें लोकांना वाटत असेल किंवा ते तसें म्हणत असतील. आपण असें गृहीत धरूं या कीं, या जाहीरनाम्यांत त्यांचें खरें अंत:-करण व्यक्त झालेलें नाहीं. खुद्द कम्युनिस्ट पक्षांतहि असे कांहीं लोक आहेत कीं, ज्यांनीं या जाहीरनाम्याला आक्षेपहि घेतला. परंतु त्यांच्या आक्षेपाला पक्षानें जुमानलें नाहीं. त्यांना असा जाहीरनामा काढण्याचा निर्णय घ्यावा लागण्यासारखी परिस्थिति देशांत निर्माण झाली आहे, ही गोष्ट महत्त्वाची

आहे. यावरून, देशांतील सर्व लोकांच्या मनाला, इतकेंच नव्हे तर आक्रमण करणारे चिनीहि कम्युनिस्ट आहेत म्हणून पूर्वी त्यांच्याविषयीं फार अनुकूल मत बाळगणाऱ्या, आपल्या देशांतल्या एका पक्षाच्या सभासदांच्या विचारांनाहि, ज्या परिस्थितीनें वळण लावलें आहे, तिचें स्वरूप स्पष्ट होतें. हा पक्ष म्हणजे भारतीय कम्युनिस्ट पक्ष. शंभर टक्के राष्ट्रवादी असलेल्या लोकांप्रमाणेंच या पक्षाच्या लोकांनींहि चिनी आक्रमणाचा धि:कार करून त्याला प्रतिकार करण्याचें जाहीर केलें आहे, ही केव्हांहि चांगली गोष्ट आहे. कम्युनिस्टांनीं असें कां केलें याची शहानिशा करीत बसण्याऐवजीं किंवा त्यांचा उपहास करण्याऐवजीं आपण त्यांच्या घोषणेचा फायदा कां करून घेऊं नये, असा माझा सवाल आहे. कम्युनिस्ट पुढारी विचारप्रणालीबाबत किंवा अन्य गोष्टीं-वरून आपसांत भांडू शकतात; परंतु कम्युनिस्ट पक्षाचे सभासद असलेले सर्व कामगार किंवा इतर लोक हीं सामान्य माणसें आहेत. कम्युनिस्ट पक्षांतल्या कोणत्या तरी गोष्टीचें या कामगारांना आकर्षण वाटतें आणि इतर सर्व-सामान्य लोकांप्रमाणेंच त्यांच्यावरहि परिस्थितीचा परिणाम होतो, प्रभाव पडतो. आणि हा कांहीं लहान-सहान फायदा नाहीं. हा जाहीरनामा चुकीचा आहे, दिशाभूल करणारा आहे, असें सांगून त्यांच्या मनावर परिस्थितीचा जो परिणाम झाला आहे, त्याची तीव्रता आपण कां कमी करावी, हें मला कळत नाहीं. म्हणून मी या जाहीरनाम्याचें स्वागत करतों; आणि आक्रमणाचा प्रतिकार करण्याचा संपूर्ण देशानें आज जो एकमुखी निर्धार व्यक्त केला आहे, त्याला अधिक दृढ बनविण्यासाठीं आपण त्याचा पूर्ण उपयोग करून घेतला पाहिजे, असें सांगूं इच्छितों. "

पंडित नेहरू हे इतिहासाचे प्रगाढ अभ्यासक समजले जातात, परंतु इतिहासापासून आपण कांहीं धडा घेतला पाहिजे, हें मात्र त्यांना मान्य नसावें, असें दिसतें. चिनी कम्युनिस्टांच्या गळ्यांत गळा घालून अभिमानानें जगासमोर शांतिदूत म्हणून मिरवितांना गेलीं दोन हजार वर्षें चीननें आपली विस्तारवादी परंपरा कायम ठेवली असल्याचा त्यांना विसर पडला; किंवा त्यापासून योग्य तो बोध त्यांनीं घेतला नाहीं. भारतीय कम्युनिस्टांच्या बाबतींतहि ते आतां तीच चूक करीत आहेत. भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यांत भारतीय कम्युनिस्टांनीं कधींच मनापासून भाग घेतला नाहीं. कारण त्यांचीं

श्रद्धास्थानें व आदेशस्थानें प्रथमपासून भारताबाहेरच आहेत. ते कधीं मॉस्कोचा आदेश प्रमाण मानतील तर कधीं पेकिंगचा; आणि प्रक्षुब्ध लोकमतापुढें नामशेष होण्याचा प्रसंग उद्भवल्यास यशस्वी माघारीचें व राष्ट्रप्रेमाचें नाटकहि वठवतील. परंतु त्यांचें हें राष्ट्रप्रेम वरवरचें आहे हें ओळखून त्यांच्या बाबतींत पुरेशी खबरदारी घेतली गेली नाहीं तर ते कोणत्या वेळीं देशाचा घात करून त्याला परकीय साम्यवाद्यांच्या घशांत लोटण्यास मदत करतील हें सांगतां येणार नाहीं.

कम्युनिस्ट पुढारी कसेहि असले तरी त्या पक्षाचे सामान्य अनुयायी हे इतर सर्वसामान्य लोकांप्रमाणेंच देशभक्त आहेत असें मानून साम्यवादी पुढारी व त्यांचे अनुयायी यांच्यांत तारतम्य करण्याचा जेव्हां पंडितजी प्रयत्न करतात तेव्हां तर त्यांच्या स्वप्नाळूपणाबद्दल कींवच करावीशी वाटते. हीच चूक त्यांनीं पूर्वीं भारतीय मुसलमानांच्या बाबतींत केली होती. त्या गोष्टीला अजून पुरीं वीस वर्षेंहि झालीं नाहींत. इतक्यांत त्यांना तिचा विसर पडला. मुस्लिम लीगचे पुढारी व मुस्लिम जनता यांच्यांत त्यांनीं असाच भेद केला होता आणि लीगचे पुढारी कितीहि वाईट असले तरी त्यांचे अनुयायी इतर सर्वसामान्य भारतीयांप्रमाणेंच देशभक्त असल्याची ग्वाही त्यांनीं दिली होती आणि मुसलमान समाजाशीं जनसंपर्क (mass-contact) वाढविण्याचा कार्यक्रमहि आंखला होता. परंतु काळानें त्यांचा तो आशावाद भोळसटपणाचा असल्याचें सिद्ध केलें. ऐन कसोटीच्या वेळीं मुस्लिम जनता मेंढरांप्रमाणें लीगी पुढाऱ्यांच्या मागोमाग गेली आणि तिनें लांडग्यांप्रमाणें निरपराध हिंदू जनतेची चटणी उडविली. हा ताजा अनुभव नजरेआड करून कम्युनिस्ट पुढारी व त्यांचे अनुयायी यांच्यांत भेद करण्याचा व त्यांतून आपल्याला हवें असलेलें समाधान मिळविण्याचा प्रयत्न पंडितजी करणार असतील तर इतिहासापासून कांहीं शिकण्यास त्यांची तयारी नाहीं असेंच म्हणावें लागेल.

स्वप्नाळूपणा गेला आहे काय ?

चीनची धडक भारताच्या उरांत बसतांच आपण आजवर एका वेगळ्याच काल्पनिक जगांत वावरत होतों याचा साक्षात्कार पंडितजींना झाला. त्यांनीं मोकळ्या मनानें तें कबूल केलें, हा त्यांचा मोठेपणा. परंतु या अनुभवानंतर

तरी त्यांचा स्वप्नाळूपणा गेला आहे काय? या बाबतींत शंका येण्यासारखीच त्यांची सध्यांची कृति व उक्ति आहे. उदाहरणार्थ, चीनजवळ अणुबाँब आहेत कीं काय या प्रश्नाला उत्तर देतांना ता. ३१ डिसेंबर १९६२ रोजीं पत्रकार परिषदेंत पंडितजी म्हणाले, "चीन लवकरच अणुबाँबचा स्फोट करणार असेलहि, परंतु हे अणुबाँब जास्त प्रमाणांत तयार करण्यासाठीं आवश्यक असणारे औद्योगिक कारखाने त्याच्याजवळ असतील असें मला वाटत नाहीं. प्रयोग म्हणून एखाद्या बाँबचा स्फोट करणें आणि त्याची कारखान्यांतून निर्मिति करणें यांत खूप फरक आहे. फ्रान्ससारख्या मोठ्या राष्ट्राजवळ देखील फारसे अणुबाँब नाहींत." त्यांच्या या उद्‌गारांनीं अमेरिकेला आश्चर्य वाटलें! चीनच्या सामर्थ्याची बलाढ्य अशा रशियाला भीति वाटते, परंतु त्यानें एकाच थपडींत ज्या भारताला लोळवलें त्या भारताचे पंतप्रधान मात्र त्या बाबतींत अगदीं निर्धास्त दिसतात. एकीकडे आमचा असा प्रचार चालला आहे कीं, युद्ध थांबलें असलें तरी युद्धप्रयत्नांत शिथिलता येऊं देऊं नका, आत्मसंतुष्ट वृत्ति बाळगूं नका, आणि दुसरीकडे आमचे पंतप्रधान आमच्या शत्रूचें सामर्थ्य कमी लेखून तो विशेष कांहीं करणार नाहीं, अशा आत्मसंतुष्ट वृत्तींत, किंबहुना स्वप्नजगांतच वावरत असावेत असा सर्वसामान्य जनतेचा समज होत आहे.

गांधीवाद्यांचा भोळेपणा :

साम्यवादी साम्राज्यवादाचे प्रत्यक्ष चटके बसत असतांहि कम्युनिस्टांच्या मैत्रीचा मोह न सुटणाऱ्या नेहरूंची जिथें ही स्थिति, तिथें कम्युनिस्टांशीं फारसा संबंधच न येणारे गांधीवादी त्यांच्या बाबतींत 'इससे भी ज्यादा' स्वप्नाळू किंवा भोळे राहिले असल्यास आश्चर्य नाहीं. या बाबतींत आचार्य विनोबा भावे यांचें मत गांधीवाद्यांचें प्रातिनिधिक मत समजण्यास हरकत नाहीं. पश्चिम बंगालच्या पीपला या ग्रामदानी गांवांत ता. १० नोव्हेंबर १९६२ रोजीं केलेल्या भाषणांत विनोबाजी म्हणाले,

"कुछ लोग कह रहे हैं कि कम्युनिस्टोंने प्रस्ताव पास किया, लेकिन उनपर कहाँतक विश्वास करेंगे ? यह ठीक है। लोग ऐसा सोचते हैं तो उसमें उनका दोष नहीं है। कम्युनिस्टोंका आज तक का रवैया भी संशयके लिए

कारण हो जाता है। लेकिन मैं संशय रखना ठीक नहीं समझता, क्योंकि उन्होंने जो जाहिर किया है, उसकी परीक्षा तुरंत होनेवाली है। .... आप कम्युनिस्टोंके लिए शंका रखते हैं, लेकिन हमारी सहानुभूति उनकी तरफ़ जाती है। हम उनसे कहते हैं कि जरा सब्र रखो, आपके विषयमें संशय रखनेका लोगोंको हक है। उस हकसे इन्कार मत करो और अपना व्यवहार संशयसे परे रखो। यह ख़ास करके बंगालके भाइयोंके लिए कह रहा हूँ; क्योंकि बंगालके पार्टीवाले सिन्सियर होते हैं। वे किसी भी पक्षके हों, जिस पक्षके होते हैं, सचाईके साथ उसके साथ होते हैं। यहाँके कम्युनिस्ट सचाईके साथ कम्युनिस्ट विचारधारामें माननेवाले हैं। उनमें दुविधा थी। फिर भी एक प्रस्ताव पास हो गया तो वह सबने मान लिया। कम्युनिस्टोंकी दुनिया भरमें एक ख्याति है और वह यह कि उनकी पार्टीमें जो प्रस्ताव पास होता है, उसे वे सब मान लेते हैं। व्यक्तिशः कोई प्रस्तावके पक्षमें न हो, तब भी पार्टीके अनुशासनके लिए उसे मानते हैं। अब यहाँके कम्युनिस्टोंको कठिन तपस्या करनी होगी, लोग उन्हें संशयकी दृष्टिसे देखेंगे, तो वह उन्हें सहन करना पडेगा और प्रस्तावपर ईमानदारीसे अमल करना पडेगा।

“आज यहाँ ग्रामदान हुआ। दूसरे भी गाँव ग्रामदान हुए हैं। इसी तरह यहाँ ग्रामदान-आंदोलन जोरोंसे चले, तो देखते-देखते एक-एक कम्युनिस्ट धीरेधीरे सर्वोदयी बन जायेगा और उसकी संशयनिवृत्ति भी जल्दी ही हो जायगी, ऐसा हमारा विश्वास है।”

याचा अर्थ असा कीं, कम्युनिस्टांचें आजपर्यंतचें आचरण संशयास्पद असलें तरी त्यांच्याविषयीं विनोबांना संशय वाटत नाहीं. इतकेंच नव्हे तर चोहोंकडे ग्रामदानें होऊं लागलीं तर हळूहळू सारे कम्युनिस्ट सर्वोदयवादी बनतील व त्यांची संशयनिवृत्ति होईल, अशी त्यांची खात्री आहे.

अर्थात् विनोबांची ही भूमिका संतपुरुषाला साजेशीच आहे; परंतु ती सर्व-सामान्य जनतेला पेलण्यासारखी नाहीं, परवडण्यासारखी तर मुळींच नाहीं. बदमाषीप्रमाणेंच संतत्वाचाहि एक कैफ असतो. तो कैफ एकदां चढला कीं मग जगांत जिकडे-तिकडे साधुत्वच भरलेलें दिसूं लागतें. व्यक्तिगत व आध्यात्मिक विकासाच्या दृष्टीनें हा कैफ आवश्यकहि असतो, परंतु ज्यांना कठोर वास्तवाशीं दोन हात करावयाचे असतात त्यांना हें संतत्व परवडतहि नाहीं,

पेलतहि नाहीं. गांधीवादी नेते व कार्यकर्ते यांच्यांत व गांधीजींत हाच मुख्य फरक होता. वैयक्तिक विकासासाठीं एका बाजूनें धडपड चालू असतांनाच गांधीजी लोकमानसाचा ठाव घेण्याची व त्याच्याशीं आपल्या तत्त्वज्ञानाचें सूत्र जोडण्याची सतत धडपड करीत राहिले. त्यामुळें गांधी महात्मा असला तरी तो आपल्यांतलाच आहे, असें जनतेला वाटलें. याच्या उलट गांधीवादी लोक गांधींच्या मानानें सामान्यच असले तरी जनतेला ते फार दूरचे वाटतात, त्यांच्या जीवनाशीं किंवा विचाराशीं सूत्र जमविणें जनतेला शक्य होत नाहीं.

या मुद्याची चर्चा यापूर्वीं पुष्कळ झालेली आहे; म्हणून येथें तिचा विस्तार करण्याची आवश्यकता नाहीं. येथें फक्त एवढेंच सांगावयाचें आहे कीं, भारतांतील कम्युनिस्टांचें तत्त्वज्ञान व त्यांची देशाबाहेर असलेली श्रद्धा किंवा निष्ठा (loyalty) हा या देशाला सतत असलेला एक भयंकर धोका आहे, ही गोष्ट पंडित नेहरू व आचार्य विनोबा या दोघांनाहि मान्य नाहीं व त्या बाबतींत सत्ताधारी पक्ष व सत्तानिरपेक्ष राहूं इच्छिणारे अपक्ष गांधीवादी हे दोघे एकाच पातळीवर आहेत; आणि म्हणून सर्वसामान्य जनतेच्या अंतःकरणापासून ते सारखेच दूर आहेत.

मुसलमानांच्या बाबतींतहि तेंच !

जी गोष्ट भारतांतील कम्युनिस्टांच्या बाबतींत खरी आहे तीच सरहद्दीवरील मुसलमानांच्या बाबतींतहि पुष्कळ अंशांनीं खरी आहे. स्वातंत्र्यपूर्व काळांत भारतांतील ज्या मुसलमानांमध्यें पाकिस्तानच्या कल्पनेविषयीं एक प्रकारचें वेडें प्रेम आणि हिंदूंविषयीं द्वेष निर्माण करण्याचा पद्धतशीर प्रयत्न करण्यांत आला ते मुसलमान एका रात्रींत भारतनिष्ठ बनले अशी समजूत करून घेणाऱ्यांच्या भोळेपणाचें कौतुकच केलें पाहिजे. (अर्थात् त्या कसोटीच्या काळांत अनंत अडचणी सोसूनहि भारतनिष्ठ, धर्मातीत व राष्ट्रीय राहिलेले कांहीं मुसलमान अवश्य होते; परंतु त्यांची संख्या फारच थोडी होती.) खरें म्हणजे, भारतीय मुसलमानांची ही मानसिक स्थिति ओळखून तिच्यावर पद्धतशीर उपचार करण्याचा प्रयत्न स्वतंत्र भारतांतील नेत्यांनीं करावयास हवा होता; परंतु सत्ताधारी व सत्ताकांक्षी राजकीय पक्षांनींच नव्हे तर सत्तानिरपेक्ष, अपक्ष गांधीवाद्यांनींहि तिकडे पूर्णपणें दुर्लक्ष केलें, ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. ज्यांना मुसलमानांचीं मतें हवीं होतीं त्यांनीं तीं मतें

मिळवून देणारे मुल्ला-मौलवी व जातीय पुढारीं यांना हाताशीं धरून त्यांच्या सल्ल्याप्रमाणें मुसलमानांना हिंदूंपासून वेगळें ठेवण्याचें ब्रिटिश साम्राज्यशाहीचें धोरणच पुढें चालविलें. मुसलमानांचीं मनें दुखावलीं जातील म्हणून त्यांना चार बायका करण्याची परवानगी देण्यांत आली, बिगर उर्दू प्रदेशांतील मुस्लिम मुलांना हिंदू मुलांत मिसळावें लागूं नये म्हणून त्यांची मातृभाषा उर्दू नसतांहि त्यांच्यासाठीं वेगळचा उर्दू शाळा हट्टानें चालू ठेवण्यांत आल्या आणि हिंदू व मुसलमान कधींच एकत्र येऊं शकणार नाहींत अशी कायमची तरतूद करून ठेवण्यांत आली. ही तरतूद मुल्ला-मौलवी व जातीय पुढारी यांना फार फायद्याची होती; कारण मुस्लिम समाजाची निरक्षरता व अन्य समाजांविषयींचें अज्ञान हेंच त्यांच्या नेतृत्वाचें भांडवल होतें व आहे. परंतु आपलें हें धोरण मतें मिळविण्याच्या बाबतींत यशस्वी ठरलें असलें तरी अंतीं देशाच्या हिताला अत्यंत घातक ठरणार आहे, ही गोष्ट सत्ताधारी पक्षाच्याच नव्हे तर इतर सत्ताकांक्षी पक्षांच्याहि लक्षांत येऊं नये, यापरतें दुर्दैव तें कोणतें ?

श्री रा. कृ. पाटील यांचा अनुभव :

ज्याप्रमाणें भारतांतील कम्युनिस्टांची निष्ठा ही मॉस्को किंवा पेकिंगकडे गहाण पडलेली आहे, त्याप्रमाणें भारतांतील बहुसंख्य मुसलमानांची निष्ठा पाकिस्तानमध्यें गुंतलेली आहे, हें आपण ओळखलें नाहीं तर उद्यां पाकिस्तानशीं युद्धाचा प्रसंग येईल तेव्हां आपल्या या भोंगळपणाबद्दल आपल्याला जबर किंमत द्यावी लागेल. भारतांतील मुसलमानांना भारतनिष्ठ बनविण्याची वेळ अजूनहि गेलेली नाहीं. या कामीं जुन्या राष्ट्रीय मुसलमानांचा खूप उपयोग होऊं शकेल. माझी स्वत:ची अशा अनेक सज्जन मुसलमानांशीं मैत्री असून या कामीं ते आनंदानें सहकार्य देतील या विषयीं मला खात्री वाटते. परंतु आजचा सत्ताधारी पक्ष अशा सज्जनांकडे लक्ष द्यायला मुळींच तयार नाहीं; कारण अडाणी मुसलमानांना कायम अंधारांत ठेवून सत्ताधारी पक्षाला त्यांचीं मतें मिळवून देण्यास हे सज्जन तयार होत नाहींत. म्हणून जुन्या लीगवाल्या पुढाऱ्यांनाच पांढरी टोपी घालून हाताशीं धरण्याचें सद्य:फलदायी धोरण सत्ताधारी पक्षानें अवलंबिलेलें आहे.

या बाबतींत सर्वोदयी नेते श्री. रा. कृ. पाटील यांचा अनुभव झोंपीं गेलेल्यांना जागें करणारा आहे. अर्थात् ज्यांनीं झोंपेचें सोंगच घेतलेलें आहे, त्यांना कोण जागें करूं शकणार ? श्री पाटील सांगतात :–

" तेजपूर खाली केलें तरी मुसलमान जमात तेथेंच चिकटून राहिली. पाकिस्तान व चीन यांचा गुप्त तह झालेला असून आसामचा उत्तर विभाग चीननें घ्यावा व दक्षिण विभाग पाकिस्ताननें घ्यावा असें त्या तहान्वयें ठरलें असल्याचा प्रचार लोकांत झाला होता. त्यामुळें हिंदु-मुसलमानांत प्रक्षुब्ध वातावरण होतें; आणि त्याचा फायदा काँग्रेसमधील एक गट आपल्या स्वार्थासाठीं घेत असल्याचाहि प्रवाद लोकांत पसरला होता.

" भारतांत पांच कोटि मुसलमान आहेत. भारतीय जीवनांत त्यांनीं ज्या तऱ्हेनें मिसळून जावयास हवें होतें तसे ते झालेले नाहींत, ही वस्तुस्थिति आहे. या परिस्थितींत पाकिस्तानशीं आपले संबंध अशा तऱ्हेचे असले पाहिजेत कीं, भारतीय मुसलमानांना द्विधा इमानदारीच्या दिव्यांतून जाण्याची परिस्थितिच उत्पन्न होऊं नये. "

आसामच्या मंत्रिमंडळांतील मुसलमान मंत्री हे पूर्वाश्रमींचे लीगी पुढारी असून त्यांच्यावर हिंदु जनतेचा मुळींच विश्वास नाहीं. पूर्व पाकिस्तानांतून आसाममध्यें बेकायदेशीरपणें घुसणाऱ्या मुसलमान निर्वासितांना या काँग्रेस मंत्र्यांचीच फूस आहे; कारण पुढेंमागें आसामांत किंवा पाकिस्तानला लागून असलेल्या आसामी जिल्ह्यांत मुसलमानांची संख्या भरपूर वाढतांच काश्मीर-प्रमाणें तो भाग पाकिस्तानला जोडण्याची चळवळ सुरू होईल, सार्वमताचें टुमणें लावतां येईल व तेवढा भाग पाकिस्तानांत घालतां येईल अशी त्यांची कल्पना आहे. आसामचे सध्यांचे मुख्यमंत्री या मुस्लिम मंत्र्यांच्या कृपेनेंच निवडून येऊं शकत असल्यामुळें ही सारी परिस्थिति स्पष्ट दिसत असतांहि ते तिकडे डोळेझांक करीत आहेत, असें जाणकारांचें म्हणणें आहे. म्हणून निदान सरहद्दींवरील मुसलमानांच्या बाबतींत तरी राज्यकर्त्यांनीं व इतर पक्षीय किंवा अपक्ष कार्यकर्त्यांनीं जागरूक राहिलें पाहिजे. भारताच्या संरक्षणाचाच तो एक भाग आहे, हें जर आपण ओळखलें नाहीं तर आपल्यावर पश्चात्ताप करण्याची पाळी आल्याशिवाय राहणार नाहीं.

नेहरूविरोधक = देशद्रोही ?

परंतु आजची स्थिति मात्र या दृष्टीनें फारच निराशाजनक आहे, असें म्हणावें लागतें. आपले हितकर्ते कोण व हितशत्रू कोण हेंहि राज्यकर्त्या पक्षाला व नेत्यांना कळेनासें झालें आहे, असें दिसतें. अखिल भारतीय कॉंग्रेस समितीनें प्रांतिक समित्यांना मार्गदर्शन करणारें जें परिपत्रक कांहीं दिवसांपूर्वीं पाठविलें होतें त्यामध्यें असें म्हटलें होतें कीं, "जे लोक पंडित नेहरूंवर टीका करतात ते राष्ट्रघातकी होत." बहुधा याच दृष्टिकोनांतून कांहीं दिवसांपूर्वीं भारत सरकारच्या गृहखात्याकडून 'करंट', 'हिंदुस्तान', 'पांचजन्य' व 'ऑर्गनायझर' या चार वृत्तपत्रांना त्यांच्या लिखाणाबद्दल दम भरण्यांत आला होता. त्यांच्या ज्या उताऱ्यांबद्दल हा दम देण्यांत आला होता ते नजरेखालून घातले असतां आमच्या लोकशाहीचे काय हे धिंडवडे चालले आहेत, या कल्पनेनें देशभक्त माणसाच्या मनाला खेद झाल्याशिवाय राहत नाहीं. गृहखात्याला केवळ पंडित नेहरूंवरील टीकाच सहन होत नाहीं असें नव्हे तर त्यानें नेहरूंच्याबरोबर त्यांच्या कुटुंबीय मंडळींचाहि अंतर्भाव 'नेहरू' शब्दांत केलेला दिसतो. 'ऑर्गनायझर' पत्राला जे उतारे आक्षेपार्ह असल्याचें कळविण्यांत आलें होतें त्यांत पंडित नेहरूंच्या सुकन्या श्रीमती इंदिरा गांधी यांच्यावर टीका करणारे दोन उतारे होते. एका उताऱ्यांत श्रीमती गांधी यांनीं आपल्या सुपुत्रांना शिक्षणासाठीं परदेशीं पाठविल्याबद्दल टीका असून दुसऱ्या उताऱ्यांत श्रीमती गांधी यांना अनेक कमिटयांचें अध्यक्षपद देण्यांत आल्याबद्दल टीका होती. हे उतारे संरक्षण नियमांनुसार कसे आक्षेपार्ह ठरूं शकतात हें एक कोडेंच म्हटलें पाहिजे.

देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीनें या देशांतील जर कोणते पक्ष धोक्याचे किंवा संशयास्पद असतील तर ते कम्युनिस्ट पार्टी व मुस्लिम लीग हे होत. परंतु त्यांना सारें रान मोकळें सोडून या देशाशींच ज्यांच्या निष्ठा अपरिहार्यपणें निगडित राहूं शकतात (कारण या देशाबाहेर त्यांचा संबंधच नाहीं.) अशा जनसंघ, स्वतंत्र, हिंदुसभा वगैरे पक्षांच्या मागें सरकारनें बडगा घेऊन धांवावें हें मोठें चमत्कारिक वाटतें. याचें कारण येवढेंच कीं, भारतीय कम्युनिस्ट उठल्यासुटल्या पंडित नेहरूंचा पाठपुरावा करीत असतात. चीनच्या बाबतींतील त्यांच्या चुकांचें तर ते मोठ्या हिरीरीनें समर्थन करीत असतात,

कारण या मार्गानें गेल्यास आपली कातडी बचावेल आणि हा देश अचूक साम्यवादाच्या खोडयांत जाऊन अडकेल अशी त्यांना आशा वाटते. आणि म्हणून नेहरू-विरोधक ते सारे देशद्रोही असल्याचा पुकारा कॉंग्रेसवाल्यांपेक्षांहि अधिक जोरानें कम्युनिस्ट लोक करीत आहेत.

तटस्थता खरी असावी :

या विवेचनाचा अर्थ असा मुळींच नव्हे कीं, भारतानें आपलें मूलभूत, आधारभूत धोरण सोडून द्यावें आणि कंम्युनिस्ट राष्ट्रांशीं शत्रुत्व संपादून पाश्चात्य राष्ट्रांच्या लष्करी करारांत सामील व्हावें. ज्या स्वत्वाच्या रक्षणासाठीं आपण साम्यवादी चीनला भारतीय भूमीवर आक्रमक म्हणून पाऊल ठेवूं न देण्याचा निर्धार केला आहे तें स्वत्व पाश्चात्यांच्या लष्करी गोटांत गेल्यानेंहि नष्टच होणार हें आपण ओळखलें पाहिजे. एवढेंच नव्हे, तर आपण कोणत्याहि एका गोटांत सामील झाल्यानें आंतरराष्ट्रीय तणातणी कमी होण्याऐवजीं वाढणारच आहे, हें ओळखून तटस्थतेचें आपलें धोरण कायम ठेवलें पाहिजे; इतकेंच नव्हे तर त्यांत अधिक खंबीरपणा, निर्धार आणला पाहिजे. परंतु एखाद्या गटाला वाईट वाटेल किंवा आमच्या तटस्थतेबद्दल शंका येईल म्हणून वेळींअवेळीं आपल्या तटस्थतेचें तुणतुणें वाजवीत राहणेंहि वाईटच. तटस्थपणाचा गाजावाजा न करतां तटस्थ राहतां येतें. आज अमेरिकेलाहि असेंच वाटतें कीं, भारतानें पाश्चात्यांच्या लष्करी करारांत सामील होऊन रशियाची सहानुभूति गमावण्याऐवजीं तटस्थ राहिलेलेंच बरें, कारण त्यायोगें रशिया युद्धापासून अलिप्त राहील व जागतिक युद्धाचा धोका कमी होईल. इकडे रशियालाहि चीनच्या वाढत्या वर्चस्वाला आळा बसण्याच्या दृष्टीनें, त्याला शह देण्यासाठीं भारताचें प्यादें उपयोगी पडेल, व त्यासाठीं भारतानें साम्यवादी गोटाच्या बाहेरच राहावें, असें वाटतें. या सर्व परिस्थितीचा विचार करतां भारताची तटस्थता त्याच्या इच्छेविरुद्ध भंग पावेल असें वाटत नाहीं. परंतु आजवर आमची तटस्थता ही कांहींशी पक्षपाती तटस्थता होती. साम्यवादी राष्ट्रांना हजार खून माफ, आणि पाश्चात्य देशांच्या बाबतींत मात्र आंधळ्या न्यायदेवतेचा कांटेकोरपणा, ही मेननीति यापुढें आपण सोडली पाहिजे.

चीनच्या आक्रमणापासून देशाचा बचाव करण्यासाठीं इंग्लंड-अमेरिकेनें दिलेलीं शस्त्रास्त्रें आपण घेतलीं हा जणूं भयंकर गुन्हाच आपल्या हातून घडला, अशा गुन्हेगारीच्या भावनेनें आमचे पंतप्रधान कित्येकदां बोलतात कीं काय अशी शंका येते. पाश्चात्य देशांच्या मदतीचा जेव्हां जेव्हां प्रश्न काढला जातो तेव्हां तेव्हां रशियाहि आम्हांला चार-दोन मिग विमानें देणार आहे, हें आवर्जून सांगण्यास नेहरूजी चुकत नाहींत. (युद्धबंदी होऊन दोन महिने झाले तरी रशियाचीं तीं मिग विमानें अजून कांहीं दृष्टीला पडत नाहींत ! *) हा इतका मिंधेपणा कां म्हणून दाखवावा? पाश्चात्य राष्ट्रेंहि आम्हांला मदत देतात म्हणजे कांहीं फार मोठी दया दाखवतात असें नव्हे. आमच्या सुरक्षितेंत त्यांचीहि सुरक्षितता असल्यामुळेंच ते इतक्या त्वरेनें मदतीस धांवून आले, हेंहि खोटें नाहीं. पण म्हणून त्यांना तुच्छ लेखण्याचेंहि कारण नाहीं. ज्याचें जेवढें श्रेय असेल त्याला तेवढें देण्यांत कृपणता कां करावी ?

इतरांकडून अवश्य मदत घ्यावी :

७० कोटि लोकसंख्येच्या चीनजवळ ३० लाख खडें सैन्य आहे. शिवाय सुमारें दोन कोटि लोकांना त्यानें लष्करी शिक्षण देऊन तयार केलें आहे. त्याच्या विमानदलांत एक लाखावर सैनिक व अधिकारी असून ३ हजार विमानें (त्यांपैकीं १८०० मिग जेट विमानें) आहेत. १९७० पर्यंत चीन अणुबाँबहि तयार करूं शकेल. गेलीं कित्येक वर्षें चिनी सैनिक कोरिया व इंडोचायना या देशांत लढत आहेत; त्यामुळें त्यांना लढाईचा चांगलाच सराव झालेला आहे. पंतप्रधान नेहरूंनीं लोकसभेंतील भाषणांत सांगितल्याप्रमाणें, 'चीनमधील राज्यक्रांति यशस्वी होण्यापूर्वीं सुमारें २० वर्षें आधींपासून चीननें शस्त्रें तयार करण्यास प्रारंभ केला होता. ते सतत लढत होते. डोंगराळ प्रदेशांत लढणारें, चांगलें प्रचंड सैन्य त्यांच्याजवळ आहे. डोंगराळ भागांत लढाई करण्यांत त्यांचा हातखंडा आहे. तांदुळाची पिशवी पाठीवर टाकून, खिशांत चहाचीं पुडकीं कोंबून आणि कापसाचे पॅड्स असलेले कोट व पाटलोणी

* भारताला पाठवावयाचीं चार मिग विमानें ता. १४ जानेवारी १९६३ रोजीं रशियन बंदरांतील बोटीवर चढविण्यांत आल्याची बातमी आहे. तीं आतां भारताला कधीं पोंचतात तें पाहावयाचें !

चढवून ते कित्येक दिवस मजल मारीत जाऊं शकतात. सुरुवातीपासूनच इतर गोष्टींबरोबर त्यांनीं शस्त्रनिर्मितीच्या विकासावर लक्ष केंद्रित केलें होतें. त्यांना सोव्हिएट युनियनकडूनहि पुष्कळ मदत मिळाली.' अशा या शत्रूशीं ४० कोटि लोकसंख्येच्या व जेमतेम ५-६ लाख खडें सैन्य असलेल्या भारताला मुकाबला करावयाचा आहे. भारताजवळ फक्त ६०० विमानें आहेत. अशा स्थितींत आपण लष्करी सामर्थ्याच्या बाबतींत चीनशीं कशी बरोबरी करूं शकणार ? चीनजवळ जेवढीं (१८००) जेट विमानें आहेत तेवढीं जरी आपण घ्यावयाचें ठरविलें तरी त्यासाठीं सुमारें पांच हजार कोटि रुपये लागतील.—म्हणजे तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या एकूण खर्चापैकीं निम्मी रक्कम नुसत्या विमानांसाठींच खर्चावी लागेल !

अशा स्थितींत एकच मार्ग उरतो. तो म्हणजे जेथून ज्या प्रकारची मदत मिळेल तेथून ती मिळविणें. आपण सर्वांशीं निःपक्षपाती स्नेहभावना ठेवली तर कांहीं देश आमच्याविषयींच्या प्रेमानें तर कांहीं चीनच्या आक्रमक साम्यवादाला थोपवून धरण्यासाठीं आपल्याला अवश्य मदत देतील. त्यांच्या-कडून मिळणारी मदत आणि भारतीय जनतेचा एकमुखी निर्धार यांच्या जोरावर आपण देशावर आलेलें हें परचक्र निश्चितपणें व कायमचें परतवून लावूं, यांत शंका नाहीं.

अंतर्गत सामर्थ्य वाढविलें पाहिजे :

अर्थात् या बाह्य मदतीवरच विसंबून न राहतां आपण आपलें अंतर्गत सामर्थ्य वाढविण्याचाहि चंग बांधला पाहिजे. या कामीं सर्व मतांच्या, पंथांच्या व पक्षांच्या लोकांना सहकार्य करतां येईल. उदाहरणार्थ, मागील प्रकरणांत वर्णन केल्याप्रमाणें गांधीवादी कार्यकर्ते सरहद्दीवरील प्रदेशांत जाऊन बसले आणि ख्रिस्ती मिशनऱ्यांप्रमाणें तेथील आदिवासी लोकांत काम करूं लागले तर ती आघाडी जनतेच्या मनोधैर्याच्या बाबतींत चांगली भक्कम बनेल. नेफा व नागालँडमध्यें परदेशी मिशनऱ्यांनीं आजवर जो विषारी प्रचार केला त्यामुळें तेथील आदिवासींच्या मनांत भारताविषयीं आपलेपणा निर्माण होण्याऐवजीं परकेपणा व शत्रुत्वाची भावनाच वाढीला लागली. ही भावना काढून टाकून तिच्या जागीं भारताविषयींचें प्रेम व स्वाभिमान निर्माण केला पाहिजे. गांधीवादी

मंडळींना हें काम करतां येण्यासारखें आहे. त्यांत हिंसा-अहिंसेचाहि प्रश्न येणार नाहीं.

आर्थिक व सामाजिक विषमता व पिळणक ही साम्यवादी क्रान्तीच्या रोपट्याला खतपाणी पुरविणारीं द्रव्यें आहेत. हें ओळखून त्यांचा नायनाट करण्याचा चंग देशांतील राजकीय-सामाजिक पक्षांनीं व संघटनांनीं बांधला पाहिजे. लोकशाही मार्गानें आपल्यावरील अन्याय दूर करून घेतां येईल अशी भावना लोकांत रुजली पाहिजे. परंतु आज आपल्याला भारतांत काय परिस्थिति आढळते ? मजुरांनीं संप केल्याशिवाय त्यांच्या पिळणुकीकडे मालकांचें अथवा सरकारचें लक्ष जात नाहीं आणि सामान्य जनतेनें दंगेधोपे व जाळपोळी केल्या नाहींत, तर तिच्यावर अन्याय झालेला आहे, हें मान्य करायलाच सरकार तयार होत नाहीं. कोणीहि तटस्थ गांधीवादी बेळगांव-कारवारच्या मराठीभाषी भागांत फिरून येईल तर तेथील जनता आपल्यावरील अन्याय दूर करून घेण्यासाठीं अशाच आततायी मार्गाचा अवलंब केल्याखेरीज गत्यंतर नाहीं, या निर्णयाला आली असल्याचें त्याला आढळून येईल; कारण ग्रामपंचायतीच्या निवडणुकांपासून विधिमंडळांच्या निवडणुकांपर्यंत साऱ्या लोकशाही मार्गांनीं आपल्यावरील अन्याय वेशीवर टांगण्याचा प्रयत्न करून ती जनता आतां अगदीं निराशेच्या कड्यावर येऊन पोंचली आहे. लोकशाही मार्गावरील तिचा विश्वासच उडून गेला आहे. अशा स्थितींत तेथें हिंसेचा पुरस्कार करणारें साम्यवादी नेतृत्व प्रभावी झालें तर त्याचा दोष त्या जनतेवर राहील कीं तिला नैराश्याच्या गर्तेत लोटणाऱ्या राज्यकर्त्यांवर ?

हीच गोष्ट अस्पृश्यांच्या बाबतींतहि लागू होते. आज विसाव्या शतकाच्या उत्तरार्धांतहि भारतीय खेड्यांतील अस्पृश्यांची स्थिति दोन पायांच्या पशूंहून अधिक चांगली नाहीं. परंतु त्यांची स्थिति सुधारावी म्हणून इमानानें कोण प्रयत्न करीत आहे ? स्पृश्यांची गोष्ट राहूं द्या, परंतु अस्पृश्यांचें नेतृत्व करणारेहि त्यांची अस्पृश्यता दूर करण्याऐवजीं ती कायम ठेवून आपलें नेतृत्व मजबूत बनविण्याचाच प्रयत्न करीत आहेत कीं काय, अशी अनेकदां शंका येते.

साम्यवादी चीनच्या आक्रमणाला यशस्वीपणें तोंड द्यावयाचें असेल तर देशांतील या साऱ्या विषमतांचें व अन्यायांचें निराकरण करण्याचाहि प्रयत्न आपण केला पाहिजे. या बाबतींतहि सत्ताधारी पक्षावर विशेष जबाबदारी

येते (आणि तो त्या बाबतींत अक्षम्य दुर्लक्ष करीत आहे) हें सांगणें नलगे !

समाजकंटकांना जरब बसली पाहिजे :

समाजावरील संकट म्हणजे कमाईची पर्वणी, असा आडाखा भारतांतील व्यावसायिकांनीं फार पूर्वीपासून बांधून ठेवलेला आहे. त्यांच्यांत सर्व प्रकारचे लोक येतात – व्यापारी, सरकारी अधिकारी, मजूर, शेतकरी, कारखानदार वगैरे ! श्री रा. कृ. पाटील यांनीं या संबंधांत सांगितलेले अनुभव उद्बोधक आहेत. ते म्हणतात :–

" लोकांमध्यें घबराट होऊन पळापळ सुरू झाली तेव्हां विमानवाहतूक कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांनीं प्रवाशांना वाटेल तसें नागवलें. रेल्वेचे नोकरहि या बाबतींत फारसे मागें राहिले नाहींत. अशा संकटकाळांतहि सद्भावना सुचूं नये, दुःखितांबद्दल सहानुभूति वाटूं नये, उलट त्यांचें संकट ही संधि मानली जावी, ही राष्ट्रीय चारित्र्यांतील असह्य उणीव आहे.

" नेफा विभागांत २१ हजार लोक सडकेच्या बांधकामावर होते. या संघटनेचें (यंत्रणेचें) नांव टस्कर.* या संघटनेविरुद्ध एकमुखी प्रवाद ऐकूं आले. वाईट चारित्र्य, ढिलें काम व अति खाबूपणा त्यांच्यांत बोकाळलेला होता. त्यांनीं बांधलेल्या सडका वाईट, खर्च बेसुमार असेहि आरोप ऐकूं आले. ' चिनी आले, पळा पळा ! ' अशा स्वरूपाचें त्यांचें वर्तन होतें. "

स्वराज्यामध्यें हे प्रकार फार मोठ्या प्रमाणावर घडूं लागले आहेत. याचा अर्थ एवढाच कीं, समाजकंटकांना या देशांत मुळींच जरब राहिलेली नाहीं. याचीं कारणें शोधून काढलीं पाहिजेत. सर्वसामान्य माणसालाहि चट्दिशीं दिसणारें व जाणवणारें कारण म्हणजे समाजाची नाडणूक व नागवणूक करणाऱ्या बड्या पुंजीपतींच्या हातांत आमच्या राजकर्त्यांच्या नाड्या आहेत हें होय. या थैलीशहांच्या पैशांवरच सत्ताधारी पक्षाची संघटना टिकून आहे आणि सत्ताधाऱ्यांना बोटांवर नाचवून हे थैलीशाह आपल्या अमर्याद संपत्तींत अधिकाधिक भर घालीत आंहेत. त्यामुळेंच आज या देशांत गरीब माणूस जास्त गरीब होत चालला आहे आणि समाजाचें शोषण करणारा श्रीमंत अधिक श्रीमंत

* या संघटनेनें जे गुण उधळले त्यावरून लोकांनीं तिला ' तस्कर संघटना ' म्हणजे चोरांचा कंपू असें सार्थ नांव दिलें !

होत आहे. यांतील मर्म जाणून देशाच्या सूत्रधारांनीं आपल्या धोरणांत बदल केला पाहिजे. देशाच्या संकटकाळींहि देशभक्तीचा संचार ज्यांच्या हृदयांत होऊं शकत नाहीं अशा समाजकंटकांची एवढी प्रचंड संख्या ज्या देशांत आहे, त्या देशाला परमेश्वर झाला तरी किती साह्य करूं शकणार ! या समाज-कंटकांमध्यें वर उल्लेखिलेल्या लोकांप्रमाणेंच सत्ताधारी लोकांचाहि समावेश करतां येईल. देशाची हांक येतांच सर्वसामान्य भारतीय रक्तदान, अर्थदान, सुवर्णदान वगैरे मार्गांनीं सरकारला साह्य करण्यास पुढें सरसावला. परंतु गेलीं सोळा वर्षें (आणि त्यापूर्वीहि कित्येक वर्षें) अधिकारावर असलेल्या ज्या सत्ताधारी पक्षानें स्वातंत्र्याचा खरा फायदा उपटला, सुखासीन बनून देशाच्या संरक्षणाकडेहि दुर्लक्ष केलें व देशाला संकटांत लोटलें, त्या पक्षाचे पुढारी, मंत्री, * अधिकारी आणि त्यांना लांच चारून गबर बनलेले भांडवलदार, कारखानदार यांनीं प्रामाणिकपणें संरक्षणनिधीला मदत केली आहे काय ? ' इन्शा ' कवीनें म्हटल्याप्रमाणें

कोई दुनियासे भला क्या माँगे ?
वह तो बेचारी आप नंगी है ॥

अशी भारतीय जनतेची स्थिति आहे. ती देशभक्तींत कोणाला हार जाणार नाहीं, ती ' नंगी ' असली तरी शक्य तेवढी मदत देशाच्या संकटकाळीं करीतच आहे. प्राणांहून प्रिय असलेलें मंगळसूत्र संरक्षणनिधीला देणाऱ्या शूर वीरांगना पुढें आल्या. पण ज्यांनीं करोडों रुपये कमावले त्यांनीं काय दिलें ? किती दिलें ? सरकारला परदेशी चलन मिळविण्यासाठीं सोनें हवें आहे, पण या

* जनतेला काटकसरीचा उपदेश करणाऱ्या सत्ताधाऱ्यांनीं स्वतःच्या जीवनांत काटकसर अमलांत आणली नाहीं, तर त्यांच्या उपदेशाचा जनतेवर काय प्रभाव पडेल हें कोणीं सांगावयास हवें असें नाहीं. सत्ताधारी पक्षांतील विविध गटांचें ' मुखलेपन ' करण्यासाठीं बहुतेक राज्यांनीं आपलीं मंत्रिमंडळें अवाच्यासवा मोठीं केलीं, त्या साऱ्यांच्या मोटारी, बंगले, दौरे, उद्घाटन-समारंभ यांत कोठेंच कपात नाहीं. जनतेनें दिलेल्या कराची ही उधळपट्टी अक्षम्यच नव्हे काय ? यांतून पैसा वांचवून तो देशरक्षणासाठीं वापरतां येणार नाहीं काय ?

करोडपतींनीं किती सोनें सरकारला दिलें ? उलट सोनें मिळविण्यासाठीं सरकारनें काढलेले सारे वटहुकूम त्यांनीं निष्फळ, निरर्थक बनविले ! देशाच्या स्वातंत्र्यासाठीं प्राण पणाला लावून झुंजलेल्या गरीब जनतेला स्वातंत्र्यमंथनांतून काय मिळालें ? नुसतें ताकाचें पाणी ! भाववाढ, बेकारी, महागाई यांनीं तोंड पोळल्यावर प्यावयाचें भावनेचें पाणी ! वस्तुतः ज्यांनीं या स्वातंत्र्यसंग्रामांत मुळींच भाग न घेतां स्वातंत्र्यमंथनांतून निघालेले सत्ता-संपत्ति-अधिकारांचे लोण्याचे गोळे उडविले त्यांच्याकडूनच देशाला आवश्यक तें आर्थिक साह्य मिळालें पाहिजे. परंतु त्यांना दुखविण्याची हिंमत आज सरकारमध्यें नाहीं; आणि धनिकांचीं मनें दुखविणें हीं गरिबांच्या पिळणुकीपेक्षांहि भयंकर हिंसा आहे, अशी समजूत असणारे गांधीवादीहि या अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याऐवजीं कांहींतरी गोलमोल तत्त्वाच्या गोष्टी बोलून वेळ मारून नेत आहेत. या संदर्भांत श्री रा. कृ. पाटील यांनीं काढलेले निष्कर्ष लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. ते म्हणतात :—

" देशांतील जनता समजूतदार, प्रामाणिक व सरकारबद्दल आपुलकीची भावना बाळगणारी आहे. पुढाऱ्यांनीं ह्या वृत्तीचा परिपोष करून तिला योग्य मार्गानें नेलें पाहिजे. केवळ आपला अधिकार व पैसा यांच्याकडे लक्ष देऊन जर नेतृत्व जाऊं लागेल तर शेवटीं ही स्थिति पालटून जाईल. म्हणून वेळींच सावध होऊन कर्तव्याची जाणीव बाळगणें जरूर आहे.

" प्रशासनयंत्रणा सुधारणें अत्यंत आवश्यक आहे. वरिष्ठांची भीति नाहीं आणि प्रामाणिकपणें व उत्साहानें काम करणाऱ्याचें चीज होईल असा विश्वास वाटत नाहीं. त्यामुळें 'होतें तसें होऊं द्या, मला काय त्याचें ?' ही वृत्ति बोकाळते. आपण आळस टाकला पाहिजे व काम करण्याची शक्ति वाढविली पाहिजे.

" चीनचें आक्रमण हें केवळ फौजी आक्रमण नाहीं, तें भावनात्मक व तात्त्विक आहे. या आक्रमणापासून धडा घेऊन भारतानें त्या दृष्टीनेंहि सज्ज व्हायला पाहिजे. लोकशाहीचीं मूल्यें नष्ट होऊं न देतां आर्थिक व सामाजिक न्यायाच्या आधारावर नवीन समाजरचनेचा पाया घातला पाहिजे; तरच चीनच्या तात्त्विक व भावनात्मक आक्रमणाला तोंड देतां येईल. "

काँग्रेस = देश ? :

पण आजच्या सत्ताधाऱ्यांची वृत्ति पाहतां ही गोष्ट सहजासहजीं घडून येईल असें वाटत नाहीं. देशांत आणीबाणीची स्थिति जाहीर होतांच वेगवेगळे पक्ष राज्यकर्त्यांशीं असलेले आपले मतभेद बाजूला सारून देशरक्षणाच्या कामीं सहकार्य करण्यास पुढें सरसावले. पण त्यांच्या या वृत्तीचें राज्यकर्त्यांकडून काय चीज झालें ? पुनः श्री रा. कृ. पाटील यांचा अनुभव नमूद करण्याचा मोह होतो. ते म्हणतात :

"गौहाटीला एका डॉक्टरांनीं स्वयंस्फूर्तीनें पुढाकार घेऊन मोहल्ल्या-मोहल्ल्यांतून रक्षकदलांची स्थापना केली; परंतु पुढें सरकारतर्फे रीतसर काम सुरू झाल्यावर पक्षीय दृष्टि पुढें आली व त्यांच्या संघटनेला डावलण्यांत आलें."

हाच अनुभव दिल्लीपासून गल्लीपर्यंत पसरलेल्या वेगवेगळ्या संघटना व कामें यांच्याहि बाबतींत प्रत्यहीं येत नाहीं काय ? काँग्रेस म्हणजेच देश * हा अहंकार, हा दर्प प्रत्येक काँग्रेसवाल्याच्या लहानसहान वागणुकींतूनहि दिसून येत नाहीं काय ? मग स्वाभिमानी कार्यकर्ते सार्वजनिक कामांत हिरीरीनें भाग घेत नसतील तर त्याबद्दल त्यांना दोष देतां येईल काय ?

आम्हांला शेजारी मित्र हवेत :

आपला शेजारी तो आपला शत्रु आणि त्या शेजाऱ्याचा शेजारपणामुळें बनलेला शत्रु तो आपला मित्र, अशी चाणक्यनीति फार पुरातन काळापासून चालत आलेली आहे. जागतिक शांततेचा पुरस्कार करणाऱ्या भारतालाहि या नीतीची कोंडी फोडतां आलेली नाहीं. त्यामुळें चीननें भारतावर हल्ला करून भारतीय सैन्याला माघार घेण्यास भाग पाडलें त्या वेळीं नेपाळ-पाकि-

* काँग्रेसवाल्यांमध्यें हा दोष निर्माण होणार, याचें दर्शन महात्मा गांधींच्या द्रष्टया दृष्टीला पूर्वींच घडलें होतें; आणि म्हणून त्यांनीं काँग्रेसचें विसर्जन करून लोकसेवक संघ नांवाचा वेगळा पक्ष काढण्याची सूचना काँग्रेसवाल्यांना केली होती; परंतु काँग्रेसची पूर्व पुण्याई (good-will) वैयक्तिक स्वार्थासाठीं वापरण्याचा मोह आवरतां न आल्यामुळें काँग्रेसवाल्यांनीं गांधीजींची ही सूचना फेटाळून लावली, या घटनेचें येथें स्मरण व्हावें.

स्तानसारख्या भारताच्या शेजाऱ्यांना आनंदाच्या उकळ्या फुटल्या. ब्रह्मदेश गप्प राहिला आणि सिलोननें चीनचा निषेध न करतां गांधीवाद्यांप्रमाणें आक्रमक व आक्रमित यांना एकाच पातळीवर लेखून केवळ सुरू झालेलें युद्ध कसें बंद होईल, एवढीच चिंता वाहिली; कारण चीन-भारतांतील युद्ध जास्त भडकल्यास आपल्यालाहि त्याची झळ लागल्याशिवाय राहणार नाहीं, एवढें ओळखण्याइतकें शहाणपण त्या चिमुकल्या राष्ट्राजवळ आहे.

परंतु या चिनी आक्रमणानें एक गोष्ट प्रकर्षानें दाखवून दिली कीं, भारताच्या संकटकाळीं धांवून येतील असे शेजारी मित्र त्याला मिळवितां आलेले नाहींत. इंग्लंड-अमेरिका हीं राष्ट्रें जगांतील आक्रमक साम्यवादाला पायबंद बसावा म्हणून जगाच्या पाठीवरील कोणत्याहि बिगर साम्यवादी आक्रमित राष्ट्राच्या मदतीला धांवून जाण्यास नेहमींच तयार असतात. त्या-प्रमाणें तीं आमच्याहि मदतीला धांवून आलीं. परंतु त्या पार्श्वभूमीवर आमच्या शेजाऱ्यांचा थंडपणा व सहानुभूतिशून्यता हीं विशेषच उठून दिसतात.

हें असें कां घडलें ? पाकिस्तानची गोष्ट आपण सोडून देऊं. सख्खे भाऊ अनेकदां एकमेकांचे जानी दुश्मन बनतात, तशी पाक-हिंदची स्थिति आहे. भारताचे प्रदेश तोडून घेण्याकडेच पाकिस्तानची प्रथमपासून प्रवृत्ति आहे आणि तुकेरग्राम, बेरुबारी वगैरे प्रदेश मिळण्याची शक्यता दिसूं लागतांच त्याची हांव आणखी वाढली आहे. आज तो काश्मीरवर हक्क सांगत आहे, उद्यां त्याला काश्मीर मिळाल्यानंतर कदाचित् तो आसामवरहि हक्क सांगूं लागेल. म्हणून त्याच्या हावरेपणाला कोठें तरी पायबंद घातलाच पाहिजे. तो पायबंद काश्मीरमध्येंच घालतां येईल. भारतानें काश्मीरवरील हक्क सोडून द्यावा आणि त्याच्या मोबदल्यांत पाकिस्तानची मैत्री मिळवावी, असा सौदेबाजीचा सल्ला पाश्चात्य राष्ट्रें भारताला देत आहेत, नव्हे, त्यानें तसें केलेंच पाहिजे म्हणून त्याच्यावर दडपणहि आणीत आहेत. आपल्यांतील राजाजी-करिअप्पा यांच्यासारखी कांहीं वजनदार मंडळीहि असेंच मत मांडीत आहेत. परंतु आपण हें दडपण निर्धारानें झुगारून दिलें पाहिजे, ती सूचना नाकारली पाहिजे. कारण, मऊ लागलें कीं कोपरानें खणणारा पाकिस्तान मग इतका शिरजोर होईल, कीं आसाम-बंगाल-पंजाबवर हक्क सांगण्यालाहि त्याला दिक्कत वाटणार नाहीं, भारतांतील मुसलमानांचा कैवार घेऊन तो आज भारतावर

जी चिखलफेंक करीत आहे तिला ऊत येईल आणि भारतीय मुसलमानांसाठीं भारताचा भला मोठा तुकडा तोडून मागण्यासहि तो मागेंपुढें पाहणार नाहीं. अथवा पूर्व-पश्चिम पाकिस्तानला जोडणारा विस्तृत भूपट्टा भारतीय भूमींतून आपल्याला मिळाला पाहिजे अशी मागणीहि तो केल्यशिवाय राहणार नाहीं. आक्रमकाचें पोट ही एक धगधगती भट्टी असते. तिच्यांत तुम्ही जेवढें टाकाल तेवढें फस्त होतें. पाकिस्तानची राक्षसी भूक त्याला काश्मीर मिळाल्यानें शमेल असें समजणारे लोक मूर्खांच्या नंदवनांत वावरत आहेत असें म्हणावें लागतें. अशा लोकांच्या दडपणापासून – मग ते देशांतील असोत कीं परदेशांतील असोत – कटाक्षानें व सावधपणें दूर राहिलें पाहिजे.

कांहीं लोक असा युक्तिवाद करतात कीं, "काश्मीरपैकीं जम्मूचा (हिंदूंची बहुसंख्या असलेला) भाग भारतानें आपल्याकडे ठेवून काश्मीरखोरें व लडाख पाकिस्तानला देऊन टाकावें. म्हणजे चीनशीं असलेल्या संघर्षाचें मूळहि नाहींसें होईल. पाकिस्तानला वाटल्यास त्यानें लडाखचा भाग चीनला देऊन त्याच्याशीं मैत्री संपादन करावी किंवा युद्ध करीत बसावें. लडाख हा बौद्धधर्मीयांचा प्रदेश असल्यामुळें पाकिस्तानला त्याबद्दल मुळींच सोयरसुतक नाहीं. तेव्हां तो भाग चीनला देऊन टाकण्यास त्याला अमेरिकेच्या विरोधाव्यतिरिक्त दुसरा कसलाच विचार करावा लागणार नाहीं. परंतु त्यानें कांहींहि निर्णय घेतला तरी भारताच्या मागची चीनची कटकट कायमची मिटेल यांत शंका नाहीं!"

या युक्तिवादांतील धोका चटकन् लक्षांत येण्यासारखा नाहीं. तो असा कीं, चीननें लडाख व्यापला – मग तो भारताकडून युद्ध करून घेतलेला असो अथवा पाकिस्तानकडून लाडीगोडीनें मिळविलेला असो – कीं मग त्याला उर्वरित भारतांत शिरणें अधिकच सोपें जाईल. वेशीचा दरवाजा मोडून पडतांच शत्रुसैन्याचा लोंढा शहरांत घुसावा, तितक्या सहजतेनें चीन भारतांत घुसेल. म्हणून कोणत्याहि परिस्थितींत लडाखचा प्रदेश चीनच्या ताब्यांत जाणार नाहीं, याची खबरदारी आपण घेतली पाहिजे. बरें, केवळ लडाख आपल्याकडे ठेवून काश्मीरचें खोरें पाकिस्तानला दिलें, तर लडाखकडे जाण्याचा मार्ग त्या खोऱ्यांतूनच असल्यामुळें लडाखचें भवितव्य पाकिस्तानच्या इच्छेवर अवलंबून राहील. म्हणून एकूण भारताच्या संरक्षणाचा विचार

करतां काश्मीर खोरें भारताच्या ताब्यात राहणें अत्यंत आवश्यक आहे, ही गोष्ट सहज लक्षांत यावी.

या विषयांतराचा हेतु असा कीं, पाकिस्ताननें गुंडगिरीचेंच धोरण पुढें चालविलें तर त्याच्याशीं मैत्री प्रस्थापित होणें शक्य होणार नाहीं, आणि वाटेल ती किंमत देऊन पाकिस्तानशीं समझोता करणें भारताला धोकादायक ठरणार आहे, ही गोष्ट वाचकांना स्पष्ट कळावी. याचा अर्थ असा नव्हे कीं, आपण पाकिस्तानशीं शत्रुत्व ठेवावें. शत्रुत्व हें नेहमींच महाग पडतें; म्हणून शत्रुत्वाची भावना पोशीत राहण्यांत कांहीं अर्थ नसतो, परंतु पाकच्या मैत्रींतील धोके लक्षांत ठेवून आपण त्याच्याशीं मैत्रीचा प्रयत्न चालू ठेवला पाहिजे.

परंतु खरा मुद्दा पाकेतर शेजाऱ्याचा आहे. ब्रह्मदेश, इंडोनेशिया, इंडोचायना, मलाया, जावा, सुमात्रा, सिलोन वगैरे देशांशीं आपली मैत्री कितपत घनिष्ठ आहे ? ती तशी नसेल तर त्याला कोण जबाबदार आहे ? पण त्या सर्वांपेक्षांहि आमच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालणारें उदाहरण नेपाळचें आहे. वस्तुतः नेपाळ हा हिंदूंचा देश. भारताशीं त्याचें धर्माचें नातें आहे. दरसाल लाखों भारतीय पशुपतिनाथाच्या दर्शनासाठीं नेपाळला जातात, तर कित्येक नेपाळी भक्त काशी-रामेश्वराच्या यात्रेसाठीं भारतांत येतात. परंतु हिंदुस्थान व हिंदुधर्म यांच्या विनाशासाठीं टपलेल्या पाकिस्तानच्या गळ्यांत गळा घालण्यास नेपाळला मुळींच संकोच वाटत नाहीं. आज नेपाळचे आर्थिक संबंध भारतापेक्षां पाकिस्तानशींच अधिक दृढ होत आहेत. केवळ भारतावर अवलंबून राहावें लागूं नये आणि चितगांवच्या बंदरांतून नेपाळला मालाची वाहतूक करतां यावी म्हणन त्या दोन देशांत करार होत आहेत, व्यापारी शिष्टमंडळें एकमेकांच्या देशांना भेटी देत आहेत आणि आम्ही हिरमुसलेपणानें त्यांची वाढती मैत्री पाहत आहोंत. तिकडे चीनशींहि नेपाळची मैत्री वाढत आहे. ल्हासा व काठमांडू यांना जोडणारा राजरस्ता बांधण्याच्या कामीं चीन व नेपाळ यांच्यांत एका करारावर नुकत्याच (ता. १४ जानेवारी १९६३ रोजीं) सह्या झाल्या आहेत. या रस्त्यानें येणारा चिनी अजगर आपल्याला चुटकीसरशीं गिळंकृत करील, एवढें समजण्याची बुद्धि नेपाळजवळ नसेल काय ? कीं खेडेगांवांत गुंडांच्या आश्रयानें जगणाऱ्या निरुपद्रवी लोकांप्रमाणें दुबळ्या

भारतापेक्षां दांडगेश्वर चीनचीच मर्जी संपादण्यांत व्यावहारिक शहाणपणा आहे असें नेपाळला वाटत असेल ?

जगाच्या पाठीवर पिढ्यानुपिढ्या राहत असलेल्या चिनी लोकांना लाल चीन आपले नागरिक मानतो आणि त्यांच्याशीं सतत संपर्क ठेवून आपल्या प्रचारासाठीं त्यांना राबवतो. परंतु आम्ही मात्र सिलोन, ब्रह्मदेश, आफ्रिका, ब्राझील, मादागास्कर वगैरे ठिकाणीं असलेल्या भारतीयांशीं नुसते सांस्कृतिक संबंधहि ठेवण्याची तरतूद केलेली नाहीं; मग नेपाळकडे दुर्लक्ष केलें असल्यास काय आश्चर्य ? खरें म्हणजे नेपाळमध्यें लोकशाही राजवट चालू होती त्या वेळींच भारतानें त्याच्याशीं दृढ मैत्रीचे संबंध प्रस्थापित करावयास हवे होते. त्या राजवटीचे संचालक कोइराला बंधू व त्यांचे सहकारी हे भारतीय नेत्यांच्या मार्गदर्शनाखालीं तयार झालेले कार्यकर्ते होते. त्यांच्याशीं योग्य सल्लामसलत करून नेपाळला भारतांत सामील करून घेणेंहि कांहीं अशक्य नव्हतें. (तीच गोष्ट भूतान व सिक्कीम यांची.) परंतु कोरियांतील व कांगों-तील विकतचीं श्राद्धें करण्यांत आपण इतके गुंग झालों होतों कीं नेपाळ-भूतान-कडे लक्ष देण्यासहि आपल्याला सवड झाली नाहीं व नेपाळला आपण चीनच्या पंखाखालीं खुशाल जाऊं दिले. नेपाळ-भारतांतील सांस्कृतिक ऐक्य हें अटळ सत्य नव्हतें काय ? मग त्याचा पराभव कां झाला ? तें सत्य विजयी कां होऊं शकलें नाहीं ? याचें कारण एवढेंच कीं, सत्य हें स्वयंप्रकाशी असतें अशा गैरसमजुतींत आपण गुरफटून राहिलों.

सत्यालाहि प्रचाराच्या कुबडच्या हव्यात :

'सत्यमेव जयते' हें भारताचें ब्रीदवाक्य आहे. सत्याच्या बाजूला आपण सदैव राहिलों तर, किंवा सत्य आपल्या बाजूला असेल त्या वेळीं अखेर आपलाच जय होईल, अशी श्रद्धा हें ब्रीदवाक्य स्वीकारण्याच्या मुळाशीं होती व आजहि आहे. परंतु या बाबतींत आपल्याकडून एक फार मोठी चूक झाली. ती अशी कीं, सत्य हें सदैव स्वयंप्रकाशी व स्वावलंबी असल्यामुळें त्याच्या प्रचारासाठीं विशेष प्रयत्न करण्याची कांहीं जरूर नाहीं, अशी आपण समजूत करून घेतली आणि त्या बाबतींत आपण फार गाफील राहिलों. भारतीय जनता ही नेपाळी जनतेच्या रक्तमांसाचींच माणसें आहेत, धर्मबांधव आहेत, ही गोष्ट जितक्या

प्रकर्षानें नेपाळी जनतेसमोर मांडावयास हवी होती तेवढी आपण मांडली नाहीं. लंडन-वॉशिंग्टन-मॉस्कोच्या वकिलातींवर लक्षावधि रुपये आपण अक्षरशः उधळले, परंतु नेपाळमधील कामाकडे संपूर्ण दुर्लक्ष केलें, त्याचा परिणाम आपण आतां पाहत आहोंत. चीनचें आक्रमण हा आपल्यालाहि धोका आहे, हें स्पष्ट दिसत असूनहि नेपाळनें त्याविरुद्ध निषेधाचा एक शब्दहि काढला नाहीं.

चीन व पाकिस्तान यांच्या बाबतींतहि आपला परदेशांतील प्रचार फार तोकडा पडला, हें स्पष्ट दिसत आहे. पाकिस्ताननें काश्मीरवर स्वारी करून आंतरराष्ट्रीय गुंडगिरी केली आहे, हें इतकें धडधडीत सत्यहि जगांतील देशांना दिसूं नये आणि त्यांनीं काश्मीर प्रश्नांत भारतालाच दोषी ठरवावें, याचा अर्थ काय ? आणि चीनचें आक्रमण हा खरोखरीं आंतरराष्ट्रीय गुन्हा व विश्वासघात आहे हें सूर्यप्रकाशाइतकें ढळढळीत सत्य आफ्रो-आशियाई देशांना पटवून देण्यासाठीं आपल्या सरकारच्या उच्च प्रतिनिधींना व मंत्र्यांना ऐनवेळीं धांवपळ करावी लागली, याचा अर्थ काय ? त्या देशांत आपल्या वकिलाती नव्हत्या काय ? त्या इतके दिवस काय नुसत्या झोंपाच काढीत होत्या ? या वकिलातींवर वर्षानुवर्षें कोटचवधि रुपये खर्च करूनहि परदेशी लोकांना आपल्या बाजूला असलेल्या सत्याचें दर्शन घडविण्याची कामगिरी त्यांना करतां येत नसेल तर त्या वकिलातींचा काय उपयोग ? जनतेनें दिलेल्या कराचा तो दुरुपयोगच नव्हे काय ? आजचें युग प्रचाराचें, जाहिरातीचें आहे, म्हणून नाकें मुरडून आपण स्वस्थ बसलों तर आपल्या बाजूचें सत्य हें पाहतां-पाहतां असत्य ठरेल आणि 'असत्यमेव जयते' अशी जगाप्रमाणेंच आमचीहि समजूत होऊन बसेल. म्हणून आपल्या सत्याला प्रचाराचे प्रभावी पंख लावून त्याला सर्वतो-गामी बनविण्याचा प्रयत्न आपण अधिकाधिक नेटानें केला पाहिजे.

सत्याच्या विजयासाठीं कंबर कसूं या ! :

या साऱ्या विवेचनाचा मथितार्थ एवढाच कीं, आपण सत्याच्या विजया-साठीं कटिबद्ध झालें पाहिजे. महात्मा गांधींनीं म्हटल्याप्रमाणें,

" सत्य सदैव स्वयंसिद्ध असतें आणि कांहीं झालें तरी तें न सोडणें हेंच सर्वांचें कर्तव्य आहे...सत्य आणि अहिंसा यांची तुलना काय करायची ? पण करावीच लागली तर मी म्हणेन, कीं सत्य हें अहिंसेहून श्रेष्ठ आहे.

कारण असत्य ही सुद्धां हिंसा आहे. ज्याला सत्य प्रिय आहे तो केव्हां ना केव्हां अहिंसेप्रत जाणारच ! ...त्रिकालाबाधित वस्तु एक सत्य हीच आहे. कारण, जरी अहिंसा व सत्य हीं एकच असलीं तरी दोहोंमध्यें निवड करण्याची पाळी आली तर **अहिंसेच्या ठिकऱ्या करून सत्याची स्थापना करण्याला मी कचरणार नाहीं**. सत्य हेंच माझ्या मतानें सर्वश्रेष्ठ आहे... आपल्याला सत्य कितपत प्रिय आहे आणि तें आपण विचारांत, उच्चारांत व आचारांत कितपत पाळतों हें स्वत:ला विचारलें पाहिजे. जो मनुष्य सत्यनिष्ठ नाहीं तो अहिंसेपासून दूर आहे."

['गांधी विचार दर्शन' : सत्याग्रह विचार : पृष्ठें १६-१७]

गांधीजींचें हें मार्गदर्शन म्हणजे अत्यंत सुस्पष्ट असें एक त्रिकालाबाधित सत्यच आहे. केवळ गांधीवाद्यांनींच नव्हे तर सर्वांनीं तें आचरिलें पाहिजे. आजच्या संदर्भांत कम्युनिस्ट चीननें भारतावर विश्वासघाती आक्रमण केलेलें असून साऱ्या सामर्थ्यानिशीं तें परतून लावणें भारतीयांचें प्रथम कर्तव्य आहे, हें मुख्य सत्य. तें कसें परतवून लावावयाचें, हिंसेनें कीं अहिंसेनें, हा गौण भाग आहे. हिंसक प्रतिकारांत सामील होणें गांधीवाद्यांना अवघड वाटत असेल तर त्यांनीं प्रतिकाराचा अहिंसक मार्ग शोधून तो अमलांत आणला पाहिजे. केवळ तात्त्विक चर्चा करून कांहीं फायदा नाहीं. सुप्रसिद्ध अध्यात्मसाधक व थोर विचारक श्री केदारनाथजी यांनीं म्हटल्याप्रमाणें गांधीवाद्यांची भूमिका उच्च असली तरी बहुजनसमाज इतका उच्च विचार करणारा नाहीं. जीं साधनें हाताशीं असतील त्यांनीं आपलें रक्षण कसें करावयाचें एवढेंच त्याला हवें आहे. जो कोणी ही शक्ति निर्माण करील, त्याच्यामागें जनता जाईल, जनता कोणासाठीं थांबणार नाहीं* हेंच खरें !

● ● ●

* श्री गोविंदराव कोरगांवकर, धर्मादाय संस्था, कोल्हापूर या संस्थेच्या गोकाक येथील संमेलनांत ता. ४-११-१९६२ रोजीं मांडलेले विचार.

मुलांमुलींना चारित्र्यसंपन्न करण्यासाठीं
प्रत्येक पालकानें आपल्या मुलांस हीं
पुस्तकें अवश्य वाचायला द्यावींत.

भारताचे मानकरी माला

संच १ ला

एकूण पुस्तकें २० ::: किंमत रु. १५=००

१ गुरु नानक	०–८०	११ राणा प्रताप	०–८०
२ श्री चैतन्यप्रभु	०–८०	१२ हैदर अली	०–६०
३ संत मीराबाई	०–८०	१३ राणी चन्नमा	०–६५
४ संत कबीर	०–८०	१४ ईश्वरचंद्र विद्यासागर	०–८०
५ श्री बसवेश्वर	०–८०	१५ रवींद्रनाथ टागोर	०–८०
६ संत एकनाथ	०–८०	१६ पंडित मालवीय	०–८०
७ नरसी मेहता	०–८०	१७ थोर गणिती रामानुजन	०–५०
८ श्रीरामकृष्ण परमहंस	०–८०	१८ प्रफुल्लचंद्र रॉय	०–६५
९ स्वामी विवेकानंद	०–८०	१९ देशबंधु दास	०–६५
१० सम्राट अशोक	०–८०	२० डॉ. बाबासाहेब आंबेडकर	०–७५

विदर्भ मराठवाडा बुक कंपनी
१३२० शुक्रवार पेठ : पुणें २.